03-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGJ/ 10:30

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SGJ/ MMP/ AKN/ 10:30

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) **:** आज स्व.यशवतंराव चव्हाण यांची जयंती असल्यामुळे त्यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्यासाठी मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.30 ते 10.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी.: राज्यात दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे विदर्भ,कोकण, मराठवाड्यासह बहुतांश भागात शेतीमालाचे झालेले नुकसान

मु.शी.: राज्यात दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे विदर्भ,कोकण, मराठवाड्यासह बहुतांश भागात शेतीमालाचे झालेले नुकसान ***या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, जयंत प्र.पाटील, सुनिल तटकरे, संजय दत्त, कपिल पाटील, रामराजे निंबाळकर, शरद रणपिसे, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरसिंह पंडित, राजेंद्र मुळक, दिपकराव साळुंखे, अब्दुल्ला खान दुर्राणी, सतिश चव्हाण, जयवंतराव जाधव, विजय सावंत, संदीप बाजोरिया, श्रीकांत देशपांडे, नरेंद्र पाटील, दत्तात्रय सावंत, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, किरण पावसकर, ॲड. हुस्नबानू खलिफे, श्री.प्रकाश बिनसाळे, प्रा.जोगेंद्र कवाडे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, विक्रम काळे, मुझफ्फर हुसेन सय्यद, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.राहुल नार्वेकर, सर्वश्री हरिसिंग राठोड, अनिल भोसले, सुभाष झांबड, वि.प.स.*** यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु..)

उप सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी.

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, राज्यात पडलेला दुष्काळ, नंतर झालेली गारपीट आणि अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्या संदर्भात मांडलेल्या विषयावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 70 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. मागील तीन वर्षापासून शेतकरी अवकाळी पाऊस, गारपीट आणि कोरडा दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीमुळे नाडला गेलेला आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी माझ्या शासनाने 4 हजार कोटी रुपयांची मदत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ....

उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते. परंतु शेतकऱ्यांना फक्त मदत करुन उपयोगाचे नाही तर अशा नैसर्गिक आपत्तीसाठी आपणास कायम स्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारचा नॅशनल डिझॅस्टर रिलिफ नावाचा फंड आहे, त्या धर्तीवर महाराष्ट्राने देखील डिझॅस्टर रिलिफ फंड केला तर अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी निधीची तरतूद करावी लागते, ती करावी लागणार नाही.

सभापती महोदय, जमिनीचा पोत पाहून हवामानावर आधारित पीक घेण्याचे प्रशिक्षण तालुका पातळीवर शेतकऱ्यांना दिल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो.

सभापती महोदय, पाण्याचे पर्क्युलेशन होण्यासाठी "जल युक्त शिवार योजना" ही चांगली योजना सरकारने हाती घेतली आहे. परंतु ही योजना तात्पुरत्या स्वरुपात न राहता ती कायम स्वरुपी राबविली पाहिजे.

सभापती महोदय, माझ्या जळगाव जिल्ह्यातील काही गावांमध्ये अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्त जास्त मदत मिळावी अशी माझी सरकारला विनंती आहे.

सभापती महोदय, माझ्या जिल्ह्यातील अनेक सिंचन प्रकल्पाची कामे रखडलेली आहेत. युतीच्या काळात माननीय श्री.एकनाथराव खडसे मंत्री असताना त्यांनी पाडासरे प्रकल्प मंजूर केला होता. परंतु मागील पंधरा वर्षापासून त्या प्रकल्पाचे काम रखडलेले आहे. सुरुवातीला त्या प्रकल्पाची किंमत 400 कोटी रुपये होती, आता त्या प्रकल्पाची किंमत 3600 कोटी रुपयांवर गेली आहे. तेव्हा याकडे सरकारने लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माझ्या जळगाव जिल्ह्यात बोरी नदी आहे. या नदीवर बंधारा बांधण्याची आवश्यकता आहे. आपण रखडलेले प्रकल्प पूर्ण केल्यास पाण्याचा प्रश्न सुटू शकेल, असे मला वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांची मुले शेतीवर अवलंबून असतात. या शेतकऱ्यांना पूरक जोडधंदा किंवा व्यवसाय उपलब्ध करुन दिल्यास आणि त्यासाठी तालुका पातळीवर प्रशिक्षण केंद्र उभारल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील असे मला वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ....

सभापती महोदय, आपण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला तर तलाठी आणि तहसीलदार यांच्याकडून शेतकऱ्यांचे पंचनामे होण्यास वेळ लागतो, तो होणार नाही आणि शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळू शकेल. तेव्हा त्यादृष्टीने सरकारने कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, इस्त्राईलच्या धर्तीवर विज्ञान, तंत्रज्ञान आणि शेती यांची सांगड घालावी. आपण अशा प्रकारच्या उपाययोजना केल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील असे मला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्यात झालेल्या दुष्काळ,गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्या संदर्भात मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, सभागृहाचे लक्ष एका वेगळ्या मुद्यावर वेधावयाचे आहे. मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. हा विषय अतिशय संवेदनशील असून या विषयाकडे ज्या गांभीर्याने पहावयास पाहिजे त्या गांभीर्याने पाहिले जात नाही ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे.

सभापती महोदय, मी औरंगाबाद येथील पैठण तालुक्यात गेली होती. त्या ठिकाणी थापटी तांडा येथे गावकऱ्यांना पाण्याचा पिंप 40 रुपयांना विकत घ्यावा लागत असल्याचे चित्र मी पाहिले.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण....

अत्यंत दु:खाची गोष्ट अशी की, 10-11 वर्षाच्या मुलीने चौथी-पाचवीत शाळा सोडून दिली आहे. तिचे आई-वडील ऊसतोडणी कामगार आहेत. ते वर्षातून सहा महिने घराबाहेर असतात. ती लहान मुलगी आपले शिक्षण अर्धवट सोडून आपल्या चार भावंडांचा सांभाळ करते. ती एकटी राहते. अशा अनेक शेतकऱ्यांच्या घरांना आम्ही भेटी दिल्या. अनेक गावांमध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा, म्हातारे आई-वडील आपले जीवन हालअपेष्टेत जगत आहेत. त्यांच्याकडे उपजीविकेचे अन्य साधन नाही. अशा परिस्थितीत त्यांना संसाराचा गाढा हाकणे कठीण झाले आहे. त्यामुळे ती मंडळी विवंचनेत असतात. अनेकदा शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर लादला जातो. त्यामुळे अशा शेतकऱ्यांसमोर आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरत नाही. त्यामुळेच शेतकरी आत्महत्येचे पाऊल उचलतो. त्याच्या आत्महत्येनंतर त्याची पत्नी, मुले, म्हातारे आई-वडील यांच्यासह संपूर्ण घराची जी वाताहत लागते ती भयंकर असते.

सभापती महोदय, या निमित्ताने मी सांगते की, आघाडी शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली होती. परंतु ती मदत अनेक ठिकाणी मिळाली नसल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. अनेक ठिकाणी विविध कागदपत्रांची पूर्तता करावयास सांगितले जाते, परिणामी यात वेळ वाया जातो. माझी मागणी आहे की, आघाडी शासनाने जाहीर केलेली मदत प्रत्येक शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना तातडीने देण्यात यावी. जी मदत दिली जाते त्यातील 60 टक्के रक्कम बँकेत ठेवली जाते आणि उर्वरित पैसा बाकीचे कर्ज फेडण्यात जाते. त्यामुळे पुन्हा ती वानवा शेतकऱ्यांच्या नशिबी असते. यावर काही तरी तोडगा काढला पाहिजे. आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे. राज्य सरकारने सांगितले की, शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले कर्ज राज्य सरकारच्या वतीने फेडण्यात येईल. पण मी निदर्शनास आणून देते की, अनेक ठिकाणी केवळ कर्जच घेतले जाते असे नाही. अनेकदा शेतकरी इतरांकडून उसनवारी करून पैसे घेतात. अशा शेतकऱ्यांना सुध्दा शासनाने तातडीने मदतीचा हात देणे आवश्यक आहे. विदर्भात भयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे. मराठवाडा आणि खानदेशात सुध्दा तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. खानदेशमध्ये सुध्दा काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी पावसाळ्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण....

ज्यावेळी पावसाची वाट पाहतो नेमका त्यावेळी पाऊस पडत नाही. आपण सांगतो की, ग्लोबल वार्मिंगमुळे हवामानात बदल झाला आहे. त्यामुळे अवकाळी पाऊस ही नवीन पध्दत सुरु झाली आहे. आज अनेक ठिकाणी गारपीट होते. नाशिकमध्ये गारपीट झाल्यामुळे द्राक्ष आणि कांदा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. कोकणात सुध्दा आंबा पिकाचे पूर्ण नुकसान झाले आहे. कोकणातील शेतकरी श्रीमंत नाही.

सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी भाषणात सांगितले की, कोकणात आंबा पिकाचे नुकसान झाले तर काजू पीक हातात असते. काजू पिकाचे नुकसान झाले तर फणस हे पीक हातात असते आणि फणसाचे नुकसान झाले तर नारळ पीक हातात असते. मला वाटते सन्माननीय सदस्यांना कोकणाची पूर्ण माहिती नाही, म्हणून ते असे बोलले. मी त्यांना सांगू इच्छिते की, त्यांनी कोकणाची संपूर्ण माहिती करुन घेणे आवश्यक आहे. कोकणातील शेतकरी हा अतिशय गरीब आहे. त्याच्याकडे आंब्याची केवळ 5-10 झाडे असतात. कोकणातील शेतकरी आपली शेती नीटनेटकी कशी करावी, झाडांची देखभाल कशी करावी, झाडांची राखण कशी करावी, आंब्याचे मार्केटींग कसे करावे याचे नियोजन अतिशय कुशलतेने करीत असतो. शिवाय सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे असेही म्हणाले की, कोकणात आत्महत्या का होत नाहीत. मी त्यांना सांगू इच्छिते की, कोकणातील प्रत्येक माणूस रोजीरोटीसाठी मुंबईत आलेला आहे. कोकणातील म्हातारे आई-वडील मुंबईत कामानिमित्त आलेल्या मुलांच्या मनीऑर्डरवर जगायचे. कोकणचा इतिहास आहे की, कोकणातील अनेक माणसे मुंबई, ठाणे या ठिकाणी नोकरीसाठी आलेले आहेत. आज अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे कोकणातील आंबा व काजूंच्या बागा पूर्णतः उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, 25 दिवसांपूर्वी कोकणात आंब्याला प्रचंड मोहोर आला होता. ती झाडे किती सुंदर दिसतात हे एकदा जाऊन पहावे असे वाटत होते. झाडाला आलेला मोहोर बघून शेतकरी सुध्दा आनंदात होते. पण 8-10 दिवसांपूर्वी कोकणात अवकाळी पाऊस झाला आणि झाडाला आलेला पूर्ण मोहोर धुवून निघाला. इतकेच नव्हे तर आता आंब्यावर करपा रोग

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे या वर्षी आंबा पीक हातात येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ..3..

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) C-3

SJB/ MMP/ AKN/ पूर्वी श्री.अजित... 10:50

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, कोकणातील महिला गरीब असली तरी ती नीटनेटकी राहते. सडा-सारवण करते. आपल्या अंगणातील झाडाचे फूल आपल्या अंबाड्यात लावून ती तिचे व्यवस्थापन करते. याबद्दल कोकणातील महिलेचे कौतुक केले पाहिजे. ती आपल्या घरादाराचा गाढा समर्थपणे पेलते. मराठवाडा आणि विदर्भातील लोक सुध्दा अत्यंत कष्टकरी आहेत. शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांमुळे त्यांचे कुटुंबीय अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना मी स्वतः भेटी दिल्या आहेत.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे वृध्द आई-वडील आणि कुटुंबीय कशाप्रकारे जीवन जगतात हे भयानक चित्र आम्ही बघितले. देशामध्ये सर्वात जास्त आत्महत्या आपल्या राज्यात होत आहेत. तुम्ही आमच्यापेक्षा चांगले काम करता किंवा आम्ही तुमच्यापेक्षा चांगले काम करतो हा विषय महत्त्वाचा नाही. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत कशी मिळेल यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. मी तर म्हणेन की, केंद्र सरकारकडे जाऊन त्यांच्याकडे मदतीचा हात मागितला पाहिजे. ज्यावेळी राज्यात अवकाळी पाऊस व गारपीट झाली होती त्यावेळी केंद्राची एक टीम राज्यात पाहणी करण्यासाठी आली होती. त्या टीमने आपला अहवाल दिला आहे. पण केंद्राने जी मदत जाहीर केलेली आहे त्यात महाराष्ट्र राज्याचा कोठेही विचार झाला नाही. त्याचा आम्हाला संताप, राग आणि चीड आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या इतक्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असताना केंद्र सरकारकडून महाराष्ट्राकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. मला वाटते राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी माननीय पंतप्रधान आणि केंद्र शासनाकडून मदतीचा हात मिळणे आवश्यक आहे. तत्कालीन पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये माननीय श्री.शरद पवार साहेब हे कृषी मंत्री होते. हल्ली माननीय श्री.शरद पवार साहेबांवर टीका करणे हा सर्वांचा आवडता विषय झालेला आहे. परंतु माननीय श्री.शरद पवार साहेबांनी गेल्या 10 वर्षात शेतीसाठी प्रचंड योगदान दिले आहे, ही बाब नाकारुन चालणार नाही. फळबागा, फुलबागा,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

भाजीपाला, गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, आंबा पीक इत्यादींबाबत जर कोणी क्रांतिकारी बदल घडवून आणले असतील तर ते केवळ तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार

श्रीमती विद्या चव्हाण....

साहेबांनी आणले आहेत. ज्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांना फ्रॅक्चर झाले त्यावेळी अवकाळी पाऊस व गारपीट झालेली असताना त्यांना वाटत होते की, अशा परिस्थितीत मी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलो पाहिजे, त्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना नेहमीच आदेश दिलेले आहेत की, तुम्ही शेतकऱ्यांपर्यंत जाऊन त्यांना मदतीचा हात द्यावा. माननीय श्री.शरद पवार साहेबांसारखी कळकळ आणि तळमळ आताच्या राज्य सरकारमध्ये दिसावयास पाहिजे, असे मला वाटते. शेतकऱ्यांना जी मदत करावयाची आहे ती तातडीने केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असताना केंद्र सरकारकडून मदत मिळत नाही. मोदी सरकार सत्तेवर आले त्यावेळी संपूर्ण देशातील लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या. त्या बरोबरच शेतकऱ्यांच्या सुध्दा अपेक्षा वाढल्या होत्या. लोकांना वाटायचे की, या सरकारकडून मदत मिळते. परंतु आजपर्यंत केंद्र सरकारकडून मदतीचा हात पुढे आलेला नाही.

महोदय, या चर्चेच्या निमित्ताने माझी मागणी आहे की, विकास कामांवर होणारा सर्व खर्च थोडे दिवस बाजूला ठेवून, तळागाळातील शेतकऱ्यांना मदत करून त्यांना वाचवले पाहिजे. आपण फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये जेवण करा किंवा झोपडीमध्ये बसून भाजी-भाकरी खा, यावर मला काही म्हणायचे नाही. परंतु जर ताटात अन्न नसेल तर आपण काय खाणार, याचा देखील विचार केला पाहिजे. अन्न हे पूर्ण ब्रम्ह आहे असे केवळ म्हणून चालणार नाही. अन्नदाता संकटात असताना त्याला मदत केली पाहिजे. काल सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी चांगल्याप्रकारे विचार मांडले. त्यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी शेतकऱ्यांना मदत म्हणून द्यावा. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी काय करता येईल ते करा, पण या राज्यातील शेतकऱ्यांना मदत करावी. काही गोष्टी करणे आवश्यक आहे, उदाहरणार्थ शौचालय बांधणे आवश्यक आहे. या चर्चेवरील माझ्या भाषणाचा समारोप करताना सांगू इच्छिते की, या वर्षीचा आमदारांचा दोन-दोन कोटी रुपये आमदार निधी शेतकऱ्यांना मदत म्हणून द्यावा. ज्या गोष्टींमुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शेतकऱ्यांच्या जीवनमानात बदल होत असेल त्या गोष्टींसाठी प्रथम प्राधान्य द्यावे, एवढेच या निमित्ताने सांगते व माझे भाषण संपविते.

नंतर श्री.रोझेकर....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि गारपिटी संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. मी लांबलचक भाषण करण्याऐवजी केवळ दोन सूचना करणार आहे.

सभापती महोदय, अचानक आलेल्या पावसाला आपण अवकाळी पाऊस म्हणत असलो तरी ते निसर्गाचे बदललेले चक्र आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे आलेले संकट आहे. यामुळे शेतकऱ्यांची पिके गेलेली आहेत. शासन शेतकऱ्याला मदत करील तेव्हा करील पण किमान या संकटाबाबत आगाऊ इशारा देणे सहजशक्य आहे. चीनने अशा प्रकारचे एक मॉडेल विकसित केलेले आहे. त्या धर्तीवर आपल्या राज्याने स्वत:चे हवामान खाते विकसित करावे. या माध्यमातून आपल्याला शेतकऱ्याला आगाऊ सूचना देता येईल. महसूल मंत्री महोदयांनी या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांना विनंती करावी आणि याबाबतचा निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे. आताच झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीची सूचना नासाकडून आपल्याला मिळाली होती. ही सूचना आपण जिल्हाधिकाऱ्यांपर्यंतही पोहोचविली होती. परंतु, आपल्याकडे शेतकऱ्याला सूचना देण्याबाबतची यंत्रणा नसल्यामुळे खालपर्यंत ही सूचना देता येऊ शकली नाही व त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत आगाऊ सूचना पोहोचण्याची गरज आहे. या माध्यमातून शेतकरी होणारे नुकसान वाचविण्याचा प्रयत्न करु शकेल.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील जमीन आणि बदललेले पर्जन्यमान या संदर्भातील टेरीचा एक अहवाल प्रसिध्द झाला आहे. राज्यातील जमीन खराब होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. पुढील कालावधीत पर्जन्यमान कमी राहणार आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन पडणारे पाणी वाचविणे आणि पीक पध्दत बदलणे गरजेचे आहे. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, शासनाने टेरीचा या संदर्भातील अहवाल आणि या संदर्भातील शासनाची भूमिका श्वेतपत्रिकेव्दारा शक्य नसेल तर वेगळ्या पध्दतीने सभागृहापुढे मांडली तर भविष्यात शेतकऱ्यांना वाचविणे आपल्याला शक्य होईल. अशा प्रकारच्या दोन सूचना करतो आणि थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि गारपिटी संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, कालही या प्रस्तावावर सभागृहात चर्चा झाली आहे. काल आणि आज सन्माननीय सदस्यांनी या विषयासंदर्भात जे विचार मांडले आहेत, त्या विचारांशी मी सहमत असून काही वेगळे मुद्दे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात अल्पकालीन चर्चेला उत्तर देत असताना महसूल मंत्री महोदयांनी सभागृहात असे सांगितले होते की, आणेवारीची पध्दत बदलण्यासंदर्भात श्री.विकास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येईल. या समितीचा अहवाल शासनाला कधीपर्यंत सादर होणार आहे, याबाबतची माहिती आम्हाला मिळू शकलेली नाही. त्यामुळे ही माहिती देखील मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महसूल मंत्री महोदयांनी आणखी एक घोषणा हिवाळी अधिवेशनात केली होती. त्यांनी असे सांगितले होते की, कर्जमाफीचे पैसे शेतकऱ्यांना न देता सावकारांना देण्यात येतील. माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे किती सावकारांच्या खात्यांमध्ये पैसे जमा करण्यात आले आहेत आणि या घोषणेनंतर किती नवीन सावकार निर्माण झाले आहेत ?

सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे शेतकऱ्यांना कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही. खास करुन, कोकणातील भात शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना एकही पैसा मिळालेला नाही. त्यावेळी असे कारण सांगण्यात आले होते की, कोकणातील आणेवारी 50 पैशांपेक्षा जास्त आहे. परंतु, वस्तुस्थिती ही आहे की, कोकणामध्ये आणेवारी काढण्यासाठी अधिकारी प्रत्यक्ष शेतीची पहाणी करीत नाहीत. कार्यालयात बसून आणेवारीचे अहवाल पाठविले जातात. त्यामुळे माझी अशी आग्रहाची मागणी आहे की, शासनाने आणेवारीची पध्दत तातडीने बदलावी आणि नवीन पध्दतीने कशा प्रकारे आणेवारी काढण्यात येणार आहे, याबाबतची माहिती सभागृहाला द्यावी.

सभापती महोदय, काल या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी असे सांगितले आहे की, नुकसान झाल्यानंतर अधिकारी पंचनामे करतात, त्याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठवितात आणि त्यानंतर किती नुकसान भरपाई देण्यात यावी, याबाबतचा निर्णय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे.....

घेतला जातो. परंतु, यामध्ये फार मोठा कालापव्यय होतो आणि तेवढ्या काळात अनेक शेतकरी आत्महत्या करतात. त्यामुळे सॅटेलाईटव्दारे सर्वेक्षण झाले तर शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देणे शासनाला शक्य होईल. ही पध्दत अवलंबिण्यात यावी, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी आताच कोकणातील शेतकऱ्यांबाबत जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. कोकणातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत कारण त्यांच्याकडे अनेक पर्याय उपलब्ध असतात, असे एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. परंतु, तशी वस्तुस्थिती नाही. कोकणातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत म्हणून त्यांना काहीही नुकसान भरपाई द्यायची नाही, ही पध्दत बरोबर नाही. या वर्षी कोकणाला निसर्गाने साथ दिली नाही. तसेच, कोकणावर या सरकारचीही अवकृपा झालेली आहे. कारण, भात शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना या सरकारने काहीही नुकसान भरपाई दिलेली नाही.

सभापती महोदय, आपण मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने अनेक वेळा प्रवास केलेला आहे, आपल्याला याची पूर्ण जाणीव आहे. राज्यातील अन्य सर्व महामार्गांचे काम सुरु असताना मुंबई-गोवा महामार्गाचे काम बंद आहे. राज्यातील सर्व सिंचन प्रकल्पांची कामे सुरु असताना, विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांची कामे सुरु असताना कोकणातील एकाही सिंचन प्रकल्पाचे काम सुरु नाही. या सरकारला कोकणातील शेतकऱ्यांची काळजी असेल तर तातडीने कोकणातील सिंचन प्रकल्पांची कामे सुरु केली पाहिजेत. नैसर्गिक आपत्ती आपल्या हातात नाही. परंतु, या सरकारने शेतकऱ्यांची जी क्रूर चेष्टा केली आहे, सरकारने जी अवकृपा केली आहे, ती अगोदर थांबविली पाहिजे. थांबविलेली सिंचनाची कामे शासनाने तातडीने सुरु केली पाहिजेत.

सभापती महोदय, कोकणाच्या अर्थकारणाबद्दल मी दोन मिनिटे बोलणार आहे. कोकणाचे अर्थकारण पूर्णपणे कोलमडलेले आहे. हापूस आंबा, काजू आणि मासे यावर कोकणाचे अर्थकारण अवलंबून आहे. आज हापूस आंब्याचे 70 टक्के नुकसान झाले आहे. काजूचे 40 टक्के नुकसान झाले आहे. केवळ शेतकऱ्यांचेच नुकसान झाले आहे असे नाही तर मजुरांचे देखील नुकसान

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.हुस्नबानू खलिफे.....

झाले आहे. कोकणातील मजूर चार महिने आपल्या शेतीमध्ये भात शेती करतो आणि पुढील आठ महिने बागायतीमध्ये मजुरी करीत असतो. आज फळेच नसल्यामुळे, काढणी नाही, संगोपन नाही, त्यामुळे मजुराला मजुरी देखील मिळत नाही. अशा प्रकारे कोकणातील शेतकरी आणि मजूर हे दोन्ही कोलमडलेले आहेत.

सभापती महोदय, राज्यात अनेक कृषी विद्यापीठे आहेत. या कृषी विद्यापीठांना अधिक स्वायत्तता दिली पाहिजे. सभापती महोदय, कोकण कृषी विद्यापीठाची माहिती आपल्याला आहे. कोकणामध्ये फळांवर किंवा अन्य शेतीवर तुडतुडा या सारखे विविध रोग येतात. रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर कृषी विद्यापीठे संशोधनाला सुरुवात करतात. संशोधन पूर्ण होऊन औषध बाहेर येईपर्यंत संपूर्ण पिकाचा नाश होतो. त्यामुळे चांगल्या प्रकारचे संशोधन होण्यासाठी कृषी विद्यापीठांना स्वायत्तता देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, शासनाकडून प्रति झाड नुकसान भरपाई दिली गेली पाहिजे. परंतु, विदर्भ आणि मराठवाड्याप्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांना हेक्टरी मदत दिली जाते. एका हेक्टरमध्ये 100 झाडे लावलेली असतात. या वर्षी शासनाकडून एक हेक्टरपर्यंतची मर्यादा घालून नुकसान भरपाई देण्यात आली. एका हेक्टरला 9 हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात आली आहे. एका हेक्टरमध्ये 100 झाडे असल्यामुळे शेतकऱ्यांना प्रति झाड केवळ 90 रुपये नुकसान भरपाई मिळाली आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, 90 रुपयांमध्ये 1 डझन आंबा तरी मिळतो का ? हापुस आंब्याचे एक झाड 15 ते 20 वर्षे वाढवावे लागते त्यानंतर त्या झाडाला फळे येतात. म्हणून माझी मागणी आहे की, शासनाने प्रति झाड नुकसान भरपाई द्यावी.

सभापती महोदय, शासनाने पीक विमा योजनेची व्याप्ती वाढविली पाहिजे. निसर्ग जरी आपल्या हातामध्ये नसला तरी पीक विमा योजनेची व्याप्ती वाढविणे आपल्या हातामध्ये आहे. त्यामुळे या योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय शासनाने घ्यावा.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड हुस्नबानू खलिफे...

त्याचप्रमाणे एक विषय सर्वांकडून दुर्लक्षित राहिलेला आहे. फळांचे, शेतीचे, विटांचे नुकसान झालेले आहे. त्यांना मदतीची मागणी करण्यात आलेली आहे. परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व मिठागरे पावसामुळे वाहून गेली आहेत. तेथील सर्व मिठागरे नेस्तनाबूत झाली आहेत. त्या मिठागरांना देखील आवश्यक ती नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मी विनंती करते व माझे भाषण संपविते.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सभागृहात अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यात या वर्षी दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस व अत्यल्प पाऊस या सततच्या अस्मानी व सुलतानी संकटामुळे वैफल्यग्रस्त झालेला शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी होताना दिसत नाही ही मोठी धोकादायक बाब आहे. आताच सन्माननीय सदस्या श्रीमती खलिफे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी कोकणाबाबत माहिती दिली आहे. कोकणात ठाणे जिल्हा व नव्याने निर्माण झालेला पालघर जिल्हात येतो. अनेक सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, कोकणात आत्महत्या होतांना दिसत नाही. ही समाधानाची गोष्ट होती, परंतु ती आता समाधानाची बाब राहिलेली नाही. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात गेल्या दोन महिन्यात तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्यांची लागण कोकणात आणि ठाणे व पालघर जिल्ह्यात होऊ लागली आहे. त्या भागातील शेतकरी देखील वैफल्यग्रस्त होत चालला आहे. या शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या आहेत त्या पूर्ण करण्यात येत नाहीत. यामध्ये आंबा व इतर पिकांच्या बाबतीत ज्या मागण्या आहेत त्यांची पूर्तता शासनाकडून वेळीच करण्यात येत नाही.

सभापती महोदय, 1 मार्च रोजी वाडा तालुक्यातील ऐनशेत या गावातील श्री. लक्ष्मण ठाकरे या शेतकऱ्यांनी गळफास लावून आत्महत्या केली आहे. याचे कारण असे होते की, या शेतकऱ्यांवर 1 लाख 45 हजार रुपयांचे बँकेचे कर्ज होते. या कर्जाची मुद्दल रक्कम 91,920/- रुपये इतकी होती. काही कारणास्तव कर्जाचे हप्ते भरता न आल्यामुळे ती रक्कम वाढत जाऊन 1,45,000/- रुपये इतकी झाली होती. त्याचप्रमाणे या शेतकऱ्याने पोल्ट्री फॉर्म काढला होता. या पोल्ट्री फॉर्मचे विजेचे बिल थकित झाल्यामुळे त्यांचे वीज कनेक्शन कापण्यात आले होते. त्यामुळे उत्पन्नाचा सोर्स बंद झाला होता. शेवटी वैफल्यग्रस्त व नैराश्यातून या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे.

सभापती महोदय, नागपूर अधिवेशनाच्या वेळी मंत्री महोदय श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले होते की, आत्महत्या 100 टक्के बंद करण्याचा कोणताही फार्मूला नाही. असा फार्मूला कोणत्याही सरकारला किंवा कोणालाही देता येणार नाही, याची मला माहिती आहे. परंतु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर...

आत्महत्या कमी करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून झाला पाहिजे. मागील काळात आघाडी सरकारने केलेली मदत आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी दिलेली कर्जमाफी, वीज बिलांची माफी यासंदर्भात काही निर्णय घेतले हाते. असे निर्णय या सरकारने घेतले तर मला खात्री आहे की, आत्महत्येचे प्रमाण आटोक्यात येईल. असे काम सरकारने केले पाहिले. यामध्ये कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता आघाडी सरकारच्या काळात किती आत्महत्या झाल्या, आता किती आत्महत्या झाल्या आहेत, यापेक्षा या आत्महत्या आटोक्यात कशा आणता येतील यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. दीर्घकालीन उपाययोजनेबाबत वेगवेगळी चर्चा करण्यात येत आहे. काही दीर्घकालीन उपाययोजना झाल्या आहेत व काही करण्यात येत आहेत. या उपाययोजनांची गती वाढविण्याची गरज आहे. पाण्याचे व्यवस्थापन चांगल्या पध्दतीने करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते व औषधे जास्तीत जास्त सबसिडी देऊन स्वस्त दरात उपलब्ध करुन दिले पाहिजेत. शेतकऱ्यांसाठी कमी व्याजाचे, दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे. असे केले तर शेतकरी त्यांच्या पायावर उभे राहतील व त्यामुळे अस्मानी व सुलतानी संकटातून ते स्वतःचा बचाव व संकटाचा मुकाबला करु शकतील. या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय, मी एक शेतकरी आहे, या सभागृहाचा सदस्य म्हणून मला सरकारला अशी विनंती करायची आहे की, शेतकऱ्यांचे नैराश्य कसे कमी होईल यासाठी राजकीय चर्चा न करता जास्तीत जास्त उपाययोजना व जास्तीत जास्त मदत शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न करण्यात यावा. अशी मदत देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे असे सभागृहातील सन्माननीय सदस्यांना देखील पटावे व त्या अगोदर सत्तेत असलेल्या त्यांच्या मित्र पक्षांचे समाधान व्हावे व त्यांनी बाहेर बोलायचे बंद करावे. त्यांना घरचाच अहेर मिळत असल्यामुळे विरोधी पक्ष बोलतो त्यामध्ये किती तथ्य आहे हे त्यांना घरच्या अहेरातून कळून येते. याचा विचार करुन शेतकऱ्यांना मदत व दिलासा द्यावा. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात असा प्रयत्न शासनाने करावा अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-4

VVK/ AKN/ MMP/ प्रथम श्री.रोझेकर... 11:10

श्री.सुभाष झांबड (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सभागृहात अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सभागृहात गेल्या दोन दिवसांपासून ग्लोबल वार्मिंगमुळे जो अवकाळी पाऊस व गारपीट झाली आहे त्यावर चर्चा सुरु आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या याचा लेखाजोखा मांडला आहे. येथे दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांवर संकट आले आहे, यामध्ये जे नुकसान झाले त्यासाठी सरकारने काही नुकसान भरपाई द्यावी यावर चर्चा सुरु असून, जे शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्या आत्महत्यांची कारणे काय आहेत, याबाबत दुसरी चर्चा सुरु आहे.

सभापती महोदय, मला सांगतांना अत्यंत वाईट वाटते की, ही चर्चा सुरु असताना मागच्या सरकारच्या काळात किती आत्महत्या झाल्या, मागच्या सरकारचे काय पाप आहे, यावर सत्ताधारी पक्षाचे ज्येष्ठ सदस्य काल सभागृहात बोलत होते. गेल्या 15 वर्षाच्या आघाडी सरकारच्या काळात 5 हजार आत्महत्या झाल्या असे आताचे सत्ताधारी सांगत आहेत. हे सरकार असे सांगते की, आमचे सरकार 90 दिवसाचे लेकरु आहे, आघाडी सरकार 15 वर्षाचा युवक आहे. या सरकारच्या 90 दिवसाच्या कालावधीत जवळपास 300 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. 15 वर्षात 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून या सरकारच्या गणिताप्रमाणे हिशोब केला तर एका महिन्यात आघाडी सरकारच्या काळात जवळपास 27 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. आता भारतीय जनता पक्षाच्या सरकारच्या काळात एका महिन्यात जवळपास 100 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे या सरकारचेच गणित आहे. एका महिन्यात 100 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत याची कारणे अनेक आहेत. सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी काल असे सांगितले की, आघाडी सरकारच्या काळात भार नियमनामुळे आत्महत्या झाल्या आहेत.

सभापती महोदय, 1995 ते 1999 या काळात युतीचे शासन होते. या शासनाच्या काळात विजेचे संकट महाराष्ट्रावर आले होते. गेल्या 15 वर्षात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या आघाडी सरकारने भारनियमन कमी करण्याचे काम केले आहे. पंरतु आरोप करताना भार नियमनामुळे आत्महत्या झाल्या असे सांगितले जाते. आघाडी सरकारने शेतकऱ्यांना विजेची कनेक्शन्स दिलीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-5

VVK/ AKN/ MMP/ प्रथम श्री.रोझेकर... 11:10

श्री.सुभाष झांबड...

भारनियमन कमी केले, या तीन महिन्यात शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देण्यासाठी विजेची गरज असते. परंतु ज्या ठिकाणची डीपी जळाली आहे तेथील शेतकरी संकटात सापडला आहे. त्या शेतकऱ्यांना 15 दिवस, 30 दिवस किंवा 45 दिवसात डीपी मिळत नाही. डीपी घेण्यासाठी शेतकरी जातो त्यावेळी त्याला 70 टक्के पैसे भरण्याचा सल्ला तेथील अधिकारी देतात. एका डीपीवरील 10 शेतकरी वीज वापरतात व 10 शेतकरी वीज वापरीत नाहीत. जे शेतकरी वीज वापरतात ते पैसे भरतात व जे शेतकरी वीज वापरीत नाहीत ते पैसे भरीत नाहीत. जे शेतकरी वीज वापरतात ते संकटात आहेत. त्यांची उभी पिके जळत आहेत. त्यांना न्याय मिळत नाही म्हणून ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. आत्महत्येची कारणे अनेक आहेत, याबाबत सरकारने सभागृहाच्या माध्यमातून विचार करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना बी-बियाणे व खते योग्य प्रतीची मिळत नाही हे एक कारण आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड.....

जी खते, बियाणे मिळतात ती निकृष्ट दर्जाची असतात. त्यामुळे शेतकऱ्यांची पिके जळतात किंवा दुष्काळामुळे ती पिके होरपळून जातात. शेतकऱ्यांना स्वत:च्या खर्चाने किंवा व्याजाने पैसे घेऊन चांगल्या प्रतीचे बियाणे व खते खरेदी करावी लागतात आणि पेरणी करावी लागते. परंतु नंतर दुष्काळ पडतो आणि उत्पादन न झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सभागृहात सिंचनावर चर्चा झाली. मराठवाडा हा दुष्काळी भाग आहे. मी ज्या भागातून येथे आलो त्या वैजापूर आणि गंगापूर तालुक्यामध्ये अत्यंत कमी पाऊस पडतो. आमच्या जिल्ह्यात 700 ते 800 मि.मी. पाऊस पडत असेल तर वैजापूर, गंगापूर तालुक्यात 500 मि.मी.च्या आत पाऊस पडतो. माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, वैजापूर आणि गंगापूर तालुक्याला नांदूर मध्यमेश्वर योजनेच्या पाण्याचा थोड्या फार प्रमाणात उपयोग झाला. परंतु आपण जर त्या योजनेची रोटेशन पद्धत बदलली तर निश्चितपणे शेतकऱ्यांना त्याचा फायदा होऊ शकतो आणि दुष्काळामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो, असे मला वाटते. तसेच, आमच्या तालुक्यात रामकृष्ण-गोदावरी ही दुसरी योजना आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी खान्देशातील तापी खोऱ्यात असलेल्या सर्व उपसा जल सिंचन योजना शासनाच्या माध्यमातून टेकओव्हर करून सुरु केलेल्या आहेत. परंतु आमची रामकृष्ण-गोदावरी उपसा जल सिंचन योजना मागील अनेक वर्षांपासून बंद पडलेली आहे. शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत. शासनाने रामकृष्ण-गोदावरी उपसा जल सिंचन योजना ताब्यात घेऊन ती कार्यान्वित केली तर 54 गावांचा पाण्याचा प्रश्न सुटेल आणि त्यामुळे 17,500 हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकते.

सभापती महोदय, मी सभागृहात दुष्काळाच्या विषयावर बोलत आहे. आपण मला बोलण्यासाठी थोडा वेळ वाढवून द्यावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : मी आपल्याला सांगू इच्छितो की, या चर्चेमध्ये आणखी तीन सन्माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे भाषण होणार आहे. आपले भाषण सुरु होऊन आता 8 मिनिटे झालेली आहेत. आपण एक-दोन मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, पीक विमा योजना दोन प्रकारे राबविली जाते. हवामानावर आधारित योजना आणि उत्पादनावर आधारित योजना, अशा दोन प्रकारे ही योजना राबविली जाते. उत्पादनाच्या आधारावर योजना राबविण्यासाठी महसूल, कृषी आणि ग्रामीण खाते या तीन विभागांचा समन्वय असला पाहिजे. खऱ्या अर्थाने या तीन विभागांचा समन्वय असल्याशिवाय शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा मिळत नाही. कृषी विभागाने महसूल विभागाला माहिती दिली तर महसूल विभागाच्या माध्यमातून ती माहिती पुढे पाठविली जात नाही. म्हणून पीक विमा उतरवून देखील शेतकऱ्यांना त्या योजनेचा फायदा होत नाही. म्हणून माननीय महसूल मंत्री आणि कृषी मंत्र्यांनी याकडे लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा फायदा मिळाला पाहिजे यासाठी तिन्ही विभागांमध्ये समन्वय असला पाहिजे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, ज्या भागात ज्या पिकाचे जास्त उत्पादन होते त्या पिकाचा विमा उतरविला जात नाही. ज्या भागात ज्या पिकाचे कमी उत्पादन होते त्या पिकाचा विमा उतरविला जातो. समजा औरंगाबाद जिल्ह्यात कापूस जास्त पिकत असेल आणि सोयाबीन कमी प्रमाणात पिकत असेल तर सोयाबीनचा विमा उतरविला जातो आणि नगर जिल्ह्यात सोयाबीन जास्त पिकत असेल तर तेथे कापूस पिकाचा विमा उतरविला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने जो फायदा मिळावयास पाहिजे तो मिळत नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या शेत मालाला हमी भाव मिळाला पाहिजे. परंतु कापूस, ऊस, डाळिंब किंवा इतर शेत मालाला हमी भाव मिळत नाही. शेतकरी अशाश्वत आहेत. शेतकऱ्यांसाठी शाश्वत असे काहीच नाही.....

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष झांबड यांना सांगू इच्छितो की, आपले भाषण सुरु होऊन आता 11 मिनिटे झालेली आहेत. आपण भाषणाचा समारोप करावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव मिळाला पाहिजे. विजेचा कायम स्वरूपी पुरवठा झाला पाहिजे. पीक विमा योजनेमध्ये समन्वय आणि शेतकऱ्यांना मोटिवेट करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून शेतकरी मेळावे आयोजित केले पाहिजेत.

सभापती महोदय, मला बोलण्यासाठी वेळ कमी मिळालेला आहे. आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भात 40 वर्षापासून सिंचनाचा अनुशेष आहे. मी विदर्भातील असल्यामुळे विदर्भातील परिस्थिती सभागृहासमोर मांडण्यासाठी मला थोडा अधिक वेळ द्यावा. कमीत कमी बोलण्याचा तरी अनुशेष निर्माण होऊ नये. आपण मला बोलण्यासाठी जो वेळ दिलेला आहे त्यापेक्षा दोन मिनिटे अधिक वेळ द्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, काल या चर्चेत भाग घेताना सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी जो विषय मांडला तो अतिशय संवेदनशील विषय होता. आज शेतकरी अडचणीत असल्यामुळे आपण कोणत्याही पक्षाचे असलो तरी ज्यावेळी आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करतो, भाष्य करतो, उपाययोजना करण्यासंबंधी चर्चा करतो त्यावेळी आपण आपले राजकीय जोडे बाहेर ठेवून हे कार्य केले पाहिजे, असे त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले. मी सांगू इच्छितो की, मागील दोन-तीन महिन्यात ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्यापैकी मनाला चटका लावून गेलेल्या दोन-तीन आत्महत्यांविषयी मी बोलणार आहे. अकोला जिल्ह्यात मुराडखड गावातील श्री.किसन इंदूरे नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. मी त्या शेतकऱ्यांच्या घरी गेलो होतो. त्या शेतकऱ्याने स्वत:चे सरण रचले आणि त्यावर उडी घेऊन आत्महत्या केली. आर्णी तालुक्यातील मुकींदपूर गावातील 24 वर्षीय श्री.प्रशांत इंगोले नावाच्या शेतकऱ्याचे लग्न होते. परंतु त्याच्या हाताला लग्नाची मेहंदी लागलेली असताना त्या नवरदेवाने लग्नाच्या अगोदरच्या दिवशी आत्महत्या केली. आर्णी तालुक्यातील दाभळी गावात माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांनी तेथे चाय पे चर्चा हा विषय घडवून आणला. त्या गावातील श्री.विठ्ठल राठोड नावाच्या शेतकऱ्याने मागील आठवड्यात आत्महत्या केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरून आपल्या राज्यात शेतकऱ्यांची काय परिस्थिती आहे हे लक्षात येते. शासनाने या संदर्भात ज्या उपाययोजना करावयास पाहिजेत त्या संदर्भातील दोन-तीन गोष्टी मी सभागृहाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यात अर्णावती प्रकल्प आहे. त्या प्रकल्पाचा डावा कालवा 55.90 कि.मी. आणि उजवा कालवा 44.20 कि.मी. आहे. परंतु आज परिस्थिती अशी आहे की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग.....

त्या प्रकल्पाचे पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचलेले नाही. ज्या शेतकऱ्यांनी माझ्या शेताला पाणी मिळेल म्हणून 25 वर्षापूर्वी या प्रकल्पासाठी आपली जमीन दिली त्या शेतकऱ्यांना प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन देखील अद्याप पाणी मिळत नाही. आपण कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी कसे पोहोचविणार आहात, या संदर्भात उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी धडक सिंचन विहीर योजने संदर्भात सांगू इच्छितो की, आर्णी तालुक्यातील आढावा घेतल्यानंतर असे लक्षात आले की, धडक सिंचन विहीर योजनेचा 948 विहिरींचा लक्षांक होता. त्याचे शेड्युल ए, बी आणि सी असे तीन शेड्युल करण्यात आले. शेड्युल ए मधील 490 विहिरींची कामे पूर्ण झाली. शेड्युल बी मधील 324 विहिरींची कामे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून घेण्यात आली आणि धडक सिंचन विहीर योजने अंतर्गत 57 विहिरी होत्या. परंतु ज्या 324 विहिरी घेतल्या त्या विहिरींसाठी त्यांना ऑनलाईन मस्टर भरणे आणि इतर ज्या गोष्टी आहेत त्याची पूर्तता करणे कठीण होत असल्यामुळे ते शेतकऱ्यांना अडचणीचे होते. म्हणून या सर्व विहिरींची कामे धडक सिंचन विहीर योजनेतून करण्यात यावीत, असे माननीय मुख्यमंत्र्यांनी यवतमाळ जिल्ह्याचा आढावा घेताना सांगितले. परंतु मार्च महिन्यापर्यंतची परिस्थिती अशी आहे की, जवळपास 16,378 विहिरी पश्चिम विदर्भ आणि वर्धा जिल्ह्यातील शिल्लक आहेत. आज परिस्थिती अशी आहे की, विदर्भातील धरणांमध्ये 5.36 टक्के गाळ साठलेला आहे. हा महत्वाचा विषय आहे. ज्यावेळी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.एकनाथ शिंदे साहेब विधान सभेचे विरोधी पक्षनेते होते त्यावेळी त्यांनी अकोला जिल्ह्याला धावती भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी काही मागण्या केल्या होत्या. शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी ताबडतोब दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये मदत द्यावी. माझी मागणी एवढीच आहे की, आज ते शासनामध्ये आहेत. त्यांनी याकडे लक्ष द्यावे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग.....

संकटग्रस्त शेतक-यांचे वीज बिल व कर्जही माफ करावे. इतकेच नव्हे तर दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता विदर्भातील शेतकऱ्यांना विशेष पॅकेज देण्यात यावे अशी भूमिका तत्कालीन विधानसभा विरोधी पक्षनेते श्री.एकनाथ शिंदे यांनी मांडली होती. या निमित्ताने या सर्व योजना अंमलात आणाव्यात अशी मी मागणी करतो. हे करीत असताना शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करावा. सिंचन विहिरींच्या प्रलंबित कामांना क्रिटीकल पाथ मेथड योजना लागू केली तर या सिंचन विहिरींची कामे पूर्ण होतील. ज्या योजना 30 जूनपर्यंत पूर्ण करावयाच्या असतील त्या योजनांची 15 जून रोजी स्थिती काय असेल, 1 मे रोजी स्थिती काय असेल, 30 एप्रिल रोजी स्थिती काय असेल असा प्रत्येक आठवड्याला आढावा घेऊन सीपीएम योजना लागू केली तर ही कामे पूर्णत्वास येऊ शकतील अशा प्रकारची मी सूचना करतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने कापूस खरेदी योजना, कापसाला भाव देण्याचा विषय अतिशय महत्वाचा आहे. मागील सरकारने कापसाला प्रती क्विंटल 6000 रुपये भाव दिला होता. युती सरकार विरोधी पक्षात असताना ज्या मागण्या करीत होते, त्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. गारपीटग्रस्त भागामध्ये माननीय खासदार श्री.शरद पवार साहेबांनी दौरा केला आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी आम्ही असल्याचे दाखविले. त्या पध्दतीने युती सरकारने देखील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकार त्यांच्या पाठीशी उभे आहे हे दाखविण्याची भूमिका वठवावी आणि शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करावी. सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी आम्ही सरकारला सर्व प्रकारचे सहकार्य करण्यास तयार आहोत. शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून आमची भूमिका ही सहकार्याची राहणार आहे.

सभापती महोदय, ब्रिज कम बंधारा बांधू शकलो तर त्या माध्यमातून आपल्याला पाणी अडविता येऊ शकते. पर्यायाने भूगर्भातील पाण्याची पातळी वाढू शकते. सरकारने त्या संदर्भात कार्यवाही करावी अशी विनंती करून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये सहभाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश जिल्हयांमध्ये कमी अधिक प्रमाणात गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या संदर्भात कायमस्वरूपी उपाययोजना करणे आणि शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करणे या दोन बाबींवर चर्चा केली पाहिजे. माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी सॅटेलाईटच्या माध्यमातून मदत करण्याबाबतचा महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित केला आहे. सत्ताधारी पक्षाच्या माननीय सदस्यांकडून मागील 15 वर्षाच्या काळातील कामकाजाचा आढावा सांगण्यापेक्षा सांप्रत स्थितीत शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल, त्यांचे जीवनमान कसे उंचावता येईल, आत्महत्या कशा रोखता येतील या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष श्री.राहुल गांधी व तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागांचा दौरा केला होता. त्या दौऱ्यामध्ये उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण सूचना दिलेल्या होत्या. सिमेंट बंधारे बांधण्याच्या दृष्टीने शासनाकडून तातडीने पावले उचलली गेली. तोच धागा पकडून मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सिमेंट बंधारा योजनेला मान्यता दिली, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, ऊस हे नगदी पीक आहे. गेली अनेक वर्षे या सभागृहात ऊसाच्या प्रश्नावर विविध आयुधांच्या माध्यमातून चर्चा घडवून आणली गेली. ऊसाकरिता ठिबक सिंचन योजना सक्तीची करण्याबाबत पावले उचलली गेली पाहिजेत. पाण्याचे नियोजन केले पाहिजे. आज संपूर्ण महाराष्ट्रात नैसर्गिक आपत्तीमुळे जे नुकसान झाले आहे त्याबाबत सॅटेलाईटच्या माध्यमातून संबंधितांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय सरकारने घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सातारा जिल्हा सुजलाम सुफलाम आहे असे सातत्याने म्हटले जाते. वास्तविक पाहता सातारा जिल्हयातील महाबळेश्वर, पाचगणी, पाटण, जावळी व वाई तालुक्यांमध्ये प्रचंड पाऊस पडतो. परंतु पावसाचे पाणी वाहून गेल्यानंतर सप्टेंबर महिन्यापासून या तालुक्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. फलटण, माण, कोरेगाव, खटाव हे तालुके पाचवीला पूजल्याप्रमाणे कायम दुष्काळाच्या सावटात आहेत. गेल्या दोन वर्षात सिमेंट बंधाऱ्यांच्या माध्यमातून चांगले काम झाले आहे. 12 ते 15 लाख रुपये खर्चून हे सिमेंट बंधारे बांधण्यात आले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) G.3

SGB/ AKN/ AKN/ MMP/ MMP/ 11:30

श्री.आनंदराव पाटील.....

त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात फरक पडला आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये नियोजन करावे लागेल.

सभापती महोदय, शासनाकडून उद्योजक, व्यापारी यांना मदत केली जाते. मात्र शेतकऱ्यांचा विचार केला तर त्यांना आधारभूत किंमत देणे आवश्यक आहे. आज बाजारामध्ये कोणत्याही कारखान्याचा माल विक्रीस येतो तेव्हा त्याची छापील किंमत 99.95 रुपये, 19.95 रुपये अशी नमूद केलेली असते. परंतु शेतमालाचे उत्पादन अधिक झाले तर त्या पिकाचे भाव कोसळतात. त्याकरिता कृषी विभागामार्फत नियोजन झाले पाहिजे. आज शेतकरी आपला शेतीमाल टेम्पोमध्ये भरून विक्रीसाठी मुंबईला पाठवितो. परंतु त्या मालाची किंमत एवढी कमी येते की, त्याला टेम्पोचे भाडे देणे सुध्दा शक्य होत नाही. म्हणून सरकारच्या माध्यमातून शेतीमालाला आधारभूत किंमत देण्याचा निर्णय घेण्यात यावा. मला या ठिकाणी विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, गारपीट व अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दृष्टीने गेले दोन दिवस सभागृहात चर्चा सुरु आहे. मी दोन-तीन महत्वपूर्ण सूचना करणार आहे, जेणेकरुन शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल.

रोजगार हमी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मजूर उपलब्ध करुन देऊ शकलो तर ती फार मोठी मदत होऊ शकेल. ग्लोबल वॉर्मिंग, अवकाळी पाऊस हा विषय थांबणार नाही. परंतु शेतकऱ्यांना ही थेट मदत दिल्यासारखे होईल असे माझे मत आहे.

या सभागृहामध्ये सिंचनाच्या विषयावर सातत्याने चर्चा केली जाते. सिंचन प्रकल्प लवकरात लवकर कसे पूर्ण होतील, त्या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाणी कसे पुरविता येईल याबाबत सरकारने विचार करावा. सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीच्या दृष्टीने जे पाऊल उचलले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

नंतर एच.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, विदर्भाचे आणि संपूर्ण राज्याचे भूषण असलेले कवी श्री.विठ्ठल वाघ यांनी टिफण या कवितेतून शेतकऱ्यांचे दर्शन घडविण्याचे काम केले आहे. काळ्या मातीत मातीत टिफण चालते, टिफण चालते वीज थैय थैय नाचते, ढग ढोल वाजवितो. या कवितेमध्ये मोठा अर्थ सामावलेला आहे. दहावीच्या वर्गामध्ये शिकत असताना आपण ही कविता शिकलेलो आहोत. जून महिना आला की ही कविता आठवते. 7 जून ला मृग नक्षत्र सुरू होते. या दिवशी शेतकरी हातामध्ये टिफण धरतो, पेरणी करतो. हा शेतकऱ्यांचा आनंदाचा दिवस असतो. दरवर्षी 7 जून म्हणजे मृग नक्षत्रात पडणारा पाऊस आता जून महिन्यामध्ये पडत नाही. एक विचित्र अवस्था निसर्गाची झाली आहे. पावसाळ्यात उन्हाळा असतो, हिवाळ्यात उन्हाळा असतो. एकमेकांनी एकमेकांवर अतिक्रमण केले आहे काय अशा पद्धतीने हे ऋतू बघायला मिळत आहेत. गेल्या तीन वर्षापासून जून-जुलै महिन्यांमध्ये पाऊस पडत नाही. ऑगस्ट महिन्यामध्ये पाऊस पडायला सुरूवात होत आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनाचे एकूण गणित बिघडत चालले आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे असे नेहमी म्हणतो. या राज्यातील कुठल्याही नेत्याचे भाषण भारत हा कृषी प्रधान देश आहे या वाक्यानेच सुरू होते. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. आपला देश अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे काम या देशाचे माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांच्या कालावधीत झालेले आहे. आपण एक नव्हे तर 11 देशांना अन्नधान्य पुरवठा करण्याचे काम केले आहे. ही कुणाची किमया आहे. हे कोणामुळे घडले आहे ? हे सर्व माझ्या बळीराजामुळे घडले आहे. दिवाळीचा सण आला की पाडव्याच्या दिवशी आपल्या येथे देव केला जातो. आमची माऊली ओवाळत असते आणि म्हणते की, इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो. त्यामुळे या राज्यामध्ये शेतकऱ्यांचे राज्य आले पाहिजे. पण आज आम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होताना पहात आहोत. आम्ही सर्व शेतकऱ्यांची लेकर आहोत. मी देखील शेतकऱ्याचा लेकरू आहे. मी देखील शेतामध्ये जाऊन काम केले आहे.

सभापती महोदय, 1972 मध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी तर आपल्या देशामध्ये अन्नधान्य काहीच नव्हते. आमच्या ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्याला सुकडी खावी लागली होती. हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे...

शब्द आपल्या कानावर कदाचित पडला असेल. त्याकाळात सुकडी खाऊन शेतकरी जगत होता. आज अशी परिस्थिती नाही. 1972 च्या दुष्काळात एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केली नाही. सुकडी होती, मिलो होता. हे सर्व त्या काळी खावे लागले होते. हा इतिहास आपल्यासमोर आहे. आज माझ्या मराठवाडा मतदार संघातील 76 तालुक्यात 274 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. भाषणबाजी करून व तेच तेच मुद्दे सांगून मी आपला वेळ घेणार नाही. शेतकऱ्यांवर एका तासात बोलून होत नाही. कमी वेळात बोलणे म्हणजे शेतकऱ्यांवर अन्याय केल्या सारखे होणार आहे. सरकार म्हणून शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका आपण घेतली पाहिजे. अशा वेळी राजकारण बाजूला ठेवले पाहिजे. राज्यातील जनतेने आपल्याला सत्ता दिलेली आहे. तेव्हा कुटुंबप्रमुख म्हणून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. या राज्यावर यापूर्वीही अनेक वेळा संकटे आली होती. आमचे सरकार असतानासुद्धा गारपीट झाली होती. त्यावेळीही दुष्काळ होता. तो आपण सर्वांनी अनुभवला आहे. त्यावेळी आमच्या शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी, त्याला दिलासा देण्यासाठी, त्याच्या प्रती आत्मविश्वास व्यक्त करण्यासाठी खऱ्या अर्थाने माननीय नेते श्री.शरद पवार यांनी भूमिका घेतली आहे. लोकसभेच्या निवडणुका असताना मोठ्या प्रमाणावर गारांचा पाऊस पडला. माननीय श्री.शरद पवार उस्मानाबाद आणि बीडच्या दौऱ्यावर आले होते तेव्हा आदल्या रात्री मुसळधार पाऊस पडला होता. तेव्हा साहेबांनी सांगितले की, सगळे दौरे रद्द करा. मी निवडणुकीची सभा घेणार नाही. आपण शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे किती नुकसान झाले आहे हे पाहू या. शेतावर गाडी देखील जात नव्हती म्हणून साहेबांनी बैलगाडी मागवून घेतली. बैलगाडीमध्ये बसून आम्ही शेतकऱ्याची द्राक्षाची आडवी झालेली बाग पाहिली. तेथून येऊन बीड व परभणी जिल्ह्याचा दौरा करण्यात आला. अवकाळी पावसामुळे मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे नुकसान कशा प्रकारे झाले आहे हे त्याच दिवशी त्यांनी माननीय पंतप्रधानांना फोन करून सांगितले व तातडीने केंद्र शासनाने मदत करण्याचे काम देखील केले. थोडीथोडकी नव्हे तर 14000 कोटी रुपयांची मदत केंद्र शासनाने जाहीर केली होती. शेतकऱ्यांना मदत करण्याचे काम आमच्या आघाडी सरकारने केले आहे. ही आकडेवारी आपल्याला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे....

कुठेही पहायला मिळेल. आता युतीचे शासन आले आहे. श्री.मोदीं साहेबांनी गोंडस भाषणे करून देशातील सत्ता हस्तगत केली. त्याबद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. त्यांनी एका ओळीचे भाषण आता करायला पाहिजे होते. त्यांनी किसान भाईयों घबराना नहीं हम तुम्हारे साथ हैं अशा प्रकारचे एका ओळीचे भाषण करायला पाहिजे होते. पण तशी एक ओळ तरी टी.व्ही.वर आली का ? माननीय पंतप्रधान तर राहू द्यावे. या देशाच्या माननीय कृषी मंत्र्यांनी महाराष्ट्राचे अजून तोंड देखील पाहिलेले नाही. आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना सुद्धा माहीत नाही की केंद्रीय कृषी मंत्री कोण आहेत ? ते एकदा सुद्धा या राज्यात आले नाही. त्याच्याशिवाय दुसरे काहीच वाईट असू शकत नाही. अशाने आपल्याला सुद्धा आत्मक्लेश होऊ शकतो. आज आपण शेतकऱ्याचे देणे लागतो. या राज्यावर मोठे दु:ख कोसळलेले असताना या देशाचे कृषी मंत्री महाराष्ट्राच्या दौऱ्यावर देखील येत नाही. कोणाच्याही शेतावर गेले नाहीत. ज्याच्या नावावर आपण राज्य आणि देश ताब्यात घेतला त्या शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडण्याचे काम सातत्याने केले जात आहे. आम्ही कर्ज काढून शेतकऱ्याला मदत करू असे सांगितले जात आहे. हे शेतकऱ्याच्यावर उपकार करत आहात काय ? शेतकऱ्याला मदत ही आपण दिलीच पाहिजे. शेतकरी हा केंद्रबिंदू आहे. आपण सर्वजण शेतकऱ्यांची लेकर आहोत. मी कितीही पोटतिडकीने बोलत राहिलो तरी समोरच्याला पाझर फुटणार नाही हे मला माहीत आहे. ज्या वेदना आम्हाला होत आहेत त्यावर फुंकर घालण्याचे काम सरकारने केले पाहिजे.

पीक विमा योजना ही शेतकऱ्यांना दिलासा देणारी आहे. ती शेतकऱ्यांना आत्महत्येपासून बाजूला सारणारी आहे. ती योजना बळकट करण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. त्यामुळे दरवर्षी रब्बी व खरीपाच्या हंगामामध्ये जी पिके घेतली जातात त्या पिकांचा विमा काढण्याचे काम राज्य शासनाने केले पाहिजे अशी माझी पहिली सूचना आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे .....

सभापती महोदय, माझी दुसरी अशी सूचना राहणार आहे की, अवकाळी पाऊस पडणे ही काही आपल्या हातातील गोष्ट नाही. परंतु द्राक्ष बागा, मोसंबी बागा तसेच डाळिंबाच्या बागांना शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात खर्च करावा लागत असतो. अवकाळी पावसात जर द्राक्ष बाग, मोसंबी बाग तसेच डाळिंब बागाईतदार सापडला तर अशा शेतकऱ्यांचे लाखो, करोडो रुपयांचे नुकसान होत असते. त्यामुळे अवकाळी पाऊस या या तारखेला, या या भागात पडणार आहे याची माहिती देणारी यंत्रणा शासनाने बसवून हा अवकाळी पाऊस कधी येणार आहे याची माहिती रेडिओ, टीव्ही,वर्तमानपत्रातून दिली तर शेतकरी आपल्या पिकांवर अच्छादन टाकून पिकांचे संरक्षण करु शकतील, उपाययोजना करु शकतील.

सभापती महोदय, माझा तिसरा मुद्दा असा आहे की, शेतकऱ्याच्या पिकांची आणेवारी काढण्याच्या पध्दतीमध्ये सुध्दा राजकारण केले जाते. आणेवारी चुकीची काढली जाते असे मी म्हणणार नाही परंतु जो बाधित शेतकरी आहे, अशा शेतकऱ्याची आणेवारी योग्य पध्दतीने काढली जावी व आणेवारी काढत असताना आणेवारीची पध्दत योग्य असली पाहिजे अशी माझी तिसरी सूचना आहे.

सभापती महोदय, राज्याचे पाणी पुरवठा मंत्री आमच्या मराठवाडयाचे असून ते या ठिकाणी उपस्थित असल्याने मी त्यांना विनंती वजा सूचना करतो की, आपण वर्षानुवर्षापासून पाणी पुरवठयाच्या योजनांसाठी पैसे देतो. परंतु असे असतानाही आपला महाराष्ट्र अद्यापि टँकरमुक्त होऊ शकला नाही. सगळी गावे एकाच वेळी आपल्याला पाणी पुरवठयाच्या संदर्भात कव्हर करता येणार नाहीत. परंतु टप्प्याटप्प्याने पाणी पुरवठयाच्या योजना सर्व गावांना लागू केली तर राज्यातील सर्व गावांना चांगल्या प्रकारे पाणी पुरवठा करता येईल. त्यामुळे पाणी पुरवठा योजनेसाठी बृहत आराखडा तयार करावा अशी मी या निमित्ताने सूचना करतो.

सभापती महोदय, मी आता शेवटची सूचना वीज बिलाच्या बाबतीत करणार आहे. शेतकऱ्याच्या विहिरीत पाणी असते परंतु वीज नसल्यामुळे शेतकरी पिकाला पाणी देऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. आमचे सरकार असताना आम्ही शेतकऱ्यांच्या वीज बिलामध्ये 50 टक्के

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे .....

सवलत दिली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची राहिलेली 50 टक्के वीज बिले तुम्ही माफ करावीत अशी सूचना करतो. 50 टक्के वीज बिल माफ करण्याची हिंमत तुम्ही दाखवण्याची आवश्यकता आहे. आपण जर शेतकऱ्याचे वीज बिल माफ केले तर आमचा शेतकरी बिलकुल आत्महत्या करणार नाही. त्यामुळे मी या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी जी पंचसूत्री सुचवलेली आहे ती पंचसूत्री माननीय महसूल मंत्र्यांना सांगण्याचे काम माननीय उद्योग राज्यमंत्री श्री.प्रवीण पोटे साहेबांनी केले आणि माननीय महसूल मंत्र्यांनी आमच्या शेतकरी बांधवांसाठी भरीव मदत दिली तर आमचा शेतकरी बांधव आत्महत्या करणार नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आपल्याला भविष्यकाळात यश आले पाहिजे, यासाठी शासनाने भरीव उपाययोजना करावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय बळीराजा.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अवकाळी पावसाच्या संदर्भात बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने बहुतेक सन्माननीय सदस्यांनी "मी शेतकऱ्याचा मुलगा आहे" असे वक्तव्य केलेले आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, मी सुध्दा अतिशय छोटया शेतकऱ्याचा मुलगा आहे. आम्ही एकंदर चार भाऊ. आम्ही तीन भाऊ शेतीच्या बळावर पदवीधर होऊन चांगली प्रगती केली परंतु आमचा एक भाऊ मात्र शेतीमध्येच अडकला. आम्ही जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा आम्ही तीन भावांनी प्रगती केली परंतु माझ्या शेतकरी असलेला भाऊ मात्र काहीही प्रगती करु शकला नाही. अलीकडच्या काळात माझा भाऊ शेती विकून टाकलेली बरी असे म्हणतो आहे. शेतकरी आता लिव्हींग ऑन एज झालेला आहे. आमचा शेतकरी आता मरणाच्या काठावर उभा आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, शेतकरी शेतीची मशागत करतो. पाऊस पडला तर शेतकरी पेरणी करतो. परंतु बऱ्याच वेळेस पाऊस पडतो, शेतकरी पेरणी करतो परंतु पुन्हा पाऊस न पडल्यामुळे बियाणे वाया जाते, शेतकऱ्याला दुबार, तिबार पेरणी करावी लागते तरी सुध्दा पीक येत नाही अशी परिस्थिती आता शेतकऱ्याची झालेली आहे. कधी कधी चांगला पाऊस पडतो, शेतकरी आपल्या शेतात बियाणे पेरतो, पीक चांगले येते, चांगले उत्पन्न होईल असे स्वप्न शेतकरी पाहत असतो परंतु अचानक अवकाळी पाऊस पडतो आणि संपूर्ण शेतीचे नुकसान होते. ही परिस्थिती आज आपल्याला खेडोपाडी पहावयास मिळत आहे.

सभापती महोदय, या वर्षी सुध्दा आंब्याला चांगल्या प्रकारे मोहर आला होता परंतु अवकाळी पावसामुळे आंब्याचा संपूर्ण मोहर गळून पडला आहे.

सभापती महोदय, चांगले पीक येईल, चांगले उत्पन्न मिळेल असे शेतकऱ्याला आता कधीही वाटत नाही. पाऊस चांगला पडला, शेतकऱ्यांने चांगले कष्ट केले, चांगले पीक आले व चांगला पैसा मिळाला या गोष्टी आता अतिशय अभावाने पहावयास मिळतात.

सभापती महोदय, एका भागात अवकाळी पाऊस पडतो तर दुसऱ्या भागात गारपीट होत असते व अशा परिस्थितीत या सभागृहात आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अतिशय गांभीर्यपूवक चर्चा करीत असतो. प्रत्येक अधिवेशनामध्ये गारपीट, दुष्काळ,अतिवृष्टी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. जयदेव गायकवाड .....

प्रश्नांवर चर्चा होत असते. त्यामुळे शेतकऱ्याच्या प्रश्नाच्या संदर्भात आपण उत्तरे शोधणार आहोत की नाही ? शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कायम स्वरूपी उपाययोजना आपण करणार आहोत की नाही हा माझा शासनाला सवाल आहे.

सभापती महोदय, माजी केंद्रीय मंत्री श्री. शरदचंद्र पवार साहेबांचा या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. काही वर्षापूर्वी शेती ही पॅशन होती. शेतकऱ्यांचा विकास होण्यासाठी संशोधन केंद्र निर्माण झाली पाहिजे, चांगले बी-बियाणे निर्माण झाले पाहिजे, शेतकऱ्यांना कमी दराने कर्ज पुरवठा झाला पाहिजे यासाठी माननीय पवार साहेबांनी गांभीर्याने विचार करून शेतकऱ्यांचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न केला व काही प्रमाणात शेतकऱ्यांची प्रगती झाल्याचे सुध्दा आपल्याला पहावयास मिळाले. परंतु गेल्या तीन चार वर्षामधील प्रत्येक अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात आपल्याला अतिशय गंभीरपणे विचार करावा लागत आहे. या ठिकाणी मी दोन चार महत्वाच्या सूचना शासनाला करणार आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जी काही चर्चा होत असते ती नैमित्तिक चर्चा होत असते. मला प्रश्न उपस्थित करावयाचा आहे की, जेव्हा जेव्हा निसर्गाचा कोप होतो तेव्हा तेव्हा शेतकऱ्याचे जे नुकसान होते त्यावेळेस शेतकऱ्याला मदत करावयाची की, नाही हे या ठिकाणी एकदा ठरवले गेले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, प्रत्येक माणसाचे जीवन सुखी व समृध्द झाले पाहिजे असे लोकशाहीचे ध्येय आणि उद्दिष्ट आहे. परंतु शेतकऱ्यांच्या संदर्भात या गोष्टीचे वास्तव आणि विदारक चित्र आपल्याला पहावयास मिळते. शेतकऱ्याच्या डोळयासमोर त्याचे पीक नष्ट झाल्यामुळे त्याला पुढचे जीवन अंधकारमय वाटल्यामुळेच शेतकरी आत्महत्या करतो व ही गोष्ट आमच्या लोकशाहीला कलंकित करणारी आहे त्यामुळे यासंदर्भात आपण सर्वांनी अतिशय गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, खेडयापाडयात शेती करणारा जो शेतकरी आहे, त्याचे नुकसान झाले तर त्याला वाटले पाहिजे की, माझे कितीही नुकसान झाले तरी आमचे सरकार आम्हाला मदत करील, असा विश्वास त्याला या सरकारने दिला पाहिजे. ...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. जयदेव गायकवाड .....

सभापती महोदय, गारपीट किंवा प्रचंड पावसामुळे शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाले तर त्यावेळेस 100 टक्के नुकसान भरपाई दिली नाही तरी चालेल परंतु 50 टक्के तरी नुकसान भरपाई दिली जाईल यासंदर्भातील आश्वासन या शासनाकडून मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आमचे मित्र श्री. जयवंतराव जाधव यांनी अतिशय चांगला मुद्दा मांडला आहे. त्यांनी सांगितले होते की, आपल्याच देशात गारपीट होते असे नाही तर इतर देशांमध्ये सुध्दा गारपीट व बर्फवृष्टी होत असते. स्पेन सारख्या ठिकाणी बर्फ पडतो परंतु तेथील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत नाही. तेथील शेतकरी बर्फबारीच्या संदर्भात उपाययोजना करीत असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत नाही. परदेशात बर्फ पिकाला लागू नये यासाठी तेथील शेतकरी पिकावर आच्छादन टाकतात व त्या अच्छादनामुळे त्यांच्या पिकांचे नुकसान होत नाही. त्यामुळे परदेशातील सुविधांसारख्या सुविधा आपल्या शेतकऱ्यांना शासनाने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. परंतु परदेशातून अशा प्रकारची साधने आणावयाची असतील तर त्यासाठी मोठया प्रमाणात ड्युटीज लावल्या जातात. त्यामुळे मी मागणी करतो की, शेतकऱ्यांच्या साधनांवर कोणत्याही प्रकारची ड्यूटी लावता कामा नये तसेच जी काही साधने उपलब्ध करुन दिली जातात त्या साधनांवर सबसिडी दिली जावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विम्याचे राष्ट्रीयकरण करावे अशी मागणी त्यांनी 1936 साली केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विम्याच्या संदर्भात दूरवरचा विचार केला होता. आपल्या ग्रामीण भागात साधारणतः 75 टक्के शेतकरी राहात आहे, त्याला विम्याचे संरक्षण हे शासन देणार आहे की नाही ? विमा कंपन्यांना रान मोकळे करुन देण्यापेक्षा

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड....

महाराष्ट्र सरकारने अशा प्रकारची एक विमा योजना तयार करुन शेतकऱ्यांची पिके इन्श्युअर केली पाहिजेत. शासनाची स्वतःची इन्श्युअर एजन्सी असली पाहिजे जेणेकरुन शासनाने आपल्या पिकांना इन्श्युअर केलेले आहे आणि आपले काही नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई मिळणार आहे याची जाणीव शेतकऱ्यांना होईल. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करता याचा अर्थ त्यांच्यावर दया दाखवतो असे न करता त्यांची पिके हक्क म्हणून इन्श्युअर केली तर त्याचा शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो.

सभापती महोदय, आपण प्रत्येक अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करतो. शेती हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पूर्वी 70-75 टक्के लोक शेतीवर अवलंबून होते. परंतु शेती बेभरवशाची असल्यामुळे अनेक शेतकरी शहरांकडे स्थलांतर करीत आहेत. त्यामुळे शहरांमध्ये गर्दी वाढत असून तेथे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आपणास शेतकऱ्यांचे जीवन इन्श्युअर करायचे असेल तर शेतकऱ्यांवर जे नैसर्गिक संकट येते त्यावर सातत्याने नियंत्रण ठेवणारी प्रशासकीय यंत्रणा आपण उभी केली पाहिजे. या यंत्रणेमध्ये लोकप्रतिनिधींना देखील सहभागी करुन घेतले पाहिजे. प्रत्येक विभागामध्ये अशी यंत्रणा उभी केली पाहिजे. जून महिन्यात किती पाऊस झाला, जुलै महिन्यात किती पाऊस झाला, याची आपण नोंद ठेवतो. परंतु फक्त नोंद ठेऊन उपयोगाचे नाही तर त्याबाबत तातडीने निष्कर्ष काढले पाहिजेत. दुष्काळ पडल्यानंतर समिती पाहणी करुन गोषवारा देणार, नंतर केंद्राकडे प्रस्ताव जाणार मग त्यानंतर शेतकऱ्यांना मदत मिळणार असा दूरवरचा प्रवास करण्यापेक्षा प्रक्रिया घडत असताना म्हणजे महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात दुष्काळ पडण्याची शक्यता आहे याचा अभ्यास करुन आपणास त्याचा अंदाज आला पाहिजे. यासाठी कायम स्वरुपी यंत्रणा निर्माण करावी अशी सूचना करुन माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते): सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.02 ते 12.12 पर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, राज्यातील दुष्काळ, गारपीट व अवकाळी पाऊस, या विषयावर चर्चा करण्यासाठी विरोधी पक्षाच्या वतीने सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी अल्पकालीन चर्चा आणि सत्ताधारी पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव दिला होता. सदरहू दोन्ही विषय क्लब करून त्यावर एकत्रित चर्चा घेण्याचा निर्णय घेतला होता. महोदय, या चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, माणिकराव ठाकरे, जयंत पाटील, महादेव जानकर, जयवंतराव जाधव, प्रा.जोगेंद्र कवाडे, प्रकाश गजभिये, रामहरी रूपनवर, दीपकराव साळुंखे, सर्वश्रीमती स्मिता वाघ, विद्या चव्हाण, श्री.कपिल पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री आनंद ठाकूर, सुभाष झांबड, ख्वाजा बेग, आनंदराव पाटील, मितेश भांगडिया, विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड यांनी भाग घेऊन अनेक चांगल्या सूचना केल्या आहेत.

महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितले की, अलीकडच्या कालखंडात निसर्गाचे चक्र बदलत चालले आहे की काय, असे वाटते. मी त्यांना सांगू इच्छितो की, होय. निसर्गाचे चक्र बदलले आहे. गेल्या अनेक वर्षाचा अनुभव पाहता, त्यापेक्षा वेगळा अनुभव गेल्या तीन वर्षांपासून शेतकऱ्यांना येत आहे. पावसाळ्यात पाऊस, उन्हाळ्यात ऊन आणि हिवाळ्यात थंडी येईल अशी स्थिती आज राहिलेली नाही. थंडीच्या दिवसात गारपीट मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. ज्या ऋतूमध्ये पाऊस मोठ्या प्रमाणावर पडावयास पाहिजे होता त्यावेळी दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊ लागली. किंबहुना, त्या दिवसात उन्हाची तीव्रता वाढीस लागली. एकंदरीत ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम आपणास दिसायला लागले आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्यातील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सभागृहात काल आणि आज चर्चा झाली. आता माननीय महसूल मंत्री त्या चर्चेला उत्तर देत आहेत. विधानसभा सभागृहात ज्यावेळी या विषयावर चर्चा झाली त्यावेळी माननीय महसूल मंत्र्यांचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

भाषण सुरु असताना माननीय मुख्यमंत्री पूर्णवेळ बसून होते. आम्हाला अपेक्षा होती की, या सभागृहात सुध्दा ते उत्तराच्या वेळी उपस्थित राहतील. ते या ठिकाणी उपस्थित राहिले असते तर फार बरे झाले असते. कारण माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर घोषणा केलेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात उपस्थित केलेल्या चर्चेवर उत्तर देत असताना माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असावयास पाहिजेत. मला वाटते त्यांना निरोप पाठवून त्यांच्या उपस्थितीत उत्तर देण्यात आले तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना अधिक न्याय दिल्यासारखे होईल. शिवाय त्यांच्या या विषयीच्या संवेदना सुध्दा प्रकट होऊ शकतील. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहण्याबाबत आपण त्यांना अवगत करावे.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : ठीक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना निरोप पाठवितो. मला वाटते माननीय महसूल मंत्र्यांच्या उत्तराने आपले समाधान होईल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय सभापती यांच्याकडे एक बैठक आयोजित करण्यात आली होती. माननीय मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते आणि मी सुध्दा त्या बैठकीला गेलो होतो. या चर्चेवरील उत्तराच्या वेळी माननीय मुख्यमंत्री उपस्थित पाहिजेतच असे नाही. मी सभागृहाचा नेता म्हणून या ठिकाणी उत्तर देत आहे. शिवाय संबंधित विभागाचा मंत्री म्हणून उत्तर देण्यास मी सक्षम आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तुमच्यासारखे इतरांना विचारुन मी काम करणारा नाही. आम्ही सुध्दा या ठिकाणी निर्णय घेऊ शकतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी तेवढे अधिकार या नेत्याला दिलेले आहेत. त्यामुळे तुम्ही चिंता करु नका, आम्ही शेतकऱ्यांना न्याय देण्याचा निश्चित प्रयत्न करु

सभापती महोदय, ग्लोबल वार्मिंगमुळे हवामानातील बदलाचा फटका आपल्याला बसायला लागला आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, केंद्र सरकारकडून अजून मदत मिळाली नाही किंवा राज्य सरकारकडून वेळेवर मदत दिली जात नाही. एवढेच नव्हे तर काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना मदत मिळणार नाही असे स्वतः महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले. या निमित्ताने सांगतो की, ज्यावेळी नुकसान होते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्यावेळी पंचनामे करुन, त्या संदर्भातील मदत जाहीर करुन ती मदत देण्याची व्यवस्था लगेच करता

श्री.एकनाथराव खडसे....

येत होती. पण यावर्षी जून ते ऑगस्ट महिन्यापर्यंत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्यामुळे 23 हजार गावांमध्ये टंचाईसदृश परिस्थिती जाहीर करावी लागली. या बाबत केंद्र सरकारला कळविण्यात आले होते. दरम्यानच्या काळात केंद्राची टीम राज्यात पाहणीसाठी आली होती. राज्यातील नुकसानीची पाहणी करुन ती टीम परत जाण्याच्या तयारीत असतानाच नाशिक आणि धुळे या भागात गारपीट झाली आणि त्या भागातील द्राक्षबागांचे नुकसान झाले. त्यामुळे लगेच दुसऱ्या दिवशी नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे करण्याची वेळ आली. ते पंचनामे पूर्ण होत नाहीत तितक्यातच विदर्भातील बुलढाणा आणि इतर जिल्ह्यात तसेच कोकणात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. पावसाळ्यात पडला नाही यापेक्षा अधिकचा पाऊस दोन दिवसात कोकणात झाला. सुरुवातीला झालेल्या नुकसानीचा अंदाज घेऊन केंद्र सरकारकडे मागणी केली की आम्हाला अमुक इतकी मदत हवी आहे. नंतर दुसऱ्यांदा नुकसान झाल्यामुळे पुन्हा वेगळ्या मदतीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा लागला आणि त्यानंतर पुन्हा तिसऱ्यांदा मदतीचा प्रस्ताव पाठवावा लागला. केंद्र सरकारने सांगितले की, आपण वेगवेगळे प्रस्ताव सादर न करता एकच प्रस्ताव सादर करावा. आम्ही सांगितले की, वेगवेगळ्या कालावधीत वादळ, गारपीट, अवकाळी पाऊस झाल्यामुळे सर्वांचा एकच प्रस्ताव कसा पाठवता येईल ? वास्तविक पाहता केंद्र सरकारचे म्हणणे होते की, राज्याकडून एकच प्रस्ताव आला तर त्याची छाननी करणे सोपे जाईल. राज्य सरकारने पाठविलेले प्रस्ताव विसंगत नव्हते. राज्याचा पहिला प्रस्ताव टंचाईसदृश परिस्थितीचा होता, दुसरा प्रस्ताव गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा आणि तिसरा प्रस्ताव वादळ-वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीबाबतचा होता. मदत मागण्याची तिन्ही कारणे वेगवेगळी होती. अशा परिस्थितीत राज्य सरकारकडून विविध भागात झालेल्या नुकसानीची माहिती घेत असताना काल-परवा पुन्हा वादळ आले. जळगाव जिल्ह्यात सुध्दा वादळ आणि गारपीट झाली. केवळ जळगाव जिल्ह्यातच झाली असे नाही. गेल्या दोन दिवसात मराठवाडा विभाग, बुलढाणा जिल्हा यासह अनेक ठिकाणी पाऊस झाला. हा पाऊस इतका झाला की तो थांबता थांबेना. यामुळे आता महाराष्ट्राचे वर्णन बारमाही पावसाचा प्रदेश करण्याची स्थिती निर्माण झाली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महोदय, यावर्षी झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना जी मदत करावयाची होती ती करण्यात थोडा विलंब झाला आहे. केंद्र सरकार मदत देत नाही की, केंद्र सरकारकडे राज्य

श्री.एकनाथराव खडसे....

सरकारची पत नाही, माननीय मुख्यमंत्री मदत मागण्यासाठी केंद्र सरकारकडे गेले नाहीत काय, असे अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. परंतु मी सांगतो की, राज्य सरकारची केंद्र सरकारकडे पत आहे.

महोदय, या निमित्ताने मी सांगतो की, केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने 4 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना रिलीज केले आहेत. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, 78 टक्के शेतकऱ्यांना ऑनलाईन आर्थिक मदत मिळाली आहे. उर्वरित 22 टक्के शेतकऱ्यांना मदत करण्याच्या बाबतीत वारसांचे प्रश्न, 7-12 च्या उताऱ्यावर अनेकांची नावे असणे, खाते क्रमांक उपलब्ध होत नसणे इत्यादी बाबी आडव्या येत आहेत. शेतकऱ्यांकडे अनेकदा खाते क्रमांक मागून सुध्दा ते मिळालेले नाहीत. या कारणांमुळेच शेतकऱ्यांना मदत देण्याचे राहिले आहे. या कारणांव्यतिरिक्त शेतकऱ्यांना मदत मिळाली नसेल तर ते दाखवावे.

नंतर श्री.रोझेकर...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

आता आम्ही ऑनलाईन प्रक्रिया केली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी 45 रुपयांचा धनादेश या ठिकाणी दाखविला आहे. शासनाने प्रति हेक्टरी 4500 रुपयांची मदत केली आहे व त्यानुसार प्रति एकर 75 रुपये होतात. तुम्ही, आम्ही ठरविलेली आणि केंद्र सरकारने मान्यता दिलेली प्रति हेक्टरी 4500 रुपयांची ही मदत आहे. याचा अर्थ, 45 रुपये मदत दिली असा होत नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या शासनाने प्रति हेक्टर 4500 रुपयांची मदत दिलेली आहे. त्यानुसार प्रति गुंठा 45 रुपये मदत शेतकऱ्याला मिळाली आहे, असे मी सांगितले होते.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या राज्यात एकरी 45 रुपये मदत मिळाली असेल तर तसे सरकारच्या निदर्शनास आणून द्यावे. आघाडी शासनाच्या काळामध्ये तर 7 रुपये, 10 रुपये अशा प्रकारची मदत मिळालेली आहे. मात्र, आम्ही आता अशा सूचना दिल्या आहेत की, कोणत्याही शेतकऱ्याला एक हजार रुपयाच्या खाली मदत देण्यात येऊ नये. एखाद्या शेतकऱ्याचे 700 रुपयांचे नुकसान झाले असले तरी त्याला किमान 1000 रुपये मदत मिळाली पाहिजे. (अडथळा) मी अर्थमंत्री असताना अशा प्रकारे दिवाळखोरीची स्थिती नव्हती.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, युती सरकारच्या काळात घडलेला एक प्रसंग मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो. त्यांनी मान्य करावे किंवा करु नये, हा त्यांचा प्रश्न आहे. परंतु, युती शासनाच्या काळात एकदा असा प्रसंग घडला होता की, ज्यावेळी शेतकऱ्याच्या शेतामधील कापसाची बोंडे गळून पडली होती त्यावेळी नागपूरला अधिवेशन सुरु असताना सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या नेतृत्त्वाखाली आम्ही मोर्चा काढला होता. त्यावेळी तीन दिवस सभागृहाचे कामकाज बंद पडले होते. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी अशी घोषणा केली होती की, 5 हेक्टरपर्यंत प्रति हेक्टरी 2500 रुपये मदत देण्यात येईल. ही मदत जाहीर करण्यात आली, त्याप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात आला, मदत करण्यास सुरुवात झाली. पण फक्त अमरावती आणि वर्धा जिल्ह्यामध्ये मदत देण्यात आली. अन्य 11 जिल्ह्यांमध्ये एक पैसा देखील देण्यात आला नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी वेळ फार कमी आहे. माझी अशी विनंती आहे की, त्यांच्या उत्तराच्या भाषणात आता कुणीही अडथळा आणू नये.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो. सन 1995 मधील प्रसंग त्यांच्या अजूनही लक्षात आहे. याचा अर्थ, त्या वेळचा पराभव त्यांच्या किती जिव्हारी लागला असेल याची आपण कल्पना करावी.

सभापती महोदय, राजकीय भाषेतच बोलावयाचे असेल तर मी तशा भाषणाला आता सुरुवात करतो. तुम्ही देण्यासाठी तिजोरीमध्ये काय ठेवले आहे ? देण्यास आमची काहीही हरकत नाही. सन 1995 मध्ये काय परिस्थिती होती ? तुमचे सरकार गेल्यानंतर आमच्या हातामध्ये सत्ता आली होती. त्या काळामध्ये ओव्हरड्राफ्ट काढला, असे तुमचे म्हणणे आहे. परंतु, तुम्ही केलेल्या दिवाळखोरीमुळेच तशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्या काळात आम्ही 20 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले होते. आज राज्यावर 3 लाख 25 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. कर्ज काढायलाही आमची हरकत नाही. परंतु, तुमच्यासारखे कर्जाचे पैसे आम्ही आदर्शमध्ये जिरविले नाहीत, कर्जाचा पैसा आदर्शमध्ये गेला नाही, आम्ही कर्जाचा पैसा तुमच्या सारखा सिंचनामध्ये जिरविला नाही. आम्ही काढलेल्या कर्जामधून कामे उभी राहिली. पुणे-मुंबई एक्सप्रेस-वे आम्ही बांधला, वरळी सि-लिंक आम्ही बांधला, मुंबईमध्ये 55 फ्लायओव्हर आम्ही उभे केले. हा पैसा आम्ही कारणी लावला, तुमच्या सारखा तो जिरविला नाही, तुमच्या प्रमाणे आमच्या चौकशा कराव्या लागल्या नाहीत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना मदत देण्याच्या संदर्भात आजची स्थिती अशी आहे की, राज्याकडे पैसे नाहीत. केंद्र सरकार निश्चितपणे निधी देणार आहे. तुम्हाला सांगतो केंद्र सरकार एवढा पैसा देणार आहे की, 25 वर्षात मिळाला नसेल त्याच्या कितीतरी पट पैसा या वर्षी केंद्र सरकार राज्याला देणार आहे. तुमच्यापेक्षा जास्त पत आमची केंद्र सरकारमध्ये आहे. परंतु, आज अशी परिस्थिती आहे की, दररोज पाऊस पडतो आहे, दररोज पंचनामे केले जात आहेत व त्यामुळे मदत देण्यास विलंब होत आहे. केंद्र सरकारकडे माहिती पाठविली जात आहे. आजची माहिती पाठविली की, उद्या पडणाऱ्या पावसाची माहिती पाठवावी लागते, लगेच तिसऱ्या दिवशी पडणाऱ्या पावसाची माहिती पाठवावी लागते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसून बोलू नये.

श्री.एकनाथराव खडसे : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना मी विचारु इच्छितो की, आपण गारा पाहिल्या आहेत का, आपण त्या ठिकाणी जाऊन आला आहात का, आपण फक्त फ्रिजमधील बर्फ बघितला आहे, गारा कशा असतात, हे आपल्याला माहीत आहे का ?

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पंचनाम्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. याबाबतची माहिती मी सभागृहाला दिली आहे. दररोज पंचनामे सुरु आहेत आणि पाऊसही सुरु आहे, हे आपण मान्य केले पाहिजे. मी स्वतः माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी आणि माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.राधा मोहन सिंग यांच्याशी चर्चा केली आहे. परवाच त्यांची बैठक झाली आहे. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे पंचनाम्याला उशीर होत नाही. पैसे देण्याची नक्की व्यवस्था करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी शेतमालाच्या भावाबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण राज्य कृषी मूल्य आयोगाच्या माध्यमातून केंद्र सरकारला शिफारशी करतो. या शिफारशी जशाच्या तशा मान्य कराव्यात, अशा प्रकारचा आग्रह आम्ही केंद्र सरकारकडे धरु. राज्य कृषी मूल्य आयोगाच्या स्थापनेपासून आजपर्यंत आयोगाने केलेल्या शिफारशी जशाच्या तशा किंवा त्याच्याशी मिळत्याजुळत्याही कधी मान्य केलेल्या नाहीत. कारण, केंद्र सरकारचे या संदर्भातील सूत्र वेगळे आहे. परंतु, आपली सूचना गृहीत धरुन हा बदल केला पाहिजे. शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे, हा आपला आग्रह आहे. तशा प्रकारचा आग्रह आपण केंद्र सरकारकडे धरु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, शासनाने तत्काळ मदत न देणे हे चुकीचे आहे. परंतु, मी आपल्याला सांगू इच्छितो की, तत्काळ मदत आपण देऊ शकत नाही. नुकसानीचे पंचनामे आल्याशिवाय आपण मदत जाहीर करु शकत नाही. अगोदर पंचनामे होतात, त्यानुसार नुकसानीचे अंदाज आल्यानंतर तरतूद केली जाते. आर्थिक तरतूद केल्याशिवाय आपल्याला पैसे देता येत नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी नॅशनल डिझॅस्टर रिलिफ फंड बाबतचा उल्लेख केला आहे. हे खरे आहे की, याच धर्तीवर आपल्या राज्यातही नवीन फंड उभारला पाहिजे. कारण, आज अशी परिस्थिती आहे की, कधी अवकाळी पाऊस पडतो, कधी अतिवृष्टी होते, कधी दुष्काळ पडतो, कधी भूकंप येतो, कधी आग लागते तर कधी गारा पडतात. त्यामुळे प्रत्येक आपत्तीमध्ये शासकीय तिजोरीतून किंवा आकस्मिकता निधीतून पैसे काढण्यापेक्षा राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीच्या धर्तीवर महाराष्ट्र आपत्ती निवारण निधी निर्माण करण्याबाबत आपण मुख्यमंत्री महोदयांकडे आग्रह धरू त्यामुळे प्रत्येक वेळी केंद्र सरकारकडे जा, राज्य सरकारने प्रयत्न करा, यापेक्षा या निधीतून आपण तत्काळ मदत देऊ शकू. अशा प्रकारचा निधी निर्माण करण्याचा राज्य शासनाचा विचार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सौर ऊर्जा पंप देण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप देणार आहे. कनेक्शनसाठी तांत्रिक मनुष्यबळ वगैरे बाबी त्यामध्ये आहेत. परंतु, प्रायोगिक तत्त्वावर पुढील महिन्यात 10 हजार सौर ऊर्जा पंप बसविण्याचा प्रयत्न राज्य सरकार करणार आहे.

तालिका सभापती : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्य सरकार ज्या उपाययोजना करणार आहे, त्याबाबतची माहिती मी सभागृहाला देणार आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी व अनेक सन्माननीय सदस्यांनी आणेवारीची पध्दत आणि होणारे नुकसान याबाबत काही नवीन पध्दत स्वीकारली पाहिजे अशा सूचना केल्या आहेत. आणेवारी पध्दतीबाबत अत्याधुनिक पध्दतीचा अवलंब केला पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील मी आपणाला सांगतो की, आणेवारीची पध्दत ही इंग्रजांच्या काळातील आहे. त्यावेळी 'आणा' होता. 16 आणे पीक म्हणजे 100 टक्के पीक आले असे गृहीत धरले जात होते. आता आणेवारीवरून पैसेवारीची पध्दत आली आहे. 100 पैसे पीक म्हणजे पूर्ण पीक असे गृहीत धरले जाते. पैसेवारीच्या पध्दतीत उंबरठा उत्पन्न धरीत असताना कमी अधिक प्रमाणात याचे मोजमाप होते. समाधान न करणारे मोजमाप होते अशी परिस्थिती आहे. यामध्ये अचुकता आणण्यासाठी व दोन्ही पध्दतीत फेरबदल करण्यासाठी आणेवरीची पध्दत बदलण्यासाठी पुण्याचे तत्कालील महसूल आयुक्त श्री.विकास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली आहे. त्यांचा अहवाल आला असून छाननी सुरु करण्यात आलेली आहे. अहवालाची छाननी पूर्ण झाल्यानंतर त्या अहवालाच्या शिफारशी विचारात घेऊन आणेवारीच्या पध्दतीत सरकार बदल करणार आहे.

सभापती महोदय, नुकसान भरपाईच्या संदर्भात अनेकांच्या तक्रारी येतात की, माझी केळी होती, माझा ऊस होता तरी देखील मला मदत मिळाली नाही. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले नाही त्यांना मदत मिळाली अशा काही तक्रारी येतात. या मदती संदर्भात सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या मी स्वीकारीत आहे. पुढील कालखंडात उपग्रहाच्या माध्यमातून आणेवारी मोजण्याच्या पध्दतीत बदल करण्यात येणार आहे. सॅटेलाईटच्या माध्यमातून गुगलवर जाऊन कोणत्या शेतात किती टक्के नुकसान झाले याची अचूकता येण्यासाठी उपग्रहाची मदत घेण्यात येईल. आणेवारी तसेच शेतीच्या मोजणीसाठी उपग्रहाची मदत घेण्यात येईल. सीटी सर्व्हे यासाठी देखील आणेवारीची मदत घेण्यात येईल. ही सर्व कार्यवाही उपग्रहाच्या माध्यमातून पुढील काळात करण्यात येणार आहे. हवामानाचा अंदाज व्यक्त करण्यासाठी हैद्राबाद येथे आता रिमोट सेंसर सेंटर आहे, त्यातून आपणाला हवामानाची माहिती मिळते. पुणे येथील हवामान खात्याचे सेंटर आहे, तेथून राज्यातील हवामान खात्याची सविस्तर माहिती उपलब्ध होते. यामध्ये अधिक अचूक व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

गावांगावातील माहिती मिळविण्यासाठी सर्कलमधील प्रत्येक गावातील माहिती गोळा करण्यात येणार आहे. येत्या 1 एप्रिल, 2015 पासून सर्कलवाईज हवामान यंत्र बसविण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

सभापती महोदय, पीक विमा योजनेच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. सर्वंकष पीक विमा योजना आणण्याचा केंद्र शासनाचा विचार आहे. तसे केंद्र शासनाने राज्य सरकारला कळविले आहे. पीक विमा योजनेतील त्रुटी दूर करून विमा योजनेतून पिकांना अधिक संरक्षण देण्यासाठी फळ पीक विमा योजनेसाठी वेगळी योजना व अन्य पिकांसाठी वेगळी विमा योजना तयार करण्यात येणार आहे. आज आपण उंबरठा उत्पन्नावर पीक विमा योजनेचा लाभ देतो. हवामान खात्याने काही यंत्रे बसविली आहेत. हवामानावर आधारित नुकसानीचे आकडे आल्यावर नुकसान भरपाई आता देण्यात येते. यासाठी पीक विमा योजना सर्वंकष करून विम्याचा अधिकाधिक लाभ शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. यासंदर्भातील प्रणाली केंद्र शासनाने विकसित केली आहे. ती प्रणाली राज्य सरकार स्वीकारणार आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून अधिकाधिक शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ मिळेल या संदर्भातील निर्णय शासन घेणार आहे. फळ पीक विमा योजना व अन्य पिकांसाठी अशी वेगवेगळी विमा योजना तयार करण्यात येणार आहे. यातून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. वादळ येते, दुष्काळ पडतो, पाऊस कमी पडला म्हणून पिण्याचे पाणी नाही. पाऊस कमी पडला म्हणून शेतीत गवत देखील उगवत नाही. शेतीमध्ये पाणी गेले पाहिजे यासाठी जलयुक्त शिवार योजना राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी याबाबत शंका उपस्थित केली की, या योजनेतून नक्की काय करण्यात येणार आहे, कशा प्रकारे जलयुक्त शिवार योजना राबविण्यात येणार आहे. शासनाचा हा एक प्रयत्नाचा भाग आहे. या योजनेतून पाटासारखे पाणी शेतात जावे अशी कल्पना नाही. या योजनेच्या माध्यमातून मातीमध्ये ओलावा निर्माण झाला पाहिजे. शेतीत ओलावा निर्माण होईल इतके पाणी अडविले आणि ते शेतात जिरविले तर शेतीसाठी त्याचा उपयोग होईल. पाच हजार गावे समोर ठेऊन यामध्ये नालाबांध, सिमेंट बंधारे, नाला सरळीकरण, मृद

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M-3

VVK/ MMP/ AKN/ प्रथम श्री.रोझेकर.. 12:30

श्री.एकनाथराव खडसे....

संधारणाची कामे, वन जमिनीची कामे, छोट्या पाटांचे पाणी वळविणे, विहीर पुनर्भरण करणे. शेतात शेत तळे, गावात गाव तळे, मोठ्या तळ्यांचा गाळ काढणे, लहान तळ्यांची सुधारणा करणे, कोल्हापूर पध्दतीची बंधारे घेण्यात येतील. सिमेंट बंधारे नव्याने तयार करण्यात येतील. नव्याने माती बांध घालणे, दगडी बांध, साखळी बंधारे बांधणे, अशा सर्व योजना एकत्र करुन जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून ही कामे करण्यात येणार आहेत. यातून पाण्याचा साठा निर्माण होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतात पाणी जिरविणे हा मुख्य उद्देश त्यामागे आहे.

सभापती महोदय, आपण इस्त्रायल देशाची माहिती घेतली तर तेथे कधीही दुष्काळ पडला नाही व शेतकऱ्यांना मदत देण्याचा विषय आला नाही. अशी कोणतीही माहिती आपणापर्यंत आलेली नाही. त्याचे कारण असे आहे की, तेथे पाऊस कमी पडत असला तरी त्यांनी पाण्याचे सोर्स मोठ्या प्रमाणावर वाढविले आहेत. महाराष्ट्रात आता गारपीट होत आहे. नाशिक व पुणे येथे द्राक्ष बागांची मोठ्या प्रमाणात हानी झालेली आहे. आता शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. यामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक आहे. ही भांडवली गुंतवणूक शेतकऱ्याला परवडत नाही. द्राक्ष, आंबा याबाबत इटली, जर्मनी व इस्त्रायल देशाने नवीन प्रयोग केले आहेत. इटली व जर्मनी या दोन देशात गारपिटीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे त्यांनी शेडनेटचे नवीन तंत्रज्ञान आणले आहे. शेडनेट उभे केले तर गार ही वरच्यावर राहते व पिकांची हानी होत नाही. त्यातून आवश्यक तेवढा सूर्यप्रकाश देखील मिळतो. अशा प्रकारचे शेडनेट उभारण्यासाठी एकरी पाच ते सहा लाख रुपये लागतात. शेतकऱ्यांची इच्छा असून देखील शेडनेट शेतकरी खरेदी करु शकत नाही. राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन पुढील कालखंडात शेडनेटसाठी अनुदान देण्याबाबत राज्य शासन विचार करणार आहे. यातून फलोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका शासन घेणार आहे. आता आम्ही असे गृहीत धरीत आहोत की, ग्लोबल वार्मिंगमुळे गारपीट होण्याचे प्रसंग वारंवार येत राहतील. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत देण्याची भूमिका शासन पार पाडणार आहे. नैसर्गिक आपत्तीकरिता कायमस्वरुपी उपाययोजना करावयाच्या आहेत, त्यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी कपाशीच्या भावाचा उल्लेख केला होता. मागील काळातील कापसाचे भाव मी लिहून आणले आहेत. आता कापसाला भाव नाहीत, त्यावेळी मी कापसाला 6 हजार रुपये भाव मागितला होता, असा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांनी केला आहे. ही गोष्ट खरी आहे की, मी 6 हजार रुपये प्रति क्विंटल कापसाला भाव द्यावा अशी मागणी वारंवार केली होती, त्यासाठी आंदोलन केले होते. यावर्षी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाला भाव नाहीत. ज्यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारात 6 हजार रुपये प्रति क्विंटल भाव होता त्यावेळी मी 6 हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा, अशी मागणी केली होती. त्यावेळी शेतकरी बाहेरील बाजारात व्यापाऱ्याला 5500 रुपये याप्रमाणे कापूस विकत होता. भाव कमी असता तर सरकारची खरेदी मोठ्या प्रमाणात झाली असती. सरकारची खरेदी त्यावेळी शून्य होती, त्या कालखंडात बाहेर भाव चांगला होता. त्यावेळी सरकारकडील भाव कमी असल्यामुळे शेतकरी सरकारला कापूस विकण्यास तयार नव्हता. यासंदर्भातील आकडेवारी माझ्याकडे आहे. सन 2004-2005 मध्ये 1700 रुपये प्रती क्विंटल कापसाला भाव देण्यात आला होता. सन 2010-2011 मध्ये 4000 रुपये प्रती क्विंटल भाव व्यापारी देत होते.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

आपण कापसाची खरेदी करीत होतो. (...अडथळा...) मी सांगितले की, एक वर्ष जर सोडले तर राज्य शासनाने कधीही कापसाला जास्त भाव दिलेला नाही.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला एक सूचना करावयाची आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शासन सकारात्मक आहे. त्यांनी सूचना करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब मागील अनेक वर्षापासून सभागृहात आहेत. मी सांगू इच्छितो की, सन 2001 पर्यंत कापूस एकाधिकार योजना सुरु होती आणि सन 2002 पर्यंत फेडरेशन कापसाची खरेदी करीत होते. (...अडथळा...) सन 1985 मध्ये मी सभागृहात आलो. तेव्हा पासून मी सभागृहात आहे. तुमच्या कृपेने मी सभागृहात आहेच. त्यामुळे ती काळजी करण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, कापूस एकाधिकार योजना यासाठी सुरु करण्यात आली की, कापसाच्या भावामध्ये फार मोठा फरक असायचा आणि राज्यात कापसाचे भाव बरोबर नसायचे. फेडरेशन यासाठी होते की, राज्यातील शेतकऱ्यांना कापसाचा योग्य भाव मिळाला पाहिजे आणि फेडरेशनच्या माध्यमातून अशा प्रकारचा भाव कन्टिन्यू देण्यात येत होता. सन 1999, 2001 आणि 2003 मध्ये कापसाला भाव देताना शासनाने किती खर्च केला याचे बजेट आपण लक्षात घेतले तर त्यावेळी राज्य शासनाने एका वर्षासाठी दीड-दीड हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यानंतर बाहेरच्या देशात कापसाचे भाव वाढले....

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेबांचा मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

तालिका सभापती : आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेबांविषयी माझ्या मनात अत्यंत आदर आहे, सन्मानाची भावना आहे. ते माझ्यापेक्षा ज्येष्ठ आहेत, याची मला कल्पना आहे. ते एका राष्ट्रीय पक्षाचे प्रदेशाध्यक्ष होते, याचीही मला जाणीव आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

त्यांनी कित्येक वेळा महाराष्ट्र पिंजून काढला, याचीही मला माहिती आहे. ते कापूस उत्पादक भागातील आहेत, याची मला माहिती आहे. त्यांच्या जिल्ह्यात सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत, याची मला कल्पना आहे. त्यांनी पाणी परिषद घेतली होती, याची देखील मला माहिती आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का वाढल्या याचे कारण अद्यापपावेतो कळू शकलेले नाही, ते यवतमाळ जिल्ह्यात असताना असे का होते, याचीही मला कल्पना आहे. मला अशा अनेक गोष्टींची माहिती आहे. (...अडथळा....) माझ्याकडे आणखी अधिकची माहितीही आहे. परंतु ती माहिती मी त्यांना सभागृहाच्या बाहेर देईन. मला राजकीय भाष्य करावयाचे नाही. राजकीय टीकाटिप्पणी करावयाची असेल तर मी मागील शासनाला विचारु शकतो की, आपण कापूस एकाधिकार योजना का बंद केली, रोजगार हमी योजना का बंद केली, कायदा का रद्द केला ? मला माहिती आहे. मी राज्याचा अर्थमंत्री होतो. मला माहिती आहे की, कापूस एकाधिकार योजने अंतर्गत जो पैसा जमा झालेला होता, तो पैसा आपल्याला पाहिजे होता. त्यासाठी कापूस एकाधिकार योजना बंद झाली. त्यावेळी मी संमती दिली होती. कारण, राज्याची आर्थिक स्थिती नाजूक होती. चढ-उतार निधी...(...अडथळा...) सन्माननीय सदस्य, श्री.पांडुरंग फुंडकर पणन महासंघाचे अध्यक्ष होते. रोजगार हमी योजना का बंद केली ? त्यावेळी श्री.हर्षवर्धन पाटील साहेब रोजगार हमी योजना मंत्री होते. रोजगार हमी योजना बंद करण्यासाठी मी प्रखर विरोध केला होता. मी त्यावेळी सांगितले होते की, तुम्ही 10-12 हजार कोटी रुपयांसाठी योजना मारुन टाकता. परंतु तुम्ही तो कायदाच रद्द केला. आपल्याला मागील गोष्टींवर चर्चा करावयाची नाही.

सभापती महोदय, कापसाला 6 हजार रुपये प्रती क्विंटल भाव दिला पाहिजे. परंतु पूर्वी एवढा भाव कधीही मिळालेला नाही. एका वर्षी एवढा भाव मिळाला होता. त्याच्या अगोदर थोडा भाव मिळाला होता. आपण आकडेवारी घेऊ शकता. माझ्यावर हक्कभंग दाखल करु शकता. परंतु यावर्षी मुळात बाजारात, आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव कमी आहेत. कापसाचा भाव 3200-3300 रुपयांपेक्षा जास्त नाही. काँग्रेस पक्षाची सत्ता असलेल्या राज्यात जर 6 हजार रुपये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

प्रती क्विंटलने कापूस विकला जात असेल तर आम्ही उद्यापासून 6,200 रुपये प्रती क्विंटल भाव देण्यास सुरुवात करु. राज्य शासन त्याचा पैसा भरेल. तुमच्या राज्यात काय परिस्थिती होती ? कापसाचा भाव कोठेही 3200-3300 रुपयांपेक्षा जास्त नाही. चायनाने बाजारपेठ बंद केलेली आहे, कापूस घेण्याचे बंद केलेले आहे. देशामध्ये नव्हे तर संपूर्ण जगात कापसाचे भाव कमी झालेले आहेत. आज व्यापारी 3200 रुपयांपेक्षा जास्त दराने कापूस खरेदी करण्यास तयार नाहीत. आज शासन सीसीआयच्या माध्यमातून 4,050 रुपये भावाने कापसाची खरेदी करीत आहे. सीसीआय पैसे देत नाही, सीसीआय कापूस देखील घेत नाही. सीसीआय फक्त शासनासाठी मध्यस्थ म्हणून कापूस खरेदी करीत आहे आणि प्रत्येक क्विंटलसाठी 800 रुपयांचा तोटा होत आहे आणि राज्य शासन हा तोटा शासनाच्या तिजोरीतून भरत आहे. आता पर्यंत शंभर लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे आणि शंभर लाख क्विंटल कापसाच्या मागे प्रती क्विंटल 700-800 रुपये नुकसान भरपाई राज्य शासनाने आता पर्यंत दिलेली आहे. आता पर्यंत कापसाच्या खरेदीमध्ये राज्य शासनाचे 700 कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे गेलेले आहेत.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, केंद्र शासनाने जी सपोर्ट प्राईज ठरवून दिलेली आहे त्यानुसार सर्व शेती मालाची खरेदी करण्याची जबाबदारी केंद्र शासनाची आहे आणि देशात नाफेडच्या माध्यमातून अशा प्रकारची खरेदी होते. मग तुम्ही नाफेडच्या माध्यमातून खरेदी का केली नाही, केंद्रात तुमच्या पक्षाचे सरकार होते, तुम्ही त्यांना का सांगितले नाही की, नाफेडच्या माध्यमातून खरेदी करावी, 700 कोटी रुपये का गेले ? तुमच्या नाकर्तेपणामुळे 700 कोटी रुपये गेले. नाफेडच्या माध्यमातून खरेदी केली असती तर एक पैसाही द्यावा लागला नसता.

तालिका सभापती : आता मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण पूर्ण होईपर्यंत मी कोणालाही बोलण्याची परवानगी देणार नाही.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हा नाकर्तेपणा नाही, हा मागील केंद्र शासनाचा नालायकपणा आहे. त्यांनी डब्ल्यूटीओ बरोबर करार केला. त्यांनी वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन बरोबर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

करार केला आणि तेथे सांगितले की, एमएसपी प्रमाणे भाव दिला पाहिजे. काही ठिकाणी सांगितले देणार नाही आणि ॲग्रीमेंट केल्यामुळे राज्यात पैसा देता येत नव्हता. यावर्षी देशाला पहिले मर्द पंतप्रधान भेटले आणि त्यांनी डब्ल्यूटीओला ठणकावून सांगितले की, तुमच्या बरोबर केलेला मागील करार आम्हाला मान्य नाही. आम्ही तो करार मी मोडून टाकतो आणि त्यांनी यावर्षी ते ॲग्रीमेंट रद्द केले. त्यामुळे आपल्याला कापसाला 4,050 रुपये तरी भाव देता आला. नाही तर आता डब्ल्यूटीओचे आपल्यावर प्रेशर आहे की, जगामध्ये 3200 रुपये भाव असताना तुम्ही एवढा भाव का देत आहात. सबसिडी देण्यासाठी डब्ल्यूटीओचा विरोध आहे. आपले ॲग्रीमेंट आहे, आपला करार आहे, तत्कालीन पंतप्रधानांच्या त्यावर स्वाक्षऱ्या आहेत. तो करार मोडून काढण्याचे धारिष्ट्य या शासनाने पहिल्यांदा केले आणि यामध्ये काही चूक असेल तर अजून अधिवेशन एक महिना चालणार आहे. तुम्ही या संदर्भात माहिती घ्यावी. सभापती महोदय, शासनाला यामध्ये 700 कोटी रुपयांचा तोटा झालेला आहे. कापसाला योग्य भाव दिला पाहिजे या मताचा मी आहे, याबद्दल दुमत नाही. (...अडथळा...) 4 हजार रुपये भाव आहे. आम्ही प्रती क्विंटल 800 रुपये भाव जास्त देत आहोत. करार तुमच्या सरकारने केला होता आणि पाप आम्हाला फेडावे लागत आहे. आमची द्यायची तयारी आहे. परंतु तुम्ही आदर्श केला नसता तर पैसे गेले नसते. आमची कापसाला भाव देण्याची इच्छा असूनही आम्ही तो देऊ शकत नाही आणि आमची अजूनही कापसाला भाव देण्याची तयारी आहे. कापूस खरेदी केल्यानंतर तो विकावयाचा कोठे याची आम्हाला चिंता आहे. बाहेर 3200 रुपयांपेक्षा जास्त दराने कोणी कापूस खरेदी करायला तयार नाही आणि आम्ही 4 हजार रुपये क्विंटलने कापूस खरेदी करून ठेवलेला आहे. आता हा कापूस विकावयाचा कोणाला ? तुम्ही 4 हजार रुपये दराने कापूस घेता काय ? म्हणजे तुम्ही घ्या असे मी म्हणत नाही. या भावाने कापूस खरेदी करणारे गिऱ्हाईक तुम्ही आणणार आहात काय ? आपण जगातील कोणताही माणूस आणावा, मी 4 हजार रुपये नाही तर 500 रुपये तोटा सहन करून कापूस देण्यास तयार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

आम्ही 4 हजार रुपये भावाने कापूस खरेदी केलेला आहे. तुम्ही जगातील कोणताही माणूस माझ्याकडे आणावा की, हा माणूस 3500-3600 रुपये भावाने कापूस खरेदी करण्यास तयार आहे. मी तोटा सहून करुन कापूस देण्यास तयार आहे. कापूस घ्यायला कोणीही तयार नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाचे खरेदीदार नाहीत. कापूस पडून आहे, कापसाचे धागे, तागे तसेच पडून आहेत. परंतु आमच्या शासनाने तोटा सहन करुन का होईना कापसासाठी पैसे दिले. यांच्यासारखे कापूस एकाधिकार योजना बंद करुन पळून गेले नाहीत. तुम्ही आम्हाला तीन महिन्यामध्ये सांगत आहात. आमचे सरकार सत्तेवर येऊन आता चौथा महिना सुरु आहे. पुढे काय होते ते आपण बघावे. आपण चौथ्याच महिन्यात शंका घेत आहात. हे वागणे बरे नव्हे. ज्यांनी 15 वर्षे राज्य केले.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या नावाचा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

सभापती महोदय, कापूस एकाधिकार खरेदी योजना का बंद झाली याची माननीय महसूल मंत्र्यांना चांगली माहिती आहे. सह्याद्री अतिथीगृहामध्ये त्यांनी केलेले भाषण आम्ही ऐकलेले आहे. त्यावेळची किंवा त्यापूर्वीची स्थिती अशी होती की, बाहेरच्या देशांमध्ये, भारतामध्ये आणि आपल्या राज्यामध्ये सुध्दा कापसाला योग्य भाव मिळत नव्हता. कापूस एकाधिकार योजनेच्या माध्यमातून तीन वर्षात 1500 कोटी रुपये दिले गेले. म्हणजे आजच्या तुलनेत ही रक्कम 3 ते 4 हजार कोटी रुपये होते. आज तुम्ही 3 ते 4 हजार कोटी रुपये खर्च केले असते तर ही परिस्थिती आलीच नसती. ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, त्या कापूस उत्पादक क्षेत्रातील आहेत. त्या शेतकऱ्यांना सन 2000 मध्ये काँग्रेस पक्षाच्या सरकारने 1500 कोटी रुपये बोनस रुपाने दिले होते. 2001 मध्ये 1700 कोटी रुपये दिले होते. आज देशामध्ये आणि जागतिक स्तरावर कापसाचे भाव कोसळले असताना त्या शेतक-यांना मदत करण्याची सरकारची जबाबदारी असताना बाहेरच्या देशामध्ये काय स्थिती आहे, भाव कसा कमी झाला आहे याबद्दल महसूल मंत्र्यांनी वक्तव्य करणे म्हणजे शेतकऱ्यांना योग्य भाव न देता आत्महत्या करण्यासाठी सोडून देत आहात असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु असताना माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे वारंवार हस्तक्षेप करुन बोलण्यासाठी उभे रहात आहेत. त्यामुळे आम्हाला मंत्री महोदयांचे उत्तर काय आहे हे कळून येत नाही. युती सरकारने ही नवीन पध्दत सुरु केली आहे का? मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु असताना माननीय सदस्यांना बोलण्याची संधी का दिली जात आहे? माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु असताना 7 ते 8 वेळा बोलण्यासाठी उभे राहिले आहेत.

श्री.संजय दत्त : माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख केल्यामुळे ते खुलासा करीत होते.

श्री.एकनाथराव खडसे : तुम्ही ताठ मानेने उभे राहून फिरायला लागले कसे? यवतमाळ जिल्हयामधील आमदार आहात. जिल्हयातील शेतकरी मरायला लागले त्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो?

श्री.हरिसिंग राठोड : शेतकऱ्यांची थट्टा करीत आहात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : लाज वाटली पाहिजे. आपल्या जिल्हयामध्ये एवढ्या आत्महत्या का होतात, या राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या का होतात? आमचा शेतकरी मरतो त्याची चिंता नाही.....(अडथळा)....सभापती महोदय, एवढ्या मोठया संख्येने शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या हे कोणाचे पाप आहे? यवतमाळ जिल्हयातील शेतकरी मरतो आहे.....(अडथळा)....माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड साहेब, दिल्लीमध्ये तत्कालीन पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारविरुध्दच्या अविश्वास प्रस्तावाच्या वेळी मी आपल्याला भेटलो होतो. दोन तास तुमच्या सोबत बसलो होतो. तुम्ही मला काय सांगितले होते? असे असेल तर येतो, नाही तर जा. हे तुमचे उत्तर होते. आमच्या खिशात काही कागदपत्र नव्हते.

श्री.हरिसिंग राठोड : तुम्ही वैयक्तिक काय घेता?

श्री.एकनाथराव खडसे : कागदपत्र नव्हते. मला सगळे माहीत आहे. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आमची मान शरमेने खाली जात आहे. शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. शेतकरी जगला पाहिजे. त्यांनी आत्महत्या करता कामा नये. आम्हाला ते लाजिरवाणे आहे. राज्याच्या दृष्टीकोनातून लाजिरवाणे आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. दुसऱ्या बाजूला नैसर्गिक आपत्ती येत असताना तो जगू शकत नाही. अशा शेतकऱ्यांबाबत कायमस्वरुपी उपाययोजना केली पाहिजे. यासाठी राज्य सरकारने काही निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये जलयुक्त शिवार हा एक निर्णय आहे. 5 लाख सौर शक्तीवर चालणारे पंप शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. दुष्काळाच्या स्थितीत जी मदत द्यायची आहे ती आम्ही दिली. काल या ठिकाणी म्हटले गेले की, हॉर्टीकल्चरच्या संदर्भात किमान 25 हजार रुपये हेक्टरी मदत मिळाली पाहिजे. 15 हजार रुपये कमी बागायतीला मिळाले पाहिजेत. ज्या फळबागांची हानी झाली, त्यात द्राक्ष असतील किंवा अन्य फळ पिके असतील त्या बागांकरिता हेक्टरी 25 हजार रुपये मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या बरोबरीला शेतकऱ्यांसाठी विशेष प्रकारचे पॅकेज देणार आहोत. विशेष पॅकेज आता आणायचे म्हटले तर पंचनामे पूर्ण होऊन नुकसान भरपाईची रक्कम आल्याशिवाय पॅकेज घोषित करता येणार नाही. त्यामुळे अधिवेशन संपण्याच्या आत शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज देणार आहोत. त्यामधून अधिकाधिक मदत देण्याचा प्रयत्न राहणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) O.3

SGB/ 12:50

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, बोअरच्या संदर्भात 750 ते 1000 फूट खोलवर जाण्याचा प्रयत्न होत आहे असा मुद्दा माननीय सदस्य श्री.दिपकराव साळुंखे यांनी मांडला. ही परवानगी राज्य सरकारने दिलेली नाही. राज्यामध्ये 210 फुटापेक्षा जास्त खाली जाऊन बोअर घेता येणार नाही. या राज्यामध्ये तशा स्वरूपाचा कायदा केलेला आहे. भूजल विनिमय कायद्याच्या माध्यमातून बोअर घेण्यासाठी भूगर्भामध्ये 210 फुटापेक्षा अधिक खाली जाता येणार नाही, अन्यथा शिक्षेची तरतूद केली आहे. एका विहिरीशेजारी 500 मीटरच्या आत दुसरी विहीर खोदता येणार नाही, अशा स्वरूपाचे बंधन घालण्यात आले आहे. अशा प्रकारची तक्रार आली किंवा तुम्ही पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली तर तातडीने अस्तित्वात असलेल्या कायद्यांतर्गत त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश अलाहिदा दिलेले आहेत. कोणी कारवाई करीत नसेल तर तशा सूचना त्यांना देण्यात येतील. या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे ही सरकारची भूमिका आहे. निश्चितपणे मागील कालखंडापेक्षा अधिक मदत राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्याचा आमचा प्रयत्न राहील. त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करु एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शेतकऱ्यांना कोणताही न्याय या सरकारने दिलेला नाही. आम्ही याबाबत निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाच्या काही माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेच्या निमित्ताने मी दोन तीन महत्वाचे मुद्दे मांडले होते, त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. सभापती महोदय, 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांसाठी सरकारने 4000 कोटी रुपये मदत जाहीर केली. प्रशासनाकडून 4803 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती हे मी माझ्या भाषणात सांगितले होते. उर्वरित 803 कोटी रुपये आणि 78 टक्क्यामधील 22 टक्के केव्हा दिले जातील याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांमध्ये 2000 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद केली आहे ती आकस्मिक निधीची भरपाई करण्यासाठी केलेली आहे. नुकसानग्रस्त भागांसाठी 25 हजार रुपये प्रती हेक्टर आणि 1 हेक्टरची मर्यादा घालण्यात आली आहे, ही मर्यादा 2 हेक्टरपर्यंत वाढविण्यात यावी. पूर्वी ही मर्यादा 2 हेक्टर होती. त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. 28 तारखेला झालेल्या गारपीट आणि अवकाळी पावसाचा विषय नियम 289 अन्वयेच्या सूचनेमध्ये व नियम 97 अन्वयेच्या अल्पकालीन चर्चेच्या प्रस्तावामध्ये होता.

नंतर पी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

28, 1 व 8 तारखेला राज्यात प्रचंड पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यासंबंधातील पंचनामे सुरू करण्याची विनंती आपणाला केली. त्याचाही उल्लेख माननीय मंत्र्यांच्या भाषणात आलेला नाही. शासनाची तिजोरी रिकामी असल्याचा उल्लेख माननीय मंत्र्यांनी केला आहे. मधल्या काळात जे काही झाले ते आमच्या शासनाने केले असेही सांगण्याचा त्यांनी प्रत्यन केला आहे. आघाडीचे शासन असताना सुद्धा राज्यात अवकाळी पाऊस झाला होता. त्यावेळी शासनाने जून 2014 शेतकऱ्यांचे वीज देयक भरले होते. आता गारपीट व अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांचे वीज देयक या शासनाने भरले पाहिजे अशी आमची मागणी होती. त्याचे देखील उत्तर आलेले नाही. सन 2013-14 मध्ये बाधित शेतकऱ्यांचे 268 कोटी रूपयांच्या कर्जाचे व्याज आमच्या सरकारने भरलेले आहे. आपण जे उत्तर दिलेले आहे ते वरवरचे आहे. येथे आपण वर्ल्ड ट्रेडचा विषय सांगितला आहे. तो करार पूर्वी केला होता त्यामुळे कापसाचे भाव वाढले असे आपण सांगितले. मी माझ्या कालच्या भाषणात उल्लेख केला होता की, क्रूड ऑईलचे दर कमी झाल्याचे श्रेय केंद्र सरकार घेत असेल तर आज जागतिक पातळीवर कापसाचे भाव कमी झाले आहेत त्याचे श्रेय देखील केंद्र सरकारने घेतले पाहिजे. श्री.शरद पवार साहेब हे दहा वर्ष देशाचे माननीय कृषी मंत्री होते. त्यामुळे आधारभावाच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे. चुकीचे पटलावर राहू नये म्हणून मला थोडीशी दुरूस्ती करावयाची आहे. सन 2004 मध्ये तांदळाचा दर रूपये 560 इतका होता. श्री.पवार साहेबांच्या काळात तो 12050 रूपये झाला. ही 123 टक्क्यांची वाढ आहे. ज्वारीचा दर रूपये 515 वरून रूपये 1500 पर्यंत गेला. ही 118 टक्के वाढ आहे. कापसाचा दर रूपये 1760 वरून रूपये 3700 वर गेला. ही 104 टक्के वाढ आहे. सोयाबीनचा दर रूपये 900 वरून 2200 पर्यंत गेला. ही 114 टक्क्यांची वाढ आहे. देशाच्या कृषी मंत्री पदावर श्री.पवार साहेब असताना त्यांनी 10 वर्षामध्ये 100 टक्क्यांच्यावर वाढ देशातील सर्व शेतकऱ्यांना करून दिलेली आहे. केंद्र सरकार सत्तेमध्ये येऊन नऊ महिने झालेले आहेत. कृषी मूल्यासंबंधी आपण आपल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

उत्तरात शासनाचे म्हणणे मांडले आहे म्हणून मी आपले आभार मानतो. 1 जानेवारी रोजी कृषी मूल्य आधाराच्या किंमती जाहीर करण्यात आल्या होत्या. त्या 0.2 टक्के आहेत. हे जबाबदारीने बोलत आहे. त्यामुळे माझे स्पष्ट मत आहे की, महाराष्ट्राचा शेतकरी अडचणीत असताना राज्य सरकारची मदत अत्यंत तुटपुंजी मिळत आहे. त्यामुळे आमची मागणी आहे की, राज्य सरकारने शेतकऱ्यांना भरीव मदत करावी. आपण केंद्र शासनाची वाट न बघता मदत जाहीर करावी. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी त्याप्रमाणे मदत केल्याचे देखील आम्ही पाहिलेले आहे. आपण जी मदत केली आहे ती अत्यंत तुटपुंजी आहे. आज राज्य सरकारची केंद्र शासनाकडे पत राहिलेली नसल्यामुळेच आपणाला निधी मिळालेला नाही. राज्यामध्ये भयंकर दुष्काळ पडलेला असताना, गारपीट झालेली असताना, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असताना राज्याने मागणी करून देखील केंद्र शासनाकडून पैसे मिळत नाहीत. अशी परिस्थिती यापूर्वी कधीही झाली नव्हती. ही परिस्थिती आताच झाली आहे. आम्ही या उत्तरावर समाधानी नाही. आम्ही जी मागणी केली आहे ती सरकारने मान्य करावी. एवढीच मला आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करावयाची आहे. येथे जे उत्तर देण्यात आले आहे ते आम्हाला मान्य नाही म्हणून सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत बहिर्गमन करतात.)

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ खडसे : सभापती महोदय, विरोधी पक्षाची बहिर्गमन करण्याची मानसिकता होई पर्यंत मी खाली बसतो हे आधीच सांगितले होते. ते गेल्या अनेक वर्षांपासून सत्तेत होते. ते आता सत्तेत नसल्यामुळे त्यांच्या जिव्हारी लागले आहे. ते जास्त वेळ सभागृहात बसूच शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे तर फारच अस्वस्थ झाले होते. मी त्यांना भेटून त्यांचे सांत्वन करणार आहे.

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी ही गोष्ट सांगू शकलेलो नाही. माझ्याकडे कपाशीचे भाव आहेत. मागील एक वर्ष वगळले तर त्याच्या आधीच्या वर्षात राज्य शासनाकडून कधीही जास्त भाव दिलेले नाहीत. जो काही भाव आला आहे तो खाजगी व्यापाऱ्यांनी दिलेला आहे. त्यावेळी राज्य सरकारच्या खरेदीला प्रतिसाद मिळाला नाही. कारण बाहेर कापसाला जास्त भाव मिळत होता. ही पहिली वेळ आहे की, राज्य सरकारने कापूस खरेदी करायला सुरूवात केली आणि त्यास जास्त भाव मिळालेला आहे. त्यामुळे आपल्याकडे 1 लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे उठून गेलेले आहेत. मला त्यांना सांगावयाचे होते की, सन 2013 मध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मदत अद्याप पर्यंत मिळालेली नाही. ती आता आम्ही देत आहोत. सन 2013 ची मदत शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत पोहोचलेली नाही. विधान सभा सदस्य माननीय श्री.गोपालदास अग्रवाल यांनी माझ्याकडे चिठ्ठी पाठवून ही माहिती कळविली होती. भ्ंडारा, गोंदियासाठी ही मदत मिळाली नसल्याचे त्यांनी मला सांगितले होते. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर येथील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी मी त्यांचा उल्लेख करून त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ताबडतोब मदत देण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. आता जेव्हा येत होतो तेव्हा उस्मानाबाद जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य श्री.राणा जगजितसिंह हे मला भेटले. त्यांनी देखील उस्मानाबाद जिल्ह्याची सन 2012-13 ची दुष्काळग्रस्तांची मदत मिळाली नसल्याचे सांगितले आहे. दुष्काळाची मदत देण्यात यावी अशा सूचना मी आताच देऊन आलो आहे. सन 2012-13 चे दुष्काळग्रस्तांचे देणे आम्ही अजूनही फेडत आहोत. त्या रकमा आघाडी सरकारने जाहीर केल्या होत्या. ठिबक सिंचनासंबंधी मी सांगू इच्छितो की, सन 2011 ते 2014 पर्यंतची ठिबक सिंचनाची सबसिडी आघाडी सरकारने दिली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ खडसे....

आता आम्ही पुरवणी मागण्यांमध्ये सर्व काही तरतुदी केलेल्या आहेत. अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर या मागण्या मंजूर झाल्यातर 100 टक्के हा अनुशेष आम्हाला दूर करावा लागणार आहे. तीन वर्ष आघाडी शासनाने ठिबक योजनेचा पैसा दिलेला नाही. दुष्काळाचा पैसा दिलेला नाही. तेव्हा ही मदत देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

2 हेक्टर पर्यंत आम्ही मदत करीत आहोत. जे मोठे शेतकरी आहेत, बागायतदार शेतकरी आहेत, त्यांना इतरांच्या तुलनेत कमी मदत देण्याचा शासनाचा विचार आहे. हा विचार राज्य शासनाच्या नव्हे तर केंद्र शासनाच्या एनडीएफआयचा निर्णय आहे. हा निर्णय माझा स्वतःचा नाही. राष्ट्रीय आपत्ती निधी हा केंद्र शासनाकडून मिळतो. त्याचे निकष आताच श्री.मोदी साहेबांनी केलेले नाहीत. हे निकष आघाडी सरकारने केले आहेत. त्या निकषानुसार आम्ही काम करीत आहोत. तरी देखील मी माननीय मुख्यमंत्र्यांना यात काही शिथिलता आणता येईल काय हे पहावे अशी सूचना केली आहे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आपण जेव्हा पॅकेज जाहीर करू तेव्हा त्याचा जरूर विचार करू. शेतकऱ्यांना अधिकाधिक देण्याचा आमचा विचार प्रयत्न आहे. त्यात राजकारण करण्याचा देखील प्रयत्न नाही. आघाडी सरकारच्या पापाचे फळ आता शेतकऱ्यांना भोगावे लागत असून ते पाप आम्हाला फेडावे लागत आहे ही स्थिती आहे. अवघ्या तीन महिन्यांमध्ये संपूर्ण चित्र बदलता येणे शक्य होणार नाही. या राज्यामध्ये 50 वर्षे आमचे राज्य नव्हते. जे काही 50 वर्षामध्ये चांगले केले आहे त्याचे श्रेय विरोधी पक्ष घेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे श्रेय देखील त्यांनीच घेतले पाहिजे. परंतु, ते घेण्याची त्यांची तयार नाही. त्यामुळेच जनतेने त्यांना चांगल्या प्रकारे उत्तर दिलेले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथ खडसे .....

विरोधी पक्षाचा लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत जो दारुण पराभव झाला, त्या पराभवातून ते अजून बाहेर आलेले नाहीत व त्यामुळेच त्यांनी बर्हिगमन केले असावे. ठीक आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. या राज्यातील कोणत्याही शेतकऱ्याने आत्महत्या करु नये अशी आमची अपेक्षा असून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते): सभागृहाने दोन्ही प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक 1 वाजून 25 मिनिटांनी सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.11 ते 1.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

राज्यातील अतिरिक्त शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

(1) * ३३९४ श्री.कपिल पाटील, डॉ.अपूर्व हिरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.धनंजय मुंडे सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील अनुदानित विद्यालयांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या कर्मचारी सूचीवरुन कोणताही शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरविण्यांत येवू नये, असे आदेश मा.न्यायालयाने दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मा.न्यायालयाचे आदेशाबरहुकूम एकही कर्मचारी अतिरिक्त ठरवू नये आणि त्याप्रमाणे स्थगिती दिल्याचा सुधारित शासन निर्णय निर्गमित करावा, म्हणून लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन देवून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शालेय शिक्षण विभागाकडील दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ चे शासन परिपत्रकान्वये एकाही अतिरिक्त कर्मचाऱ्याचे ऑफ लाईन पध्दतीचे वेतन काढू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यांत आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशाबरहुकूम एकही कर्मचारी अतिरिक्त होणार नाही, असे मा.शिक्षण मंत्री यांनी मान्य केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, याउपरही विविध जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ चे वेतन देयके सन २०१३-१४ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी वगळून नंतरच सादर करणेचे आदेश दिलेले आहेत व त्याबरोबर मुख्याध्यापक यांचेकडून त्यांनी एकही अतिरिक्त कर्मचाऱ्याचे वेतन काढलेले नाही, याबाबतचे हमीपत्रही घेण्यात आले हे ही खरे आहे काय, ..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394...

(6) असल्यास, मा.न्यायालयाचे आदेश व मा.मंत्री शालेय शिक्षण विभाग यांचे आदेशाची यातून अवमानना घडून येते, हे ही खरे आहे काय,

(7) असल्यास, शिक्षण सेवकांच्या सेवेस संरक्षण देणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे?

श्री. विनोद तावडे : (१) सन २०१३-१४ च्या संचमान्यता व समायोजनाच्या कार्यवाहीस मा.उच्च न्यायालयाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

(2) होय.

(3) दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ च्या शासन परिपत्रकान्वये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन ऑनलाईन न काढता ऑफलाईन काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(4) नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

(6) प्रश्न उद्भवत नाही.

(7) अतिरिक्त ठरणा-या शिक्षण सेवकांच्या सेवेस संरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने ज्या दिवशी हा निर्णय दिला त्या अगोदर या जी.आर.प्रमाणे किती शिक्षक सरप्लस केले होते आणि त्यानंतर किती शिक्षक सरप्लस केले ? या प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने "जैसे थे" आदेश दिले असल्यामुळे त्यानंतर जे शिक्षक अतिरिक्त झाले असतील त्यांना पूर्ववत त्यांच्या शाळेमध्ये पाठविणे आवश्यक आहे त्याप्रमाणे शासन निर्णय घेईल काय, जी.आर.च्या शेवटच्या ओळीमध्ये असे म्हटले आहे की, "परिविक्षाधीन शिक्षकाची सेवा तत्काळ समाप्त करावी." या ओळीचा गैर अर्थ लावून इयत्ता नववी आणि दहावीच्या शिक्षकांना जे परिविक्षाधीन आहेत, त्यांची सेवा समाप्त केलेली आहे त्यांना पुन्हा पुनर्स्थापित करणार काय, माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अगोदर सरप्लस झाले असे साधारणत: 350 शिक्षक असावेत त्या शिक्षकांचे वेतन तातडीने सुरु करणार काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने अतिरिक्त शिक्षकांच्या संदर्भात जो निर्णय दिलेला आहे, त्याप्रमाणे सरकारची कार्यवाही होईल. या प्रश्ना संदर्भात माननीय उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ तसेच अन्य खंडपीठामध्ये केसेस दाखल झालेल्या असून त्या प्रकरणी वेगवेगळे निर्णय झालेले आहेत. काही ठिकाणी ॲक्शन न घेण्या विषयी निर्णय होतो, काही ठिकाणी "जैसे थे" ठेवावे असा निर्णय होता तर काही ठिकाणी संचमान्यता पत्राला स्थगिती होती. तेव्हा या प्रश्नासंबंधी उच्च न्यायालयात एकत्रितपणे सुनावणी घ्यावी अशी विनंती आम्ही माननीय उच्च न्यायालयाला केली आणि त्याप्रमाणे त्यांनी सुनावणी घेतलेली आहे. माननीय उच्च न्यायालयाने "जैसे थे" असे आदेश दिलेले असल्यामुळे आम्ही स्वाभाविकपणे ताबडतोब संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत. या प्रश्ना संबंधी केव्हा निकाल लागेल, प्रत्यक्षात निकाल लागल्यानंतर त्याची लिखित कॉपी येते, त्या विषयी विधी व न्याय विभागाकडून माहिती येते त्यामुळे 20 दिवसांच्या गॅपनंतर ते गेले असेल. त्या गॅपमध्ये 300 ते 350 संख्या असेल, ज्या दिवशी निकाल आला त्या दिवसाप्रमाणे तो लागू करु.

सभापती महोदय, 92 शिक्षण सहायकांची नोकरी जाऊ नये म्हणून मला रोज अनेकांचे एसएमएस येत होते. राज्यात शिक्षकांची जवळपास 10 हजार 77 पदे रिक्त आहेत आणि या वर्षी उच्च न्यायालयाचा निकाल लागला, या शिक्षण सहायकांना प्राथम्याने समायोजित करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394....

श्री.विनोद तावडे....

तसेच इयत्ता 9 वी व 10 वी च्या शिक्षकांवर चुकीचा अर्थ काढून जर कार्यवाही केली असेल तर स्वाभाविकपणे ते दुरुस्त करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाबाबतच्या महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. अतिरिक्त शिक्षकांमध्ये दोन प्रकारचे शिक्षक आहेत. एक म्हणजे सन 2013-14 च्या संचमान्यतेच्या आधारे अतिरिक्त ठरलेले आणि दुसरे म्हणजे त्यापूर्वी विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे अतिरिक्त ठरलेले होय. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु आज अनेक ठिकाणी पदे रिक्त नसल्यामुळे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होत नाही. वास्तविक पाहता अनुदानित शाळांतील अतिरिक्त ठरलेले शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी असतील आणि जे कायमस्वरुपी असतील तर त्यांना वेतन देण्याची जबाबदारी शासनाची आहे. पण दुर्दैवाने शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दोन गट पाडले. 2013-14 मध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचा पगार मिळतो आणि 2012-13 मध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचा पगार मिळत नाही. यामध्ये शिक्षकांचा दोष नाही. शिक्षक हे 2012-13 मध्ये अतिरिक्त झाले की 2013-14 च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त झाले याचा विचार न करता, सर्व अतिरिक्त शिक्षकांना इतर शिक्षकांबरोबर रेग्युलर वेतन देणार काय ? तसेच दुसरी बाब अशी की, अतिरिक्त ठरलेले शिक्षक समायोजन केलेल्या कोणत्याही शाळांमध्ये जाण्यास तयार आहेत. कारण अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चॉईस नाही. पण दुर्दैवाने अतिरिक्त शिक्षकांचे ज्या शाळांमध्ये समायोजन केले जाते त्या शाळेचे संस्थाचालक अतिरिक्त शिक्षकांना हजर करुन घेत नाहीत. त्यामुळे त्यांचा पगार बंद होतो. अशा परिस्थितीत हजर करुन न घेणाऱ्या संस्था चालकांवर कोणतीही कारवाई केली जात नाही. उलट त्यांना संरक्षण दिले जाते. अतिरिक्त शिक्षकांना कायदेशीरदृष्ट्या सामावून घेणे बंधनकारक असताना देखील संस्था चालक त्यांना सामावून घेत नाहीत म्हणून त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ? अनेक जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक होते, परंतु त्यांचे समायोजन करण्यात आलेले नाही. असे असताना शिक्षणाधिकाऱ्यांनी नवीन शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता दिली आहे. अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन न करता नवीन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे ते शिक्षक आज बाहेर आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ? तसेच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न करता, ज्यांनी अतिरिक्त शिक्षक असताना नवीन शिक्षकांना मान्यता दिली त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन 2013-14 च्या संचमान्यता व समायोजनाच्या कार्यवाहीला माननीय उच्च न्यायालयाने 'जैसे थे' आदेश दिलेले आहेत. सन 2012-13 च्या संचमान्यतेबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जे सांगितले ते खरे आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, या विषयी आताच आदेश काढावेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, गेल्या आठवड्यात आयुक्तांनी या बाबत आदेश काढलेले आहेत. त्यामुळे या आठवड्यात सर्वांचे 2012-13 चे पगार होतील. तसेच ज्या संस्था समायोजित शिक्षकांना सामावून घेणार नाहीत त्यांना त्या शिक्षकांना सामावून घेणे बंधनकारक आहे. सर्व संस्था चालक नाही परंतु अनेक संस्था चालक शिक्षक भरती करता आली तर प्रत्येक शिक्षकाच्या मागे 10-15 लाख रुपये कमवितात. त्यामुळे अशा चुकीच्या पध्दतीने, गैरमार्गाने आणि पळवाटा शोधून संस्था चालक शिक्षकांची भरती करीत असतील तर त्या संस्थांवर सरकारकडून आवश्यक ती कारवाई नक्कीच करण्यात येईल. विभागाच्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त शिक्षकांना समायोजित करुन घेण्याऐवजी नवीन शिक्षक भरती करण्यास परवानगी दिली असेल तर त्याबाबत आम्ही नक्की चौकशी करु.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी मंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यापासून ते गोडगोड घोषणा करीत आहेत. त्या बाबत आमचे दुमत नाही. परंतु माननीय मंत्र्यांकडून आमची अपेक्षा आहे की, निर्णय तातडीने झाल्यानंतर त्या बाबतचे लेखी आदेश काढावयास पाहिजे. शिक्षण विभागाने सन 2013-14 ची संचमान्यता 2014-15 मध्ये दिली. संचमान्यता ही दरवर्षीच्या विद्यार्थी संख्येवर होत असते. पण यात आपल्या विभागाने गोंधळ करुन ठेवला आहे. सन 2013-14 ची संचमान्यता 2014-15 मध्ये दिली. चालू शैक्षणिक वर्ष आता संपत आले आहे. आज 12 मार्च आहे. शैक्षणिक वर्ष संपण्यास आता केवळ एक महिना राहिला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394....

श्री.विक्रम काळे....

या वर्षीच्या संच मान्यतेस मान्यता देणे शिक्षण विभागाला शक्य नाही. शिक्षणाच्या बाबतीत राज्यात काय सुरु आहे असा प्रश्न राज्यातील जनतेसमोर निर्माण झाला आहे. जे शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत त्यांचे वेतन मार्च महिन्यापर्यंत काढावे असे आदेशात नमूद केले आहे. आता मार्च महिना संपत आला आहे. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईपर्यंत मूळ आस्थापनेतून त्या शिक्षकांचे पगार काढण्याचे आदेश देण्यात येतील काय ? तसेच दुसरी बाब अशी की, सन 2013-14 पूर्वी जे शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत त्यांचेही वेतन मूळ आस्थापनेतून काढण्याबाबत आदेश देणार काय ? तसेच तिसरा प्रश्न असा की, शिक्षण सेवकांना संरक्षण देण्यात येईल असे गेल्या अशिवेशनात माननीय मंत्र्यांनी संगितले होते. परंतु त्या बाबतचा लेखी आदेश विभागाने काढला नाही. या संदर्भातील लेखी आदेश निघेपर्यंत कोणीही त्यावर विश्वास ठेवणार नाही. आताच माननीय मंत्र्यांनी सांगितले की, आम्ही शिक्षकांना काढणार नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या संदर्भातील लेखी आदेश कधी काढणार आहात ? तसेच शिक्षक सेवकांना सेवेत ठेवले जाईल या बाबतचा लेखी आदेश हे अधिवेशन संपण्याच्या आत काढला जाईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय अभ्यासू सदस्य श्री.विक्रम काळे यांनी मांडलेला मुद्दा खरा आहे. समायोजन संच मान्यतेची सर्व प्रक्रिया पूर्ण होत होत फेब्रुवारी-मार्च महिना उजाडतो आणि परीक्षेच्या 10-15 दिवस अगोदर नवीन शिक्षक त्या शाळेत जातात. अशा परिस्थितीत ते शिक्षक कसे शिकविणार ही त्यांची चिंता वास्तव आहे. ही चिंता त्यांनी यापूर्वी 8-10 वर्षे मांडली, पण पूर्वीच्या सरकारमधील मंत्र्यांनी त्यांना दाद दिली नाही. मी सांगू इच्छितो की, या महिन्यात विद्यार्थी आणि महाविद्यालयांसाठी ऑनलाईन पध्दत पूर्ण करीत आहोत. आज आमच्यासमोर न्यायालयाच्या एका निर्णयाची अडचण आहे. त्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश होईपर्यंत म्हणजेच 30 ऑक्टोबरपर्यंत थांबावे. गेल्या चार वर्षात 30 जुलै ते 30 ऑक्टोबर या दरम्यान किती विद्यार्थी प्रवेश घेतात याचा अभ्यास मी केला. त्यात दिसून आले की, या कालावधीत साधारणत: दोन-अडीच टक्के विद्यार्थी सुध्दा प्रवेश घेत नाहीत. पण ज्या चोरी करणाऱ्या शाळा आहेत, ज्यांची टक्केवारी कमी आहे, त्या शाळांनी आपल्याकडील विद्यार्थी तिकडे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दाखविण्यास संधी मिळावी म्हणून 30 ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढवून ठेवली आहे. त्यामुळे

श्री.विनोद तावडे....

न्यायालयात जाऊन व त्यांना मागची सर्व आकडेवारी दाखवून 30 जुलै ही मुदत मान्य झाली तर 15 ऑगस्टला तो शिक्षक नवीन शाळेमध्ये झेंडा फडकविण्यास पोहोचेल. 15 ऑगस्टपर्यंत शिक्षकाचे समायोजन झालेले असेल. अशी योजना सुरु करीत आहोत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचा गेल्या 8-10 वर्षात न सुटलेला प्रश्न गोडगोड उत्तरे देणाऱ्या मंत्र्यांनी सोडविल्याबद्दल ते कौतुक करतील अशी माझी खात्री आहे.

महोदय, दुसरी बाब अशी की, शिक्षण सहायकांच्या नोकरीच्या सुरक्षेची पूर्ण हमी मी स्वीकारली आहे. या बाबतचा आदेश मी काढू शकत नाही. कारण या बाबत आदेश काढला तर माझ्यावर कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होईल. परंतु सध्या या विषयी न्यायालयात 'जैसे थे' ची परिस्थिती आहे. या प्रकरणाचा निकाल लागणे आवश्यक आहे. आम्हाला शिक्षण विभागात 10 हजार पदे भरावयाची आहेत. त्यातील पहिली 90 पदे शिक्षण सहायकांचीच भरण्यात येतील. या बाबतची जबाबदारी शिक्षण विभाग आणि शिक्षण मंत्र्यांनी स्वत: घेतली आहे. उच्च न्यायालयात सुनावणी होत असताना असा आदेश काढला तर उद्या कोणी तरी न्यायालयात जाऊन पुन्हा या शिक्षकांची नोकरी जाईल आणि सन्माननीय सदस्यांचा मूळ उद्देश असफल होईल.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394....

श्री. विनोद तावडे ....

तुमचा मूळ उद्देश सफल होण्यासाठीच मी आज आदेश काढलेला नाही. पण त्या पूर्ण 90 जागांच्या नोकरीची हमी शिक्षण मंत्री म्हणून मी स्वीकारली आहे. आपणास काळजी करण्याचे कारण नाही.

श्री. नागो गाणार : सभापती महोदय, सन 2013-14 च्या संच निर्धारणाचा विषय आहे. न्यायालयाने स्टेटस्को दिला आहे त्यामुळे या संच निर्धारणाच्या आधारावर ज्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्यापकांचे वेतन थांबविण्यात आले आहे, ते वेतन दिले जाणार आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाने कोणाचेही वेतन थांबविलेले नाही किंवा थांबवू शकत नाही. सरकारी नोकरीत इतकी वर्षे कार्यरत असल्यामुळे त्यांचे वेतन देणे क्रमप्राप्त आहे. ते कोणत्या विद्यालयामध्ये आहेत एवढा त्यातील मुद्दा आहे. ऑनलाईन व ऑफलाईन हा त्यातील मुद्दा आहे. मी सांगू इच्छितो की, या सर्वांचे वेतन 100 टक्के दिले जाईल. शिक्षक शिक्षक आमदारांकडे जाऊन सांगतात की, आमचा पगार झालेला नाही. मी या संदर्भात खात्याला सांगितले आहे की, माझा पगार झालेला नाही अशी थेट तक्रार शिक्षण आयुक्त किंवा आमच्याकडे प्राप्त झाली तर पुढच्या 7 दिवसांत पगार होण्याची व्यवस्था करण्यात येईल. मात्र या संदर्भात स्पेसिफिक तक्रार आली पाहिजे. ठाण्यातील 147 शिक्षकांची तक्रार आली होती. आम्ही त्या संदर्भात ताबडतोब निर्णय घेऊन पुढील 8 दिवसांत त्यांचे पगार रवाना केले. सभापती महोदय, असे जर काही असेल तर 31 मार्चच्या आत संबंधितांना पगार देण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माध्यमिक किंवा प्राथमिक शाळांतील अतिरिक्त शिक्षक आहेत. हा प्रश्न दिवसेंदिवस कठीण होणार आहे. गेल्या नागपूरच्या अधिवेशनात सांगण्यात आले हाते की, राज्यात 50 ते 75 हजार शिक्षक जास्त आहेत. पुढील वर्षात त्यांची संख्या दीड लाखांपर्यंत जाणार आहे. वर्गामध्ये कमीत कमी 35 विद्यार्थी पाहिजेत अशी शासनाची अट आहे, ती शिथिल करून 20 विद्यार्थ्यांवर आणली तर बरे होईल. आपण असे केल्यामुळे शिक्षकांचा दर्जा सुधारेल आणि हा प्रश्न निकालात निघेल. शाळा बंद पडणे ही गंभीर बाब आहे. या शाळांत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394....

श्री. जयंत प्र. पाटील ....

गरिबांची मुले शिकतात. सरकार या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेईल का ? दिवसेंदिवस आपल्या सरकारी शाळा बंद पडत चालल्या आहेत. विद्यार्थी नसल्यामुळे शाळांतील शिक्षक अतिरिक्त झाले आहेत. त्यामुळे आपल्याला त्यांना पगार देण्यासाठी प्रश्न मांडावेच लागणार आहे. शासन या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचे वेगळे काम करेल का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी मांडलेला प्रश्न योग्य आहे. येत्या काळात हा प्रश्न अतिशय गंभीर होत जाणार आहे. आता आपण सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांशी बोललो तर आपल्याला समजेल की, ती 3-4-5 भावंडे होती. परंतु, आता त्यांना 1 किंवा 2 मुले आहेत. मुलांची संख्या कमी होत चालली आहे. त्यामुळे शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे. विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे येत्या काळात शाळा बंद पडणार आहेत. जगाचा नियम आहे. विकासाभिमुख देश विकसित देशाकडे जात असतात आणि आपोआप विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असते. देशातील विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे स्वाभाविकपणे शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होणार आहे. त्यामुळे शिक्षकांची संख्या स्वाभाविकपणे कमी लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात दोन धोरणात्मक गोष्टींचा विचार करावा लागेल. आपल्याला या संदर्भात असा एक विचार करावा लागेल की, आपल्याला राज्यातील शिक्षणाचा बृहत आराखडा केला पाहिजे.

सन्माननीय सदस्य अनेक कातकरी पाड्यांवर शाळा चालवतात. 10-15 विद्यार्थी असताना स्वतःच्या खिशातून पैसे घालून शाळा चालवितात. दूरवर, डोंगराळ भागात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी आहे. शासनाने अशा शाळांसाठी वेगळा निकष लावण्याची पहिली पायरी आणली पाहिजे. ज्या वर्गापर्यंत शिक्षण पोहचू शकत नाही त्या वर्गापर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी शासनाकडे असलेल्या आर्थिक स्त्रोतातील महत्त्वाचा भाग खर्च करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाला घ्यावा लागेल. विद्यार्थी-शिक्षक रेश्यो कुठे 50 आहे तर कुठे 34 आहे. आता तो

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394....

श्री. विनोद तावडे ....

अधिक कमी आणला. तो कमी करीत असताना शिक्षकांचा दर्जा देखील त्याप्रमाणे वाढला पाहिजे. रेश्यो कमी होतो त्यावेळी विद्यार्थ्याला ॲसेस करण्याचे प्रकार वेगळे असतात. आता नुसते वर्गात शिकविणे आणि पेपर तपासणे असे काम असते. त्याच्या पलीकडे जाऊन 20 विद्यार्थ्यांना ॲसेस करणे, त्यांचे मूल्यमापन करणे असे एक शिक्षण प्रशिक्षण वेगळ्या प्रकारे निर्माण करावे लागणार आहे. आपण त्यामुळे शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थ्यांचा दर्जा, शिक्षकांचा विद्यार्थ्यांना शिकविण्याचा दर्जा आणि सन्माननीय सदस्यांच्या कल्पनेत ज्या गोष्टी आहेत त्या आणि शिक्षणाचे उद्दिष्ट गाठू शकतो. त्यामुळे या संदर्भात नक्की धोरण करावे लागेल. मी असे सर्व प्रयत्न, प्रयोग करताना सर्व सन्माननीय सदस्य, सन्माननीय शिक्षक आमदार किंवा अन्य माझ्या पाठीशी राहतील, अशी मला आशा आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याचे अधिकार जिल्हा पातळीवर प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना दिले आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ आहे. अतिरिक्त शिक्षक ठरविताना त्यांची सेवाज्येष्ठता विचारात घेऊन ठरविली जाते. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळामध्ये सेवाज्येष्ठता डावलून नंतर नियुक्ती झालेल्या शिक्षकांना कायम ठेवले आहे आणि अगोदर नियुक्त झालेल्या शिक्षकांना नंतर ठेवले गेले आहे अशी त्यांची तक्रार आहे. शासन त्या संदर्भात चौकशी करून तत्काळ निर्णय घेणार का ? मघाशी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्र्यांनी सविस्तर आणि उत्तम उत्तर दिले की, 90 अतिरिक्त सेवक ठरले आहेत आणि त्यांना संरक्षण मिळण्याची हमी त्यांनी घेतली आहे. परंतु उच्च न्यायालयाच्या "जैसे थे" अशा निर्णयामुळे न्यायालयाचा अवमान होऊ नये म्हणून त्या संदर्भातील आदेश काढता येत नाही. माझी या बाबतीत माननीय मंत्र्यांना विनंती आहे. आता त्या शिक्षकांना पगार मिळत नाही, ना ते कुठे नोकरीला आहेत. आपल्याला त्यांना वेतन देण्याच्या संदर्भातील स्थिती निर्माण करता येईल का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांचे म्हणणे खरे आहे. केवळ रायगड किंवा माणगाव पुरता हा प्रश्न नाही. अनेक ठिकाणाहून अशा तक्रारी येत आहत. तक्रारी अशा येत आहेत की, नियमांचे उल्लंघन करून वेगवेगळ्या प्रकारे हितसंबंध जोपासतात आणि मान्यता होते. मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी ऑनलाईन होईल त्यावेळी हे सर्व प्रकार थांबतील. मात्र या वर्षी असे झाले आहे, अशा तक्रारी प्राप्त होतात आणि चौकशीअंती त्यामध्ये तथ्यही आढळते. मी सांगू इच्छितो की, स्पेसिफिक माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात संगितलेले खरे मानून ताबडतोब पुढच्या 15 दिवसांत चौकशी करण्यात येईल आणि त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, अनेक वेळा असे होते की, आपल्याकडील शिक्षक येतात आणि अधिकाऱ्यांबरोबर असणारे भांडण सुध्दा आपल्यामार्फत काढतात. मंत्री कारवाई करतात असे कनिष्ठ पातळीवर समजले की, ते त्याच्या विरोधात पुन्हा यायला लागतील. आपण स्वत: थोडी खात्री करून वास्तव पहावे. माझ्याकडे अशी माहिती दिली तर मी नक्की चौकशी करून योग्य कार्यवाही करीन. मी पुन्हा सांगतो की, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संदर्भात 15 दिवसांत चौकशी करण्यात येईल.

सभापती महोदय, मी 90 पदांच्या विषयाच्या संदर्भात सांगतो की, आम्ही त्यांचे वेतन सुरू केले की मग ते आपोआप त्यांना 3 वर्षे पूर्ण होतात आणि ते शिक्षक संवर्गामध्ये येतात. आम्हाला ते आता कायद्यामुळे करता येणार नाही. परंतु या जूननंतर न्यायालयाचा निर्णय प्रलंबित राहिला तरीही न्यायालयाचा आदर करून त्यांची सेवा सुरू करण्यात येईल.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394.....

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, पहिल्याच तारांकित प्रश्नावर साधारणपणे 25 मिनिटे चर्चा सुरु आहे. आणखी किती काळ हा प्रश्न चालणार आहे ?

उप सभापती : तारांकित प्रश्नावर 25 मिनिटे चर्चा होईल किंवा 35 मिनिटे चर्चा होईल, या पेक्षा किती सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नावर भावना व्यक्त केल्या आहेत, हे महत्वाचे आहे. कारण, तो प्रश्न तेवढाच महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारचे प्रश्न पुन्हा विचारु नयेत.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, या प्रश्नाचे महत्व समजून आपण या प्रश्नाच्या चर्चेला वेळ दिला, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 14 ऑक्टोबर, 2014 च्या शासन परिपत्रकान्वये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन न काढता ऑफलाईन काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत." परंतु, वस्तुस्थिती ही आहे की, ऑफलाईन पगार काढत असल्यामुळे शिक्षकांना 6-6 महिने पगार मिळत नाहीत. त्यामुळे संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना मंत्री महोदय योग्य ते आदेश देतील का ?

सभापती महोदय, उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, "अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षण सेवकांच्या सेवेस संरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे." माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भातील निर्णय कधीपर्यंत घेण्यात येणार आहे ? त्याचबरोबर शिक्षकांप्रमाणेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीही अशा प्रकारचे संरक्षण असेल, अशी माझी खात्री आहे आणि तसे संरक्षण मंत्री महोदय देतील, असा मला विश्वास वाटतो. त्यांना अशा प्रकारचे संरक्षण कधीपर्यंत देण्यात येणार आहे ?

सभापती महोदय, काही संस्थांनी मुख्याध्यापकांची नेमणूक केलेली नाही, त्याबाबत काही वाद आहेत. या संस्थांमधील शिक्षकांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागतील, यासाठी मंत्री महोदय संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन आणि आदेश देणार आहेत का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3394.....

ॲड.निरंजन डावखरे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी असा प्रश्न विचारला होता की, अनेक संस्था अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांना सामावून घेण्यास तयार नाहीत. शिक्षणाधिकारी अशा संस्थांच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतात व त्यांना योग्य त्या सूचना देतात. परंतु, या संस्था शिक्षणाधिकाऱ्यांचेही ऐकत नाहीत. अशा संस्थांवर कडक कारवाई करणार का ?

सभापती महोदय, शिक्षण मंत्री महोदय 15 दिवसांपूर्वी नंदुरबार येथे गेले होते. तेथील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली होती व आठ दिवसात वेतन मिळेल, असे त्यांना सांगितले होते. परंतु, अद्यापही त्यांना वेतन मिळालेले नाही. या संदर्भातील कार्यवाही लवकरात लवकर होईल का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना मी सांगू इच्छितो की, या तारांकित प्रश्नाच्या चर्चेत सभागृहाच्या एकूण 78 सदस्य संख्येपैकी जवळ जवळ 17 सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारले आहेत. त्यामुळे या प्रश्नाला थोडा अधिकचा वेळ मिळणे क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी ऑफलाईन पध्दतीने काही शिक्षकांचे पगार अद्याप झाले नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात काय अडचण आहे, ती शोधून लगेच पगार देण्याची व्यवस्था आम्ही करणार आहोत.

सभापती महोदय, नंदुरबार येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत या आठवड्यात माहिती घेऊन त्या संदर्भातील कार्यवाही पूर्ण करू

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शासनमान्य अनुदानित संस्थांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना वैद्यकिय प्रमाणपत्र घेण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सकांना ३ टक्के शुल्क द्यावे लागत असल्याबाबत

(२) *३२४३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अनुदानित संस्थामधील शिक्षक-शिक्षकेतरांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि. १२ मे १९८९ अन्वये लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी झालेल्या व होणाऱ्या सुधारणांसह ही योजना शिक्षक-शिक्षकेतरांनाही लागू आहे काय,
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाने १० जूलै, २००१ च्या आदेशान्वये शासकीय कर्मचाऱ्यांना प्रतिपूर्तीसाठी ३ टक्के रक्कम जिल्हा शल्यचिकित्सक यांना देण्याच्या अटीतून वगळयात आले आहे काय,
(४) असल्यास, सदरची तरतुद शिक्षक- शिक्षकेतरांना लागू न करण्याची कारणे काय आहेत,
(५) याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी १२ जानेवारी, २०१५ व १५ जानेवारी, २०१५ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) होय.
(३), (४), (५) व (६) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १० जुलै, २००१ च्या शासन निर्णयामध्ये परिशिष्ट अ क्र.१ मध्ये वैद्यकीय देयकाच्या प्रतिपूर्तीसाठी ३ टक्के रक्कम शुल्क दर म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक वैद्यकीय अधीक्षक यांना देण्याच्या अटीतून शासकीय कर्मचा-यांना वगळण्यात आले आहे.
सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी १२ जानेवारी व १५ जानेवारी, २०१५ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, खरे म्हणजे मी विचारलेला प्रश्न हा आरोग्य विभागाशी संबंधित होता. तरी देखील काही हरकत नाही. शिक्षण मंत्री महोदयांनी या प्रश्नाला उत्तर देण्याची तयारी केलेली आहे.

सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय साधा आणि सोपा आहे. दिनांक 12 मे, 1989 रोजीच्या शासन निर्णयामध्ये या राज्यातील अनुदानित संस्थांमधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळेल, अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आणि त्याबाबतची अंमलबजावणीही सुरु झाली. यामध्ये अडचण अशी आहे की, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबतचे देयक शिक्षण विभागाला सादर करीत असताना त्याबरोबर सिव्हिल सर्जनचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक ठरविले आहे. ज्या आजारावर खर्च झाला आहे, तो आजार शासन निर्णयान्वये मान्य केलेल्या आजारामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3243.....

श्री.रामनाथ मोते.....

मोडतो किंवा कसे, एवढेच सिव्हिल सर्जन यांना प्रमाणित करावयाचे असते. त्याप्रमाणे ते देयक तपासतात व प्रमाणपत्र देतात. परंतु, या प्रमाणपत्रासाठी देयकाच्या एकूण रकमेच्या 3 टक्के रक्कम संबंधित कर्मचाऱ्याला अधिकृतपणे भरावी लागते. अनधिकृतपणे किती रक्कम घेतली जाते, हे मी सांगू शकणार नाही.

सभापती महोदय, मी आपले लक्ष सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनाक 10 जुलै, 2001 रोजीच्या शासन निर्णयाकडे वेधणार आहे. या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय कर्मचारी, आमदार, खासदार, मंत्री, सभापती, उप सभापती या सर्वांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबतची सवलत देय आहे. परंतु, त्यांना सिव्हिल सर्जनच्या प्रमाणपत्रासाठी 3 टक्के रक्कम द्यावी लागत नाही. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच ही योजना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. परंतु, शालेय शिक्षण विभागाकडून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून देयकाच्या 3 टक्के रक्कम घेतली जात आहे. बायपास, किडनी ट्रान्सप्लांट किंवा अन्य मोठ्या शस्त्रक्रियेसाठी लाखो रुपये खर्च येत असतो व त्या खर्चाच्या रकमेच्या 3 टक्के रक्कमही मोठी असते. माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 10 जुलै, 2001 च्या शासन निर्णयाप्रमाणे शासकीय कर्मचारी व इतरांना ज्याप्रमाणे 3 टक्के रकमेतून सूट देण्यात आली आहे, त्याप्रमाणेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही सूट देणार आहात का ? कारण, अशा प्रकारची सूट दिली गेली पाहिजे. अशा प्रकारे शासनाला शासकीय कर्मचारी आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करता येणार नाही. मंत्री महोदय अशा प्रकारचा निर्णय येत्या आठ दिवसात घेतील का व त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करतील का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री.रामनाथ मोते सरांनी विचारलेला प्रश्न आरोग्य विभागाशी संबंधित आहे, हे खरे आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न आरोग्य विभागाशी संबंधित नसून शिक्षण विभागाशीच संबंधित आहे. हा प्रश्न शिक्षकांचा आहे. केवळ प्रमाणपत्र देण्यासाठी आरोग्य खात्याची व्यवस्था शासनाने केली आहे. त्यामुळे आरोग्य खात्याचा या प्रश्नाशी संबंध नाही, असे मला वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3243.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भातील शासन निर्णय आरोग्य विभागाने निर्गमित केला आहे. किती पैसे घ्यायचे, कशासाठी घ्यायचे, हे त्या विभागाने ठरविले आहे. वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकासाठी 3 टक्के रक्कम, वयाच्या दाखल्यासाठी 50 रुपये, अशा प्रकारची फी आकारणी आरोग्य विभागाने त्यांच्या दिनांक 30 डिसेंबर, 2010 च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेली आहे. तथापि, मी या प्रश्नासंबंधी सन्माननीय आरोग्य मंत्री डॉ.दिपक सावंत यांच्याशी चर्चा केली आहे. ज्याप्रमाणे शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना 3 टक्के रकमेतून सूट दिलेली आहे, त्याप्रमाणेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही सूट देणे आवश्यक आहे, त्यांना अशी अट लावणे अनावश्यक आहे. त्यामुळे दोन्ही विभागांचा समन्वय साधून 3 टक्क्यांची अट आम्ही रद्द करू.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपचारासाठी कॅशलेस पॉलिसी आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सध्या हे प्रकरण वित्त विभागाकडे असून त्यांनी काही त्रुटी या संदर्भात काढल्या आहेत. या योजनेप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एक स्मार्ट कार्ड देण्यात येईल व त्या माध्यमातून ते निश्चित केलेल्या रुग्णालयांमधून उपचार करुन घेऊ शकतील. यामुळे खर्चाची प्रतिपूर्ती वगैरे प्रश्न राहणार नाहीत. कर्मचाऱ्यांना अगोदरच रुग्णालयांची यादी दिली जाईल आणि त्यामध्ये ते कॅशलेस पध्दतीने उपचार करुन घेऊ शकतील. आपण दरवर्षी साधारणपणे 125 कोटी रुपयांपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती करीत असतो. परंतु, इन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना कॅशलेस पॉलिसी दिली आणि एकरकमी प्रिमियम भरला तर अधिक चांगले होईल. त्यामुळे ही योजना लागू करण्याबाबत आम्ही प्रयत्न करु व लवकरच ती सुरु करू.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा असून तो अतिशय महत्त्वाचा आहे. बायपास किंवा अन्य महत्त्वाच्या व मोठ्या शस्त्रक्रियांसाठी हजारात नाही तर लाखामध्ये खर्च येत असतो. अशा प्रकारची मोठ्या खर्चाची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3243.....

श्री.विक्रम काळे.....

देयके दोन-दोन वर्षे प्रलंबित राहतात. मागील आजार जाऊन दुसरा आजार होईपर्यंत मागील आजाराचे देयक कर्मचाऱ्यांना मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. आताच मंत्री महोदयांनी कॅशलेस पॉलिसीबाबतचे सूतोवाच केले आहे. या योजनेचे शासन आदेश हे अधिवेशन संपण्यापूर्वी काढण्यात येतील का ?

सभापती महोदय, सध्या देयकाच्या प्रमाणपत्रासाठी कर्मचाऱ्यांकडून 3 टक्के रक्कम घेतली जात आहे. मात्र, अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना या मधून सूट देण्यात आली आहे. त्यांच्याप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सूट देणार का आणि या संदर्भातील आदेश हे अधिवेशन संपण्यापूर्वी काढणार आहात का, याबाबत मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3243...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे व सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांची सवय मी सन 2002 पासून पाहत आहे. त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचा शेवट असा असतो की, हे अधिवेशन संपण्याच्या आत निर्णय घेण्यात येईल काय ? असे त्यांचे वाक्य नेहमी असते. याबाबत मी चौकशी केली तेव्हा मला असे कळले की, त्यावेळी त्यांचे तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.वसंत पुरके व श्री. अनिल देशमुख असे सांगत होते की, कार्यवाही करण्यात येईल, परंतु ती कार्यवाही केली जात नव्हती. म्हणून त्यांना अशी सवय लागली की, अधिवेशन संपण्याच्या आत शासन निर्णय काढण्यात येईल काय ? या बाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी आता काळजी करण्याची आवश्यकता नाही. विनोद तावडे जे बोलतो ते अधिवेशन संपण्याच्या आत किंवा अधिवेशन संपल्यानंतर लगेच कार्यवाही पूर्ण करण्यात येते. असा प्रश्न विचारण्याची सवय आता आपण सोडून द्यावी. ह्रदयरोग व कॅन्सर अशा रोगांचे निदान झाल्यानंतर त्यासाठी जास्त खर्च येतो. यावर उपचार करण्यासाठी शासनाकडून दीड लाख रुपये ॲडव्हांस देण्यात येतात. त्यामुळे उपचार चालू करण्यास मदत होते. त्यानंतर पूर्ण रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. जी रुग्णालये निश्चित केली आहेत तेथे उपचार घेतले तर त्या रकमेची प्रतिपूर्ती लवकर होते. इतर रुग्णालये असतील तर तपासणी करण्यास थोडा जास्त वेळ जातो. सन्माननीय सदस्यांनी कॅशलेसचा आग्रह धरला आहे. परंतु अर्थ खाते बजेटमध्ये व्यग्र असल्यामुळे यासाठी थोडा वेळ लागेल. इतर खात्यांच्या काही अडचणी असल्यामुळे त्या अडचणींवर मात करुन सविस्तर अशी योजना राबविण्यात येणार आहे. सविस्तर योजना तयार केली नाही तर पुन्हा तुमच्याकडे प्रकरणे येतील, तुमच्याकडे नेहमी गर्दी होईल त्यामुळे जी योजना करण्यात येणार आहे, ती सविस्तर असावी असा शासनाचा प्रयत्न आहे. आपण जो आग्रह धरला आहे तो पूर्ण करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या पाणी पुरवठा योजनेत झालेला अपहार

(३) * **४१२५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुर झालेल्या ५ गावांच्या पाणी पुरवठा योजनेत उक्त गावातील समित्यांनी आतापर्यंत १ कोटी १६ लाख ७९ हजार ३३४ रुपये निधी घेऊनही लोकप्रतिनिधी व समितीच्या अकार्यक्षमतेमुळे सदरील कामे प्रलंबित असून योजना रद्द करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त योजनेत सदरील गावांच्या समित्यांनी आतापर्यंत सुमारे ४६ लाख १७ हजार ८३५ रुपयांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग एक व दोन प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त गावांच्या पाणी पुरवठा योजना त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच उक्त योजनेतील अपहाराप्रकरणी संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ च्या वार्षिक कृती आराखडयातील समाविष्ट ३ गावांमधील पाणी पुरवठा योजनांबाबतीत संबंधित ग्रामपंचायतींकडून प्रशासकीय बाबींसंबधित पूर्तता होत नसून योजनेसाठी संबंधित गांवाकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सदर गावे आराखडयातून वगळण्याचे प्रस्तावित आहे.
तसेच एका गावातील पाणी पुरवठा योजनेच्या कामात रु.६ लाखाचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) व (४) माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेल्या एका गावातील पाणी पुरवठा योजनेच्या कामात रु.६ लाखाचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित ग्राम आरोग्य पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्ष व सचिव यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माजलगांव हा तालुका आहे, आता तेथील लोकसंख्या किती आहे याची मंत्री महोदयांना कल्पना आहे. या तालुक्याच्या बाजूला मोठा प्रकल्प असून तेथील लोकांना नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नाही. येथील पाणी पुरवठा योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. या संपूर्ण प्रकल्पाची सखोल चौकशी करुन जे दोषी असतील त्यांच्यावर हे अधिवेशन संपण्याच्या आत कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, डुबा नावाच्या गावातील अशोक भाऊराव तौर व जनाबाई एकनाथ अर्धट या पाणी पुरवठा समितीच्या सदस्यांनी 6 लाख रुपयांचा अपहार केला होता. या प्रकरणात गुन्हा दाखल झालेला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, गुन्हा दाखल झाला येथपर्यंत ठीक आहे, डुबा गावातील पाणी पुरवठ्याची योजना शासन किती दिवसात पूर्ण करणार आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4125...

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, डुबा व इतर 36 गावांसाठी पिण्याच्या पाण्याच्या योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे. 36 पैकी 14 गावांतील योजनांची कामे सुरु झाली आहेत. इतर गावांतून ग्रामपंचायतीचे ठराव व काही कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे तेथील योजना बंद असून 14 गावांतील कामे सुरु आहेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. डुबा गावाच्या पाणी पुरवठा योजनेमध्ये अपहार झाला आहे. तेथील अध्यक्ष व सचिवांवर शासनाने गुन्हे दाखल केले आहेत. ही फक्त एकाच गावाची समस्या नसून बीड जिल्ह्यातील 35 गावांतील लोकांवर एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. एफआयआर दाखल करुन योजना पूर्ण होत आहेत काय ? तर योजना पूर्ण होत नसून त्या योजना बंद आहेत. पायबंद घालण्यासाठी गुन्हा दाखल करणे हा एक उपाय आहे. योजना पूर्ण होत नसून त्या गावाला न्याय मिळत नाही. या गावातील पाण्याची योजना पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. गुन्हा दाखल केल्यावर कोर्ट केस झाल्यामुळे अधिकारी हस्तक्षेप करीत नाहीत. त्यामुळे त्या पाणी पुरवठा योजना अपूर्ण राहतात. यातून शासन कायमस्वरुपी काय मार्ग काढणार आहे, याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

त्याचप्रमाणे बीड तालुक्यात अशा प्रकारे 58 योजना असून त्यापैकी फक्त 9 योजनांची कामे सुरु आहेत. इतर योजनांची कामे बंद आहेत, यामध्ये अनेक ठिकाणी गैरव्यवहार झाले आहेत, अनेक योजना बंद आहेत, याबाबत शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, तेथे दोन गावच्या नळ पाणी पुरवठा योजना आहेत. त्यांची कामे सुरु झालेली आहेत. दोन गावांतील नळ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. तीन योजना मार्च 2015 पर्यंत पूर्ण होतील. डुबा येथील नळ योजनेच्या कामाबाबत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. असे असले तरी त्या गावाने टँकर सुरु करण्याची मागणी केली किंवा ग्रामपंचायतीने तसा प्रस्ताव दिला तर पाण्याची व्यवस्था करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4125...

श्री.बबनराव लोणीकर...

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी असे सांगितले की, अशीच काही प्रकरणे बीड जिल्ह्यात झाली आहेत. सन्माननीय सदस्यांनी त्याची माहिती माझ्याकडे दिली तर त्याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, बीडबाबत मंत्री महोदयांनी सांगितले तर मी त्यांना धन्यवाद देतो. गुन्हे दाखल झाल्यावर न्यायालयीन प्रक्रिया सुरु होत असल्यामुळे त्या योजना बंद राहतात, त्या पूर्ण होत नाहीत. त्यामुळे गावाला फायदा होत नसून पैसे खाऊन संबंधितांवर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळे अशा गावांच्या योजना कशा प्रकारे पूर्ण करण्यात येतील ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, ज्या गावात अशा प्रकारे अपहार झाला असेल त्याचा तपास पोलीस अधिकारी करतील. त्या गावातून पिण्याच्या पाण्यासाठी टैंकरची मागणी करण्यात आली किंवा ग्रामपंचायतीने तसा ठराव दिला किंवा दुसरा बोअर अधिगृहीत करायचा असेल किंवा तात्पुरती पाणी पुरवठा योजना करायची मागणी ग्रामपंचातीने केल्यास त्या ठिकाणी पाणी देण्याची शासनाची तयारी आहे.

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत राज्यातील पिवळया व केशरी शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य देण्याबाबत

(४) * २६५४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंदराव पाटील, ॲड हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंद ठाकूर: सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः मुंबई येथील कांदिवली, चारकोप, ठाणे, पुणे तसेच नाशिक व इतर जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.) आणि शिधापत्रिकाधारकांना अन्न सुरक्षा योजनेमार्फत दरमहा स्वस्त धान्य दुकानामार्फत सवलतीच्या दरात गहू, तांदूळ वितरित केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत लाभार्थी असलेल्या राज्यातील १ कोटी ७० लाख कुटुंबांना माहे नोव्हेंबर, २०१४ पासून गहू, तांदूळ दिला जात नाही तसेच सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गतच्या रॉकेल कोटयातही शासनाने कपात केली आहे, हे खरे आहे काय,

(३) त्यामुळे गोरगरिबांना स्वस्त किंमतीत मिळणारे धान्य त्यांना देण्यात आले नसल्यामुळे तसेच त्यांना बाजारभावाने गहू विकत घेणे आर्थिकदृष्टया परवडत नसल्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाभार्थ्यांना पूर्ववत सवलतीच्या दरात धान्य देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.) आणि केशरी रंगाच्या (ए.पी.एल.) शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानातून सर्व प्रकारचे धान्य व रॉकेलचा पुरवठा त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच धान्य उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करणाऱ्या दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेतत ?

श्रीमती विद्या ठाकूर,श्री. गिरीश बापट, यांच्याकरिता : (१) होय,

(२) होय,

(३) नाही,

(४) होय,

(५) व (६) दारिद्रय रेषेखालील लाभार्थी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आले असून त्यांना सवलतीच्या दराने धान्य पुरवठा करण्यात येता राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल (केशरी) शिधापत्रिका धारकांना राज्यशासनाने आर्थिक भार सोसून अन्नधान्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्यास मिळणाऱ्या केरोसिनच्या नियतनामध्ये माहे डिसेंबर, २०१४ मध्ये देण्यात आलेल्या केरोसिन नियतनाच्या सुमारे १८ टक्के कपात केली आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत राज्याच्या केरोसिनच्या मागणीच्या २८ टक्के इतके केरोसिनचे नियतन केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होत आहे. सदर उपलब्धतेच्या प्रमाणानुसार केरोसिनचे जिल्हानिहाय नियतन व वितरण करण्यात येते. राज्याच्या केरोसिन कोटयात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या प्रश्नांतील क्रमांक तीन मध्ये असा प्रश्न विचारण्यात आला आहे की, ''गोरगरिबांना स्वस्त किंमतीत मिळणारे धान्य त्यांना देण्यात आले नसल्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) V-6

VVK/ प्रथम श्री.रोझेकर.. 14:00

ता.प्र.क्र.2654...

श्री.धनंजय मुंडे...

तसेच त्यांना बाजारभावाने गहू विकत घेणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे हे ही खरे आहे काय ?" या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, 'हे खरे नाही.' अन्न सुरक्षा योजनेमध्ये या राज्यातील 1 कोटी 75 लाख केसरी कार्डधारक आहेत. सदर कार्डधारक अन्न सुरक्षा योजनेत बसत नसल्यामुळे आघाडी सरकारने अशा एपीएल कार्डधारकांना ही योजना लागू केली होती. त्यांच्यासाठी राज्य सरकार दरमहा 120 कोटी रुपये खर्च करुन अन्न धान्याचा पुरवठा करीत होते. केंद्र शासनाकडून इकॉनॉमिक कॉस्टने धान्य खरेदी करण्याची मुदत . ऑक्टोबर 2014 पर्यंत होती. ही मुदत संपल्यानंतर मंत्रिमंडळासमोर जाऊन मुदतवाढ का घेण्यात आली नाही ? खुल्या बाजारातून अन्नधान्य खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या होत्या असे शासनाचे मत असेल तर गेल्या चार महिन्यात या निविदे प्रक्रियेबाबत काय प्रगती झाली याची माहिती मंत्री महोदय देतील काय ? 1 कोटी 75 लाख लोकांचा हा प्रश्न आहे.

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2654.....

श्री.धनंजय मुंडे.....

आघाडी शासनाच्या काळात त्या लोकांना अन्न सुरक्षा कायद्याप्रमाणे जसे अन्न धान्य दिले जात होते त्या प्रमाणे शासन त्यांना अन्नधान्य देणार आहे काय ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तारांकित प्रश्नातील तिसऱ्या क्रमांकाच्या प्रश्नामध्ये लोकांची उपासमार होते काय याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. देशात कोणाचीही उपासमार होऊ नये म्हणून केंद्र शासनाने अन्न सुरक्षा कायदा केला आणि गरिबातील गरीब माणसाला देखील अन्न धान्य मिळाले पाहिजे म्हणून यामध्ये बीपीएल, अंत्योदय, आश्रमशाळा पासून सर्व खालच्या स्तरातील लोकांना कव्हर केले. मुळात अन्न सुरक्षा कायद्यात एपीएल कार्डधारकांना ग्रामीण भागात 44 हजार रुपये आणि शहरी विभागात 59 हजार रुपयांची मर्यादा आहे. त्यापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या लोकांना या योजने अंतर्गत अन्न धान्य देण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही. माननीय विराधी पक्षनेत्यांनी सांगितले की, आघाडी शासनाने निर्णय घेतला होता. लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर विधानसभेच्या निवडणुका होण्यापूर्वी....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, कालावधी तोच आहे, जो कालावधी आहे, तो मी सांगितलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी अन्न सुरक्षा कायदा लागू झाला त्यावेळी राज्यातील 1 कोटी 75 लाख केशरी कार्डधारकांना ही योजना लागू होत नव्हती. म्हणून राज्यातील आघाडी शासनाने 1 कोटी 75 लाख लोकांचा याच योजनेत समावेश केला आणि राज्य शासनाने यासाठी महिन्याला 120 कोटी रुपये खर्च करुन त्या लोकांची जबाबदारी घेतली. आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर असेपर्यंत आम्ही ही जबाबदारी उचलली. परंतु यांच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर यांनी 1 कोटी 75 लाख केशरी कार्डधारकांना अन्न धान्य देणे बंद केले. 1 कोटी 75 लाख केशरी कार्डधारकांना लाभ देणे का बंद केले, याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2654.....

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, आघाडी शासनाने 120 कोटी रुपये खर्च करुन 1 कोटी 77 लाख लोकांना अन्नधान्य दिले, हे आम्हाला मान्य आहे. आपण असेही सांगितले की, अन्न सुरक्षा कायद्यात समावेश नसताना देखील त्यांना धान्य दिले, हे देखील मान्य आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून जी प्रतिपूर्ती होते किंवा केंद्र शासन राज्य शासनाला जे धान्य देण्याबाबत सांगते त्यापेक्षा अधिकचा भार आपण उचलला आहे. आमच्या शासनाने तो भार उचलण्याच्या संदर्भात राज्याची आर्थिक परिस्थिती बघून दोन प्रयत्न सुरु केले. पहिला प्रयत्न असा आहे की, उत्पन्नाची मर्यादा जर वाढविली तर 1 कोटी 77 लाख लोकांमधील जवळपास 1 कोटी लोक यामध्ये कव्हर होतील. याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याची मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत. दुसरा मुद्दा असा आहे की, यामध्ये राज्य शासनाने किती आर्थिक भार उचलावयाचा ? राज्य शासन इतर योजनांचा देखील भार उचलत आहे. म्हणून या संदर्भातील निर्णय अद्याप मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेला नाही, तो विचाराधीन आहे. आम्ही तो स्थगित ठेवलेला आहे, बंद केलेला नाही, त्यासाठी काही वेळ लागतो. कॅबिनेटमध्ये या संदर्भातील निर्णय झाल्यानंतर राज्यातील 7 कोटीपेक्षा जास्त लोकांना अन्न सुरक्षा योजने अंतर्गत शासन आज अन्नधान्य देत आहे. म्हणजे शासन जवळपास 80-85 टक्के लोकांना अन्नधान्य देत आहे. उर्वरित लोकांना अन्नधान्य देण्याच्या संदर्भातील निर्णय राज्य शासन नजीकच्या काळात घेणार आहे. राज्य शासनाला कोणताही निर्णय घेताना त्याचा राज्याच्या तिजोरीवर पडणारा आर्थिक भार विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागतो. म्हणून नजीकच्या काळात कॅबिनेटसमोर जाऊन, या संदर्भात विचार करुन अधिकाधिक लोकांना स्वस्त धान्य किती लवकर देता येईल याचा शासन विचार करेल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सभागृहाची थोडी दिशाभूल करीत आहेत. जे 1 कोटी 75 लाख केशरी कार्डधारक आहेत ते अन्न सुरक्षा कायद्याच्या अंतर्गत मोडत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे आणि याची आपल्याला देखील कल्पना आहे. अन्न सुरक्षा विधेयक आणत असताना केंद्र शासनाने त्यासाठी ज्या अटी लागू केल्या त्यानुसार त्यांचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2654.....

श्री.सुनील तटकरे.....

यामध्ये समावेश होत नव्हता. म्हणून राज्य शासनाने स्वतःच्या उत्पन्नातून प्रती माह 120 कोटी रुपये आर्थिक भार सोसून राज्यातील 1 कोटी 75 लाख केशरी कार्डधारकांना लाभ दिला. एका कार्डावर 4 व्यक्ती जरी गृहीत धरल्या तरी ती संख्या 5 कोटीच्या आसपास जाऊ शकते. आपण मघाशी सांगितले की, 40-45 हजार उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ही उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याचा अधिकार आपल्याला नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, आपण त्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी चार वर्षे हे खाते सांभाळले आहे. अंत्योदय, बीपीएलच्या उत्पन्नाची कमाल मर्यादा वाढविण्याचा अधिकार आपल्याला नाही. केंद्र शासनाकडून तो प्रस्ताव नियोजन आयोगाकडे पाठविला जातो. आता नियोजन आयोगाऐवजी निती आयोग स्थापन करण्यात आलेला आहे. त्यामुळे तो प्रस्ताव निती आयोगाकडे जाईल. यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर विलंब लागणार आहे. केंद्र शासनाच्या मूळ योजनेत याचा अंतर्भाव नसल्यामुळे राज्य शासनाने यासाठी स्वतःच्या उत्पन्नातून 120 कोटी रुपयांचे अनुदान देणे अत्यंत आवश्यक आहे. आपण म्हणता की, धान्य उपलब्ध नाही. आपल्याकडे धान्य उपलब्ध आहे. कारण, एपीएल कार्डधारकांसाठी 7 आणि 9 रुपये किलो दराने धान्य उपलब्ध आहे. त्यामुळे आपल्याकडे धान्याचा कोटा आहे. आपल्याकडे धान्याचा कोटा नाही, असे जर आपण म्हणत असाल तर ती दिशाभूल आहे. आपल्याकडे धान्याचा कोटा उपलब्ध आहे. फक्त त्यांना सवलतीच्या दरात धान्य देण्यासाठी जी योजना तत्कालीन शासनाने सुरु ठेवली होती ती योजना पुन्हा सुरु ठेवण्याचा राज्य शासन विशिष्ट कालावधीत निर्णय घेणार आहे काय ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. आपण एपीलएल मधील सर्व लोकांना नाकारलेले नाही. ज्यांचे उत्पन्न जास्त आहे त्यांना नाकारले आहे आणि ती संख्या 1 कोटी 77 लाख इतकी आहे. ही संख्या कमी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2654.....

श्री.गिरीष बापट.....

नाही, ही मोठी संख्या आहे. परंतु, ज्यांना देतो ती संख्या देखील जास्त आहे. आपण राज्यात 7 कोटी पेक्षा जास्त लोकांना धान्य देत आहोत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, आपण ज्यांना धान्य देतो ती संख्या देखील आपण लक्षात घ्यावी. आपण राज्यातील किती लोकांना अन्न धान्य देतो याबाबतची माहिती सभागृहाला देणे चुकीचे आहे काय ? आपण ज्यांना धान्य देत नाही त्यांची आणि ज्यांना धान्य देतो त्यांची माहिती मी सभागृहाला देत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्य सरकार त्यांना धान्य देणार आहे किंवा नाही, हा प्रश्न आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, राज्य शासनाने याबाबत विचार केलेला आहे. परंतु राज्य शासनावर पडणारा आर्थिक भार विचारात घेऊन शासनाने त्यांना कायम धान्य न देण्याचा निर्णय घेतलेला नाही. शासनाने तो स्थगित ठेवलेला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार गोरगरिबांना धान्य मिळावे म्हणून शासन नजीकच्या काळात एपीएलच्या लोकांनाही धान्य देण्याचा विचार करणार आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मंत्री म्हणून उत्तर द्यावयास पाहिजे. प्रत्येक वेळी उत्तर देताना राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे, असे सांगितले जाते. आता तुमच्या पक्षाचे शासन सत्तेवर आहे. त्यावेळी आम्ही राज्याच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे सांगितले नव्हते. तुम्ही राज्यावर 48 हजार कोटी रुपयांचे कर्ज करुन ठेवले, असे आम्ही सांगितले नव्हते. आम्ही 15 वर्षे राज्य चालविले. आम्ही सत्तेवर असताना गरिबांना न्याय दिला. मग तुम्ही आता राज्याच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे का सांगत आहात ? तुमच्यात हिम्मत असेल तर तुम्ही पैशांची व्यवस्था करावी. आता जनतेने तुमच्या हाती सत्ता दिलेली आहे. तुम्ही अद्याप जनतेला अन्नाचा एक दाणा देखील दिलेला नाही. मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही हा विषय स्थगित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2654.....

श्री.भाई जगताप.....

ठेवला आहे, आम्ही या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत विचार करणार आहोत. माझा प्रश्न असा आहे की, आपला निर्णय होईपर्यंत आपण त्या लोकांना पूर्ववत योजनेप्रमाणे धान्य देणार आहात काय ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी मघाशी दोन प्रश्नांची उत्तरे दिली. त्यावेळी मी असे सांगितले की, राज्य शासन उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. 44 हजार आणि 59 हजार रुपयांची उत्पन्नाची मर्यादा वाढवून दिली तर त्यामध्ये जवळपास 80 लाख ते 1 कोटी लोकांना अन्न धान्य मिळणार आहे. मग त्यानंतरही 70 लाख लोकांचा प्रश्न शिल्लक राहतो.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2654.....

श्री.गिरीष बापट.....

या विषयामध्ये मला राजकारण आणायचे नाही. सरकार आघाडीचे होते की युतीचे याची चर्चा मी करु इच्छित नाही. परंतु आघाडी सरकार पायउतार होण्यापूर्वी 52 हजार कोटी रुपयांच्या योजना कार्यवाहीत आणून तिजोरीत खडखडाट करुन राज्य चालविण्याचे काम ज्यांनी केले त्यांनी आम्हाला राज्य चालविण्याबाबत सांगू नये.....(अडथळा).....52 हजार कोटी रुपयांच्या योजना लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत दिल्या गेल्या. वस्तुस्थिती या ठिकाणी मांडली पाहिजे.....(अडथळा).....माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी विषय उपस्थित केला म्हणून मी वक्तव्य केले. मी सरकारचे वक्तव्य केले नाही. 1.77 कोटी केशरी शिधापत्रिका धारकांना धान्य देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. किती दिवस लागतील तेवढे दिवस विचाराधीन राहील. शासन त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेईल. आजच निर्णय घ्या असे होणार नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असताना मंत्री महोदय मागील 15 मिनिटे प्रस्तावना करीत आहेत. कोणत्याही सरकारला तो निर्णय घ्यावाच लागतो. जोपर्यंत पर्यायी व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्या गरीब, कष्टकरी 1.77 कोटी केशरी शिधापत्रिका धारकांना पूर्वीप्रमाणे धान्य मिळणार आहे काय?

श्री.गिरीष बापट : गोरगरीब, मजूर वगैरे 7 कोटी लोक यामध्ये अंतर्भूत आहेत आणि त्यांना धान्य मिळत आहे. ज्यांना धान्य मिळत नाही, त्याचे उत्पन्न 60 हजार रुपयांपेक्षा अधिक असून ते शहरी भागातील लोक आहेत. त्यामुळे गरीब लोकांना धान्य मिळण्याच्या दृष्टीने सरकार गांभीर्याने विचार करीत आहे. लवकरच सरकार याचा निर्णय घेईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये म्हटले आहे की, विचार केला जाईल, मंत्रिमंडळापुढे ठेवले जाईल, मंत्रिमंडळाचा विचार घेतला जाईल. दिनांक 24.2.2015 च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे हा विषय मांडण्यात आला होता. त्या बैठकीमध्ये कोणताही विचार झाला नाही. ही बाब मंत्रिमंडळाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर कोणताही निर्णय झाला नाही. आघाडी सरकारने 1.77 कोटी केशरी शिधापत्रिका धारकांसाठी जी योजना सुरु केली होती ती पूर्ववत सुरु ठेवली जाईल काय? दुष्काळी परिस्थितीत बाहेरच्या विद्यार्थ्यांना पुणेकरांनी जेवायला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) X.2

SGB/ 14:20

श्री.धनंजय मुंडे.....

घातले आहे. अन्नधान्याचा हा विषय असल्यामुळे मंत्री महोदयांना पुण्य पदरात पाडून घेण्याची संधी आहे. योगायोगाने हा विभाग मंत्री महोदयांकडे आहे, खिशातून काही द्यावे लागणार नाही. सरकार देणार आहे. गरीब लोकांसाठी आघाडी सरकारने 120 कोटी रुपये खर्च केले होते. तेवढा खर्च युती सरकार करण्यास तयार नसेल तर ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आम्हाला हा निर्णय आता अपेक्षित आहे. 1.77 कोटी केशरी शिधापत्रिका धारकांबाबत सरकारने आता निर्णय घ्यावा.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते व इतर माननीय सदस्यांची तळमळ पाहता मी एवढेच सांगू इच्छितो की, हा विषय मंत्रिमंडळापुढे मांडण्यात आल्यानंतर वित्तमंत्र्यांनी त्याबाबत टिप्पणी दिली होती. आताच निर्णय घ्या असे म्हणून चालणार नाही. आपणही सरकारमध्ये होता. कोणताही निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेशिवाय घेता येत नाही. गोरगरीब लोकांबद्दलची तुमची तळमळ पाहता नजीकच्या होणाऱ्या कॅबिनेटपुढे हा विषय नेऊन मंत्रिमंडळाची मंजुरी घेऊन लवकरच याबाबतचा निर्णय घेतला जाईल.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) X.3

SGB/ 14:20

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 289 अन्वये मी एका महत्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, आघाडी सरकारने मराठा समाजाला 16 टक्के आणि मुस्लीम समाजाला 5 टक्के शैक्षणिक आणि नोकरीमध्ये आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. आरक्षणाचा कायदा तयार करण्याचे काम सुरु झाले. त्याविरुध्द न्यायालयात दावा दाखल झाल्यानंतर हायकोर्टाने मराठा समाजाच्या 16 टक्के शैक्षणिक व नोकरीच्या संदर्भातील आरक्षणाला स्थगिती दिली आणि मुस्लीम समाजाचे नोकरीतील 5 टक्के आरक्षणाला स्थगिती देऊन शैक्षणिक आरक्षण देण्यास हरकत नाही असा निर्णय दिला. त्यानंतर या राज्यात सत्तांतर झाले. भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तारुढ झाले. काही दिवसानंतर शिवसेना पक्ष सत्तेत सामील झाला. मागील हिवाळी अधिवेशनात या आरक्षणाच्या अध्यादेशाची मुदत संपणार होती. त्यावेळी फक्त मराठा समाजाच्या आरक्षणाबाबतचे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले. ते विधेयक दोन्ही सभागृहाने एकमताने संमत केले. मात्र जाणीवपूर्वक मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण देणाऱ्या अध्यादेशाची मुदत संपणार होती त्या दिवसापर्यंत आरक्षणाबाबत कोणतेही विधेयक सभागृहापुढे मांडण्यात आले नाही. या ठिकाणी संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहेत.

आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेद्वारे सरकारला विनंती केली होती. सरकारकडून असे उत्तर देण्यात आले की, महाअधिवक्ता यांचे मार्गदर्शन घेत आहोत. महाअधिवक्त्यांकडून राज्य सरकारने कोणते मार्गदर्शन घेतले हे सभागृहाला कळले पाहिजे. काल विधानसभेमध्ये याच विषयावर स्थगन प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्याबाबत उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, आम्ही न्यायालयाच्या निर्णयाधीन राहून मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतचा निर्णय घेऊ. या महाराष्ट्रामध्ये मुस्लीम समाज 11 ते 12 टक्के असताना जाणीवपूर्वक युती सरकार मुस्लीम समाजाला शैक्षणिक आणि नोकरीमध्ये आरक्षण नाकारीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर वाय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

हे मी जबाबदारीने सांगत आहे. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी सांगितले होते की, या अधिवेशनामध्ये महाअधिवक्त्याचे म्हणणे आपल्या समोर ठेवू आणि त्याप्रमाणे निर्णय घेऊ. आज अधिवेशन सुरू होऊन 4 दिवस झाले आहेत. पण यासंबंधी काहीच केले जात नाही. महाराष्ट्रामध्ये मुस्लीम समाजाच्या आरक्षणासंबंधी ठिकठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते आणि रास्ता-रोको करण्यात आले होते. आम्ही मुस्लीम समाजाला आरक्षण देऊ अशा प्रकारचे उत्तर या सरकारने हिवाळी अधिवेशनामध्ये दिलेले आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण किंवा कालचे माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर यात मुस्लीम आरक्षणासंबंधातील शासनाची भूमिका कोणत्याही प्रकारे दिसत नाही. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, न्यायालयाच्या निर्णयाची प्रत प्राप्त झाल्यानंतर आम्ही निर्णय घेऊ. ज्या न्यायालयाने मुस्लीम समाजाला 5 टक्के शैक्षणिक आरक्षण मान्य केले आहे ते शैक्षणिक आरक्षण या सरकारने द्यावे अशी आमची मागणी आहे. सदर विषय हा नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा होऊ शकतो हे मी येथे सांगतो आहे. तेव्हा सभागृहापुढील सर्व कामकाज थांबवून आपण चर्चेसाठी वेळ द्यावा.

उप सभापती : आज दिनांक 12 मार्च 2015 रोजी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली असली तरी यासंबंधी मी संबंधितांशी विचारविनिमय करून आपणाला निश्चित असा दिवस व वेळ ठरवून त्यावर बोलावयास देईन.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, धन्यवाद.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री.रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 13 मार्च,2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 12 मार्च, 2015 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. 2 अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थासाठी दर्शविण्यात येणार असून बॅलटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार 3 अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

पुर:स्थापनार्थ

1.	सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 1 -महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, 2015 श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.	5 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2.	सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 2 -महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, 2015 श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे.	

बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव

1.	श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 65	- 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2.	श्री. संदीप बाजोरिया , वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 40	- 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3.	श्री.दिपकराव साळुंखे, वि.प.स.यांचा ठराव क्रमांक 29	- 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

.....

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील शाळांची पुन्हा सुरू करण्यात आलेली फेर तपासणी रद्द करण्याबाबत औचित्याचा मुद्दा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने दिनांक 1 मार्च 2014 रोजी व त्या सुमारास या राज्यातील 1343 शाळांना अनुदान देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला. एकदा शासन निर्णय निर्गमित केल्यानंतर पुन्हा त्या शाळांची फेरतपासणी करणे हे बेकायदेशीर आहे. असे असताना या शाळांची फेरतपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही तपासणी बेकायदेशीररित्या होत आहे. त्रयस्थ समितीच्या नावाखाली तेच तेच अधिकारी या विभागातून जाऊन त्या त्या विभागात जात आहेत. त्याच अधिकाऱ्यांनी हे प्रस्ताव शासनाला शिफारस करून पाठविले आहेत. पुन्हा तेच अधिकारी तेथे जाऊन तपासणी करीत आहेत. म्हणजे चोराची तपासणी चोरच करीत आहे. तेव्हा या शाळांची फेर तपासणी रद्द करावी आणि या शाळांच्या अनुदानासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून द्यावी यासाठी सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने 9 मार्च पासून आझाद मैदान, मुंबई येथे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. ते कधीही रस्त्यावर येऊन आंदोलन करू शकतात. तेव्हा फेर तपासणी रद्द करण्यासंबंधीचे आणि शाळांना अनुदान उपलब्ध करून देण्यासंबंधी आदेश काढण्याचे निवेदन मंत्री महोदयांना करण्याबाबत आपण सूचित करावे अशी मी विनंती करीत आहे.

उप सभापती : माननीय मंत्री आता येथे उपस्थित नाहीत. योग्य वेळी निवेदन करण्यात येईल.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : आज दिनांक 12 मार्च 2015 रोजी नियम 93 अन्वये माझ्याकडे ज्या सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "वीस पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचे शासनाचे आदेश असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, हेमंत टकले यांनी "दिनांक 10 मार्च 2015 रोजी नागपूर सिताबर्डी येथे श्री.भारत खटवाणी या व्यापाऱ्याने खंडणी देण्यास नकार दिल्यामुळे त्यांची केलेली हत्या यामुळे व्यापाऱ्यांनी दिनांक 11 मार्च 2015 रोजी नागपूर बंद करण्याची केलेली घोषणा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी "राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील सर्वशिक्षकांना 12 वर्षे सेवा झाल्यानंतर वरिष्ठ श्रेणी व 24 वर्षे सेवा झाल्यानंतर निवडश्रेणीचा लाभ देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दीपकाराव साळुंखे यांनी "पंढरपूर (जि.सोलापूर) येथे दिवाणी व फौजदारी न्यायालय वेगवेगळ्या ठिकाणी असल्यामुळे पक्षकार आणि वकील यांची होत असलेली गैरसोय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "माहे फेब्रुवारी 2015 मध्ये थिरूवनंथपूरम (केरळ) येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र नेमबाजी संघटनेने तजस्वीनी मुळे या खेळाडूस जाणूनबुजून संघाबाहेर ठेवणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "दिनांक 5 जानेवारी 2015 रोजी श्रीक्षेत्र भगवानगड ता.पाथर्डी येथे विधान परिषद, विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्या वाहनांवर केलेली दगडफेक व त्यांना जीवे मारण्याची दिलेली धमकी यासंदर्भात पोलिसांनी कोणतीही कार्यवाही न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील,विजय सावंत, कपिल पाटील यांनी "राज्यात मुद्रांक विभागाने अनेक ठिकाणी घोटाळे निर्माण करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी "महाराष्ट्र लोकसेयवा आयोगातर्फे सन 2013 साली राज्य सरकारच्या विविध खात्यांतर्गत रिक्त असलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी गट-ब पदाच्या भरतीसाठी परीक्षा घेण्यात येऊनही नियुक्ती प्रक्रिया सुरू करण्यात आली नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "कनिष्ठ महाविद्यालयातील पायाभूत पद मंजूर होऊनही अनुदान न मिळण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत.

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये एकूण 4 लक्षवेधी सूचना दाखविण्यात आल्या आहेत. त्यापैकी पहिली लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया व इतर यांची आहे. आज या लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊ शकणार नाही. यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी पत्र दिले असून त्यात नमूद केले आहे की, "सदर बाब ही नॅशनल ऑथोरिटी ऑफ इंडिया यांच्या अखत्यारीत आहे. सर्व बाबी विचारात घेता सदर लक्षवेधी सूचनेतील माहिती जाणून घेण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. कृपया लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी."

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सभापती .....

आजच्या कामकाजात दुसऱ्या क्रमांकावर दर्शवण्यात आलेली लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांनी दिली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी कळविले आहे की, या लक्षवेधी सूचनेवर निवेदन करण्यासाठी अत्यंत कमी कालावधी असून सदरहू लक्षवेधी सूचनेबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडून माहिती मागवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

आजच्या कामकाजात तिसऱ्या क्रमांकावर दर्शवण्यात आलेली लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले व इतर सन्माननीय सदस्यांनी दिली असून सदर लक्षवेधी सूचनेवरील निवेदन काही कारणामुळे नियोजित वेळी करणे शक्य नसल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना दोन तीन दिवस पुढे ढकलण्यात यावी अशी मंत्री महोदयांनी विनंती केलेली असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

आजच्या कामकाजात चौथ्या क्रमांकावर दर्शवण्यात आलेली लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक व इतर सन्माननीय सदस्यांची असून सदरहू लक्षवेधी सूचनेचा विषय विस्तृत असून त्या अनुषंगाने सविस्तर माहिती प्राप्त करुन घेऊन व त्यासंदर्भात शासनाची भूमिका सभागृहाला सादर होणे आवश्यक असल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती माननीय मंत्री महोदयांनी केलेली असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

मी संसदीय कार्य मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आजच्या दिवसाच्या कामकाजातील संपूर्ण लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आल्या असून सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यासाठी मंत्री महोदयांकडून दोन तीन दिवसानंतर लक्षवेधी सूचना घ्यावी, निवेदन करण्यासाठी कालावधी कमी आहे, लक्षवेधी सूचनेतील विषय विस्तृत आहे अशी कारणे दिलेली आहेत. खरे म्हणजे चारही लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मंत्री महोदयांकडून एकच उत्तर आलेले आहे, त्यामुळे ही, बाब योग्य आहे असे वाटत नाही. त्यामुळे आपण संबंधित मंत्री महोदयांना समज द्यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, एक गोष्ट मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, आजच्या कामकाजात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांकडून जी कारणे देण्यात आलेली आहेत ती सयुक्तिक नाहीत. एकाच विषयावर विविध आयुधांवर 100 प्रश्न विचारता येतात. हा विषय केंद्रांतील आहे, त्यामुळे या संबंधी माहिती घेण्यासाठी काही कालावधी लागेल अशा प्रकारचे जे कारण सांगण्यात आलेले आहे, ते देता येणार नाही. या विषयाच्या संदर्भात मी त्यांच्याकडून माफीची अपेक्षा करणार नाही. परंतु आपण संबंधित मंत्री महोदयांना सूचना द्याव्यात, अशी मी आपल्याला विनंती करतो.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

उप सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. मार्कंडेय काटजू यांनी गेल्या दोन तीन दिवसापूर्वी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि थोर स्वातंत्र्य सेनानी सुभाषचंद्र बोस या राष्ट्र पुरषाबाबत अतिशय निदंनीय व घृणास्पद वक्तव्य केलेले आहे. ज्या महान विभूतीबद्दल सर्व भारतीयांना आदर व अभिमान वाटतो त्यांच्या बद्दल ते ब्रिटिशांचे, जपानचे एजंट होते, असे अकलेचे तारे या निवृत्त न्यायमूर्तींनी तोडलेले आहेत. या उद्दाम न्यायमूर्तींच्या वर्तनाचा त्रिवार धिक्कार करण्याची या ठिकाणी आवश्यकता आहे. यासंदर्भात या निवृत्त न्यायमूर्तींचा निषेध करणारा ठराव कालच राज्यसभेत एकमताने मंजूर करण्यात आला होता. देशवासियांच्या भावना दुखवल्याबद्दल काटजू यांचा निषेध करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य तर आहेच परंतु त्यांच्या या बेताल बडबडीबद्दल त्यांना जाब विचारण्याचीही गरज आहे. त्यामुळे या औचित्याच्या मागणीद्वारे यासंदर्भातील निषेध योग्य ठिकाणी व्यक्त केला जावा व त्यासंदर्भात पुढची जी योजना आहे त्याबाबत शासनाने गंभीर विचार करावा, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

श्री. विनोद तावडे (शालेय शिक्षणमंत्री) : नोंद करण्यात आली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, योगायोगाने दोन्ही गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. दिनांक 5 जानेवारी, 2015 रोजी श्री क्षेत्र भगवानगड, ता.पाथर्डी येथे माननीय विधानपरिषद विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्या वाहनावर दगडफेक करून त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करणे, या नियोजित दौऱ्याबाबत पोलीस प्रशासनाला दौऱ्याची माहिती असतानाही त्यांनी दखल न घेणे, दिनांक 9 मार्च, 2015 रोजी त्यांच्या मोबाईलवर धमकीचे मेसेज येणे, याबाबत पोलिसांत फिर्याद देण्यात येऊनही घडलेल्या दोन्ही प्रकरणात पोलीस यंत्रणेकडून कोणतीही कारवाई करण्यात न येणे, श्री. धनंजय मुंडे यांना झेड दर्जाची सुरक्षा देण्यासंदर्भात मी स्वतः पत्राद्वारे बीड येथील एस.पी. आणि माननीय मुख्यमंत्री यांना विनंती केलेली आहे. परंतु याबाबत गांभीर्याने कोणतीही कार्यवाही न होणे, त्यांच्या जीविताला निर्माण झालेला धोका लक्षात घेता याबाबत शासनाने गांभीर्यपूर्वक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

प्रा.राम शिंदे : निवेदन करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ.शी./मु. शी. : बोरिवली-दहिसर पालिकेच्या मोकळया मैदानात सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने डिजेचा वापर करणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुंबई मधील बोरिवली-दहिसर पालिकेच्या मोकळया मैदानात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सतत सुरु असतात. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डिजेचा वापर केल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो. हा काळ सगळीकडे दहावी व बारावीच्या परीक्षांचा असतो. यासंदर्भात पोलीस नियंत्रण कक्षाला कळवूनही योग्य ती दाद मिळत नाही. कार्यक्रम आयोजक बीट मार्शलला दाद देत नाहीत. पालिकेची काही उद्याने व मैदाने देखरेखीसाठी काही संस्थांना देण्यात आलेली आहेत. या संस्था त्या जागांचा गैरवापर करीत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. विशेषत: दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या काळामध्ये ध्वनिप्रदूषण तातडीने थांबवण्याची आवश्यकता आहे. ध्वनिप्रदूषण कायदा 2000 मधील नियमांची अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे. या भागातील काही स्वयंसेवी संस्थांनी महापालिकेकडे दाद मागून सुध्दा काही उपयोग झालेला नाही. त्यामुळे या परिस्थितीत तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु. शी. :उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमात बदल करताना नवीन अभ्यासक्रमाला लागणारी यंत्रसामुग्री, भौतिक सुविधा,शैक्षणिक साहित्य तसेच शिक्षक व तांत्रिक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता या बाबत श्री.मितेश भांगडिया,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे जुने अभ्यासक्रम पुनर्रचित करून नवीन सुधारित अभ्यासक्रम शिक्षण मंडळाच्या मंजुरीशिवाय लागू करण्याचे ठरविले आहे. अभ्यासक्रमामध्ये बदल करताना प्रचलित पद्धतीनुसार 20 टक्क्यापर्यंत बदल करणे अपेक्षित असताना आमूलाग्र परिवर्तन करण्याच्या निर्णयामुळे उपलब्ध भौतिक सुविधा व यंत्रसामुग्रीचा वापर करताना अनेक अडचणी निर्माण होणार आहेत. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमात बदल करताना नवीन अभ्यासक्रमाला लागणारी हत्यारे, यंत्रसामुग्री, भौतिक सुविधा, शै्क्षणिक साहित्य व कर्मचाऱ्यांचे या विषयाचे प्रशिक्षण देणे आवश्यक असताना ही सर्व प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. यामुळे नवीन अभ्यासक्रम शिकविण्याकरिता शिक्षक तसेच तांत्रिक कर्मचारी संभ्रमावस्थेत असून या सर्व निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होणार आहे. या सर्व बाबींचा समग्र विचार करण्याची आत्यंतिक गरज याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही याबाबत मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत केलेल्या रस्त्यांच्या कामांची चौकशी करणे याबाबत श्री. जगन्नाथ शिंदे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत सुमारे 376 कोटी रुपये खर्च करुन मनपा क्षेत्रात एकूण 23 रस्त्यांची कामे सुरु असून या योजनेच्या पहिल्या टप्प्यात डोंबिवलीतील मानपाडा रोड, राजाजी पथ, फडके रोड व कल्याण रोड या चार रस्त्यांचे क्राँक्रिटीकरण करण्यात येत असताना अवघ्या महिनाभरातच यापैकी डोंबिवली पूर्वेकडील रस्त्याला तडे गेलेले असल्याने या रस्त्यांच्या कामातील गुणवत्तेविषयीचा प्रश्न निर्माण झालेला असून मनपा प्रशासनाने या प्रकरणाच्या चौकशीच्या ससेमिऱ्यातून स्वत:ची सोडवणूक करुन घेण्यासाठी दोन अभियंत्यांचा बळी दिला असला तरीही ज्या ठेकेदाराने या रस्त्यांची कामे केली व ज्या प्रकल्प अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ही कामे झाली त्यांना मात्र अभय दिल्याने प्रशासनाच्या या कृतीबद्दल संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच मनपा अधिकाऱ्यांनी पुकारलेले असहकार, सामूहिक रजा आंदोलन याबाबींचा विचार करुन शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा योग्य विनियोग झालेला आहे की नाही याची सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात ठोस कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु. शी. :पुण्यातील डेक्कन येथील विमलाबाई गरवारे प्रशालेत दहावीच्या परीक्षा बोर्डाच्या प्रश्नपत्रिकांच्या रूममध्ये बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलीस हवालदाराने स्वत:वर रायफलमधून गोळी झाडून केलेली आत्महत्या याबाबत ॲड.जयदेव गायकवाड,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुण्यातील डेक्कन येथील विमलाबाई गरवारे प्रशालेत दहावीच्या परीक्षा बोर्डाच्या प्रश्नपत्रिकांच्या रूममध्ये बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलीस हवालदाराने स्वत:वर रायफलमधून गोळी झाडून दिनांक 6 मार्च 2015 रोजी आत्महत्या केली. हा प्रकार डयुटीवरून सोडण्यास पोलीस हवालदार आले असता उघडकीस आला. त्यांची झडती घेण्यात आली असता त्यांचेकडे सुसाईड नोट सापडलेली नाही, यावरून सदर आत्महत्या ही नैराश्यातून झाल्याबाबत येत असलेला संशय, तसेच राज्यात गत वर्षभरात 129 पोलिसांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस येणे, पोलीस डयुटीच्या तणावाखाली येत असल्याने पोलिसांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे आठ तासांचीच डयुटी देण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु. शी. : राज्यातील चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"राज्यात विशेषतः चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या गुराढोरांना अनेक प्रकाराचे नवनवीन आजार उद्‌भवत आहेत. तसेच साथीचे आजार सुरु असल्यामुळे शेतकऱ्यांच्या गुराढोरांचा मृत्यू होण्याच्या प्रकारात वाढ झालेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे पशुवैद्यकीय दवाखाना अपग्रेड करुन त्याचे बांधकाम पूर्ण होणे, परंतु सदर दवाखान्यात उपायुक्त पद व नागपूर येथील प्रादेशिक पशुधन सह आयुक्त पद रिक्त असणे. तसेच सदर दवाखान्यात गुरावरील आजारावर उपचारांसाठी तज्ज्ञ डॉक्टर नसल्यामुळे असलेल्या मशीनचा वापर होत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता आहे. या विषयाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष व त्यावर शासनाने करावयाची कारवाई याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु. शी. : महिला आयोगावरील अध्यक्षांची व सदस्यांची नियुक्ती करणेबाबत श्री.ख्वाजा बेग,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील साडेचार कोटी महिलांच्या हक्क व संरक्षणासाठी स्थापन झालेल्या महिला आयोगाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असून गेल्या सहा महिन्यापासून महिला आयोगाचे अध्यक्ष व आयोगावरील सदस्यांची नियुक्ती अद्याप करण्यात आलेली नाही. महिला आयोगाच्या कार्यालयाकडे दररोज साधारणत: ई मेलद्वारे 25 ते 30 तक्रारी येतात. जानेवारी, 2014 ते जुलै 2014 या कालावधीत आयोगाकडे 2004 तक्रारी आल्या होत्या. त्यापैकी फक्त 918 तक्रारीची सुनावणी झाली. आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षांनी ऑगस्ट 2014 मध्ये राजीनामा दिल्याने हे पद रिक्त आहे. महिलांना त्वरित न्याय मिळावा व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची शासन दरबारी नोंद होऊन अन्याय निवारणाचे काम त्वरित व्हावे हा उद्देश आयोगाच्या निर्मितीमागे होता हे विचारात घेता या प्रकरणी शासनाने त्वरित लक्ष घालून महिला आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची त्वरित नियुक्ती करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय योग्य मुद्दा मांडलेला आहे. मागील सरकारने हे पद साडेतेरा वर्षे रिक्त ठेवले होते, परंतु आम्ही तेवढी वर्षे रिक्त ठेवणार नाही. महिला अध्यक्षांचे पद लवकर भरण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु. शी. : इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेचे पेपर फुटू नयेत म्हणून बोर्डाने ताफा तैनात केला असताना देखील पेपर फुटणे याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" सोमवार, दिनांक 9 मार्च, 2015 रोजी बारावीचा बुक-किपिंग अँण्ड अकाऊंटचा पेपर व्हॉटसॲपवर फुटल्याचे स्पष्ट झाले असतानाच दुसऱ्याच दिवशी मंगळवार, दिनांक 10 मार्च, 2015 रोजी औरंगाबाद जिल्हयातील कन्नड तालुक्यात खुद्द शिक्षकांनीच दहावीचा बीजगणिताचा पेपर फोडल्याचा प्रकार उजेडात आला. दहावी आणि बारावी परीक्षेसाठी सीलबंद पेपर पोलीस बंदोबस्तात परीक्षा केंद्रावर पाठविण्यासाठी नियंत्रक, पर्यवेक्षक, खास वाहने, पोलिसांचा ताफा राज्य बोर्डाने तैनात केला असतानाही दहावी आणि बारावी परीक्षेचा पेपर फुटणे ही अत्यंत खेदाची बाब आहे. विद्यार्थी वर्षभर अभ्यास करुन परीक्षेला बसतात त्यांच्या शैक्षणिक बाबीला धक्का देणारी ही गोष्ट आहे. महत्वाच्या विषयांचे पेपर फुटणे ही गंभीर बाब असून अशा प्रकारांवर आळा बसण्यासाठी शालेय शिक्षण मंडळाने ठोस कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय शालेय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. माझी त्यांना आपल्यामार्फत विनंती आहे की, त्यांनी या प्रश्नाची दखल घ्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.संजय दत्त यांनी या ठिकाणी जो विषय मांडला तो महाराष्ट्राला क्लेशदायक असा आहे. मी या संदर्भात माहिती मागविली आहे. यापूर्वी आदल्या दिवशी पेपर फुटायचा आणि तो सर्क्यूलेट होत होता. परंतु आता पेपर परीक्षा केंद्रावर पोहोचल्यानंतर फुटतो. आता टेक्नॉलॉजीमध्ये सुधारणा झाली आहे जसे व्हॉटसॲप वगैरे या माध्यमातून पेपर पुरविण्याचे काम सुरु झालेले आहे. काही परीक्षा केंद्रावर नातेवाईक, पोलीस, खिडकीतून पेपर घेऊन ते लिहून पाठवित असल्याच्या घटना निदर्शनास आल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

आहेत. मी विभागामार्फत पोलीस तक्रार केलेली आहे की, जे नातेवाईक व्हिडीओमध्ये विद्यार्थ्यांना चिठ्ठया देताना दिसून येतील ते नातेवाईक कोणाचे आहेत, ते आयडेन्टीफाय करुन त्या विद्यार्थ्यांवर रस्टीकेटची कारवाई केली पाहिजे. महाराष्ट्रात कॉपी संस्कृती बंद झाली पाहिजे, असा सरकारचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./ मु.शी.: ठाणे व पालघर जिल्ह्यातही शासकीय अधिकारी/कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर तसेच पोलिसांच्या बदल्यांसाठी अकोला व हिंगोली जिल्ह्यांच्या धर्तीवर जिल्हा बदलीचा नियम लागू करणे, याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"महोदय, ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नव्याने पालघर जिल्ह्याची निर्मिती होणे, परंतु पालघर जिल्हा स्थापनेनंतर शासनाने मूळ ठाणे जिल्ह्यातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत कोणतेही धोरण निश्चित न केल्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये बदल्यांबाबत संदिग्धता असणे, त्यामुळे जिल्हा परिषद कार्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पोलीस विभाग, महसूल विभाग यासह अन्य शासकीय अधिकारी/कर्मचारी वर्गामध्ये संभ्रम निर्माण होणे, मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातून 80 टक्क्यांहून अधिक कर्मचाऱ्यांना ठाणे जिल्ह्यातच काम करणे सोयीस्कर वाटत असणे, अकोला व हिंगोली या जिल्ह्याच्या स्थापनेनंतर राज्य शासनाने दोन वर्षे बदल्यांसाठी जिल्हा बदलीचा नियम लागू केलेला नसणे, त्याच धर्तीवर ठाणे व पालघर जिल्ह्यातही काही वर्षासाठी हा नियम लागू करण्याबाबतची कर्मचारी संघटनांकडून मागणी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, 2015 व दिनांक 12 फेब्रुवारी, 2015 रोजी वा त्या सुमारात निदर्शनास येणे, तथापि, जिल्हा विभाजन होऊन 7 ते 8 महिन्यांचा कालावधी होऊनही त्या बाबत अद्याप कार्यवाही न झाल्याने अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होणे, त्यामुळे ठाणे व पालघर जिल्ह्यातही बदल्यांसाठी अकोला व हिंगोली जिल्ह्यांच्या धर्तीवर जिल्हा बदलीचा नियम लागू करावा, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : ठाणे येथील सेतू कार्यालयातील महसूल अधिकाऱ्यांनी जात प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमिलेअरचे अर्ज स्वीकारणे बंद करणे, याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"ठाणे येथील सेतू कार्यालयात 250-300 नागरिकांकडून शैक्षणिक व नोकरीच्या कामानिमित्त जातीच्या व नॉन-क्रिमिलेअरच्या दाखल्यासाठी अर्ज केले जातात. आतापर्यंतच्या कार्यपध्दतीनुसार जात प्रमाणपत्र तयार करण्याबरोबर पडताळणीचे कामही महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केले जात होते. परंतु आता जात पडताळणीचे काम सामाजिक न्याय विभागाकडून करण्याबाबतचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे. त्यामुळे दिनांक 4 मार्च, 2015 पासून ठाणे येथील सेतू कार्यालयातील महसूल अधिकाऱ्यांनी जात प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमिलेअरचे अर्ज स्वीकारणे बंद केल्यामुळे जवळपास दोन हजार नागरिकांना या प्रमाणपत्रांअभावी परत जावे लागत आहे, अशी तक्रार प्राप्त झाली आहे. ठाणे जिल्ह्यात ठाणे हा सर्वात मोठा तालुका असून या तालुक्यात ठाणे शहर, मिरा-भाईंदर आणि नवी मुंबईचा परिसर समाविष्ट आहे. तथापि, अधिकाऱ्यांनी अर्ज स्वीकारणे बंद केल्यामुळे गेल्या 8 दिवसांत सुमारे दोन हजारांहून अधिक नागरिक आणि विद्यार्थ्यांना चिंताग्रस्त अवस्थेत माघारी परतावे लागत आहे. माहे एप्रिल ते जून या कालावधीत अर्जदारांकडून दररोज 1 हजाराच्या वर अर्ज प्राप्त होतात, ठाणे जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांच्या असहकार आंदोलनामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी विनंती करतो की, ही प्रमाणपत्रे त्यांना लवकरात लवकर मिळण्यासाठी कार्यवाही करावी."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : महापालिकेच्या रुग्णालयातील रुग्णांना खाटेवर जेवण न देता त्यांना रांगेत उभे करुन जेवण देण्यात येणे, याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"देशभरातील तसेच मुंबईतील अनेक रुग्ण आरोग्य तपासणी आणि उपचाराकरिता मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात येत असणे, त्यापैकी अनेकांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करुन पूर्ण बरा होईपर्यंत त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याची रुग्णालय प्रशासनाची जबाबदारी असणे, उपचार घेत असलेल्या रुग्णांना दुपारी तसेच रात्री देण्यात येणारे जेवण त्यांच्या खाटेवर देणे आवश्यक असताना या जेवणासाठी रुग्णालयातील वॉर्ड बॉय आणि आया रुग्णांना रांगेत उभे राहण्यास भाग पाडत असल्याचे निदर्शनास येणे, रुग्णांना देण्यात येणारे जेवणही निकृष्ट दर्जाचे असल्याचे रुग्णांच्या नातेवाईकांचे म्हणणे असणे, रुग्णालय प्रशासनाच्या या मनमानी व निष्काळजीमुळे रुग्णांच्या मनात कैद्येत असल्याची भावना निर्माण होणे, या बाबत रुग्णांना देण्यात येणाऱ्या जेवणाचा दर्जा सुधारुन पूर्ववत खाटेवर जेवण देण्यात येण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : माथेरान शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या शार्लेट लेक तलावात हॉटेलकडून सांडपाणी सोडण्यात येणे, याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"माथेरान जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असून तेथे पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, तसेच साडेतीन हजार स्थानिक लोकांची वस्ती असणे, या सर्वांना पिण्यासाठी शार्लेट लेक या तलावातून पाणी पुरवठा करण्यात येत असून, तलावाची देखभाल करण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असणे, पण या लेक परिसरात असलेल्या मोठ्या हॉटेलचे सांडपाणी लेक तलावात येत असल्याने पाण्यावर लालसर आणि हिरवट रंगाचा तेलाचा तवंग येऊन पाणी दूषित होणे, परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आम्ही पाणी शुध्द करून पिण्यासाठी देत असल्याचा दावा करणे, परंतु या दूषित पाण्यामुळे तेथे येणाऱ्या पर्यटकांच्या आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता, या बाबत तलावात सांडपाणी सोडणाऱ्या मोठ्या हॉटेलवर कारवाई करून तेथे येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिक नागरिकांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळावे यासाठी तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उस्मानाबाद येथे असलेले उपकेंद्र व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे लातूर येथे असलेले उपकेंद्र यांचे नवीन विद्यापीठात स्थांतर करणे, याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यामध्ये उच्च शिक्षणामध्ये विद्यापीठाचा फार मोठा वाटा आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन कार्यासाठी फार मोठी चालना दिली जाते. विद्यार्थ्यांना नवनवीन ज्ञान मिळण्यासाठी मदत होते, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी विद्यापीठाच्या माध्यमातून साधने उपलब्ध करुन दिली जातात. क्रीडा विकासाला चालना देण्याचे काम विद्यापीठाच्या माध्यमातून होते, विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक क्षेत्रातील विकासाला चालना देण्यासाठी युवक महोत्सवाच्या माध्यमातून विद्यापीठाची फार मोठी भूमिका राहिली आहे. राज्यात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. विद्यार्थ्यांचीही संख्या वाढत आहे. बाहेरील देशातील लोकसंख्येचा विचार करता, त्यांच्याकडे असलेल्या विद्यापीठांची संख्या लक्षात घेता, आपला भारत देश व त्यातही आपले महाराष्ट्र राज्य विद्यापीठाच्या संख्येमध्ये मागे आहे असे दिसून येते, यामुळे राज्यामध्ये नवीन विद्यापीठाची निर्मिती करणे गरजेचे आहे, म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उस्मानाबाद येथे असलेले उपकेंद्र व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे लातूर येथे असलेले उपकेंद्र यांचे विद्यापीठात स्थांतर करावे व या दोन्ही ठिकाणी नवीन विद्यापीठांची निर्मिती करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून करण्यात आलेल्या कामांची व मजुरांची थकीत रक्कम देण्याबाबत श्री. जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सन 2011-12 या वर्षी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक विहिरी मंजूर करताना व मजुरांचे रेकॉर्ड ठेवण्यात औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण पंचायत समितीच्या तत्कालीन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात केलेली अनियमितता समोर आली होती. परिणामी या कामांची चौकशी सुरु झाली. कुशल व अकुशल मजुरांचे असे एकूण सव्वासहा कोटी रुपयांचे पेमेंट थांबविण्यात आले आहे. चौकशी लवकरच पूर्ण होईल या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून मजुरांचे पैसे देवून विहिरी पूर्ण् करुन घेतल्या. मात्र तीन वर्षाचा कालावधी लोटल्यावरही थकीत पेमेंट न मिळाल्याने तालुक्यातील दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मजुरांच्या थकीत पैशासाठी यापूर्वीही अनेक आंदोलने करण्यात आली. मात्र शासनाने याची दखल घेतली नाही. शासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी तालुक्यातील जवळपास पाचशे शेतकऱ्यांनी तालुक्यातील रहाटगाव येथील शेतातील विहिरीत उतरुन आंदोलनाला जानेवारी 2015 च्या शेवटच्या आठवड्यात सुरुवात केली. तरी शासनाचे या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख मांडत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : पंढरपूर येथील जुन्या बस स्थानकाची स्वच्छता राखण्याबाबत श्री.दीपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर शहरात जुन्या बस स्थानकावरुन तालुक्यातील अनेक ग्रामीण भागासाठी बस धावतात, तसेच नवीन बसस्थानकातून लांब पल्ल्याच्या बस धावत असतात, ओळख म्हणून असलेल्या जुन्या बस स्थानकामध्ये सध्या फारच अस्वच्छता असून, नियोजनाचे वातावरण बिघडलेले आहे, दर महिन्याच्या एकादशीला या ठिकाणी मोठ्या संख्येने यात्रेकरु येत असतात, जुन्या बस स्थानकाची ओळख राहावी म्हणून सदर बस स्थानकाची स्वच्छता राखण्याच्या संदर्भात शासनामार्फत संबंधिताना सूचित करण्यात यावे, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास करीत आहे."

उप सभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.45 वाजता पुन्हा सुरु होईल.

(दुपारी 3.08 ते 3.45 वाजेपर्यंत मध्यंतर)

नंतर श्री.रोझेकर....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करावी, अशी आमची विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.45 ते 3.55 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलण्यासाठी उभा आहे. सभापती महोदय, आता माननीय राज्यपाल यांच्या अभिभाषणावर चर्चेला सुरुवात करण्यात येणार आहे. माननीय राज्यपाल यांचे संयुक्त सभागृहापुढे अभिभाषण झाले आहे. हा संसदीय लोकशाहीचा अतिशय महत्वाचा पाया आहे. राज्यपाल महोदयांच्या भाषणात पुढील वर्षात सरकार नेमके काय करणार आहे, याचे वैचारिक प्रतिबिंब त्यात असते. सरकारच्या वतीने राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचा प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात येत असताना सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री महोदय यापेक्षा जास्त निकडीच्या दुसऱ्या एखाद्या कामात असतील तर सभागृह नेत्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. यापैकी कोणीही उपस्थित नसणे म्हणजे हा माननीय राज्यपाल यांचा अवमान आहे. राज्यपाल महोदयांचा अवमान सत्तारूढ पक्षाला मान्य असेल तर मंत्री महोदय श्री.बबनराव लोणीकर यांनी प्रस्ताव मांडावा, आमची काहीही हरकत नाही. मी ही भूमिका अधिकृतपणे रेकॉर्डवर आणीत आहे. राज्यपाल महोदयांचा अवमान सरकारने करु नये, सरकारच्या वतीने मुख्यमंत्री महोदय किंवा सभागृह नेत्यांनी सभागृहात यावे अशी माझी मागणी आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जी सूचना केली ती अत्यंत योग्य आहे. या संदर्भातील निरोप मी संबंधितांना तातडीने पाठवित आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचा ठराव सभागृहात मांडत असताना माननीय मुख्यमंत्री किंवा सभागृह नेते सभागृहात उपस्थित पाहिजेत. राज्यपाल महोदयांचा अवमान सरकारला मान्य असेल तर आमची हरकत नाही. पंरतु राज्यपाल महोदयांचा अवमान आम्ही सहन करणार नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जी सूचना केली ती अतिशय योग्य आहे. सभागृहात माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय सभागृह नेते उपस्थित राहणे आवश्यक असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 3.57 ते 4.12 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

तालिका सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.स.स. यांनी मांडला असून ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी त्यास अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आज गुरुवार, दिनांक 12 मार्च, 2015 रोजी होणार असून सभागृहातील कामकाज लक्षात घेता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस सर्वसाधारणपणे एकूण 5 तासाचा कालावधी उपलब्ध आहे व त्यातील मुख्यमंत्र्यांच्या उत्तरासाठीचा 1 तासाचा कालावधी गृहीत धरल्यास उर्वरित 4 तास चर्चेसाठी उपलब्ध होतील. त्यातील प्रस्तावकांना 15 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच, विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणासाठी 20 ते 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदामार्फत माझ्याकडे 10 मिनिटात पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंर वेळेचे बंधन घालावे काय, याचा विचार करता येईल.

या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. सदर सुधारणा बुधवार, दिनांक 11 मार्च, 2015 रोजी टपालखणाद्वारे वितरित करण्यात आल्या आहेत. सुधारणांची एकत्रित यादी सदस्यांना मिळाली आहे, असे मी समजतो. तसेच, सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या नाहीत, असेही मी समजतो.

आता प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. भाषण करतील. तद्नंतर प्रस्तावाला अनुमोदन देणारे सदस्य ॲड.अनिल परब, वि.प.स. भाषण करतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते.

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

सभापती महोदय, महाराष्ट्राचे दैवत, गोरगरिबांचा भगवान आणि पंढरीचा पांडुरंग यांच्या वारकरी दिंडीचा आनंद आम्ही दरवर्षीच घेतो. खऱ्या अर्थाने वारकऱ्यांच्या दिंडीमध्ये आपल्याला ईश्वराचा भास होतो. आपण आता पर्यंत कधीच 26 जानेवारी किंवा प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यासाठी चित्ररथ पाठविला नव्हता. परंतु, राज्य शासनाने यावर्षी प्रथमच प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याच्या वेळी सादर केलेल्या "पंढरीची वारी" या स्थिरनाट्य देखाव्यास भारत सरकारचा सर्वोत्कृष्ट स्थिरनाट्य देखावा म्हणून पुरस्कार मिळालेला आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व कलाकारांचे, तंत्रज्ञांचे, सहायकांचे व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करीत असताना मी माननीय राज्यपालांचे देखील अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदय, राज्याचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर सर्व स्तरातील लोकांचा विकास होणे अतिशय महत्वाचे असते. म्हणून यावेळी शासनाने सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्राला योग्य दिशा देण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम आखलेले आहेत, याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, प्रत्येक वर्षी निसर्गाचा समतोल राखला जात नाही आणि प्रत्येक वर्षी अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. देव कोणत्याही पक्षाचा नाही. देव आपल्यावर नेहमीच आघात करीत असतो आणि त्याला सामोरे जाण्याचे सामर्थ्य आपणा सर्वांमध्ये असते. राज्यात मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस, गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यासाठी शासनाने तातडीने सर्व्हे करून बाधित शेतकऱ्यांना मदत, जीवित हानी, जनावरे, घरांची झालेली पडझड यासाठी नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला असून त्या कामाला सुरुवात केलेली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी सर्व्हे अत्यंत महत्वाचा असतो आणि यावेळी अतिशय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

तातडीने सर्व्हे झाल्यामुळे आपण शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत देऊ शकलो. यासाठी मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, मी मागील 25 वर्षापासून सभागृहात आहे. आम्हाला प्रत्येक वर्षी आणेवारी, पैसेवारी काढण्यासाठी भांडावे लागते. आणेवारी काढत असताना आम्हाला नेहमीच अन्याय सहन करावा लागत होता. परंतु, यावर्षी मात्र गावांची पैसेवारी काढत असताना वस्तुस्थितीवर आधारित पैसेवारी काढली गेली. त्यामुळे यावेळी लोकांची ओरड झालेली नाही. राज्यात 23,811 गावांमध्ये टंचाई सदृश परिस्थिती घोषित झाली असून शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड, थकीत पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात रूपांतर करणे व शेतीशी निगडित कर्ज वसुलीस स्थगिती देण्यात आलेली आहे. या सर्व गोष्टी यावर्षी मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या असल्यामुळे मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, प्रत्येक वर्षी कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. कधी अतिवृष्टी, अल्पवृष्टी, अवकाळी पाऊस तर कधी गारपीट होते. आम्ही यापूर्वी शासनाकडे प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मदत करण्याची मागणी करीत होतो. कारण आम्ही अनेक वर्षे विरोधी पक्षात काढलेले आहेत, याची आपल्याला देखील कल्पना आहे. आपण यासाठी प्रत्येक वर्षी 2 हजार कोटी रूपयांपर्यंत तरतूद करीत होतो. परंतु शासनाने यावर्षी प्रथमच शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी 4 हजार कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे आणि ही रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून शासनाने शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिलेला आहे, याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते. या नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असते. विदर्भ असो किंवा मराठवाडा असो. या भागात सिंचनाचे प्रमाण कमी असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. एकदा कोरडवाहू जमिनीत पीक उगवले आणि अवकाळी पाऊस, अतिवृष्टी यामुळे जर पिकाचे नुकसान झाले तर तो शेतकरी रस्त्यावर येतो. त्या शेतकऱ्याला ते वर्ष कसे तरी काढावे लागते. तो शेतकरी कर्जाच्या डोंगरात दबून जातो आणि अशा वेळी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना मदत करीत असताना स्थिर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

स्वस्त्याची सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे अतिशय आवश्यक असते. सिंचनाची सोय झाली तर

श्रीमती शोभा फडणवीस.....

शेतकरी स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो. मुळातच मराठवाडा विभागात सिंचन क्षेत्र कमी असल्यामुळे कोरडवाहू शेती जास्त आहे. त्याकरिता जलयुक्त शिवार अभियान, मामा तलावांचे नूतनीकरण, खोलीकरण, त्याच बरोबर पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सूक्ष्म जल सिंचन पद्धतीला चालना देऊन राज्य टंचाई मुक्त करण्याचे धोरण प्रथमच शासनाने घेतलेले आहे. प्रतीवर्षी 5 हजार गावे टंचाई मुक्त करण्यात येणार आहे. सर्वांना असे वाटत आहे की, एका वर्षात 5 हजार गावे टंचाई मुक्त कशी काय होतील ? ज्यावेळी आपण एखादे धोरण ठरवितो त्यावेळी आपण ते धोरण पुढे नेण्याचा प्रयत्न करीत असतो. मला असे वाटते की, आपल्याला कोणतेही काम मोठे वाटत असले तरी आपण ते काम सहजपणे करु शकतो. हे काम केवळ एक व्यक्ती करीत नसते, तर त्यासाठी सर्वच लोक त्या व्यक्तीच्या पाठीमागे असतात. प्रत्येक वर्षी 5 हजार गावे टंचाई मुक्त होणार असतील तर आपण पुढील 5 वर्षात 25 हजार गावे टंचाई मुक्त करु शकतो आणि खऱ्या अर्थाने जनतेला, शेतकऱ्यांना या सर्व दुःखापासून दिलासा देऊ शकतो. आपण यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपण थांबवू शकतो.

सभापती महोदय, आज पर्यंत शेतकऱ्यांना जलसंपदेचा इष्टतम, समन्यायी व शाश्वत अधिकार मिळालेला नव्हता. त्यासाठी याच सभागृहात मोठ्या प्रमाणावर चर्चा झालेल्या आहेत.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.....

त्याकरिता शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, जून्या प्रकल्पाचे नूतनीकरण, भूपृष्ठ जल, भूजल यांचा वापर करण्यात येणार आहे. जल सिंचन योजनेमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग आणि सूक्ष्म जल सिंचनाचा वापर यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. हे पहिल्यांदाच घडत आहे. त्यामुळे सिंचनाबाबत सरकारने जे धोरण आखले त्याबाबत खऱ्या अर्थाने बऱ्याच वर्षापासून आमचीही मागणी होती आणि विरोधी पक्षाची सुध्दा मागणी होती, ती जर पूर्ण होत असेल तर मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, स्वच्छ भारत अभियान कार्यक्रम आपण राबवित आहोत. भारत स्वच्छ राहिला तर निरोगी भारत होऊ शकतो. त्यामुळे भारत स्वच्छ असावा, निरोगी असावा यासाठी स्वच्छतागृह व प्रसाधनगृह बांधण्याचा महत्वाचा कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता होती. त्यासाठी शासनाने 2015-2016 या वर्षात ग्रामीण भागात 14 ते 15 लाख प्रसाधनगृह बांधण्याचे निश्चित केले असून शहरातील 8 लाख कुटुंबांना प्रसाधनगृह पुरविण्यात येतील असा कार्यक्रम प्रथमच घेण्यात येत आहे, त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना लाभासाठी विहिरींची अतिशय गरज असते. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहिरी बांधण्याचा प्रयत्न केला. अजूनही काही भागामध्ये विहिरी पाहिजे त्या प्रमाणात पूर्ण होऊ शकल्या नाहीत. विदर्भ विहिरींच्या बाबतीत मागे आहे. मराठवाडा सुध्दा विहिरींच्या बाबतीत मागे आहे. सिंचन विहिरींची शेतकऱ्यांना आवश्यकता असते. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत पुढील 2 वर्षात विहिरी आणि रोजगार हमी योजनेतून पांदण आणि शेती रस्ते यासाठी जास्तीत जास्त कामे करण्याचे ठरविले आहे. मी आदिवासी भागामध्ये फिरते. आजही गडचिरोली किंवा मेळघाट या आदिवासी भागातील तालुक्यांमधील 50 टक्के गावात आदिवासींना जाण्या येण्याकरिता रस्ते नाहीत, शाळा नाही, पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. या माध्यमातून आपण तेथे रस्ते पुरवू शकलो तर त्या आदिवासी मुलांचा विकास होईल. आदिवासींचा विकास होऊ शकेल. ते विकासाच्या प्रवाहामध्ये येऊ शकतील. या योजनेबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, प्रत्येक दुष्काळी परिस्थितीत फळबागांचे मोठया प्रमाणात नुकसान होते. नुकसान भरपाई म्हणून शासनाकडून आर्थिक मदत दिली जाते. कधी 25 हजार, कधी 15 हजार तर कधी 10 हजार रुपये तात्पुरती मदत दिली जाते. फळबाग पुन्हा उभी रहावी हा उद्देश असतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) FF.2

SGB/ 16:20

श्रीमती शोभा फडणवीस.....

फळबाग योजनेसाठी स्थिर रक्कम देत नव्हतो. प्रथमच नुकसान भरपाई देत असताना शासनाने महात्मा फुले जल अभियानांतर्गत फळबागांचे पुनरुज्जीवन, वैरण विकास कार्यक्रम व सूक्ष्म जल सिंचन विकास यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत 350 कोटी रुपयांची तरतूद केली याचा आम्हाला आनंद होत आहे. मी याबद्दल माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे मराठी भाषेबद्दल जिव्हाळा, आत्मीयता, भाषेचा स्वाभिमान आपणा सर्वांनाच आहे. मराठी भाषेला मान सन्मान मिळावा ही आपल्या सगळ्यांची इच्छा आहे. यासाठी मराठी भाषा धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासन कटिबध्द आहे. त्यासाठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी भारत सरकारकडे नेटाने पाठपुरावा करीत आहे. त्यामध्ये आपण यशस्वी होऊ असा मला विश्वास आहे. मराठी भाषेला दिलेला मान व सन्मान याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते. सभापती महोदय, शासन राज्यात प्रथमच मराठी भाषा भवन बांधण्यास प्रयत्नशील आहे. मराठी भाषा भवन झाले तर ती आदर्श इमारत उभी राहील आणि मराठी भाषेला सन्मान मिळेल.

सभापती महोदय, राज्यात अपराध सिध्द होण्याचे प्रमाण, गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी शासन अनेक उपाययोजना करीत आहे. परंतु पाहिजे त्या प्रमाणात यश आलेले नव्हते. मागील दोन वर्षात महिलांवरील बलात्कारामध्ये 70 टक्के वाढ झाली. त्यातील 95 टक्के घटना संबंधित लोकांपासून घडल्या आहेत अशा पध्दतीचा अहवाल आहे. 2012, 2013 व 2014 मध्ये मोठया प्रमाणात महिलांवर अत्याचार झालेले आहेत. याकरिता शासनाने महिला व बालकांच्या लैंगिक अत्याचाराशी संबंधित प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी विशेष व जलद गती न्यायालयाचे स्थापन करण्याचे ठरविले आहे. कोर्टात प्रकरणे मोठया प्रमाणात दाखल होतात. परंतु निकालांचे प्रमाण कमी आहे. मागील वर्षी 1701 बलात्काराच्या घटना घडल्या आणि फक्त 215 गुन्हेगारांना शिक्षा झाली. इतर सर्व आरोपी शिक्षेविना सुटले. म्हणून तातडीने निकाल लागणे, लवकर न्याय मिळावा, निर्णय मिळावा यासाठी या न्यायालयांचा आपल्याला नक्की उपयोग होईल. याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, राज्यातील असमतोल विकास हा नेहमीच चर्चेला आणि उद्वेगाचा विषय झालेला आहे. त्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या समतोल प्रादेशिक विकासाच्या संदर्भातील

श्रीमती शोभा फडणवीस.....

उच्चस्तरीय समितीचा अहवाल विचारात घेऊन मंत्री समिती गठीत करण्यात आली. त्या समितीमार्फत मंत्रिमंडळाला शिफारशी करण्यात आल्या. त्यातून प्रादेशिक असमतोल दूर होऊन राज्याचा समतोल विकास होईल. विदर्भावर अन्याय झाला, मराठवाड्यावर अन्याय झाला, कोकणावर अन्याय झाला, निधीचे समन्यायी वाटप झाले पाहिजे, समतोल विकास झाला पाहिजे यादृष्टीने बजेटमध्ये तरतूद केली जाते. परंतु त्याचा फार कमी फायदा आपल्याला मिळत होता. त्यामुळे नेहमीच पाण्याबाबत, निधीबाबत, रस्त्यांबाबत, विकासाबाबत चर्चेच्या माध्यमातून विषय मांडण्यात आले. समतोल विकास करण्याकरिता शासनाने उचललेले पाऊल खऱ्याअर्थाने अभिनंदनास पात्र आहे. त्यामुळे मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, आर्थिक लाभापासून वंचित राहिलेल्या देशातील जनतेच्या सर्वंकष विकासाचे उद्दिष्ट साधण्यासाठी योजना सुरु करण्यात आली. पंतप्रधान जन धन योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून ग्रामीण भागात 37.50 लाख आणि शहरी भागात 39.26 लाख अशी एकूण 76.76 लाख खाती उघडण्यात आली आहेत. लोकांच्या हिताच्या दृष्टीने या योजनेला अतिशय महत्व आले आहे. बँकेशी आजपर्यंत गरीब लोकांचा संबंध आलेला नव्हता. आम्ही म्हणायचो की, पैसे जमा कर, बँकेत खाते काढ. परंतु रोजची रोजीरोटी ज्याला मिळत नाही ते बँकेत खाते काढू शकत नव्हते. या योजनेच्या माध्यमातून मोठया प्रमाणात खाती उघडल्याने लोकांची पैशाची सोय झलेली आहे. त्यामुळे आपल्याला या बाबतीत अतिशय आनंद वाटला पाहिजे. आपण गरीब लोकांचा विचार करण्यास सुरुवात केली आहे.

सभापती महोदय, अनुकंपा तत्वावर क आणि ड गटातील पदांवर नियुक्ती करण्यासाठी 5 टक्क्यावरुन 10 टक्के इतकी मर्यादा वाढविली आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे. पूर्वी 3 टक्के पदे अनुकंपा तत्वावरील नियुक्त्यांसाठी राखीव ठेवली जात होती. प्रचंड यादी होती, त्यामुळे संधी मिळत नव्हती, पात्र उमेदवारांचे वय उलटून जात होते. घरातील कर्ता पुरुष गेला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असेल तर त्या कुटुंबावर उपासमारीची पाळी यायची. त्यामुळे टक्केवारी वाढवावी अशी मागणी केली जात होती. 3 टक्क्यावरुन 5 टक्के इतकी वाढ झाली होती. आता ती 10 टक्के केल्यामुळे अनुकंपा तत्वावरील पात्र उमेदवारांना न्याय मिळेल असा विश्वास वाटतो.

..4...

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) FF.4

SGB/ 16:20

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 अन्वये अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 नुसारच अंत्योदय अन्न योजनेचे पात्र लाभार्थी म्हणून समजण्यात येईल. अन्न सुरक्षा अधिनियमानुसार अंत्योदय अधिक बीपीएल धारक ग्रामीण भागात 4.5 कोटी आणि शहरी भागात 2.30 कोटी लोकांना याचा फायदा होणार आहे. ज्या लोकांना भीती वाटते ते आमच्याकडे येतात. आमची अंत्योदय योजना बंद होणार आहे का, धान्य मिळणार नाही का? गरीबांना धान्य मिळणार नाही असा कोणताही सूर यातून निघत नाही. गरीब लोकांना धान्य मिळण्याचे धोरण तेच आहे. गरीब लोकांना मोठ्या प्रमाणात धान्य मिळणार आहे.

सभापती महोदय, 1995 पासून गोवध हत्या बंदीची मागणी असताना 20 वर्षानंतर कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक, खरेदी विक्री व निर्यात यावर प्रतिबंध करणारे प्राणी रक्षण सुधारणा विधेयक, 1995 ला राष्ट्रपती महोदयांनी संमती दिली असून कायदा पास झाल्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, लोकनेते आणि गोरगरीब जनतेचे कैवारी स्व.गोपीनाथ मुंडे यांचे भव्य स्मारक औरंगाबाद येथे बांधून त्यांची स्मृती जागृत ठेवण्याचे काम या माध्यमातून करीत असल्यामुळे मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते. देशातील स्त्री भ्रूण हत्येमुळे महिला व पुरुष प्रमाणात असमतोल निर्माण झाला आहे. ही गंभीर बाब लक्षात घेऊन 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा कार्यक्रम केंद्र सरकारने सुरु केला आहे. त्याच धर्तीवर 'माझी कन्या भाग्यश्री' ही नवीन योजना सुरु करण्याचे ठरविले आहे त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणात होणारे बालमृत्यू, कुपोषण या गंभीर समस्येचे उच्चाटन करण्यासाठी आदिवासी आरोग्य आणि पोषण आहार अभियान सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे. यातून आदिवासी बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण कमी होऊ शकते. अशा पध्दतीने निरनिराळ्या योजना, रस्ते, पाणी, पिण्याचे पाणी, स्वच्छता यांचा अभिभाषणामध्ये उल्लेख

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असल्यामुळे मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करणारा ठराव मांडते आणि माझे भाषण पूर्ण करते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

नंतर 2जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी गेल्या 25-30 वर्षापासून विधानमंडळाचा सदस्य आहे. राज्यापालांच्या अभिभाषणाचा प्रस्ताव मांडत असताना अनुमोदन देणारे सन्माननीय सदस्य उपस्थित राहिले नाहीत हे मी पहिल्यांदाच पाहात आहे. याचा अर्थ शिवसेनेचा या अभिनंदन प्रस्तावाला पाठिंबा नाही असाच होतो. त्यांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल भावना नाही हे त्यांच्या अनुपस्थितीच्या माध्यमातून व्यक्त होत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे अनुमोदक होते ते आता सभागृहात उपस्थित नाहीत. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मी सांगितले होते की, आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव हा वैधानिक नाही. याचे कारण त्यावेळी श्री.एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली सभागृहाच्या बाहेर आंदोलन करण्यात आले होते. ही जी वस्तुस्थिती आहे ती नाकारता येत नाही. आज त्याची मी द्विरुक्ती करीत नाही. पण हे पहिल्यांदाच घडते आहे की, ज्यांनी अनुमोदन दिले आहे ते सन्माननीय सदस्य माननीय राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्यासाठी देखील उपस्थित नाही. याचा अर्थ असा आहे की, आजचा आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव हा असांविधानिक आहे. या प्रस्तावाला पाठिंबा किंवा अनुमोदन देण्यात आलेले नाही. सभागृहामध्ये जेव्हा अशा प्रकारचे अभिनंदनाचे प्रस्ताव येतात विशेषत: माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासंबंधातील प्रस्ताव मांडत असतो त्या त्यावेळी सूचक व अनुमोदकांनी उपस्थित राहणे आवश्यक असते. एक वैधानिक प्रस्ताव, घटनात्मक प्रस्ताव मांडला जात असताना शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांनी अनुपस्थित राहून या कामकाजासंबंधी किंवा या अभिभाषणाबद्दल नापसंती व्यक्त केल्याचे दिसत आहे. मी माननीय मंत्री श्री.एकनाथ खडसे यांना सांगू इच्छितो की, कालच सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सरकारी यंत्रणा काम करीत नाही असे सांगितले. आपणाला या सर्व गोष्टींचा अनुभव आहे. कारण आपण सन 1990 पासून या सदनाचे सदस्य आहात. 1995 मध्ये युती शासनाच्या काळात आपण मंत्री झाला. मंत्रिमंडळाच्या पहिल्या यादीमध्ये आपले नाव नव्हते. तेव्हा आपली व माझी आमदार निवासामध्ये भेट झाली होती. मंत्रिमंडळाच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

दुसऱ्या यादीमध्ये आपल्याला स्थान मिळाले. अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री ही पदे आपण भूषविली आहेत. आताच्या मंत्रिमंडळामध्ये आपला दुसरा क्रमांक लागतो हे आम्ही मानतो आणि ते आहेच. मला एक बाब आपल्या निदर्शनास आणावयाची आहे. आम्हाला माननीय राज्यपालांचे अभिभाषण देण्यात आले आहे ते आपण पहावे. आज आपल्या शासकीय छापखान्याची अवस्था देखील वाईट झाली आहे काय ? आम्हाला भाषणाची जी पुस्तिका दिली आहे ती आपण पहावी. आमच्या वेळी अशी अवस्था असती तर हे भाषण आपण रागाने फेकून दिले असते. आपण जेमतेम छापल्या सारखे केले आहे. हा टीका करण्याचा भाग नाही. पद्धतीमधील दोष बदलण्यासाठी मी हे बोलत आहे. जे चूक झाले आहे ते बोलण्यासंबंधी आपण धारिष्ट्य दाखवत नाही तो पर्यंत काहीही होणार नाही. आम्हाला देण्यात आलेल्या पुस्तिकेचे कटींग पहावे. हा विषय कृपा करून कोणीही चेष्टेने घेऊ नये. गेली 25 वर्षे आम्ही सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांची भाषणे ऐकली आहेत. आपण बारीक-सारीक उणिवांवर बोलत होता. आपण जो शब्दप्रयोग करीत होता तो आम्ही करीत नाही. आम्ही ते लायक आहेत की नाही हे देखील बोलत नाही. खरे तर ना हा शब्द आम्ही आयुष्यात कधीच वापरला नाही. कारण आम्ही सुसंस्कृत विचारातून घडत गेलेलो आहोत. या सरकारच्या भूमिकेबद्दल कोणतीही कसूर असता कामा नये. माननीय राज्यपालांचे भाषण आम्ही 9 मार्च रोजी ऐकले होते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आताच आपल्या 15-20 मिनिटांच्या भाषणामध्ये तेच भाषण त्रोटक पद्धतीने वाचून दाखविले आहे. नवीन कोणतेच मुद्दे नसल्यामुळे पक्षाने जे काही दिले आहे ते वाचण्यापासून त्यांना दुसरा कोणताच पर्याय नव्हता. त्यांनी फार मोठ्या पद्धतीने अभिनंदन केले आहे. राज्यपालांच्या अभिभाषणाचा मसुदा कॅबिनेट ठरवत असते. जनतेसमोर शासन कशा प्रकारे जाणार आहे त्याचे प्रतिबिंब त्यात असते.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासंबंधीचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. परंतु, माननीय राज्यपालांच्या मराठी भाषणामध्ये 27 वेळा इंग्रजी शब्द वापरण्यात आलेले आहेत. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते असते तर मी त्यांना विचारले असते. कदाचित यास त्यांची मंजुरी नसेल असे मला वाटते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा असे आता आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

तावातावाने विचार मांडले आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आपण 27 वेळा इंग्रजी शब्द वापरता याचा अर्थ आपल्या मराठी भाषेबद्दलच्या भावना पोकळ आहेत हे या निमित्ताने दिसते. आताच माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांचे आगमन झाले आहे. आम्हाला आपल्या उपस्थितीची गरजच होती. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात 27 वेळा इंग्रजी शब्दप्रयोग आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला पाहिजे हे आपण कशाला म्हणतो. आपण आदरणीय माजी उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना श्रद्धांजली वाहत असताना सांगितले की, मंत्रालयामध्ये माननीय मंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांच्या नावाच्या पाट्या मराठीत लावण्यासंबंधी आंदोलन केले. ज्यावेळी आपण मंत्रालयात आंदोलन करण्यासाठी गेला होता तेव्हा आबांनी आपली पाटी मराठीत लावली होती याचा आवर्जून उल्लेख आपण शोक सभेमध्ये केला होता. आज आपण मंत्रिमंडळामध्ये आहात. आपली काय पतच राहिली नाही काय ? ती संपुष्टात आली काय ? आपण विरोधी पक्षात असताना तावातावाने बोलत होता. मुंबईचे महापौर म्हणून आम्ही श्री.दिवाकर रावते यांचा अवतार पाहिला आहे. मराठवाड्यातील दुष्काळी जनतेसाठी 40 ते 50 कि.मी.अंतर धावणारे श्री.दिवाकर रावते पाहिले आहेत. डोक्याला मुंडासे बांधत अनवाणी चालणारे श्री.दिवाकर रावते आम्ही पाहिले आहेत. तेच श्री.दिवाकर रावते आता सत्तेमध्ये आल्यानंतर गारठले की काय अशी शंका हे अभिभाषण वाचल्यानंतर आमच्या मनात निर्माण होते. मी राजकीय भाषण करीत नाही. वस्तुस्थितीवर आधारितच भाषण करीत आहे. आपण एक महिनाभर विरोधी पक्षामध्ये होता. माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनी मराठवाड्याचा दौरा केला. कदाचित आमच्या बबनरावांच्या मतदार संघात देखील गेले असतील. तावातावाने बोलणारे श्री.रामदासभाई कदम यांना देखील त्या दिवशी पाहिले. नाशिकला तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथ शिंदे यांना घेऊन गेले होते.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी माझा ज्या पद्धतीने उल्लेख केला आहे त्याचा मला मनापासून आनंद झाला आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, आजही मंत्रिमंडळामध्ये इंग्रजी शब्द आला की मी लगेच तेथे मराठी शब्द सुचवितो. माझ्याकडे अभिभाषण आल्यानंतर ते सुधारले होते. मी मराठीत करा असे सांगितले होते. मी आपणास नक्की सांगतो की, माननीय राज्यपालांच्या पुढील अभिभाषणामध्ये एक सुद्धा इंग्रजाळलेला मराठी शब्द दिसणार नाही. यावेळी देखील मी मराठी शब्दांचा आग्रह धरला होता. पण ते यावेळी राहून गेले हे मी आपल्या माहितीसाठी सांगत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : माननीय रावते साहेब आपण चूक मोठया अंतःकरणाने मान्य केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु तुम्ही चुका लक्षात आणून दिल्या नंतर सुध्दा त्या दुरुस्त न झाल्याबद्दलचे शल्य तुमच्या मनात आहे. परंतु पुढच्या वर्षाचा दिवस कोणी पाहिला ? तुम्ही त्यावेळेस असाल की नसाल हे कोणी पाहिले ? राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात इंग्रजीचा शब्द असेल किंवा नसेल हे कोणी पाहिले ?

श्री.दिवाकर रावते : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष माननीय शरद पवार साहेब एनडीएमध्ये जाणार याबाबद्दलचे आपण सूतोवाच करीत असल्याबद्दल धन्यवाद.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ज्या दिवशी बजेट अधिवेशन सुरु झाले होते त्याच्या आदल्या दिवशी माननीय उद्धव ठाकरे यांनी शिवालयात विधानसभा सदस्यांची बैठक घेऊन सांगितले होते की तुम्ही जरी सरकारमध्ये असला तरी जनतेच्या प्रश्नासंबंधी सभागृहात आवाज उठवा. लोकसभेत एनडीएने जे भूसंपादनाचे बिल आणले होते त्याला विरोध करण्याची भूमिका आपण घेतली त्याच दिवशी तुम्ही एनडीएमधून बाहेर पडण्याचे सिध्द झाले.

सभापती महोदय, आपण सांगत होता की, आम्ही सरकारमध्ये जाणार नाही, सरकारमध्ये जाणार नाही, असे होणार, तसे होणार नाही. परंतु त्यावेळेस दिल्लीच्या सरकारमध्ये केंद्रीय मंत्री श्री. आनंद गिते होते हे आपण कसे विसरता ? याचा अर्थ ते माननीय उद्धव ठाकरे यांचे तरी ऐकतील की, नाही याबाबतची शंका त्यावेळेस प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली होती. या महिन्या भराच्या कालखंडात माननीय श्री.एकनाथ शिंदे विरोधी पक्ष नेते, त्यावेळेस माननीय श्री. रामदास कदम हे सुध्दा आम्ही सरकारमध्ये जाणार नाही असे तावातावाने सांगत होते. परंतु यानंतरच्या कालावधीत तुम्ही सत्तेमध्ये सामील झालात.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये मध्यंतरी पडलेल्या गारपिटीचा जरा देखील उल्लेख करण्यात आलेला नाही. गारपीट 28 तारखेला झाली, अभिभाषण 9 तारखेला झाले, अभिभाषण 7 तारखेला छापण्यासाठी गेले असेल मध्यंतरीच्या सहा सात दिवसामध्ये अभिभाषणात गारपिटीची एक ओळ देण्याची सुध्दा या सरकारकडे संवेदना नाही, इतक्या संवेदना या शासनाने तीन महिन्याच्या कालावधीत गमावलेल्या आहेत ? आपण केवळ आम्ही गेल्या 15

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे .....

वर्षाच्या कालखंडात काय केले याचा सतत उल्लेख करता. आपल्याला सरकार चालवायचे असेल तर चालवा नाही तरी तुमच्याकडे त्याच्याशिवाय दुसरे कर्तृत्वच हळू हळू महाराष्ट्रातील जनतेच्या मनात येऊ लागले आहे. ज्यावेळेस कर्तृत्व संपते, काम दाखवण्यासाठी दुसरी कोणतीही इच्छाशक्ती राहात नाही, प्रबळ इच्छाशक्ती राहात नाही, काम करण्यासाठी पाऊले उचलण्यासाठी काही प्रयत्न केले जात नाही त्याचवेळेस दुसऱ्याच्या अपयशावर बोट ठेवणे किंवा कारणमीमांसा सांगणे एवढाच एक भाग राहतो.

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात 4 हजार कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे अशी माहिती राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आहे. या अभिभाषणात 4 हजार कोटी रुपयांचे वाटप केले, शेतकऱ्यांच्या नावावर चेक जमा केले व सावकारांच्या कर्जातूनही आम्ही शेतकऱ्यांना मुक्त केले असा उल्लेख आहे. मा. खडसे साहेब तुम्ही प्रामाणिक आहात याबद्दल आज तरी माझ्या मनात शंका नाही, तुम्ही हाडाचे शेतकरी आहात याबद्दल माझ्या मनात शंका नाही. सावकारांचे कर्ज माफ करण्याच्या दृष्टिकोनातून तुम्ही जो प्रस्ताव आणला होता त्यावेळेस मी आपल्याला दुसऱ्याच दिवशी सांगितले होते की, अधिकृत सावकारांना जे लायसन्स दिले जातात त्यामध्ये शेतीला कर्ज देण्याचा परवाना नसतो. ही बाब जर स्पष्टपणे असेल तर आपण नेमक्या कोणत्या लोकांचे कर्ज भरले आणि कोणाची धन केली ? शेतकऱ्यांच्या पदरात नेमके काय पडले आहे ? आबा एकदा म्हणाले होते की, "सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढू" परंतु तुम्ही त्यांची आयुष्यभर चेष्टा केली. परंतु आता त्याच सावकारांचे तुम्ही पैसे भरलेले आहेत. या सरकारने कोणत्या सावकाराचे पैसे भरले याची माहिती माननीय सदस्य फुंडकर साहेबांनी या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. सावकारांचे कर्ज भरुन आपण कोणाची फसवणूक केली आहे ?

सभापती महोदय, काम करीत असताना चुका होतच असतात. काम करताना आमच्या हातून काही चुका झाल्या असतील परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानावर गाढ विश्वास ठेवणारे तुम्ही आम्ही सर्वजण आहोत. सत्तेमध्ये बदल होणे हे स्वाभाविक आहे. लोकशाहीमध्ये आपण लोकांचा कौल मानतच असतो. निवडणुकीमध्ये जनतेने आपल्यावर प्रचंड

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे .....

विश्वास दाखवला आहे. अवकाळी पाऊस पडणे हे कोणाच्या हातामध्ये आहे काय, आम्ही अवकाळी पाऊस पाडला असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय, आम्ही इकडे आल्यामुळे आमच्या पायगुणाने पाऊस पडला असे तुम्हाला म्हणावयाचे आहे काय, तुम्ही तिकडे असल्यामुळे तुमच्या पायगुणाने अवकाळी पाऊस पडला असे तुम्हाला म्हणावयाचे आहे काय ? गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या फळ बागांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. गारपिटीच्या संदर्भात एकाही ओळीचा अभिभाषणात उल्लेख न करुन आपण शेतकऱ्यांचा घोर अपमान केलेला आहे. महाराष्ट्रातील एकतर्फी शेतकऱ्यांचा केलेला अपमान आम्ही सहन करणार नाही. आपण अभिभाषणामध्ये अशा प्रकारे पुढच्या वर्षाचा आलेख दिलेला आहे. आपण या अभिभाषणात ज्या मुद्यांचा उल्लेख केलेला आहे त्यातील निम्म्यापेक्षा जास्त मुद्यांची सुरुवात आघाडी सरकारनेच केली होती हे आपण विसरु नका. आपण आपली पाठ किती थोपटून घ्यावी ? नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे धोरण आम्हीच आणले होते, नयनासारखी स्मार्ट सिटी वसवण्याचे आमच्याच सरकारने योजले होते. सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांनी या ठिकाणी शौचालयाच्या योजनेचा उल्लेख केला आहे परंतु शौचालयाची योजना काय या वर्षीच सुरु झाली ? अंगणवाडी इमारतीच्या संदर्भात या अभिभाषणात सांगण्यात आले आहे की, तीन महिन्याच्या कालखंडात आम्ही अल्पसंख्याक समाजासाठी जिल्हावार 16 वसतिगृहे बांधली आहेत. तीन महिन्यात 16 वसतिगृहे बांधणे शक्य आहे काय ? ही वसतिगृहे आपण भाडयाने घेतली आहेत. जिल्हा नियतव्ययाच्या निधीला तुम्ही 40 टक्के कपात लावत आहात. 60 टक्क्यापेक्षा जास्त निधी अजून दिलेला नाही. मार्च महिना आला की, निधी दिला जातो व तो निधी मार्च महिन्यात खर्च होत नसल्यामुळे निधी परत जातो असे तुम्ही 15 वर्ष सांगत आला आहात मग आता तुम्ही गप्प का ? जिल्हा नियोजन मंडळाचा वार्षिक निधी वाढविण्याचे काम आम्ही केले आहे. सन 2009-2010 मध्ये मी जेव्हा राज्याच्या अर्थमंत्री पदाची सूत्रे हाती घेतली होती त्याच्या अगोदर 2400 कोटी रुपयांचा जिल्हा वार्षिक निधी दिला जात होता तो आम्ही 4000 कोटी केला. एका एका जिल्हयासाठी 200-200, 400-400 कोटी रुपयांचा निधी आम्ही दिलेला आहे. तुम्ही फक्त मागच्या सरकारने कर्जाचा डोंगर केला एवढेच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे .....

सांगत आहात. आम्ही माननीय खडसे साहेबांची आणि रावते साहेबांची भाषणे ऐकलेली आहेत. माननीय मंत्री श्री.बापटसाहेब आता सांगत आहेत की, जिल्हा वार्षिक निधीचा 40 टक्के निधी मार्च महिन्यात देऊ. आपण मार्च महिन्यात निधी दिला तर तो निधी खर्च कधी होणार ? हा निधी लॅप्सच होणार ? आम्ही सुध्दा या प्रक्रियेमधून गेलेलो आहोत. या अभिभाषणातील 90 टक्के मुद्दे जुनेच आहेत. अभिभाषणात म्हटले आहे की, 65 गोदामांची कामे पूर्ण झाली आहेत. 100 दिवसात 65 गोदामे बांधून होऊ शकतात काय ? याचा अर्थ असा आहे की, हा सगळा ई टेंडरींगचा परिणाम आहे. खडसे साहेब नाकर्त्यापणाला सुध्दा काही मर्यादा असाव्या लागतात. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या वेळी माननीय खडसे साहेबांनी उपस्थित रहावे अशी आमची अपेक्षा होती. या ठिकाणी माननीय श्री. बबनराव लोणीकर या ठिकाणी शरीरानेच बसले आहेत. माननीय सदस्य अर्जुन केतकर खालच्या सभागृहात बोलल्या प्रमाणे यांना सुध्दा त्यांच्या मतदार संघात जाता येत नाही. त्यामुळे तोंड दाबून बुक्क्याचा मार अशी अवस्था झाल्यामुळेच लोणीकर साहेब या ठिकाणी बसले आहेत. सभागृहासाठी मंत्र्यांचे रोस्टर असते. आमच्या वेळेस माजी मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील सभागृहात मंत्र्यांनी केव्हा उपस्थित राहावे यासंदर्भात रोस्टर तयार करीत असत. या वेळी माननीय मंत्री श्री. बापट साहेब रोस्टर लिहीत असतील. माननीय मंत्री श्री. बापट साहेबांचे अन्य मंत्री महोदय ऐकत असते तर गेल्या तीन दिवसात कॅबिनेट मंत्री नसल्यामुळे हे सभागृह तीन वेळा बंद पडले नसते. खरे म्हणजे या शासनाचा हा हा तीन दिवसातील विक्रम आहे.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीष बापट यांचे कोण ऐकते ? माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते आपण त्यांचे ऐकण्याचे काही कारण नाही कारण आपण स्वतंत्र आहात.

सभापती महोदय, अशा अनेक गोष्टींचा परामर्श सर्वजण घेत असताना एका गोष्टीवर विचार करण्याची आवश्यकता आहे. सरकारने कर्ज घेतल्यानंतर त्याचा काहीना काही उपयोग होऊ शकतो. गुजरात राज्यापेक्षा आपल्या राज्याची कर्ज घेण्याची वित्तीय मर्यादा जास्त आहे. आपली इच्छा शक्ती संपूर्ण मेली आहे असे आपण येथे सांगत आहात. आपणास शेतकऱ्यांना मदत करायची नाही. कर्ज घेण्याची पत आणि क्षमता आघाडी सरकारने टिकवून ठेवली होती याचा अभिमानाने उल्लेख मी या निमित्ताने करतो. सरकारने नाकर्तेपणा किती दाखवावयाचा ? आम्ही शेतकऱ्याचे तारणकर्ते आहोत, हितकर्ते आहोत, आम्ही सरकारमध्ये आल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहेत अशा तऱ्हेचा आभास निर्माण करण्यात आला. राज्याचा अर्थसंकल्प मांडल्यानंतर या सर्व गोष्टी समजतील. सरकार एलबीटीबाबत काय निर्णय घेणार आहे ते समजेल.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर उपस्थित आहेत. या सरकारने धनगर समाजाला आरक्षण देण्यात येईल अशा मोठमोठ्या घोषणा केल्या होत्या. श्री.महादेव जानकर यांना विधानपरिषदेत उमेदवारी दिली म्हणजे झाले असे माननीय मंत्री. श्री.दिवाकर रावते म्हणत आहेत. श्री.जानकर साहेब आपल्या आयुष्यातील यासारखी दुसरी अवहेलना असू शकत नाही. आपणास येथे बसविले म्हणजे आरक्षण दिले असे माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते सांगत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांची "सहन होत नाही आणि सांगताही येत नाही" अशी अवस्था झाली आहे. (अडथळा) आपण नंतर बोलावे आपणास बोलण्याची संधी आहे. मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरच बोलत आहे. अभिभाषणामध्ये आरक्षणाचा विषय नाही हेच मला सांगायचे आहे. आपण त्या समाजाची किती दिशाभूल करणार आहात हे मला कळत नाही. आपण कबूल केले हे बरे झाले.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय अटलजी वाजपेयी यांनी पंढरपूर येथे धनगर आणि ओबीसी समाजाला आरक्षण देण्याचा शब्द दिला होता. परंतु त्यावेळी देखील हा प्रश्न सुटला नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय श्री.अटलजी वाजपेयी यांचा उल्लेख झाला म्हणून सांगतो, माननीय श्री.अटलजी वाजपेयी यांनी शब्द दिला होता आणि राज्य सरकारकडून शिफारस मागवावी असे ठरले होते. त्यावेळी सरकार आपले होते आणि आपण तशी कार्यवाही केली नाही. मंत्रिमंडळातील विषयांवर बाहेर चर्चा करता येत नाही. परंतु मी याठिकाणी सांगू इच्छितो की, मंत्रिमंडळाच्या बैठकीत आरक्षण देण्याच्या मुद्यावर सविस्तर चर्चा झालेली आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय अटलजींचा विषय काढला पण ते त्यावेळी लहान होते. काहीही झाले तरी धनगर समाजाला आरक्षण देण्याचे दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही. सर्व आश्वासने तीन महिन्यात पूर्ण का झाली नाही असे आपण विचाराल. आपण थोडे थांबावे, आम्ही आश्वासने पूर्ण करणार आहोत. जोपर्यंत त्यांचा आमच्यावर विश्वास आहे तोपर्यंत चिंता करु नका.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण लोकांची फसवणूक करा पण स्वतःच्या मनाला फसवू नका. नागपूरच्या अधिवेशनात या विषयावरील लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. त्यावेळी आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णू सवरा यांनी स्पष्टपणे भूमिका मांडली होती की, "धनगर समाजाला आरक्षण दिले जाणार नाही." हे सर्व रेकॉर्डवर आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जे सांगितले ती गोष्ट खरी आहे. माननीय आदिवासी मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही आदिवासींमधील आरक्षण देणार नाही. त्यावेळी मी उठून सांगितले की, आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला तिसऱ्या सूचीमध्ये समाविष्ट करून धनगर समाजाला आरक्षण देणार. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे हे पुढची वाक्य बोलणार तोच सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर उभे राहिले. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना असे सांगायचे होते की, आदिवासींमधील आरक्षण देणार नाही असे आदिवासी मंत्री महोदयांनी सांगितले पण श्री.एकनाथराव खडसे असे असे बोलले होते. पण त्यांना आपण मध्येच अडविले, हे बरोबर नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी अजून ट्रेनिंग घ्यावे. आपण इतरांना फसवू शकाल, पण स्वतःच्या मनाला फसवू शकणार नाही. माझे हे वाक्य यासाठी होते की, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे नंतर असे असे बोलले. परंतु त्यांना माहीत होते की, असे आरक्षण देता येत नाही. कारण आदिवासी मंत्री महोदयांनी तशी कबुली दिलेली आहे. तिसरी सूची करण्याचा अधिकार राज्य सरकारला नाही. दिल्लीमध्ये आपल्या पक्षाचे सरकार आहे हे आम्ही नाकारत नाही. आपणास घटनात्मक बदल करून घ्यावा लागेल. भूमी विधेयक मंजूर करताना केंद्र सरकारची काय अवस्था झाली हे सर्वांना माहीत आहे. आपण घटनात्मक बदल करताना आपल्या पक्षातील आदिवासी खासदार काय बोलतील त्याबाबत मला भाष्य करायचे नाही. आमची ती भूमिका नाही. या ठिकाणी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी खाली बसून सांगितले की, श्री.महादेव जानकर यांना विधानपरिषदेत आणले म्हणजे त्यांना आरक्षण दिले. आपण या प्रश्नाबाबत नेमकी कोणती भूमिका घेणार आहात हे स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मुस्लिम समाजाच्या आरक्षणा विषयी उल्लेख नाही. गरीब मुस्लिमांना पाच टक्के आरक्षण देण्याचा निर्णय आमच्या आघाडी सरकारने घेतला होता. न्यायालयाने हा निर्णय मान्य केला. परंतु नोकरीत आरक्षण देण्याचा निर्णय मान्य केला नाही. आपण मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्याचे आम्ही स्वागत केले. त्यावेळी आम्ही मुस्लिमांना आरक्षण देण्याचा विषय सुद्धा विधेयकामध्ये समाविष्ट करावा अशी भूमिका मांडली. आता आपण सांगत आहात की, तो अध्यादेश रद्द होणार आहे. समाजा समाजामध्ये, धर्मा धर्मामध्ये दरी निर्माण केल्याखेरीज आपल्याला आपली राजकीय पोळी भाजता येत नाही. हा विषय नजरेसमोर ठेवून आपण काम करण्याचा प्रयत्न करता त्यावेळी या ना त्या माध्यमातून अशी गोष्ट घडत असते.

सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 4 हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, 70 टक्के रक्कम जमा झाली. पण त्यांनी पुढे जे सांगितले त्याकडे आपण कानाडोळा केला. शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली रक्कम त्यांच्या कर्जखात्यावर जमा केली जात आहे. हे सर्व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले आहे. मी या विषयावर येईन त्यावेळी बोलेन.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

काल सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, हा सर्व पैसा राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यामध्ये जमा करीत आहेत. या गोष्टीला वेळीच आळा घाला, असेही त्यांनी सांगितले. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कृषी विमा योजनेचा उल्लेख करून, या राज्य सरकारने स्वत:ची पाठ थोपटून घेतली आहे. जसे काही आपल्याच कालावधीत पीक विमा उतरविण्यात आला. काल सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, कृषी विमा योजनेंतर्गत.....सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर जे बोलले त्याला ते जबाबदार आहेत. त्यांना मंत्रिमंडळात घेतले नाही तर नाही. ते बेजबाबदारीने बोलत आहेत काय ? मला काही कळतच नाही. माननीय श्री.खडसे साहेब, आपण सांगितले की, सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे. पण तुमच्या पक्षाचे वरिष्ठ नेते, ज्यांना तुम्ही मंत्री पदापासून वंचित ठेवले, ज्यांना विरोधी पक्ष नेते पदावरून तुम्ही काढून टाकले, त्यांच्या शब्दावर तुमचा विश्वास नाही तर महाराष्ट्रातील कोणाच्या शब्दावर तुम्ही विश्वास ठेवून काम करणार आहात ? तुम्ही जे बोलला तेच मी सांगितले. माननीय मंत्री श्री.खडसे साहेब, याचा अर्थ असा आहे की, ग्राम पातळीवर काय सुरु आहे, याची तुम्हाला कल्पना नाही. त्यांनी असेही सांगितले की, सरकारी यंत्रणा अजूनही दुसऱ्याच विश्वात असल्यासारखे काम करीत आहे. मी सांगू इच्छितो की, ज्याची मांड घोड्यावर पक्की बसते त्यालाच घोडेस्वार म्हटले जाते. तुम्ही नवीन नाहीत. आपण पाच वर्षे सरकारमध्ये काम केलेले आहे.

सभापती महोदय, आज माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी बऱ्याच गोष्टी कबूल केल्या आहेत. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी सुध्दा काही गोष्टी कबूल केल्या आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सर्व जुन्या योजना आहेत असे त्यांनी कबूल केले. वार्षिक योजनेच्या बाबतीत सुध्दा त्यांनी कबूल केले. माननीय श्री.एकनाथराव खडसे मघाशी जे बोलले ते एकनाथ खडसेंबद्दल बोलले नाही, ते माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल बोलले. पण ते जे बोलले ते बरोबर बोलले. कालही त्यांनी मला ओबामांना भेटण्यासाठी जायचे नाही असे म्हटले. माननीय श्री.खडसे साहेब, आपण या सभागृहाचे नेते आहात. तुम्ही ज्यावेळी कार्तिकी एकादशीच्या पूजेला गेला तेव्हा तुम्ही तुमच्या मनातील भावना त्या ठिकाणी व्यक्त

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

केल्या आहेत. पंढरीच्या विठ्ठलाच्या ठिकाणी तुम्ही आपली भावना व्यक्त केली. आज सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आपल्या भाषणाची सुरुवात विठ्ठलाच्या नावाने केली. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, आपल्या भावना आम्ही टी.व्ही.वर ऐकल्या. आम्ही पंढरपूरला आपल्या भावना ऐकण्यासाठी नव्हतो. आपण पंढरपूरला शासकीय पूजा करण्यासाठी गेला होता. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर, तुम्ही मुख्यमंत्री न झाल्यानंतर तेथे गेला होता. या निमित्ताने मी सांगतो की, सरकार चालवित असताना ते एकीचे सरकार आहे या दृष्टिकोनातून चालविले पाहिजे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या. परंतु यावेळी तुम्ही सत्तेत आला.

सभापती महोदय, माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, तुमच्या खात्याचे राज्यमंत्री सभागृहात येत नाहीत. तुम्हाला तुमच्या विभागाच्या राज्यमंत्र्यांचे नाव माहीत नाही काय ? नव्या नवरीचे लग्न झाल्यानंतर नाव घ्या, नाव घ्या, असे म्हणतो. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, आपल्या विभागाचे राज्यमंत्री कोण आहेत त्यांचे नाव घ्या, नाव घ्या.

श्री.एकनाथराव खडसे : माझ्या खात्याच्या राज्यमंत्र्यांचे नाव माननीय श्री.संजय राठोड आहे. ते या ठिकाणी आले होते. तुम्हाला काय वाटले मी नाव घ्यायला बाईसारखा लाजणार आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री.संजय राठोड असे म्हणतात की, त्यांना कसलेच अधिकार दिलेले नाहीत. महोदय, मला माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांना मानलेच पाहिजे. ते माननीय मुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांच्या निम्म्या खात्यांचा कारभार त्यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे मी परवाच ऐकले आहे. माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील खाली बसून मला उद्देशून सांगत आहेत की, मी जे वक्तव्य केले आहे ते कामकाजातून काढून टाकावे. वास्तविक पाहता मी माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांचे कौतुक करीत होतो. माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे एकाच वेळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्या विश्वासातील आहेत, असे मी म्हटले होते. परंतु हेच वाक्य ते कामकाजातून काढून टाकण्यास सांगत आहेत. एका ध्रुवावर असलेले माननीय मुख्यमंत्री आणि दुसऱ्या ध्रुवावर असलेले माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचा दुवा माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील आहेत असे मी म्हटले होते. त्यांच्या बाबतीत मी आदराने आणि प्रेमाने बोललो असताना सुध्दा ते सदरहू वाक्य कामकाजातून काढून टाकण्यास सांगत आहेत. हे वाक्य काढायचे असेल तर काढा त्याला माझी हरकत नाही. माननीय मंत्री श्री.खडसे साहेब हे त्यांच्या मनातील सल नेहमी बोलतात.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे विरोधी पक्ष नेते असताना त्यांनी अनेकदा सन्माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांना अगोदर बोलण्याची संधी दिली म्हणून ते मुख्यमंत्री झाले असे तेच सांगतात. आपण सुध्दा हे मान्य करीत आहात. मी तर म्हणेन की, माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांनी खाली जावून माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी खाली बसून काय वक्तव्य केले हे माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अगोदर मी बोलावे असे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनीच मला सांगितले. मी निदर्शनास आणून देतो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी अनेकदा असे घडलेले आहे की, माननीय विरोधी पक्षनेत्यांएवेजी अन्य सदस्यांनी चर्चेला सुरुवात केली. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेची सुरुवात माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या अगोदर माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी अनेकदा केल्याचे आम्ही बघितले आहे. या चर्चेवर माननीय विरोधी पक्ष नेते सुध्दा बोलणारच आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे माझ्याकडे बघत आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांच्यासारखा हाडाचा शिवसैनिक माझ्यासारख्या कार्यकत्याने अनेक वेळा पाहिला आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर, आपण खाली बसून बोलू नका. आपण कोकणातील आहात हे विसरलात काय ? तुमचे गाव त्यांना माहीत नसेल, पण मला माहीत आहे. असो.

महोदय, स्व.गोपीनाथ मुंडे यांचे स्मारक उभारण्याबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात केल्याबद्दल मला शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. कोणताही पक्ष सत्तेवर आल्यानंतर, ज्या नेत्याच्या जडणघडणीतून पक्ष उभा राहतो, त्या नेत्याच्या दुर्दैवी निधनानंतर त्याचे यथोचित स्मारक उभे करणे हे त्या पक्षाच्या कार्यकर्त्याचे, नेत्याचे सरकारमध्ये आल्यानंतरचे कर्तव्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे. मी सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना विचारतो की, तुमच्यातील अंगार कुठे गेला

श्री.सुनील तटकरे....

आहे ? त्याचा उपयोग शून्य आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा थोडाही उल्लेख नाही. मग तुम्ही कशाला सत्तेत राहता ? बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे तुम्ही सत्ता बघितली. रस्त्यावर फिरणाऱ्या, हॉटेलमध्ये काम करणाऱ्या माणसाला बाळासाहेबांनी नगरसेवक केले, आमदार केले, खासदार केले. परंतु त्यांच्या स्मारकाचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नाही, याचे तुम्हाला काहीच वाटत नाही काय ? मी सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना सांगू इच्छितो की, शिवसेनेची पत सरकारमध्ये नाही. शिवसेना पक्षाला कोणी विचारत नाही. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते येथून निघून गेले. त्यांनी कबूल केले की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात 27 ठिकाणी इंग्रजी शब्दांचा उल्लेख आहे. या बाबी कबूल करुन ते येथून निघून गेले, हा चिंतेचा विषय नाही. पण हा प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. काँग्रेसवाल्यांनो माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे खाली बसून जे काही बोलले त्यावर हसू नका. जर आम्हाला सत्तेत जायचे होते तर आम्ही 1999 मध्ये ज्यावेळी तुमच्या विरोधात लढलो त्याच वेळी केंद्रात माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्यासोबत गेलो असतो आणि राज्यात सुध्दा गोपीनाथ मुंडे यांना सोबत घेऊन आम्ही सरकार बनविले असते.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

आम्ही शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारसरणीशी आयुष्यात कधीही तडजोड केली नाही. तुम्ही चिंता करू नका. तुम्हाला ती जागा कधी भरून काढता येणार नाही. मी आता माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब बोलले त्याला धरूनच पुढचे वाक्य बोलतो. ते तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाबद्दल या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही असे मी म्हणालो. त्यावर ते म्हणाले की, प्रफुल्ल पटेल आहेत, आम्हाला चिंता नाही. असे ते बोलले आहेत. आपण ऐकले असेलच. तुमची सोडाच पण बाळासाहेब ठाकरे यांची देखील त्यांनी काय अवस्था केली ते तुम्ही ऐकले का ? त्याचा अर्थ असा आहे की, मी त्याच विषयावर होतो. मी चुकीचे कधी बोलत नाही. मी सुध्दा सभागृहात 25 वर्षे काम करतो. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब माझ्या वक्तव्यावर प्रफुल्ल पटेल यांच्या संदर्भात बोलले तेव्हा ते ऐकून सर्वांना गुदगुल्या झाल्या. गुदगुल्या काही दोन मिनिटांकरिता होणार, मला त्याबद्दल काही वाईट वाटण्याचे कारण नाही. ठीक आहे. सन्माननीय सदस्यांना बाके वाजविण्यासाठी मजा आली. सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी त्यांच्या तोंडावर हात ठेवला आहे, याचा अर्थ, तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे, यापेक्षा दुसरे कारण काय असू शकते ? बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक असा नव्हता. उध्दव ठाकरे यांना शिवालयात येऊन तुम्हाला आदेश द्यावे लागतात, या शिवाय शिवसैनिकांच्या आयुष्यातील दुर्दैव कोणते असू शकते ?

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, शिवसेना पक्ष कसा चालवायचा, त्या बाबतीत काय करायचे या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांच्याकडून आम्हाला मार्गदर्शन घेण्याची काही गरज नाही. त्यासाठी आमचा पक्ष सक्षम आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख नाही, त्यांच्या संदर्भात काय करायचे, या बाबतीतील निर्णय पक्ष घेईल. आम्हाला त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांकडून मार्गदर्शन नको. आमचे वरिष्ठ नेते त्या संदर्भात काय करायचे ते ठरवतील. मी किती आक्रमक व्हावे या संदर्भातील मार्गदर्शन सन्माननीय सदस्यांकडून आम्हाला नको. मला मार्गदर्शन करण्यासाठी माझे नेते बसले आहेत. बाळासाहेब ठाकरे यांनी मला जी शिकवण दिली आहे त्यानुसार मला जर कुठे आक्रमकपणा दाखवायचा असेल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. अनिल परब ....

तर योग्य वेळी मी तो दाखवीन. कृपया सन्माननीय सदस्यांच्या मार्गदर्शनाची मला गरज नाही, एवढेच तूर्तास मी सांगतो. सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलावे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी अगदी बरोबर उत्तर दिले आहे. माझ्या वाक्यावर त्यांनी उत्तर दिले आहे. मी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरच बोलत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा उल्लेख नाही यावर मी बोलत आहे. मी अभिभाषणाच्या बाहेर गेलेलोच नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आमच्या मार्गदर्शनाची गरज नाही, हे आम्हाला मान्य आहे. आम्ही आपल्याला मार्गदर्शन करणारच नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, शिवसैनिक कसा असावा, कसा नसावा, कसा होता हे सन्माननीय सदस्य सांगत आहेत. त्यामुळे मी सांगितले की, मी शिवसैनिक आहे, मी कसा आहे हे मला माहीत आहे, माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांना माहीत आहे. आमचा इतके वर्षे संबंध आहे. मी कसे वागावे, कसे रहावे, हा विषय येत नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचा आभारी आहे. मी माझे सर्व शब्द मागे घेतो. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा उल्लेख नसल्याबद्दल आपण ज्या प्रतिक्रिया दिल्या आहेत, त्याबद्दल तुमचे शतशः आभार.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा त्याच्याशी काय संबंध आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा या बाबीशी संबंध येणार नाही तर मग कोणाचा संबंध येणार ? ते शिवसैनिक आहेत. सन्माननीय सदस्यांनी ज्या प्रतिक्रिया दिल्या याचा अर्थ बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा अभिभाषणात उल्लेख नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा अभिभाषणामध्ये उल्लेख नाही हे ठरविणारे आपण कोण आहात ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांचा उल्लेख केला आहे आणि त्यांनी सांगितले सुध्दा आहे की, त्यांनी त्यांना शिकवण दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी स्मारकाचा उल्लेख केलेला नाही. नको ते शब्द त्यांच्या मुखात घालण्याचा प्रयत्न होत आहे, विषय संपवा. सन्माननीय सदस्यांनी फार सुंदर भाषण केले आहे. आतापर्यंत एक तास झाला आहे. मला चिंता याची वाटते की, मी कोणत्या मुद्याच्या संदर्भात उत्तर देऊ. कारण सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये एकही मुद्दा उत्तर देण्यासारखा नाही. मी येथे नोंद ठेवण्यासाठी बसलो आहे. तासभराच्या भाषणामध्ये एक सुध्दा असा मुद्दा आला नाही की, ज्याचे मला उत्तर द्यावेसे वाटेल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हे महत्त्वाचे नाही का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हे महत्वाचे नाही.

(गोंधळ)

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण एकमेकांमध्ये बोलू नये.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आमच्या दृष्टीने हे महत्त्वाचे नाही. त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असेल तर आम्हाला आनंद वाटेल. आम्ही महत्त्वाच्या गोष्टी करीत आहोत. आपण त्यांची चिंता करू नये. आपण आम्ही काय करायचे या संदर्भातील चिंता करू नका. आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलावे. मी नोंद घेत आहे. आपण फार सुंदर भाषण करीत आहात, चांगले बोलत आहात. आपण सरकारबद्दल बोला. तुमचे भाषण नोंद न घेण्यासारखे व्हावे ही बाब काही ठीक नाही. मला याच खेद वाटेल. आपण चांगले भाषण करीत आहात. परंतु भाषणातील मुद्दे तरी चांगले असले पाहिजेत.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण एकमेकांमध्ये बोलू नये. सन्माननीय सदस्यांनी भाषण सुरू करावे आणि लवकर संपवावे. अनेक सन्माननीय सदस्यांनी भाषण करण्यासाठी नावे दिली आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माझ्या भाषणात कोणतेही महत्त्वाचे मुद्दे दिसत नाही. माणूस न्यूनगंडाने असे बोलतो. मी सांगितले की, माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये इंग्रजी भाषा वापरली आहे. आमच्या सरकारच्या 90 टक्के योजना या अभिभाषणामध्ये आहेत. अभिभाषणामध्ये अवकाळी पावसाचा, गारपिटीचा उल्लेख नाही. मी हे देखील संगितले आहे की, अभिभाषणामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा उल्लेख नाही. माझ्या सांगण्यातील कोणते वाक्य अभिभाषणाच्या बाहेरचे आहे ? तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही उत्तर देऊ नका. तुम्हाला करायचेच नाही तर तुमच्याकडून आम्हाला उत्तराची अपेक्षा नाही. सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, या बाबतीत आम्हाला मार्गदर्शनाची गरज नाही. याचा अर्थ असा की, बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल आम्ही ज्या भावना मांडल्या त्या त्यांना मान्य नाहीत. एवढेच मी बोललो.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, विषय दुसरीकडे नेला जात आहे. उध्दव ठाकरे यांना येथे येऊन मार्गदर्शन करावे लागते, असे सन्माननीय सदस्य म्हणाले. आम्हाला ते मार्गदर्शन करतील. आम्हाला तुमच्या मार्गदर्शनाची गरज नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, त्यांच्या पक्षाचे नेते त्यांना मार्गदर्शन करतील. आमचे ते कसे ऐकतील. तुमचे ऐकत नाहीत तर ते आमचे कसे ऐकतील.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, तुमचे का ऐकतील ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य तुमचे सुध्दा ऐकत नाहीत, त्यांनी ऐकले असते तर एवढे झाले नसते.

ॲड अनिल परब : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब या सभागृहाचे नेते आहेत, माझ्या जवळचे आहेत. ते जे सांगतील ते मी ऐकणार आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, तसे होते. ते इतके आज्ञाधारक आहेत की प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठीही ते आले नाहीत. तुम्हालाच असले आज्ञाधारक लखलाभ होवोत. आम्हाला त्याची चिंता असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी अभिभाषणामध्ये भावना व्यक्त केल्या आहेत आणि पुढील 1 वर्षात दिशा देण्यासंबंधी सांगितले आहे. सभापती महोदय, हे दिशाहीन सरकार आहे,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

सरकारमध्ये एकवाक्यता नाही. शिवसेना पक्ष विरोधी पक्षात आहे की सरकारमध्ये आहे हेही कळत नाही. आमच्या भूमिकेत तडजोड हा विषय नाही. आमचा विचार स्पष्ट आहे. आमच्या भूमिकेत शाहू, फुले, आंबेडकर यांचा विचार आहे आणि त्यामध्ये बदल असण्याचे काही कारण नाही. नवीन आलेल्या सरकारला इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान मिळाले आहे आणि त्यामुळे त्या सरकारकडून जनतेच्या काही अपेक्षा होत्या. परंतु जतनेच्या अपेक्षांचे कोणतेही प्रतिबिंब अभिभाषणात नसल्यामुळे मी या संदर्भात खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : नागरी नूतनीकरण योजना

मु.शी. : नागरी नूतनीकरण योजना संबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो. :-

(**प्रेस**: येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....)

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्यापूर्वी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.सुनील तटकरे बोलले. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून सरकारमध्ये जी एकी दिसावयास हवी होती, ती आम्हाला दिसली नाही, याबद्दल मला खेद वाटतो.

सभापती महोदय, मी फक्त सहा मुद्यांवर बोलणार आहे. मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, राज्याच्या मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी म्हणजेच सर्व मंत्री महोदयांनी राज्यपाल महोदयांसमोर गुप्ततेची शपथ घेतलेली आहे व त्या अनुषंगाने त्यांच्यावर काही बंधने आहेत. परंतु, आपल्याला असे बघावयास मिळत आहे की, राज्य मंत्रिमंडळातील काही मंत्री राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांवर आणि काही मंत्री महोदयांवर जाहीररित्या टीका करीत आहेत. राज्याची धोरणे मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर होण्यापूर्वीच मीडियामध्ये त्याबाबतची वक्तव्ये केली जात आहेत, हे घटनाविरोधी आहे. कारण, निर्णयाधीन असलेल्या धोरणांबाबत गोपनीयता पाळण्याचे बंधन घटनेनुसार मंत्री महोदयांवर आहे. त्यामुळे अशा प्रकारे जे गोपनीय माहिती मीडियासमोर उघड करीत असतील त्यांच्याविरुध्द राज्यपाल महोदयांनी ॲक्शन घेतली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरी बाब ही आहे की, राज्यघटनेमध्ये 'मंत्री' आणि 'राज्यमंत्री' असा कोठेही उल्लेख नाही. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी जे सांगितले ते बरोबर आहे, ते घटनेप्रमाणे बोलत आहेत. मंत्री आणि राज्यमंत्री यांच्यामधील कामाच्या वाटपाबाबतचा उल्लेख घटनेमध्ये नाही. सन 1995 पर्यंत या राज्यामध्ये अशा प्रकारे कधीही कामाचे वाटप करण्यात आले नव्हते. सन 1995 मध्ये ज्यावेळी युतीचे शासन आले त्यावेळी मंत्री महोदयांचे वेगळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

अधिकार, राज्यमंत्री महोदयांचे वेगळे अधिकार, अशा प्रकारे कामाचे वाटत करण्यात आले. मला असे वाटते की, जर राज्यमंत्री म्हणून काम करणारी व्यक्ती स्वतः कर्तृत्ववान असेल तर तो कोणतेही काम करुन घेऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे सुध्दा सुरुवातीला राज्यमंत्री होते. राज्यमंत्र्यांना सर्व अधिकार असतात. या राज्याचे माजी मुख्यमंत्री माननीय श्री.अ.र.अंतुले यांचा सन 1969 मध्ये राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाला होता. रायगड जिल्ह्यामध्ये त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व होते. परंतु, राज्यमंत्री म्हणून अंतुले साहेबांनी आम्हाला सळो की पळो करुन सोडले होते. मी त्यावेळी लहान होतो. मला असे सांगावयाचे आहे की, राज्यमंत्र्यांनाही सर्व अधिकार असतात. विभागाची प्रत्येक फाईल राज्यमंत्र्यांमार्फतच पुढे जात असते. कोणतीही फाईल राज्यमंत्र्यांना वगळून पुढे जात नाही. त्यामुळे अशा प्रकारचे मंत्रिमंडळातील वाद कोठे तरी थांबले पाहिजेत.

सभापती महोदय, माझ्या बरोबर मी घटनेची प्रत आणली आहे आणि त्याचा मी अभ्यास देखील केलेला आहे. या राज्यातील कोणतेही आमदार भेटावयास गेल्यानंतर मुख्यमंत्री महोदय त्यांना भेटतात. मी फार कमी वेळा मंत्री महोदयांना किंवा मुख्यमंत्री महोदयांना भेटावयास जातो आणि त्यामुळे मंत्रालयात देखील कमी वेळा जातो. परंतु, ज्या ज्या वेळी मी मुख्यमंत्री महोदयांना भेटावयास गेलो त्या त्या वेळी अपॉईंटमेंट न घेता गेलो असलो तरी मुख्यमंत्री महोदय त्यांचे नियमित कामकाज बाजूला सारुन मला पाच मिनिटे तरी भेटले आहेत. परंतु, राज्याचे एक मंत्री महोदय असे म्हणतात की, मुख्यमंत्री महोदय भेटत नाहीत आणि कामेही करीत नाहीत. हे बरोबर आहे का ? या राज्याचे एक राज्यमंत्री महोदय तर थेट मुख्यमंत्री महोदयांवर आणि अन्य मंत्री महोदयांवर आरोप करतात. ही बाब अतिशय गंभीर आहे. प्रशासकीय यंत्रणेमध्ये प्रशासन कसे एकत्र राहील, याबाबतचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये दिसून येत नाही, याचा मला खेद होतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांच्या शैलीत अतिशय चांगले भाषण केले. पण त्यापुढे जाऊन अधिक स्पष्टपणे मी हे सांगू इच्छितो की, एक वेगळ्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

प्रकारचे प्रशासन आम्हाला बघावयास मिळत आहे. सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचे मी अभिनंदन करीन. कारण, त्यांनी कबूल केले. कबूल करण्यामध्ये देखील मोठेपणा आहे. त्यांनी हे कबूल केले की, हे तुमचेच प्रकल्प आहेत आणि तुमच्याच योजना आहेत. मी सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे आणि सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांच्यानंतर 5 वर्षांनी या सभागृहात आलो आहे. परंतु, मला वाटते, एक वेगळे सत्तास्थान निर्माण झाल्यासारखे दिसत आहे आणि ते म्हणजे सत्ताधारी विरोधी पक्ष. त्या पक्षाचे नेते कोण आहेत हे मला माहीत नाही. परंतु, एक सत्ताधारी विरोधी पक्ष तयार झालेला आहे. ही बाब आपल्या राज्याला भूषणावह नाही. सत्तेत असताना काही निर्णय तुम्हाला पटले नसतील तर तुम्ही बाजूला व्हा. तशा प्रकारची भूमिका तुम्ही घेतली पाहिजे. परंतु, सत्तेतही राहणार आणि हा निर्णय बरोबर नाही, असेही म्हणणार, हे बरोबर नाही. पोलिटिकली तुम्ही काहीही बोलू शकता. परंतु, प्रशासनाच्या बाबतीत घटनेनुसार तुमच्यावर काही बंधने आहेत. सभागृहात सन्माननीय सदस्यांनी कसे वागले पाहिजे, किंबहुना, येथे सभागृहात किंवा गॅलरीमध्ये कोणी कसे बसले पाहिजे, कशा प्रकारे सभागृहाचा अपमान होऊ शकतो येथपासून सर्व बाबींचे मार्गदर्शन घटनेने आपल्याला केलेले आहे. परंतु, मंत्रिमंडळातील मंत्री महोदय वाटेल तसे बोलावयास लागले तर ती वेगळ्या प्रकारची भूमिका दिसून येते. त्यामुळे मला असे वाटते की, हा जो सत्ताधारी विरोधी पक्ष आहे त्याच्यावर काही तरी बंधन आणले पाहिजे. वेगळ्या पध्दतीची जी भूमिका घेतली जात आहे, ती चुकीची आहे. या विषयावर मी आणखी तासभर बोलू शकतो. परंतु, मला काय बोलावयाचे आहे, ते सभागृहाला कळले आहे. हे कोठे तरी थांबले पाहिजे, एवढीच माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आपले स्थान सर्वोच्च आहे. आपण त्या स्थानावरून दिलेले आदेश आम्ही नेहमी पाळतो. आमच्या कडून काही चुकले असेल तर आम्ही दिलगिरी देखील व्यक्त करतो. या राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांचे देखील एक वेगळे स्थान आहे. मुख्यमंत्री महोदयांबद्दल आमदार किंवा जनतेला देखील आदरानेच बोलावे लागेल. परंतु, जे शासनाचे घटक आहेत, तेच जर

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

मुख्यमंत्री महोदयांविरुध्द बोलावयास लागले तर ते बरोबर नाही. यावर कोठे तरी बंधने आणावी लागतील. कारण, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावता कामा नये. त्यामुळे या सर्व परिस्थितीत बदल झाला पाहिजे, काही तरी सुधारणा झाली पाहिजे. तशा प्रकारचा कोणताही उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, त्यांनी म्हातारीचा उल्लेख इकडे बघून करु नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रिमंडळाचा कारभार गुप्त ठेवावयाचा असतो. कारण, मंत्रिमंडळाच्या बैठकीचा जो अजेंडा मिळतो किंवा मंत्रिमंडळाच्या ज्या टिप्पण्या मंत्री महोदयांना मिळतात त्यावर 'गोपनीय' असे लिहिलेले असते. माझ्या भगिनी श्रीमती मिनाक्षीताई पाटील यांनी सुध्दा राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. स्वत: सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सुध्दा मंत्री म्हणून काम केलेले आहे. सन्माननीय श्रीमती मिनाक्षीताई पाटील यांच्याकडे असलेल्या विभागासाठी केवळ 2 कोटी रुपयांची तरतूद होती. परंतु, दोन वर्षात त्यांनी ही तरतूद 250 ते 300 कोटी रुपयांपर्यंत वाढविली, त्या विभागाचे उत्पन्न एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढविले. सन्माननीय श्री.मोहन पाटील यांनी देखील राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. राज्याचा निधी, शासकीय यंत्रणा आणि विकास यांचा मेळ घालून मंत्री महोदयांनी काम करावयाचे असते. त्याप्रमाणे सर्व अधिकार त्यांना असतात.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

आमदार म्हणून मला देखील काही अधिकार आहेत, मंत्रिमंडळ विधानसभा व विधानपरिषद सभागृहाच्या वतीने काम करीत असून आम्ही देखील त्याचे पार्ट ॲन्ड पार्शल आहोत. त्यामुळे राज्यमंत्री जी वक्तव्ये करतात ती व्यक्तव्ये थांबविली पाहिजेत. माननीय मंत्र्यांनी देखील त्यांची वक्तव्ये थांबविली पाहिजेत. ज्या प्रमाणे मी मुख्यमंत्री यांच्याबाबत बोललो. त्याचप्रमाणे या सभागृहात ज्या सन्माननीय सदस्यांनी 30 ते 40 वर्षे काम केले आहे, त्यांच्याबाबत कोणी काय बोलावे यावर देखील काही बंधने असली पाहिजेत. मी कोणावरही व्यक्तिगत टीका करीत नाही. या सभागृहाचा सदस्य म्हणून मला ही खंत व शल्य वाटते. अशा पध्दतीचा राज्याचा कारभार आणि सभागृहाची उंची अशा प्रकारे कमी होत असेल तर ही बाब कोठे तरी थांबली पाहिजे असे मला वाटते. या दृष्टीकोनातून मला नाइलाजाने हे बालावे लागत आहे.

सभापती महोदय, रेती धोरणाबाबत मी बोलत असताना असे सांगू इच्छितो की, या विषयावर माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्या सोबत अनेक वेळा चर्चा झाली आहे. या राज्यातील रेती माफिया तहसीलदार, पोलीस अधिकारी, तलाठी यांच्यावर गोळीबार करतात, त्यांच्यावर हल्ला करतात, त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर किंवा ट्रक घालतात. हे प्रकार थांबले पाहिजेत. मंत्री महोदय महाराष्ट्रातील जनता आपल्याकडे एका वेगळ्या नजरेने पाहत आहेत. जो गरीब शेतकरी आहे त्याच्या शेताच्या बाजूला अनधिकृतपणे ड्रेझर लावून रेती काढल्यामुळे शेत जमीन खचते. कोकणातील परिस्थिती अत्यंत वेगळी आहे. अनेक ठिकाणची शेती नष्ट होत चालली आहे. यावर अनेक वेळा चर्चा करण्यात आली आहे, या अधिवेशनात पुन्हा संधी मिळाली तर या विषयावर मी चर्चा करीन. ज्याप्रमाणे झोपडपट्टी व एसआरए दादांचा बंदोबस्त एमपीडीए कायद्याने करण्यात आला, तशाच प्रकारचा बंदोबस्त रेती माफियांचा करण्यासाठी एक विशेष कायदा करण्याची गरज आहे. ज्या लोकांनी अनधिकृतरित्या रेती उपसा केला असेल त्यांना कायद्याने अटक करावी. एक ते दोन वर्ष त्या व्यक्तींना जामीन मिळणार नाही हे करणे सरकारला शक्य आहे. असे केले तर महाराष्ट्राची जनता या सरकारला दुवा देईन. ज्या ठिकाणची रेती काढायला पाहिजे तेथील रेती काढली जात नाही. ज्या ठिकाणी गाळ आहे ते ठरविण्याची यंत्रणा पर्यावरण विभागाकडे आहे. रेती माफियांच्या संदर्भातील अनेक घटना मला सांगता येतील. पुरवणी मागण्या किंवा विधेयकावर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

संधी मिळाली तर मी त्यावर आणखी जास्त बोलीन. आता मी जास्त वेळ घेणार नाही, कारण अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. अशा प्रकारचा विशेष कायदा रेती माफियांसाठी केला तर त्याचा निश्चित फायदा होईल.

सभापती महोदय, सरकारकडे निधी नाही. रेती व मातीच्या भरावाची रॉयल्टी काढली जाते. मंत्री महोदयांकडे मी एक अर्ज देतो त्यामध्ये सर्व कंत्राटदारांचे नंबर देतो, त्यांच्या कंत्राटाच्या ऑर्डर देखील देतो. डीपीडीसीच्या बैठकीत एकमताने ठराव झालेला असताना देखील एक रॉयल्टी दहा ठिकाणी वापरली गेली आहे. त्याच रॉयल्टीची पावती सिडको मध्ये वापरली, बांधकाम खात्यात वापरली, रेल्वे व जेएनपीटी येथे देखील वापरण्यात आली आहे. सरकारकडे निधी अपुरा असेल तर रायगड जिल्ह्यातील रॉयल्टीची चौकशी करावी. मी तुम्हाला 5 हजार कोटी रुपयांची रॉयल्टी दंडासह वसूल करुन देण्यास तयार आहे. असे केले नाही तर मी पुन्हा सभागृहात येणार नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात रॉयल्टीची लयलूट तेथे सुरु आहे. रॉयल्टीचे एकच चलन काढून ते दहा ठिकाणी वापरण्यात येते. यामध्ये सर्व अधिकारी गुंतले असल्यामुळे शासन हतबल झाले आहे. हे सर्व प्रकार बंद झाले पाहिजेत, अशी माझी मंत्री महोदयांकडे मागणी आहे. रॉयल्टीचा बंदोबस्त करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील आमदारांना सरकारने बोलवावे, याबाबत चर्चा करुन सरकारला चांगला महसूल मिळेल असे मला वाटते. आज रेती माफिया सरकारचे पैसे लूटून मजा करीत आहेत. रेती माफियांचा बंदोबस्त करण्यासाठी वेगळा कायदा करण्याची गरज आहे. रॉयल्टीचे चलन पुन्हा पुन्हा वापरले तर त्यांना कायद्याने शिक्षा झाली पाहिजे. अशा प्रकारची भीती निर्माण झाली पाहिजे. एखाद्या रेती माफियाला अटक करुन त्याच्यावर गुन्हा दाखल केला तर तो लगेच जामीन घेऊन बाहेर येतो. अटक होण्या अगोदर तो अटक पूर्व जामीन घेतो. हा प्रकार कोठे तरी थांबला पाहिजे.

सभापती महोदय, गोहत्याबंदी राज्यात सुरुवातीपासून आहे, त्यासाठी आमचा विरोध नाही. गोहत्येच्या निमित्ताने ससा मारला, हरीण मारले, आमच्याकडे रानडुक्कर मारले जाते. मुस्लिम समाज डुक्कर खात नाही, आपण लोक खातो. गोहत्त्या बंदीचा अतिरेक करुन कत्तलखाने बंद होत आहेत. असे असेल तर सरसकट मांस खाण्यास बंदी केली पाहिजे. राज्यातील वेगवेगळ्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

समाजातील 15 ते 20 हजार खाटिक परवा आझाद मैदानावर लाल निशान पक्षाचे सचिव श्री.मिलिंद रानडे यांच्या नेतृत्वाखाली जमा झाले होते. त्या ठिकाणी मी स्वतः त्यांना भेटावयास गेलो होतो. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, अत्यंत गरीब घराण्यातील दरिद्री अवस्थेतील लोकांचा व्यवसाय बंद झालेला आहे. परराज्यातून हे सर्व मटेरियल येत असून लोक राजरोसपणे खात आहेत. कोणी काय खावे व काय खायचे नाही, यावर कोणालाही बंधन घालता येत नाही...(अडथळा)...

सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्या लोकांना मी घेऊन येतो. हैद्राबाद व कर्नाटक येथून हे लोक येतात. येथील लोकांना हा व्यवसाय करण्यासाठी सरकारने बंदी घालू नये. परराज्यातून हे लोक येतात व आपल्याकडे त्या कामासाठी बंदी घातली जात असेल तर ते योग्य नाही.

सभापती महोदय, विधानसभा सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा हे असे सांगतात की, दक्षिण मुंबईत मांसाहाराचे एकही दुकान चालणार नाही, असे ते जाहीरपणे सांगतात. मी सकाळी उठल्यापासून भाकरी बरोबर सुकट खाणारा माणूस आहे. याबाबत स्पष्ट भूमिका राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात मला स्पष्टपणे दिसून येत आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील वाळीत प्रकरण गाजत आहे, तसेच राज्यात देखील वाळीत प्रकरणे झाली आहेत. वाळीत प्रकरणाबाबत राज्यात कायदा करण्याची आवश्यकता आहे. कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. कायद्यात या संदर्भात स्पष्ट धोरण पाहिजे. गावातील बैठका कशा घ्याव्यात, कोणी घ्याव्यात याचा कोठेही उल्लेख या ठिकाणी नाही. ज्यांनी काही केले नाही, काही ठिकाणी व्यक्तिगत भांडणे झाली तर ते लोक वाळीत टाकल्याची केस करतात. रायगड जिल्ह्यात अशा प्रकारची प्रकरणे झाली आहेत.

सभापती महोदय, मँग्रोव्हज बाबतीत शासनाला वेगळे धोरण तयार करावे लागणार आहे.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

तुम्हाला मॅन्ग्रोव्हजची दोन एकरच्या आतमधील झाडे तोडावयाची असतील तर तुम्हाला चार एकर मॅन्ग्रोव्हजची झाडे लावावी लागतात. तुम्ही जर चार एकर मॅन्ग्रोव्हजची झाडे लावली तर तुम्हाला कायद्यानुसार मॅन्ग्रोव्हजची झाडे तोडण्यास बंदी नाही. तुम्ही ते करु शकता. मॅन्ग्रोव्हज काय आहे ? तुम्ही मॅन्ग्रोव्हजची झाडे खाडी लगत लावावीत. आम्हाला शेतीचा बांध देखील घालता येत नाही. आमच्या खार जमिनीतील जो बांध आहे तो बांधण्यासाठी देखील मॅन्ग्रोव्हजचा बाऊ केला जातो. शासनाने या संदर्भात धोरण ठरविले पाहिजे, अशी माझी शासनाला विनंती आहे. आपण फक्त बी टाकले तरी मॅन्ग्रोव्हजची झाडे उगवतात. त्यामुळे काही अडचण नाही. ज्या भागातील जेवढी मॅन्ग्रोव्हजची झाडे तोडली जातात त्याच भागात किंवा त्याच्या बाजूला आपण दहा पट मॅन्ग्रोव्हजची झाडे लावण्यास सांगावे. मॅन्ग्रोव्हजची झाडे तोडण्यावर बंदी असली तरी राजरोसपणे मॅन्ग्रोव्हजची झाडे तोडलीच जातात. मॅन्ग्रोव्हजची झाडे तोडल्यानंतर संबंधित यंत्रणेचे लोक पैसे खातात. म्हणून यासाठी कायद्यात सुधारणा केली पाहिजे. सुदैवाने केंद्रीय मंत्री देखील महाराष्ट्रातील आहेत. ते या सभागृहाचे माजी सदस्य आहेत. आपण त्यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी एक संयुक्त बैठक आयोजित करावी. जेणे करुन आम्हाला त्यांच्या समोर आमचे मत मांडता येईल, अशी माझी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण पूर्ण करणार आहे. महाराष्ट्र राज्यातील पाणी कोणत्याही परिस्थितीत गुजरातमध्ये जाता कामा नये, अशी आमची भूमिका आहे. या विषयावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. महाराष्ट्रातीन जनता पाण्यासाठी तडफडत आहे. आज मराठवाड्यात पाणी नाही म्हणून आपण त्यासाठी करोडो रुपये खर्च करीत आहेत. श्री.बबनराव लोणीकर साहेब, मराठवाड्याची अशी परिस्थिती आहे. आपण या विषयावर बोलले पाहिजे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, आपल्या राज्यातील 133 टीएमसी पाणी गुजरात राज्यात सोडण्याचा करार केलेला आहे. हा करार कोणी केला याची आम्हाला माहिती नाही. परंतु, करार केला म्हणून आपण ते पाणी द्यावयास पाहिजे असे नाही. हा करार रद्द केला पाहिजे आणि 130 टीएमसी पाणी उचलून ते गोदावरीमध्ये सोडले पाहिजे, ते पाणी जळगाव जिल्ह्यातील तापीमध्ये देखील सोडले पाहिजे. आज 2 टीएमसी पाण्यासाठी नगर, नाशिक आणि औरंगाबाद जिल्ह्यामध्ये युद्ध होत आहे. ते 133 टीएमसी पाणी आपल्या राज्यातच राहिले पाहिजे. मी माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांना देखील सांगितले की, या अधिवेशनात आपल्याला या विषयावर चर्चा करावयाची आहे. हे 133 टीएमसी पाणी मधुबन येथून आपल्याला 600 मीटर अंतरावरुन उचलावयाचे आहे. आपण हे 133 टीएमसी पाणी उचलले तर मराठवाड्यात कधीच दुष्काळ पडणार नाही. आपण दुष्काळासाठी, पाण्यासाठी जे करोडो रुपये खर्च करीत आहोत ते देखील यामुळे वाचू शकतील. आम्ही आमच्या पक्षाच्या वतीने मागील दोन महिन्यांपासून या संदर्भात अभ्यास करीत आहोत. विधानसभेचे माजी सन्माननीय सदस्य श्री.विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली आम्ही यासाठी 200 तरुणांची टीम तयार केलेली आहे. आमचे तरुण त्या भागात फिरत आहेत. आम्हाला असे वाटते की, हे पाणी आपल्या राज्यात राहिले पाहिजे. मराठवाड्यात पाणी गेले नाही तर मराठवाड्याला कधीच पाणी मिळणार नाही. एकीकडे तुम्ही कोकणातील पाणी उचलून ते कृष्णेमध्ये सोडण्याबाबत चर्चा करता. त्यापेक्षा इंटरनॅशनल वॉटर पॉलिसीमध्ये पाण्याच्या बाबतीत जे धोरण ठरविले आहे त्या प्रमाणे आपल्या हक्काचे पाणी आपल्याला मिळण्याबाबत कार्यवाही केली पाहिजे आणि प्रत्येक भागात किती पाऊस पडतो त्या प्रमाणात पाण्याचे वाटप केले पाहिजे. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब देखील आमच्या भूमिकेशी सहमत असतील. आपल्या राज्यातील पाणी कोणत्याही परिस्थितीत गुजरात राज्यात जाता कामा नये. ज्या प्रमाणे गुजरात राज्य सुजलाम्-सुफलाम् होत आहे त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य देखील सुजलाम-सुफलाम

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

झाले पाहिजे. खऱ्या अर्थाने मराठवाड्यातील जनतेचे हाल होत आहेत. आम्ही कळवण आणि जळगाव मधील काही भागातील परिस्थितीचा मागील दोन-अडीच महिन्यांपासून अभ्यास करीत आहोत. आम्ही स्वत: त्या भागात जात आहोत. मी स्वत: धुळे, नाशिक भागात चार-पाच वेळा गेलो होतो. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. परंतु या अधिवेशनात या विषयावर विस्तृत चर्चा झाली पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्राला कळले पाहिजे की, आपल्याकडे पाणी उपलब्ध आहे आणि पाणी असताना देखील आपण ते घेऊ शकत नाही. माझी सभागृहाच्या नेत्यांना विनंती आहे की, या विषयावर सभागृहात किमान दोन-तीन तास विस्तृत चर्चा झाली पाहिजे. माझ्याकडे या संदर्भातील कागदपत्रे आहेत, नकाशे आहेत. मी या संदर्भात अभ्यास करीत आहे. मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न कशा प्रकारे सोडविला जाणार आहे याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही, याचा मला खेद आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि मी जे मुद्दे मांडले त्याबाबत सभागृहाच्या नेत्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा, अशी विनंती करून मी माझे दोन शब्द संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी अतिशय चांगले भाषण केले. आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. माननीय विरोधी पक्षनेते त्यांना निरोप देतील. त्यांच्या भाषणात त्यांनी शाहू, फुले, आंबेडकरांचा जवळपास पाच-सहा वेळा उल्लेख केला. या देशात ज्या राजकीय शक्ती आहेत त्यामध्ये धर्मांध शक्ती आणि धर्मनिरपेक्ष शक्ती आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जानकर साहेब, धर्मनिरपेक्ष शक्ती नेहमी फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार मांडते. त्यावेळी सुनीलजी अतिशय लहान होते. माझे आणि त्यांचे 1973-74 पासूनचे संबंध आहेत. आता हा विचार विधिमंडळाच्या प्रत्येक कामकाजातून देखील दिसला पाहिजे. माननीय महसूल मंत्र्यांनी सांगितले की, मी सर्व मुद्यांची नोंद घेत आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे किंवा इतर सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले नाहीत ते मुद्दे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. विधानसभेच्या निवडणुका झाल्या आणि नवीन सरकार सत्तेवर आले. नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर हे त्यांचे तिसरे अधिवेशन आहे. पहिले अधिवेशन मुंबई येथे झाले, दुसरे अधिवेशन नागपूर येथे झाले आणि तिसरे अधिवेशन आता पुन्हा मुंबई येथे होत आहे. हे शासन आगामी 5 वर्षात काय करणार आहे याचा लेखाजोखा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असावा, अशी आमची अपेक्षा आहे. परंतु त्याचे कोणतेही प्रतिबिंब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसत नाही. म्हणून मी सुरुवातीलाच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, मराठी अभंगामाध्ये 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' असे एक वाक्य आहे. तुम्ही नेहमी आमच्याकडे बघून सांगता की, राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे. त्यावेळी तुम्ही काय बोलला होता हे आम्ही आता सांगण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, विधानसभेमध्ये दिनांक 20 मार्च, 2012 रोजी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा झाली होती. त्या चर्चेच्या वेळी नागपूर-दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस साहेब काय म्हणाले होते. ते असे म्हणाले होते की, "आपल्या संविधानाप्रमाणे माननीय राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात आणि कौन्सिल ऑफ मिनिस्टर्स

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

यांच्या सल्ल्यानुसार ते काम करतात. त्यानुसार आपले कौन्सिल ऑफ मिनिस्टर्स ज्या प्रकारचे भाषण त्यांना तयार करुन देते, तेच भाषण राज्यपाल महोदयांना त्यांच्या मनात असो किंवा नसो ते भाषण करावे लागते. राज्यपाल महोदयांचे पद हे अतिशय उच्च पातळीवरील आहे. त्यामुळे किमान एवढया उच्च पातळीवरील पदाच्या तोंडी जे भाषण दिले जात आहे ते असत्य, खोटे असू नये, वस्तुस्थितीपासून दूर असू नये अशा प्रकारची खबरदारी घेण्याची आवश्यकता होती. पण माननीय राज्यपाल महोदयांच्या तोंडी धडधडीतपणे असत्य कथन टाकण्याचे काम या आघाडी सरकारने केले आहे." राज्यपालांचे अभिभाषण असत्य असू नये, असा माननीय श्री.फडणवीस साहेबांचा मुद्दा होता. त्याच दिवशी दुपारी 2 वाजून 10 मिनिटांनी भाषण करताना माननीय श्री.फडणवीस साहेब काय म्हणाले होते. ते असे म्हणाले की, "अध्यक्ष महोदय मी या सरकारचा धिक्कार करतो.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

शेतकऱ्यांची अशा प्रकारे दिशाभूल करुन त्यांना आत्महत्येस प्रवृत्त केले जात आहे. विदर्भातील शेतक-यांच्या रोज आत्महत्या होत आहेत. अशा प्रकारे हे सरकार वागते. त्यासाठी या सरकारवर 302 कलमान्वये खटला भरला पाहिजे. कारण शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याकरिता हे सरकार प्रवृत्त करीत आहे. त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम हे सरकार करीत आहे." माझा एवढाचा मुद्दा आहे की, जर शेतक-यांच्या सातत्याने आत्महत्या होत असतील तर सरकारवर कलम 302 अन्वये खटला भरा असे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षात असताना म्हणाले होते. आपण भाजप प्रणित सरकारविरुध्द अद्याप कलम 302 अन्वये खटला भरलेला नाही, हा माझा पहिला मुद्दा आहे.

सभापती महोदय, दिनांक 5 जून, 2014 रोजी माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षात असताना असे म्हणाले होते की, मराठा समाजाला, धनगर समाजाला आपण आरक्षण दिले. पण कोळी समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाचे घोंगडे शासनाकडून जाणीवपूर्वक भिजत ठेवले गेले आहे. आपण मराठा, धनगर आणि मुस्लीम समाजाला आरक्षण दिले. पण कोळी समाजाच्या आरक्षणाबद्दल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही. याबाबत सभागृहाला उत्तर मिळणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, त्याच दिवशी श्री.देवेंद्र फडणवीस काय म्हणाले होते? माननीय राज्यपालांचे अभिभाषण वाचल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, शासनाने 15 वर्षापासून राज्यातील जनता तसेच छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनाही फसविले आहे. आम्ही या सरकारकडून कोणती अपेक्षा करायची. तीन महिन्याचे मेहमान आहेत. त्यानंतर आपण सत्तेवर राहणार नाही. राज्यातील जनतेला आपले सत्य समजले आहे. चेहरा दिसला आहे. आपण जनतेची कशी फसवणूक केली याची जनतेला माहिती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील स्मारकाचा उल्लेख अभिभाषणात दिसून येत नाही. तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अभिमान नाही का?

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिलमधील स्मारकाबद्दल माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते यांनी आंदोलन केले होते. श्री.विजय कांबळे यांनी त्याची सुरुवात केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. तत्कालीन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) OO.2

SGB/ 17:50

श्री.शरद रणपिसे.....

माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्र सरकारकडून मान्यता आणली होती. आज केंद्रामध्ये तुमचे सरकार आहे, राज्यात तुमचे सरकार आहे, परंतु या स्मारकाबाबत काहीच भरीव प्रगती झालेली नाही. या गोष्टीबद्दल मी तुमचा निषेध करतो. या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही हे मी नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, माननीय विधानसभा सदस्य ॲड.आशिष शेलार हे या सभागृहाचे सदस्य होते. त्यांनी दिनांक 5 जून, 2014 रोजी मुस्लीम समाजाबद्दल काय वक्तव्य केले? भारतीय जनता पक्षामध्ये मुस्लीम समाजाबद्दल इतका कळवळा व्यक्त करणारा वक्ता मी कधीही पाहिलेला नाही. त्यांचे भाषण अभ्यास करण्यासारखे आहे. ते आपल्या भाषणात असे म्हणतात, "सभापती महोदय, राज्यातील मुस्लीम समाजाची खालावत चाललेली स्थिती याबद्दल खेद व्यक्त करावासा वाटतो. डॉ.मेहमूद उर रहमान समितीने राज्यातील मुस्लीम समाजाच्या दृष्टीने शिफारशी केल्या. ही घोषणा घेऊन केंद्रामध्ये नवीन सरकार सत्तारूढ झाले. भारतीय संविधानानुसार राज्य चालविणाऱ्या सरकारकडून सुध्दा हीच अपेक्षा आहे." मी वेगळे चित्र मांडण्याची गरज नाही. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांच्या आघाडी सरकारने डॉ.मेहमूद उर रहमान यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल आला. या समितीने आपल्या अहवालात म्हटले आहे की, राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी मुस्लीम समाजाचे 32 टक्के लोक वेगवेगळ्या जेलमध्ये आहेत. जो उल्लेख ॲड.आशिष शेलार यांनी केला त्याचा ओझरता उल्लेख अभिभाषणामध्ये नाही. ते पुढे म्हणतात, "एका विशिष्ट समाजातील लोकांवरील अन्याय दूर करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल या सभागृहात लवकरच ठेवा. आम्हाला सरकारची प्रतिक्रिया कळत नाही." माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे ज्येष्ठ सदस्य आहेत. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मराठी समाजाच्या आरक्षणाबद्दलचा अध्यादेश तुम्ही पारित केला. निश्चित त्या समाजाला आरक्षणाचा फायदा मिळाला पाहिजे. मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबद्दल मी दुरुस्ती सुचविली होती. इतका प्लॅन झाला की, एखाद्या शासकीय विधेयकाला दुरुस्ती सुचविली असेल तर त्या दुरुस्तीवर बोलण्याचा सभागृहातील सदस्याला घटनात्मक अधिकार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे. तुम्ही सभागृहात गोंधळ घातला आणि मुस्लीम समाजाला आरक्षण मिळू नये यादृष्टीने तुम्ही पध्दतशीरपणे प्रयत्न केला. त्याबाबत राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही.

..3...

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) OO.3

SGB/ 17:50

श्री.शरद रणपिसे.....

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी धनगर समाजाच्या आरक्षणाबद्दल उल्लेख केला. धनगर समाजाला आरक्षण कसे देणार आहात? भूमी अधिग्रहण विधेयकाबाबत केंद्र सरकारची पंचाईत झाली आहे. घटनात्मक दुरुस्तीबाबत तुम्ही सहज बोलून गेलात की, दोन्ही सभागृहाचे संयुक्त अधिवेशन बोलावू. असे करता येत नाही. देशातील सर्व विधिमंडळांची सुध्दा काही प्रमाणात संमती घ्यावी लागते. ती संमती तुम्हाला मिळाली का? मग धनगर समाजाला वाटाण्याच्या अक्षता लावण्याचा प्रयत्न तुम्ही केला आहे. त्या संदर्भात अभिभाषणात काहीही उल्लेख नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, शासकीय कर्मचारी हा शासनाचा कणा असतो. भारतीय राज्य घटनेने अनुसूचित जातीला 13 टक्के आरक्षण दिले. आदिवासी समाजाला 7 टक्के आरक्षण दिले आहे. घटनेनुसार 20 टक्के आरक्षण झाले. स्व.वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री असताना मी काँग्रेस पक्षाचा प्रदेश सरचिटणीस होतो. व्हीजेएनटीला 4 टक्के, ओबीसीला 10 टक्के अशाप्रकारे एकूण 34 टक्के आरक्षण झाले. आता आरक्षणाचे प्रमाण 52 टक्क्यावर गेले आहे. आता मराठा समाजाला 16 टक्के, मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण गृहीत धरले तर हे प्रमाण 73 टक्क्यावर जाईल. 73 टक्के समाजाचे प्रतिनिधित्व शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये आहे. नुकताच मॅटने निर्णय दिला आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना आरक्षणानुसार पदोन्नती मिळणार नाही. जो कर्मचारी 73 टक्के समाजाचे प्रतिनिधित्व करतो त्या 73 टक्के समाजाला तुम्ही वंचित ठेवणार आहात. त्या कर्मचाऱ्यांवर तुम्ही अन्याय करणार आहात. सरकारची भूमिका काय आहे?

सभापती महोदय, श्री.सुशीलकुमार शिंदे या राज्याचे मुख्यमंत्री असताना 29 जानेवारी, 2004 रोजी आपण एक कायदा मंजूर केला. सुपर क्लास वनपर्यंत सर्व समाज या 73 टक्क्यामध्ये येतो.

नंतर 2पी.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष (श्री.प्रकाश बिनसाळे) : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, श्री.सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांनी एक कायदा केला. त्यांनी सुपरक्लासवनपर्यंत पदोन्नती देण्याचे मान्य केले. आज 73 टक्के आरक्षित असलेला समाज शासकीय सेवेचे प्रतिनिधित्त्व करीत आहेत. त्याचा साधा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही म्हणून मी आनंद कसा व्यक्त करावयाचा ? त्यामुळे खेद व्यक्त केल्याशिवाय मला पर्याय नाही.

सभापती महोदय, विजय गोगरे विरूद्ध महाराष्ट्र शासनाची केस आहे. हे प्रकरण सन 2004 मध्ये हायकोर्टामध्ये गेले. या प्रकरणाचा निर्णय 2012 मध्ये आला. तेव्हा हायकोर्टाने सांगितले की, पदोन्नती, भरती, बढती हा विषय आमचा नाही. आपण मॅटकडे जावे. मॅटने काय निर्णय दिला ? मॅट देखील सेमी ज्युडिशिअरी आहे हे मी मान्य करतो. मी मॅट आणि हायकोर्टाचाही अवमान करीत नाही. मॅटने सुप्रीम कोर्टाच्या नागराज प्रकरणातील ऑब्झर्व्हेशनचा आधार घेतला. त्यांनी सांगितले की, बॅकवर्डनेस दाखवा, क्वांटीफाय डाटा दाखवा. इनॲडीक्वेशन ऑफ रिप्रेझेंटेटीव्ह दाखवा. तेव्हा आता या 73 टक्के लोकांचे आपण काय करणार ? अशाने मराठा समाज देखील वंचित राहील. येणारा धनगर समाज देखील वंचित राहील. अस्तित्त्वात असलेले अनुसूचित जाती व जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती याही वंचित राहतील. आरक्षण हा प्रकार काय आहे ? पदोन्नतीमध्ये देखील आरक्षण आहे. यासंबंधी राज्य सरकारने सन 2004 मध्ये कायदा केला आहे. 73 टक्के आरक्षित असलेला समाज हा सरकारी सेवेत आहे. त्याच्याबद्दल या शासनाला बिलकूल काहीही वाटत नाही. त्याचा त्यांनी साधा उल्लेख देखील या अभिभाषणामध्ये केलेला नाही. आरक्षण काय आहे ? दोन अडीच हजार वर्षापूर्वी एक चार मजल्याची इमारत होती. या चार मजल्याच्या इमारतीतील तळ मजल्यावर राहणाऱ्या लोकांना वरच्या मजल्यावर जाण्याची संधीच मिळत नव्हती. हा साधा आरक्षणाचा विषय आहे. सर्वात वर राहणाऱ्या उच्च वर्गाने उर्वरित तीन वर्गाची पिळवणूक केली म्हणूनच आरक्षण आलेले आहे. आपण कुठला क्वांटीफाय डाटा मागवत आहात ? आपणाला कुठला डाटा पाहिजे आहे. वरच्या वर्गाने उर्वरित तीन वर्गांना शिक्षण देण्याचे काम करायला पाहिजे होते. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

परंतु, त्यांनी त्यांना शिक्षण दिले नाही. त्यामुळेच हे तीन घटक वंचित राहिले आणि आज त्यांना पदोन्नतीसाठी आपण अडवत आहात ही गोष्ट काही बरोबर नाही. मला काही कोणालाही खिजवायचे नाही. मला काही कोणाच्या विरोधात बोलावयाचे नाही. हे या शासनाचे धोरण नसून ते रेशीमबागेतून ठरले असावे असा माझा समज आहे. चुकीचा असेल तर त्यासंबंधी आपण सांगावे. मी त्याचा जरूर पुनर्विचार करेन. पण हे धोरण राज्यामध्ये राबवू नका अशी माझी आपल्याला या निमित्ताने विनंती आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

सभापती महोदय, अभिभाषणातील अनुक्रमांक 67 वरील मुद्दा हा विजेसंबंधात आहे. आज आपल्या देशात विजेची गरज किती आहे ? भारतात सरासरी दरडोई अंदाजे 700 युनिटचा खप आहे. भारत सोडून इतर देशांमध्ये दरडोई विजेचा खप 2800 युनिट इतका आहे. एवढी खूप मोठी तफावत आहे. आज ग्रामीण भागामध्ये वीज नाही, आज शेतकऱ्यांना वीज मिळत नाही, विद्यार्थ्यांना वीज मिळत नाही. आपल्या येथे विजेचा प्रश्न खूप मोठा आहे. पण त्याबद्दल आम्ही अमुक एक प्रकल्प करू असे नमूद केले आहे. जैतापूर प्रकल्पातून 10 हजार मे.वॅ.वीज मिळणार आहे. आता वीज कडाडली आहे. बाजूला पाणी देखील आहे आणि आता पुरवठा देखील आला आहे. आपल्याला दहा हजार मे.वॅ.वीज उपलब्ध होणार आहे. आपण दरडोई 700 युनिट वीज वापरतो. जगातील इतर देशातील लोक दरडोई 2800 युनिट वीज वापरतात. आपण विजेची गरज कशी काय भागवणार आहात. स्वच्छ आणि चांगली वीज पाहिजे असेल तर अणु ऊर्जेशिवाय पर्याय नाही. त्याबद्दल दोन शब्द देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये का नाहीत हा माझा आक्षेप आहे. माझा शिवसेनेवर आक्षेप नाही. आपल्याला मोठ्या प्रमाणावर वीज पाहिजे असेल तर अणु ऊर्जेशिवाय पर्याय नाही. त्याची कबूली माननीय ऊर्जा मंत्री देतील. त्याचा उल्लेख नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो. सौर ऊर्जेतून पाहिजे तेवढी वीज मिळणार नाही. सौर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

ऊर्जेतील वीज ही मर्यादित आहे. जैतापूर प्रकल्पातून 10 हजार मे.वॅ.वीज निर्मिती होणार आहे. या राज्यात अणु ऊर्जा प्रकल्प होणार नाही असे आपले धोरण आहे काय ? आपण विजेची गरज कशी काय भागवणार आहात हा माझा मूलभूत प्रश्न आहे. विजेची गरज भागविण्यासाठी अणु ऊर्जेशिवाय पर्याय नाही. मेहरबानी करून आपण हे माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील अनुक्रमांक 40 व 41 वर परवडणाऱ्या घरांचे बांधकाम आम्ही करू झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवू असा उल्लेख आहे. आपण स्मार्ट सिटीज, दिल्ली मुंबई कॉरिडॉर करणार आहात. या कॉरिडॉरमुळे सर्व जागा भांडवलदारांच्या हातामध्ये जाणार आहेत. त्यामुळे आपल्याला गरीबांसाठी घरे बांधायला जागा कुठे मिळणार आहे ? एक श्रीमती इंदिरा गांधी होत्या त्यांनी जो राहील त्याची झोपडीखालची जमीन राहील असा निर्णय देशासाठी घेतला होता. तसेच अर्बन लँड सिलिंग ॲक्ट करून मोठ्या प्रमाणावर घर बांधणीसाठी जमीन उपलब्ध करून दिली होती. आपण फक्त देऊ असे सांगत आहात. पण कसे देणार आहात ? एसईझेडचे काय झाले ? युपीए गरिबांच्या बाजूने आहे. पण ते भांडवलदारांच्या बाजूने आहेत हा त्यातील फरक आहे. या शासनाने कॉरिडॉर कसा करणार आहे हे सांगावे. मी येथे श्रीमती इंदिरा गांधी यांचे उदाहरण मुद्दामहून दिले आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांनी अर्बन लँड सिलिंग ॲक्ट आणला. हा कायदा केंद्र शासनाने रद्द केला नसून तो राज्य शासनाने केला आहे. तो कायदा रद्द करण्याचा अधिकार प्रत्येक राज्याला होता.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे.....

अर्बन सिलिंग ॲक्टच्या मर्यादा कमी झाल्याची माहिती माननीय खडसे साहेबांना आहे. आता युएलसी, वीज आणि एनरॉनचा विषय काढला तर तुम्हाला चालेल काय ? बुडवलेला एनरॉन प्रकल्प संत तुकारामाच्या गाथेसारखा वर काढण्यात आला. त्यावेळेस रिबेका मार्क्स सर्वांना भेटल्या होत्या. विविध बँकाना 3000 कोटी रुपये एन्रॉनने द्यावयाचे होते. खरे म्हणजे यामुळेच आयडीबीआय बँक बुडली हे आपल्याला माहिती आहे. त्यावेळेस मी आणि माननीय श्री. चिमणराव कदम सत्ताधारी पक्षात होतो, त्यावेळेस एन्रॉनचा रेट डॉलरमध्ये करण्यात यावा असा आग्रह आम्ही धरला होता. त्यावेळेस आमच्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी आम्हाला समज दिली होती परंतु आम्ही त्यावेळेस ऐकले नाही. तुम्ही विजेबद्दल, परवडणाऱ्या घराबद्दल काहीही सांगत नाही. माननीय श्री. खडसे साहेब बहुजन समाजाचे नेतृत्व करीत असल्यामुळे आम्हाला तुमच्या बद्दल फार आदर आहे. परंतु कॉ.गोविंद पानसरे यांचा शोकप्रस्ताव या सभागृहात यावा म्हणून विरोधी पक्षाला आटापिटा करावा लागला होता, हे आपण कसे काय विसरता ?

श्री. भाई गिरकर : आपण सत्तेमध्ये होता त्यावेळेस आपण दाभोळकरांचा शोक प्रस्ताव सभागृहात मांडला नव्हता, हे कसे विसरता ?

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये मी हा मुद्दा मांडला होता. (अडथळा) कामकाज सल्लागार समितीमध्ये सदर शोक प्रस्ताव मांडू नये, असे आम्हाला सुस्वातीला सांगण्यात आले होते.

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रणपिसे साहेब या ठिकाणी आपले मत व्यक्त करीत आहेत त्याबद्दल माझा आक्षेप नाही. त्यांनी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खुशाल बोलावे. सन्माननीय सदस्स श्री.रणपिसे साहेब ज्येष्ठ सदस्य आहेत. परंतु कामकाज सल्लागार समितीमध्ये कोणत्या विषयावर चर्चा झाली, याची चर्चा बाहेर केली जात नाही. कामकाज सल्लागार समितीचा निर्णय हा सभागृहाच्या पटलावर ठेवला जातो तसेच कामकाज सल्लागार समितीचे ब्रिफींग सुध्दा होत असते. माझी आपल्याला विनंती आहे की, अभिभाषणावर आपले जे काही मत असेल ते खुशाल मांडावे परंतु कामकाज सल्लागार समितीची चर्चा बाहेर केली जाऊ नये, यासंदर्भात जे नियम आहेत त्याचे पालन करावे, एवढीच मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमधील चर्चा वर्तमानपत्रात आली होती. या सरकारचा सामाजिक समतोल बिघडलेला आहे. संसदीय कार्य मंत्र्यांच्या विनंतीला मान देऊन राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर अधिक मोठया प्रमाणात खेद व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवतो.

धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)

श्री. अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे धन्यवाद व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांचे अभिनंदन व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये राज्याची आजची परिस्थिती काय आहे तसेच उद्या या राज्याची काय स्थिती राहणार आहे, याअनुषंगाने जो उल्लेख केला आहे त्यामुळे या शासनाच्या भूमिका व कार्यप्रणालीमुळे उद्याच्या महाराष्ट्राचे चित्र काय राहणार आहे हे पाहणे अधिक गरजेचे आहे. मागील तीन महिन्याच्या कार्यकाळाचा उल्लेख करीत असताना माननीय राज्यपालांनी माझ्या शासनाची सुरुवात अत्यंत उत्साहाने व जोमाने झाली असल्याचा उल्लेख या ठिकाणी केला तो रास्तच आहे असे मी समजतो. या राज्यात भाजप-सेनेचे सरकार आल्यानंतर एकामागे एक उद्‌भवलेली अस्मानी संकटे, अतिवृष्टी, गारपीट आणि दुष्काळाच्या आडोशाने या सरकारवर सतत दोषारोप करण्यात आले. राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणातून राज्याला जी दिशा दिलेली आहे व त्यासंदर्भात राज्य शासनाने जे धोरण ठरवले आहे, त्याचे मूल्यमापन करण्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा विचार केला तर आपल्या लक्षात येते की, या अभिभाषणात 70 टक्के भाग हा या राज्यातील गोरगरीब, शेतकरी, शेतमजुरांना मध्यबिंदू धरुन व बेरोजगार युवकांची चिंता करुन लोकांना त्यांच्या घरापर्यंत अधिकाधिक सेवा कशा पोहचतील याचा उल्लेख करुन त्यासंदर्भातील धोरण म्हणजे राज्यपालांचे अभिभाषण असल्यामुळे मी राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो. या शासनाची आर्थिक परिस्थिती कशी आहे, तिजोरीमध्ये किती पैसा आहे याचा विचार न करता जवळपास 23850 गावांची आणेवारी 50 पैशांच्या खाली होती अशा गावांना केंद्रशासनाची मदत येण्यापूर्वीच 4000 कोटी रुपयांची रक्कम थेट लाभ हस्तांतरण योजनेमार्फत वितरित करण्यात आली.

सभापती महोदय, हवामानाच्या बदलावर या सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात एक दिशा निश्चित होताना आपल्याला दिसते आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अनिल सोले .....

या सभागृहात काल आणि आज अवकाळी पाऊस, गारपिटीवर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी हवामानाच्या बदलाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले आहेत. हवामानाच्या बदलाच्या अनुषंगाने शासन व्यवस्थेला नवीन दिशेने विचार करण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने या सरकारचा भर शेतकऱ्यांची उन्नती, बेरोजगारीचे उच्चाटन तसेच कृषी व कृषीतर पाण्याचे व्यवस्थापन, तंत्रज्ञानाच्या उपयोगातून नागरी सेवा आणि त्याच बरोबर आनुषंगिक उद्योग आणि सस्टेनेबल डेव्हलपमेंटच्या अनुषंगाने राज्यपाल महोदयांचे अभिभाषण हे या राज्याला नवीन दिशा दाखवणारे असल्यामुळे मी राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार अभियानाची संकल्पना महाराष्ट्र शासनाने अधोरेखीत केलेली आहे. या अनुषंगाने ग्रामीण भागातील शेतकरी, कास्तकार हा पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावा, पाण्याच्या बाबतीत महाराष्ट्रातील शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवंलबून राहून त्याच्या इच्छेप्रमाणे अडचणीत येऊ नये यासाठी जलयुक्त शिवार अभियान या योजनेचा शुभारंभ आपल्या राज्यात झाल्याबद्दल व यासंदर्भात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात उल्लेख आहे.

सभापती महोदय, स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत जवळपास 14.15 लाख प्रसाधनगृहे ग्रामीण भागात बांधण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. ग्रामीण भागाला रोगराईमुक्त करणे, दुर्गंधीमुक्त करणे आणि स्वच्छ भारत अभियानामुळे रोगराईमुक्त भारत करण्याचा उल्लेख केल्याबद्दल मी राज्यपाल महोदयांचे आभार मानतो.

सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत येत्या काळात 44 हजार विहिरींची निर्मिती केली जाणार असल्याचा संकल्प राज्यपालांच्या अभिभाषणातून दिसून येतो.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात विशेष व्याघ्र प्रकल्पाचा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र विदर्भात असून गडचिरोली, चंद्रपूर, नागझीरा या ठिकाणी व्याघ्र प्रकल्प आहेत तेथे एक प्रकारचे आशादायी धोरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

यानंतरा श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल सोले.....

सभापती महोदय, महाराष्ट्रातील विदर्भ आणि कोकण विभागात मोठ्या प्रमाणावर बांबूची निर्मिती होते. परंतु ज्या प्रमाणात बांबू उत्पादनाकडे लक्ष द्यावयास पाहिजे त्या प्रमाणात दिलेले नाही. बांबू हे रोजगार निर्मितीचे एक प्रमुख साधन आहे. परंतु दुर्दैवाने आजपर्यंत बांबू निर्मितीचा व्यवसाय 350 कोटी रुपयांपेक्षा जास्त होत नाही. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये बांबूचे प्रशिक्षण आणि संशोधन करण्याचा उल्लेख माननीय राज्यपालांनी अभिभाषणात केलेला आहे. बांबू क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बेरोजगार युवकांच्या दृष्टीने हा एक आशेचा किरण आहे. आपण देशातीत बांबू उद्योगाचा विचार केला तर विदर्भामध्ये जवळपास 10 ते 15 हजार कोटी रुपयात बांबूचा उद्योग उभा राहू शकतो. कोकणात देखील अशा प्रकारचा उद्योग उभा राहू शकतो. बांबू उद्योगाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्रामध्ये एक नवीन आशेचा किरण निर्माण झालेला आहे, असे मी समजतो.

सभापती महोदय, सन 2009-2010 मध्ये बांबूचे धोरण ठरविण्यात आले. परंतु त्याची ज्या पद्धतीने अंमलबजावणी व्हावयास पाहिजे होती, ती झालेली नाही. वने मंत्री महोदयांच्या माध्यमातून या धोरणाला अधिक मजबूत करून आणि बांबूचा व्यवसाय व्यवसायाभिमुख करण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केलेला आहे, त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, रास्त भाव दुकानात बायो-मेट्रिकचा वापर करण्यात येत आहे. या पद्धतीमुळे अनागोंदी कारभाराला निश्चिपणे आळा बसणार आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात त्याबद्दल उल्लेख असल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आज मोठ्या प्रमाणावर कौशल्य प्रशिक्षणाच्या बाबतीत चर्चा करण्यात येते. परंतु त्या संदर्भात आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्याबाबत शासन उदासीन दिसते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून बेरोजगारीचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीकोनातून एक नवीन आशेचा किरण दिसत आहे. आज देशामध्ये 26 टक्के प्रशिक्षित युवक आहेत. आपण याचा विचार केला तर महाराष्ट्राचे संतुलन व्हावयास पाहिजे, परंतु ते संतुलन होत नाही. विदर्भ, कोकण आणि महाराष्ट्रातील उर्वरित भागात तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या दृष्टीने तयार होताना आपणास दिसत नाही. राज्य शासनाने कौशल्य विकासाकडे लक्ष केंद्रित करण्याचे धोरण ठरविले आहे, त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल सोले.....

सभापती महोदय, धर्मदाय संस्था आणि इतर खाजगी जमिनींवर असलेल्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याचा यक्ष प्रश्न निर्माण झालेला आहे. या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. धर्मदाय संस्था आणि खाजगी जमिनीवरील असलेल्या झोपडपट्टीचे पुनर्वसन जमीन मालकांनी केले नाही तर ज्या जमिनी शासन ताब्यात घेईल व स्वतः पुनर्वसन करील असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पर्यटनाकडे राज्याचे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. माननीय राज्यपालांनी अभिभाषणामध्ये पर्यटनासंबंधी तीन तीन वेळा उल्लेख केलेला आहे. पर्यटन महाराष्ट्राची अर्थ व्यवस्था बदलू शकतो. पर्यटन राज्यातील बेरोजगार युवकांना रोजगार देऊ शकतो.पर्यटन हा विषय इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटकडे लक्ष देऊ शकतो. पर्यटनामधून 49 टक्के रोजगार निर्मिती होऊ शकते इतका हा मोठा विषय आहे.

सभापती महोदय, आज मुंबई शहरात जवळपास 3 कोटी पर्यटक भेट देतात. त्यामध्ये 50 लाख परदेशी पर्यटक असतात. मुंबईत जे परदेशी पर्यटक येतात ते महाराष्ट्रातील इतर भागांमध्ये न जाता ते गोवा, उत्तराखंड आणि केरळ राज्यात पर्यटनासाठी जातात. ते राज्यातील इतर भागांमध्ये गेले तर त्या ठिकाणी रोजगार निर्मिती होऊ शकते. परंतु त्याकडे दुर्लक्ष झालेले दिसते.

सभापती महोदय, कोकणामध्ये 1 कोटी 70 लाख पर्यटक येतात. परंतु आपण व्हीलेज पर्यटनाकडे दुर्लक्ष केलेले आहे. विदर्भामध्ये व्याघ्र प्रकल्प उभे राहू शकतात. आपण महाराष्ट्रामध्ये पर्यटन स्थळे विकसित केली आणि त्या ठिकाणी परदेशी पर्यटकांना फिरवले तर त्या माध्यमातून रोजगार निर्मिती होऊन राज्याला महसूल मिळू शकतो.

सभापती महोदय, केरळ राज्यात जवळपास 1 कोटी पर्यटक येतात. त्या राज्यास पर्यटनाच्या माध्यमातून 28 हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. परंतु आपल्याकडे पर्यटकाच्या माध्यमातून किती उत्पन्न मिळते याची अधिकृत आकडेवारी नाही. माननीय राज्यपालांनी आपल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल सोले.....

भाषणात पर्यटनासंबंधी तीन-चार वेळा उल्लेख करून पर्यटन क्षेत्राचा विकास करण्याचा मानस व्यक्त केलेला आहे. माननीय राज्यपालांनी परंपरागत त्याच त्याच भाषणाच्या कॅसेट ऐकवण्याऐवजी महाराष्ट्र पुढील कालखंडात कशा प्रकारे काम करणार आहे, त्याचा उल्लेख अभिभाषणात केलेला आहे त्याबद्दल मी राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करतो आणि या अभिभाषणाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (ठाणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी नवीन सदस्य असल्याने माझे थोडे अज्ञान आहे असे मी समजतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात "पाण्याची मागणी व सिंचनेतर पाणी वापरकर्त्यांना शासनाची मंजुरी देणे यासाठी ऑनलाईन सुविधा देण्याचा शासनाचा मानस आहे" असा उल्लेख आहे. माझ्या मनात असा प्रश्न निर्माण झालेला आहे की, माझ्या शेतकऱ्याला ऑनलाईनद्वारे पाणी कसे मिळणार आहे आणि तो ऑनलाईन पाण्यासाठी अर्ज कसा करणार आहे ? ही ऑनलाईन पाण्याची सुविधा उद्योग आणि मोठ्या कंपन्यासाठी आहे काय ? या ठिकाणी शेतकऱ्यांचा विचार झालेला नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, "स्वच्छ भारत अभियानांतर्गत" 2015-2016 या वर्षामध्ये ग्रामीण भागात सुमारे 14.15 लाख इतकी प्रसाधनगृहे बांधण्यात येतील. तसेच नागरी भागातील सुमारे 8 लाख कुटुंबांना प्रसाधनगृह सुविधा पुरविण्याचे शासनाने ठरविले आहे" असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. माझ्या मनात शंका येते की, प्रसाधनगृह बांधत असताना त्याच्या देखभाल खर्चाचा विचार शासनाने केला आहे काय, याचा खुलासा माननीय मंत्री यांनी आपल्या भाषणात करावा अशी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, "एकात्मीकृत कृषी विकासासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी म्हणजे पीपीपी पद्धतीद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्यासाठी 5 लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या कॉर्पोरेट जगताशी संपर्क साधून पुढील तीन वर्षामध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांना सामावून घेण्यासाठी या कार्यक्रमाचा विस्तार करण्यात येईल" असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. मला असे वाटते की, रिलायन्स किंवा वॉलमार्ट या सारख्या मोठ्या कंपन्यांच्या हाताखाली शेतकऱ्यांना बंदिस्त करून शेतकरी स्वतःच्या शेतीमध्ये कामगार म्हणून काम करेल की काय असे शासनाचे धोरण तर नाही ना, अशी शंका माझ्यासारख्या सदस्याच्या मनात येते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात "मराठी भाषा धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासन कटिबद्ध असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी भारत सरकारकडे नेटाने पाठपुरावा करीत आहे आणि मराठी भाषा भवन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे .....

बांधण्याकरिता प्रयत्न देखील करीत आहे" असा उल्लेख आहे. आपण मराठी भाषेच्या विकासाबाबत बोलत असताना राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. काल प्रश्नोत्तराच्या तासामध्ये त्या संदर्भात प्रश्न आला होता आणि त्यावर आपण चर्चा केलेली आहे. मराठी भाषेच्या विकासा बरोबर मराठी शाळा कशा टिकतील याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही, त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, मेळघाट, नवेगाव व नागझिरा येथे विशेष व्याघ्र प्रकल्प उभारण्याबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे. कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात शेजारच्या राज्यातील जंगली हत्तींचा वावर सातत्याने वाढलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे....

या सभागृहात या विषयावर सातत्याने चर्चा झालेली आहे. वास्तविक पाहता या भागात एलिफंट सँक्च्युरी होणे आवश्यक आहे. परंतु या बाबतचा विचार राज्यपालांच्या अभिभाषणात केलेला नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या बाबतचा विचार राज्य सरकारकडून करण्यात येईल काय ? तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जे मृत्युमुखी पडतील त्यांना देण्यात येणारी मदत 5 लाख रुपयांवरुन 8 लाख रुपये करण्यात आली आहे. निश्चितच ही वाढ समाधानकारक आहे. परंतु वन्य प्राण्यांच्या हल्ल्यातून त्या लोकांना कसे वाचविता येईल किंवा त्यांना वेळीच औषधोपचार कसा उपलब्ध करुन देता येईल, या बाबतचे धोरण शासनाकडून आखले गेले पाहिजे.

महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यात 5.95 लाख मेट्रिक टन क्षमतेची गोदामे बांधण्याचे ठरविण्यात आले असून त्यापैकी 60 हजार मेट्रिक टन क्षमतेच्या 65 गोदामांचे बांधकाम पूर्ण झाल्याचे अभिभाषणात नमूद केले आहे. मुळात ही योजना मागच्याच सरकारची आहे. तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांच्या पुढाकाराने ही योजना अंमलात आणली होती. ही योजना पुढे सुरु ठेवल्याबद्दल मी सरकारचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकासाठी जमीन हस्तांतरित करुन इंदू मिल येथे त्यांच्या भव्य स्मारकाचे बांधकाम 100 दिवसात सुरु करणार, असे राज्य सरकारने सांगितले होते. परंतु त्या आश्वासनाची पूर्तता झाली नाही. माझी मागणी आहे की, या स्मारकाचे बांधकाम तातडीने पूर्ण करावे.

महोदय, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच 'नयना' नावाने अत्याधुनिक शहर उभारण्याबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आहे. वास्तविक पाहता हे काम मागच्या सरकारचे आहे. या सरकारने त्या कामांचा उल्लेख अभिभाषणात केला आहे. या कामांना मागच्या सरकारने सुरुवात केली आहे. याशिवाय स्मार्ट सिटी अभियानाचा सुध्दा अभिभाषणात उल्लेख करण्यात आला आहे. या स्मार्ट सिटी कधीपर्यंत पूर्ण होतील आणि त्याबाबत सरकारचे धोरण काय आहे, त्यासंदर्भातील आराखडा काय आहे, आराखड्याबाबतचा अहवाल कधीपर्यंत येणे अपेक्षित आहे, या बाबतचे सुस्पष्ट धोरण अभिभाषणात नमूद केलेले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे....

सभापती महोदय, म्हाडा मार्फत मोठ्या प्रमाणावर परवडणारी घरे बांधण्याचा तसेच घरांच्या बांधकामासाठी जमीन राखून ठेवण्याचे अभिभाषणात नमूद केले आहे. ठाण्यामध्ये वर्तक नगर भाग आहे. त्या ठिकाणी पोलिसांच्या जुन्या इमारती आहेत. त्या इमारती म्हाडाच्या जमिनीवर वसलेल्या असून त्या जीर्ण झाल्या आहेत. त्या इमारतींची दुरुस्ती म्हाडाने करावी अशी सातत्याने मागणी केली जात आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या इमारतींच्या बाबतीत सरकारचे नेमके धोरण काय राहणार आहे ? वास्तविक पाहता या इमारतींची दखल घेण्याबाबतचा कोणताच उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नसल्याबद्दल मला खंत वाटते.

सभापती महोदय, मेरु व अन्य खाजगी टॅक्सींमध्ये जीपीआरएस यंत्रणा बसविण्याबाबतचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात केला आहे. परंतु पब्लिक ट्रान्सपोर्टमध्ये जीपीआरएस यंत्रणा बसविण्याबाबत कोठेही उल्लेख नाही. मेरु आणि खाजगी टॅक्सींमध्ये जीपीआरएस यंत्रणा पहिल्यापासून असते. कारण खाजगी मालकांनी त्या बाबतची व्यवस्था अगोदरच करुन ठेवलेली असते. पब्लिक ट्रान्सपोर्ट मध्ये सुध्दा जीपीआरएस यंत्रणा बसविण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

महोदय, राज्याच्या प्रमुख शहरांमध्ये, अधिक चांगल्या सुरक्षिततेच्या वातावरणासाठी सीसीटीव्हीवर आधारित संनिरीक्षण यंत्रणा बसविण्याच्या उपक्रमाचा भाग म्हणून मुंबईत ही यंत्रणा बसविण्याच्या कामास सुरुवात झाल्याचे अभिभाषणात नमूद केले आहे. पुणे शहरात ही यंत्रणा पूर्वीपासून आहे. मुंबई शहराचा विकास करीत असताना अखंड मुंबईचा विचार करावा. अशा प्रकारची यंत्रणा केवळ मुंबईपुरती न बसविता संपूर्ण एमएमआर रिजनमध्ये बसविणे गरजेचे आहे. ठाणे किंवा ठाणे जिल्ह्यातील बराच भाग हा एमएमआर रिजनमध्ये येतो. त्यामुळे संपूर्ण एमएमआर रिजनमध्ये ही यंत्रणा बसवावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, प्रत्येक महापालिकेच्या क्षेत्रात पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आहे. ठाणे जिल्ह्याच्या आयुक्तालयाचे विभाजन करण्याची सातत्याने मागणी आहे. ठाणे शहरात नागरीकरणाचे वाढते प्रमाण लक्षात घेता आयुक्तालयाचे विभाजन करण्याची आवश्यकता आहे. तसेच पोलीस चौक्यांचे सुध्दा विभाजन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

करणे गरजेचे आहे. ठाणे महापालिकेच्या वॉर्डांची संख्या पूर्वीच्या तुलनेत खूप वाढली आहे. ठाणे शहरात सातत्याने शहरीकरण होत आहे. त्या ठिकाणी इतर भागातून लोक मोठ्या संख्येने राहण्यासाठी येत आहेत. त्या शहरावर चांगले नियंत्रण राहण्यासाठी व तेथील पोलीस यंत्रणा सक्षम करण्यासाठी सरकारने योग्य तो विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, 3 लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या सर्व कामांसाठी ई-निविदा सक्तीची करण्यात आल्याचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात आहे. माझ्या माहितीनुसार, कदाचित माझी माहिती चुकीची सुध्दा असू शकेल, पण 50 हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या कामांच्या निविदा ई-निविदा पध्दतीने काढल्या जातात. 50 हजार रुपयांचा स्लॅब 3 लाख रुपयांपर्यंत केला असेल तर त्या बाबतचा खुलासा माननीय मंत्र्यांनी केला तर बरे होईल.

सभापती महोदय, "मेक इन महाराष्ट्र" ही मोहीम राबविण्याचा शासनाचा विचार आहे. हे करीत असताना स्मॉल स्केल इंडस्ट्रीजना किती सबसिडी दिली जाणार आहे हे समजले पाहिजे. किंबहुना ही मोहीम नेमकी कोणासाठी आहे हे सुध्दा सांगितले पाहिजे. जे सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना स्मॉल युनिट सुरु करावयाचे असेल तर एमआयडीसीकडून कोणत्या सवलती मिळतील या बाबतची सुध्दा माहिती मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अनुकंपा तत्त्वावरील गट 'क' व 'ड' मधील पदांवर नियुक्ती करण्यासाठीचा वाटा 5 टक्क्यांवरुन 10 टक्क्यांपर्यंत वाढविला आहे. परंतु अनुकंपा तत्त्वावरील वारसदारांच्या नोकरीबाबत 31 डिसेंबर 2012 पर्यंतच्या कालावधीतील प्रकरणांवर कार्यवाही करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय हा दिनांक 1 जानेवारी, 2013 नंतर मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या वारसांवर अन्यायकारक आहे. शासनाने 31 डिसेंबर, 2012 च्या कालावधीचे निर्बंध रद्द करावे, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, राज्याच्या महत्त्वाकांक्षी पर्यटनाच्या योजनांबद्दल सांगत असताना कोकणातील सी-वर्ल्ड प्रकल्पाला हे शासन विसरले आहे. कारण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोकणाच्या बाबतीत कोठेही उल्लेख नाही. महोदय, शिक्षकांच्या पायाभूत सुविधेअंतर्गत त्यांना प्रगत तंत्रज्ञान पुरविणे या बाबत राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे....

पण शिक्षकांचे पगार नियमितपणे मिळतील याबाबतची शाश्वती शासनाकडून मिळावी, एवढीच या निमित्ताने विनंती करतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, या चर्चेवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले असून अजूनही अनेक सन्माननीय सदस्यांना या चर्चेवर बोलायचे आहे. शिवाय आजच्या कामकाजपत्रिकेवर विरोधी पक्षाचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर सुध्दा होणार आहे. मला वाटते उर्वरित सदस्यांच्या भाषणाच्या वेळेबाबत नियोजन केले आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर उद्या ठेवले तर बरे होईल. मला वाटते सभागृहाने याचा विचार करावा. नाही तर आजचे कामकाज पूर्ण होऊ शकणार नाही. मला वाटते आज ही चर्चा संपविली तरी विरोधी पक्षाला त्यांचा नियम 260 चा प्रस्ताव मांडावयाचा असेल.

तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे) : मला वाटते या बाबत माननीय सभापतींशी चर्चा करून निर्णय घेऊ या. या चर्चेवर अजूनही 30 सन्माननीय सदस्य बोलणार असून त्यांची नावे माझ्याकडे आहेत. माझी सर्व गटनेत्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या पक्षातील सदस्यांची नावे कमी केली तर ही चर्चा वेळेत संपू शकेल. सन्माननीय सदस्यांनी कमी वेळेत आपले मुद्दे मांडले तर प्रत्येकाला बोलण्याची संधी मिळू शकेल.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, उद्या पुरवणी मागण्यांवर सुध्दा चर्चा आहे. त्यावर चर्चा करण्यात वेळ जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर उद्या ठेवले तर, नियम 260 चा प्रस्ताव आणि इतर सदस्यांच्या भाषणाच्या वेळेचे नियोजन कसे करता येईल, ते पहावे लागेल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, प्रत्येक सन्माननीय सदस्यांवर वेळेचे बंधन घालावे आणि सर्वांना बोलण्याची संधी द्यावी, असे मला वाटते. वाटल्यास नियम 260 चा प्रस्ताव उद्या चर्चेला घेऊ या.

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, या चर्चेवरील काही नावे कमी करता येतील काय हे पहावे. 30 सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिल्यास रात्रभर थांबावे लागेल. मला वाटते या चर्चेवरील नावे कमी करावयास पाहिजे. आज ही चर्चा संपविली पाहिजे. उद्या पुरवणी मागण्या सुध्दा चर्चेला आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, आवश्यकता पडल्यास या चर्चेला उद्या उत्तर देण्याची त्यांची तयारी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्यासाठी दोन दिवसांचा वेळ दिला होता. परंतु काल ही चर्चा झाली नाही. त्यामुळे आज जो वेळ मिळाला तो कमी आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर इतक्या कमी वेळात यापूर्वी कधीही चर्चा झालेली नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

आम्हाला परिस्थितीवर बोलले पाहिजे. सभापती महोदय, 15 सन्माननीय सदस्य बोलण्यास फार वेळ होईल. आपण उद्या काही सन्माननीय सदस्यांचे भाषण ठेवावे. आता चर्चा थांबवावी. उद्या विशेष बैठक घ्यावी आणि त्यामध्ये सन्माननीय सदस्यांच्या भाषणांसहित माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर घ्यावे. आज विरोधी पक्षाने उपस्थित केलेली चर्चा सोमवारी ठेवावी. उद्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात येतील. सन्माननीय सदस्यांची माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्याची इच्छा आहे. आपण सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यास उद्या संधी दिली तर बरे होईल. आता 1-1 सन्माननीय सदस्य बोलतील आणि ही चर्चा येथेच थांबवावी.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आज पूर्ण करावयाची आहे. उद्या सकाळी 11.00 ते दुपारी 12.15 या वेळेत या चर्चेवर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर होईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, उद्या सकाळी 10.00 ते सकाळी 11.00 या वेळेत विशेष बैठक घ्यावी.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, काल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा होऊ शकली नाही. आजच्या दिवसातील काही वेळ माननीय राज्यापालांच्या अभिभाषणाच्या चर्चेकरिता मिळाला आहे. आतापर्यंत फक्त 5 सन्माननीय सदस्य बोलले आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत किमान 15-20 सन्माननीय सदस्य भाषण करतात. 2 दिवस चर्चा असते. आपण उद्या विशेष बैठक घ्यावी, त्यामध्ये काही वेळ सन्माननीय सदस्य बोलतील. आता काही सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. उद्या एक तास देण्यास काय हरकत आहे ?

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आज चर्चा आटोपून घेऊ या.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण किती वेळ बसणार ? आज रात्रीच चर्चा आटोपून घेऊ या असे सांगणे योग्य नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आज अजून एक तास सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी द्यावा आणि उद्या सकाळी 10.00 वाजता राहिलेल्या सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यास वेळ देऊन माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर घ्यावे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)

श्री. अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल नापसंती व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंबंधीचा उल्लेख केला आहे. मला खेद व्यक्त करावासा वाटतो. कारण माननीय राज्यपालांनी एक तरी वाक्य मराठीमध्ये बोलायला पाहिजे होते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मराठी भवनचा उल्लेख केला आहे. तुम्ही मराठी माणसाच्या रक्षणाकरिता अनेक वर्षे बोललात. आज त्या मराठी भवनची अवस्था काय आहे ते आपण पहा. आज तुम्हाला लेबर आंध्र प्रदेशमधून आणावे लागतात, कडिया राजस्थानमधून आणावे लागतात, गवंडी काम करणारे लोक गुजरातमधून आणावे लागतात आणि त्यांच्या सहकार्याने तुम्ही मराठी भवन बांधण्यास निघाला आहात.

सभापती महोदय, सरकार सत्तेवर आले आणि महाराष्ट्र राज्य टोलमुक्त करणार असे सांगितले. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये टोलच्या संदर्भात साधा उल्लेख सुध्दा नाही. नव्या वर्षांच्या सुरूवातीलाच नवी मुंबई येथे नव्या सरकारने नवीन टोल नाका सुरू केला आहे. आताचे शासन टोलमुक्त महाराष्ट्र करण्यास गेले होते. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये टोलच्या संदर्भात साधा उल्लेख नाही. उलट त्यांनी नवीन टोल नाका सुरू केला आहे.

सभापती महोदय, स्वच्छ भारत करण्याच्या घोषणा देण्यात आल्या. दिल्लीपासून गल्लीपर्यंत माननीय मंत्र्यांचे फोटो लावून, स्वच्छ भारत करण्याच्या घोषणा देण्यात आल्या. तुम्ही काही स्वच्छ भारत केला नाही. उलट राज्यात स्वाईन फ्लूच्या साथीने 200 माणसे मृत्युमुखी पडली आहेत. रूग्णालयात बाकीच्या रूग्णांना जागा नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये स्वाईन फ्लूचा साधा उल्लेख नाही किंवा इतर आरोग्याच्या सुविधांबाबतही उल्लेख नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अनंत गाडगीळ ....

सभापती महोदय, शासनाकडून सातत्याने सांगितले जाते की, आमचे सरकार येऊन फक्त 3 महिने झाले आहेत. मी तर 2-3 माननीय मंत्र्यांना म्हणतो की, तुम्ही सरकार येऊन 2 महिने झाले आहेत असे म्हटले तरी चालेल. कारण पहिला एक महिना तर तुमचा खाते वाटपात गेला आणि नंतरचे 2-3 आठवडे हे माननीय मंत्र्यांना कोणता बंगला द्यायचा या निर्णयामध्ये गेला आहे. त्यामुळे एक महिना कमी केला तरी काही म्हणणे नाही. मी नवीन आमदार असल्यामुळे जुन्या काही सन्माननीय सदस्यांच्या भाषणांचा ग्रंथालयात जाऊन अभ्यास केला. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे त्यांच्या एका भाषणात असे म्हणाले होते की, काँग्रेसच्या, राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजवटीमध्ये माननीय मंत्र्यांचे अधिकारी ऐकत नाहीत. माझे चुकले तर मी शब्द मागे घेईन. पण मला अशी माहिती मिळाली आहे की, माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी ॲडिशनल कलेक्टर संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या गेल्या आठवड्यात प्रस्तावित केल्या. परंतु त्यांना कळण्याच्या आत त्यातील 8-10 नावे माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून काही अधिकाऱ्यांनी बदलली. आताचे शासन कायदा व सुव्यवस्था या संदर्भात सांगत होते. मला आठवते की, आमचे सरकार होते तेव्हा तत्कालीन गृहमंत्री कै. आर.आर.पाटील यांच्यावर बॉंबस्फोटानंतर नेहमी विरोधी पक्ष ॲटॅक करायचा. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असतानाच कसाबला फाशी देण्यात आली. तुम्ही मात्र दहशतवादी आलमला सोडून दिले. जम्मू-काश्मीरमध्ये तुमच्याच सरकारची राजवट आहे. आपण भ्रष्टाचारमुक्त भारत, महाराष्ट्र अशा घोषणा दिल्या. परंतु सभापती महोदय, हे सरकार आल्यानतर 176 सरकारी कर्मचाऱ्यांवर एसीबीने खटले दाखल केले. त्यांचे गुन्हे सिध्द झाले आहेत. परंतु अजूनही त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. मुंबईवर बॉंबहल्ला झाल्यानंतर आमच्या आघाडी सरकारने रक्षणासाठी स्पीड बोटी घेतल्या. परंतु त्या स्पीड बोटींना शासनाकडून डिझेल दिले जात नाही. आमचे सरकार असताना इस्टर्न फ्री वे झाला. आम्ही एकही टोल नाका त्यावर सुरू केलेला नाही. एखादा माणूस चेंबूरपासून मंत्रालयापर्यंत 20 मिनिटात येतो. आम्ही त्यावेळी एकाही माणसला बेघर केलेले नाही. आम्ही उड्डापणूल सुरू केला. तुमचाच रिपोर्ट सांगतो की, नवीन सरकार आल्यानंतर राज्य रस्ते विकास महामंडळाकडून अजून एकाही नवीन प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवलेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) TT.5

MSK/ पूर्वी श्री. बोर्डे 18:40

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री. अनंत गाडगीळ ....

सभापती महोदय, 1976 साली मुंबईचा डीपी आला. त्यावेळी एफएसआय वाढविण्याचा निर्णय घेतला. परंतु त्यावेळी विरोधी पक्षाने विरोध केला. आज तर दादरमध्ये 8 एफएसआय प्रस्तावित करीत आहेत. तेथे माणसाला हलण्यास जागा नाही आणि तुम्ही 8 एफएसआय प्रस्तावित करीत आहात. परंतु त्याचा साधा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही. महागाई कमी करणार आहोत असे सांगितले गेले, गरिबाला घरे देणार आहोत असे सांगितले. परंतु इतिहासामध्ये रेडिरेकनरचा रेट 15 टक्के असा तुमचे सरकार आल्यानंतर वाढला आहे. आमच्या पुण्यामध्ये रेडिरेकनरप्रमाणे 10 हजार रुपयांचा रेट 20 हजार झाला आहे. मघाशी विजेच्या संदर्भात सांगण्यात आले. मी तुम्हाला हे सरकार आल्यानंतर मुंबईमध्ये विजेची वाढ किती झाली हे सांगतो. मुंबईमध्ये 0 ते 100 युनिटसाठी 10 टक्के वाढ झाली आहे, 100 ते 300 युनिटसाठी 16 टक्के वाढ झाली आहे, 300 ते 500 युनिटसाठी 40 टक्के वाढ झाली आहे, 500 युनिटसाठी 34 टक्के वाढ झाली आहे. या सरकारचा फ्यूज गेला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असताना विजेच्या दरात एवढी वाढ कधीही झालेली नाही.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ.....

सभापती महोदय, गंमत अशी आहे की, आता सत्तारूढ पक्षात असलेले सन्माननीय सदस्य आमचे सरकार असताना सीसीटीव्ही का लावले नाहीत, या संबंधीची ओरड करीत असत. महिन्याभरात, दोन महिन्यात सीसीटीव्ही कॅमेरे लावले पाहिजेत, असाही आग्रह त्यांच्याकडून धरला जायचा. त्यावेळची विरोधी पक्ष सदस्यांची भाषणे मी वाचली आहेत. ज्यांनी आमच्या सरकारकडून 90 दिवसात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची अपेक्षा व्यक्त केली होती त्यांनीच आता सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी 90 आठवड्यांचा कालावधी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून मागून घेतला आहे, याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, नवी मुंबई विमानतळाचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आहे. आजच वर्तमानपत्रात बातमी आली आहे की, पुण्याच्या सरदार बिवलकर यांच्या 157 एकर जागेचा वाद अद्याप मिटलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात स्थगिती दिलेली आहे. ज्या ठिकाणी नवी मुंबईचा विमानतळ होणार आहे, त्या विमानतळाच्या धावपट्टीसाठी निश्चित केलेली महत्त्वाची जागा सरदार बिवलकर यांची आहे. जर धावपट्टीच तयार झाली नाही तर या सरकारचे विमान आकाशात झेपावणार कोठून आणि आकाशातून उतरणार कोठे, हा प्रश्न आमच्या सारख्याच्या मनात निर्माण होत आहे. राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये ज्या नवी मुंबईच्या विमातळाबाबत उल्लेख आहे, त्या विमातळाच्या जागेच्या हक्काचा प्रश्न अद्याप सुटलेला नसल्याने मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, हे सरकार हार्टलेस आहे. याचे कारण असे आहे की, ह्रदयावरील शस्त्रक्रियेसाठी अत्यावश्यक साहित्य खरेदी कशामधून करायची याचाच निर्णय अद्याप या शासनाने घेतलेला नाही. त्यामुळे राज्यातील सर्व रुग्णालयांमधील ह्रदय शस्त्रक्रिया थांबलेल्या आहेत. या संदर्भातील कोणताही उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार अभियानाची घोषणा या सरकारने केली आहे. मराठवाड्यातील 71 ते 76 तालुक्यांमधील पाण्याची पातळी सरासरी 1 ते 4 मीटरने खाली गेलेली आहे. पिण्याच्या पाण्याची पातळी खाली गेलेलीच आहे, पण लोकांच्या मनामधील या सरकारकडून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ.....

असलेल्या अपेक्षांची पातळी देखील उतरंडीला लागलेली आहे. एवढेच सांगतो आणि राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) :सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी आणि या भाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यात नव्याने सरकार आले ते अगोदर भारतीय जनता पक्षाचे आणि नंतर शिवसेनेबरोबरचे. शिवसेनेचा या सरकारमधील वाटा किती आहे, हे मला माहीत नाही. परंतु, या नवीन सरकारचा अजेंडा हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आहे, हे मात्र सरकारने राज्यपालांच्या अभिभाषणामधून सुरुवातीलाच स्पष्ट केले आहे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाच्या सुरुवातीलाच 19 वर्षापूर्वी युती सरकार असताना गोवंश हत्या बंदीबाबतचे बिल पास झाल्याबद्दलचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे. मला खेद वाटतो की, जो महाराष्ट्र बळीराजाचा महाराष्ट्र, शेतकऱ्याचा महाराष्ट्र म्हणून ओळखला जायचा त्याच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर निरुपयोगी असलेली, नको असलेली जनावरे लादून त्यांना संकटात टाकण्यासाठी, विदर्भातील आणि मराठवाड्यातील शेतकरी त्रस्त असताना त्यांना आणखी संकटात टाकण्यासाठी 19 वर्षापूर्वीचे बिल राष्ट्रपती महोदयांकडून मंजूर करून आणण्याचा उद्योग या नव्या सरकारने केला आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील बोलत असताना सभागृहाच्या नेत्यांनी, सन्माननीय महसूल मंत्र्यांनी असे सांगितले की, "मांस खाण्यावर बंदी नाही." पण कोणतेही मोठे जनावर कापायचे नाही तर मग मांस मिळणार कोठून ? सत्तारूढ पक्षाचे मुंबईचे अध्यक्ष सर्व मुंबईभर असा फलक लावतात की, "गोहत्या बंदी केल्याबद्दल सरकारचे अभिनंदन, प्राणीमात्रांवर दया करा." मला असे विचारावयाचे आहे की, गोहत्या बंदी तुम्ही केली का ? तुमचा काय संबंध आहे ? या राज्यामध्ये सन 1976 मध्ये गोहत्या बंदी आली, ती तुम्ही केलेली नाही. त्यामुळे गोहत्या बंदीचे क्रेडिट तुम्हाला कधीही घेता येणार नाही. ज्या राजकीय हिंदुत्त्वाचे तुम्ही वारसदार आहात, त्या राजकीय हिंदुत्वाचे जनक स्वातंत्र्यवीर सावरकर गोहत्येचे पुरस्कर्ते होते, गोहत्या बंदीचे नाही. "गाय ही उपयुक्त पशू आहे आणि तिचे मांस खाण्यास हरकत नाही", असे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे म्हणणे होते आणि पुढे जाऊन ते असे म्हणतात की, "ईश्वराचे सर्व अवतार गायीमध्ये आहेत म्हणून गाय पूजनीय मानायची तर साक्षात ईश्वराने म्हणजे विष्णूने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.....

पहिल्यांदा वराह अवतार घेतला असल्याने आपण डुक्करपूजा सुरु करायची का ?" यांचे प्रेरणास्थान असलेले राजकीय हिंदुत्त्वाचे जनक स्वातंत्र्यवीर सावरकर, असे म्हणतात. मी काही सावरकरवादी नाही. त्यामुळे मला ते बिलकूल मान्य नाही. मी गायीला गोमाता मानणारा माणूस आहे. कारण, मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. गायीच्या हत्येला बंदी आहे. गायीचे मांस खा, असे म्हणणारा मी माणूस नाही. यज्ञामध्ये गायीची हत्या करा, असे मानणाराही मी नाही. या देशामध्ये पहिली गोहत्या बंदी बाबराने केली. "या देशामध्ये राज्य करायचे असेल तर येथील श्रध्दा जपल्या पाहिजेत आणि येथील बहुसंख्य लोक गायीला गोमाता मानतात म्हणून गायीला मारु नका," असा पहिला फतवा बाबराने काढला होता. महाराष्ट्राच्या अगोदर जम्मू आणि काश्मिर हे असे पहिले राज्य आहे की, ज्या ठिकाणी गोहत्या बंदी आहे, त्या ठिकाणी गाय कोठेही कापली जात नाही आणि तरी तुम्ही असा दावा करता की, गाय कापण्याला आम्ही विरोध केला आणि गोहत्येवर बंदी घातली ? प्राणीमात्रांवर दया करण्यासाठी बंदी घातली, असा खोटा दावा तुम्ही का करता ?

सभापती महोदय, 19 वर्षापूर्वी आपल्या राज्याच्या दोन्ही सभागृहांनी गोवंश हत्या बंदीचे बिल पास केले. गोवंश हत्याबंदीचे म्हणजे 'वळू' आणि 'बैल' यांच्या हत्येचे. वळू आणि बैलाला कोणत्याही देवाचा अवतार मानला जात नाही. कोणत्याही धर्मामध्ये हे प्राणी पूजनीय मानले जात नाहीत. निरुपयोगी असलेली जनावरे शेतकरी स्वत:हून कत्तलखान्याला विकतो. कारण, अन्य कोणत्याही कामासाठी ती जनावरे उपयोगी नसतात आणि ती विकल्यानंतर शेतकऱ्याला पैसे मिळतात. परंतु, निरुपयोगी झाल्यानंतरही त्या जनावरांना गोठ्यामध्ये ठेवले तर त्यांच्यासाठी वैरण लागते, चारा लागतो आणि तो खर्च शेतकऱ्याला परवडत नाही. आज आपल्याला दुष्काळामध्ये चारा पुरवावा लागतो, गुराढोरांसाठी कॅम्प लावावे लागतात आणि त्याच शेतकऱ्याला तुम्ही सांगणार की, जनावर विकायचे नाही. त्यांची व्यवस्था तुम्ही करणार आहात का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.....

सभापती महोदय, मोठ्या जनावराचे मांस कोण खाते ? तुम्ही एका धर्माकडे बोट दाखवून, फक्त मुसलमान मांस खातात म्हणून ज्या पाट्या मुंबईभर लावलेल्या आहेत, त्या खोटा संदेश देणाऱ्या आहेत. कारण, बहुसंख्य गरीब हिंदू मागासवर्गीय, हिंदू दलितांमधील मोठा समाज, आदिवासींमधील मोठा समाज मोठ्या जनावराचे मांस खातो. कारण ते स्वस्त असते आणि प्रोटिनसाठी सर्वात चांगला सोर्स मोठ्या जनावराचे मांस हे आहे. बोकडाचे मांस त्यांना परवडत नाही. तुम्ही सातारा, कोल्हापूरात जा, बहुजन वर्गामध्ये देखील मोठ्या जनावराचे मांस खातात. जो नेपाळ एकमेव हिंदू देश मानला जायचा, त्या नेपाळचा राजा अजूनही, अगदी काल परवा पर्यंत भारतात काशी, वाराणशीला यायचा आणि रेडे, वळू, गायी कापून जायचा. तुम्हीच त्याचे स्वागत करायचात. कारण, त्यांच्या धर्माचा तो भाग आहे. एकमेव, तथाकथित, त्यावेळच्या हिंदू राष्ट्राच्या राजाने भारतामध्ये येऊन हजारएक गायी, वळू, रेडे कापले आणि तुम्ही ते पुरविले. आम्ही त्याचे समर्थन करणार नाही.

सभापती महोदय, अनेक ठिकाणी देवीसमोर रेडा कापावा लागतो. त्याचे काय करायचे ? जर तुम्ही एवढ्या सर्व धर्मपरंपरांना मानता तर त्या धर्मपरंपरांचे काय करायचे ? त्या ठिकाणी तुम्ही मान्य करीत नाही. मघाशी मंत्री महोदयांनी सांगितले की, "मांस खाण्याला बंदी नाही." त्यावेळच्या बिलातील कलम 5 (क) मध्ये असे म्हटले आहे की, "अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही व्यक्तिला या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कत्तल केलेल्या कोणत्याही वळूचे आणि बैलाचे मांस स्वतःच्या ताब्यात ठेवता येणार नाही." सन 1976 च्या कायद्यात गायीचाही उल्लेख होता. तुम्ही दुरुस्ती सुचविलेला उल्लेख असा आहे की, "वळूचे आणि बैलाचे मांस स्वतःच्या ताब्यात ठेवता येणार नाही." ताब्यात ठेवता येणार नाही म्हणजे विकता येणार नाही आणि म्हणून खाताही येणार नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

खोटे बोल पण रेटून बोल हीच या लोकांची परंपरा आहे. माझ्या मताशी मंत्री महोदय श्री.गिरीष बापट देखील सहमत होतील कारण ते माझे भाषण मनापासून ऐकत आहेत. संविधानाने जे स्वातंत्र्य दिले ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. गोवंश हत्या बंदी हे विधेयक असंविधानिक आहे. 19 वर्षापासून कोणत्याही राष्ट्रपती महोदयांनी या विधेयकावर सही केली नाही. आता केंद्रात व राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यामुळे राष्ट्रपतींना या विधेयकावर सही करावी लागली आहे. 19 वर्षात काही झाले नसताना आता अचानक अशी कोणती परिस्थिती उद्भवली की, या विधेयकावर तातडीने सही करावी लागली, या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. ज्या शेतकऱ्यांचा उल्लेख आपण सर्व गौरवाने करतो त्यांच्यावर सरकारने आत्महत्या करण्याची पाळी आणली आहे. चर्मकार समाजाला मोठ्या जनावरांच्या कत्तलीनंतर उद्योगधंदा करण्यासाठी चामडे मिळत होते, आता त्यांना चामडे मिळत नाही, ते लोक चामडे कोठून आणतील. ते आता ऑस्ट्रेलियातून चामडे आणणार काय ? सरकारच्या धोरणामुळे परदेशी निर्यात होत असून भारतात त्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत नाही. भारतात गोवंश हत्या बंदी झाल्याशिवाय बाहेरील मालाला भारतात बाजारपेठ मिळणार नाही, म्हणून येथे गोवंश हत्या बंदी करायची व तेथील चामडे आणि मांस भारतात पाठविण्याचे काम केले जाते. हे सरकार परदेशी भांडवलदारासाठी येथील चर्मकार समाजाला जो बहुसंख्येने हिंदू आहे, त्याच्या पोटावर आपण पाय आणत आहे. येथील सर्व मोठ्या जनावरांचे केस, हाडे व शिंगांचे काही तरी बनते. आता जी साखर तयार होते तिला पांढरा रंग येण्यासाठी मोठ्या जनावराच्या हाडाची पावडर त्यात वापरली जाते, त्याशिवाय साखर पांढरी होत नाही. या सर्व बाबींबर आता बंदी घालण्यात आली आहे. भारतात हा उद्योग उभा राहिला होता. भारत कृषी प्रधान देश आहे. या देशातील गरीब नागरिकांना हे सरकार भिकेला लावीत आहे. हे सरकार अभिमानाने सांगते की, हा कायदा आम्ही चर्मकार व शेतकऱ्यांसाठी केला आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, मला असे वाटले होते की, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि जुन्या चळवळीतील माझे मित्र श्री.महादेव जानकर भारतीय जनता पक्षासोबत आल्यानंतर ते त्यांचा विचार येथे घेऊन आले असतील. मराठा, धनगर व मुस्लिम यांना आरक्षण मिळेल, असे मला वाटले होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर त्यांच्यासोबत आल्यानंतर हे सरकार धनगर आरक्षणाबाबत वेगाने पावले उचलेल असे वाटले होते. परंतु यासंदर्भातील पावले सरकारकडून उचलताना अजून तरी दिसून येत नाही. या लोकांना आरक्षण मिळण्यासाठी किती वेळ वाट पहावी लागणार आहे ? यासाठी किती वेळा उपोषणे करावी लागणार आहेत ? माननीय मंत्री श्री.विष्णू सवरा यांनी जे सांगितले तेच सभागृहाच्या नेत्यांनी देखील सांगितले आहे. त्यांनी जे सांगितले आहे ते मी नाकारीत नाही. आता केंद्रात व राज्यात एकाच पक्षाची सत्ता असल्यामुळे आरक्षणाचा निर्णय घेण्यासाठी कोणतीही अडचण यावयास नको. मराठा आरक्षणाच्या संदर्भात या सरकारने जनतेला फसविले आहे. आरक्षणाचा मसुदा असा तयार करण्यात आला होता की, तो कोर्टात टिकणार नाही. मुस्लिम आरक्षणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितल्याप्रमाणे सुप्रीम कोर्टाची काहीही हरकत नव्हती. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता की, शिक्षणातील आरक्षण सुरु ठेवावे. मुस्लिम समाजातील मागासवर्गीय घटकाला आरक्षण मिळण्यासाठी संविधानाने अडचण नाही. संविधानानुसार फक्त धर्माच्या नावावर आरक्षण देता येत नाही. मुस्लिम समाजातील मागासवर्गाला आरक्षण देण्यामध्ये संविधान आडवे येत नाही, आपल्या राज्यात तसे आरक्षण आहे, त्याची व्याप्ती वाढवून प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता होती, परंतु हे काम देखील शासनाने केले नाही.

सभापती महोदय, 1995 मध्ये युती सरकार असताना श्री.शरद पवार व दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांनी त्यास मान्यता दिली होती. आताचे युती शासन आरक्षण रद्द करण्यास निघाले आहे. आता हे सरकार आल्याबरोबर हे आरक्षण कायमचे बासनात गुंडाळून ठेवण्यात आले. याचे आम्हाला दु:ख होत आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्याबद्दल आम्हाला अभिमान आहे. कारण ते मागासवर्गीय, दलित, भटक्या विमुक्त जाती, जमाती यांच्या चळवळीशी नाते सांगत होते व पक्षाचे बंधन झुगारून त्यांच्या पाठीमागे उभे राहत होते. आता या सरकारवर कोणाचे दडपण आहे, कोणाचे बंधन आहे ? नागपूर येथून आदेश येत असतील तर असाच प्रकार होईल, ती एक अडचण असू शकेल.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात असे नमूद केले आहे की, सातवी ते बारावीपर्यंत रोजगाराभिमुख शिक्षण देण्यात येणार आहे. अकरावी व बारावी हा व्यावसायिक शिक्षण देण्याचा पाया आहे. तेथे करिअर निश्चित केले जाते. आता हे शिक्षण देण्यास सातवी पासून सुरुवात करण्यात येणार. आता आठवीपर्यंत मोफत शिक्षणाचा कायदा केला असून गरीब व बहुजन वर्गाने 9 वी 10 वी पर्यंतचे शिक्षण घेऊन नोकरीला लागायचे, सायकलची दुरुस्ती करायची, मोबाईलची दुरुस्ती करायची, पुढचे शिकायचे नाही, म्हणून रोजगाराभिमुख शिक्षण आणले जात आहे. सातवी ते दहावी पर्यंत रोजगाराचे शिक्षण नसते. अकरावी व बारावीसाठी रोजगाराचे शिक्षण आम्हाला मान्य आहे. दहावी पर्यंतचे शिक्षण हे माणूस बनण्यासाठी असते. बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलून ते ज्या वर्णातील आहेत, त्या वर्णाने दिलेले काम करण्यासाठी त्यांना आता रोजगाराभिमुख शिक्षण म्हणजे तांत्रिक शिक्षण देण्याचा घाट घातला जात आहे. आपल्या देशातील वर्णाश्रम व्यवस्थेने शिक्षणाचा क्रम आखून दिलेला आहे. त्या पध्दतीने येथे उल्लेख करण्यात आलेला आहे, याचा मला खेद वाटतो.

सभापती महोदय, नवीन सरकार आल्यावर मला असे वाटले होते की, आरे कॉलनी वाचेल. सभागृहाचे नेते म्हणाले होते की, एक इंच देखील जमीन देणार नाही. त्यांच्या हिंमतीचे मी स्वागत करतो. परंतु सरकारकडे आता जमीन कोठे आहे ? 22 ऑगस्ट 2014 रोजी ही जमीन एमएमआरडीएकडून रिलायन्सच्या ताब्यात दिलेली आहे. हा करार मोडून ही जमीन परत आणण्याची हिंमत सरकार दाखविणार आहे काय ? हे सरकारने सांगितले पाहिजे याबाबत सरकार बोलण्यास तयार नाही.

सभापती महोदय, डीपी महानगरपालिकेने जाहीर केला आहे. तेथे शिवसेना व भारतीय जनता पक्ष सत्तेवर आहे. डीपी केराच्या टोपलीत टाका असे त्यांचे नेते म्हणतात. हा डीपी वाईट असेल तर तसा प्लॅन कोणी तयार केला आहे ? संपूर्ण मुंबई बड्या भांडवलदारांच्या खिशात घालण्याचा हा डाव आहे.... अडथळा... दादर आणि गिरगांव येथे सहा एफएसआय देण्यात येईल, असे बोर्ड लावले आहेत, आता दोन एफएसआय असताना मुंबईत चालण्यासाठी जागा नाही. मुंबईत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. मुंबईत चालण्यासाठी जागा नसताना दादर येथे मोठ्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

जाहिराती लागलेल्या आहेत. कोहिनूर मध्ये एकदम स्वस्तात म्हणजे अडीच कोटी रुपयांत घर मिळेल. आता त्या घराची किंमत पाच कोटी रुपये झाली असावी, असे मला वाटते. हा प्लॅन मंजूर केला तर मुंबईतील घरांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढतील. जेव्हा जेव्हा एफएसआयमध्ये वाढ करण्यात आली, तेव्हा सामान्य माणसाला घर मिळाले नाही. मुंबईत व मंत्रालयात येणारा कर्मचारी वसई, विरार, पालघर, डहाणू , कर्जत, कसारा येथून येतो. पनवेलच्या पलीकडे जाऊन तो घर घेत आहे. मुंबईत त्याला घर घेणे परवडत नाही. या लोकांनी दादर, गिरगांव ही शहरे कधीच सोडली आहेत. त्या लोकांना आता गिरगांव, चेंबूर, नवी मुंबईला देखील घर घेता येत नाही. मिरा-भाईंदरला देखील घर घेता येत नाही. त्या माणसांना कर्जत, कसारा येथे घर घ्यावे लागते, पालघर येथील घरांचे भाव देखील खूप वाढले आहेत. सामान्य नोकरदार माणूस आता घर घेऊ शकत नाही. मग गरीब माणूस घर कसे घेणार ? ज्या पध्दतीने डीपी तयार करण्यात आला आहे, त्यामुळे मुंबईत आता मराठी माणसे राहिलीच नाहीत, कष्टकरी माणसे मुंबईत राहिली नाही. कष्टकरी व नोकरदार माणूस मुंबईत राहूच शकत नाही. आपण म्हणत आहात की, मुंबईतील मराठी माणूस आम्ही वाचवू. यांना तुम्ही कसे काय वाचवू शकणार ? सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब साहेब राज्य तुमचे आहे, तुम्हाला हिंमतीने उभे रहावे लागेल. राज्य मोडले तरी चालेल पण मराठी माणूस वाचला पाहिजे, कष्टकरी माणूस वाचला पाहिजे. नोकरदार माणूस वाचला पाहिजे. राज्य मोडून ही हिंमत आपण दाखविणार आहात काय ? सत्तेच्या खुर्च्या उबवायच्या आणि डीपी केराच्या टोपलीत टाका म्हणून सांगून मराठी माणसाच्या नावाने राजकारण करायचे आता थांबविले पाहिजे, पुढील काळात हे चालणार नाही. मराठी माणूस मुंबईतून बाहेर काढण्याचे काम डीपी व आरे कॉलनीच्या जमिनीच्या माध्यमातून हे शासन करीत आहे. शासनाच्या व तुमच्या आमच्या मालकीची जमीन मुंबईत कोठे आहे ? म्हाडाची घरे आता महाग झाली आहेत, म्हाडाची घरे शासनाने ठरविले तर पाच लाख रुपयांत देता येऊ शकतील. म्हाडाच्या घरांचा रेट ज्या पध्दतीने आखला जातो ती पध्दत बंद करण्याची आवश्यकता आहे. ही हिंमत शासन करणार आहे काय ? शासनाने ठरविले तर मंत्रालयातील नोकरदार, शिक्षकवर्गाला व महानगरपालिकेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

काम करणाऱ्या माणसाला दहा लाख रुपयांत टू बीएचके किंवा वन बीएचके पाच लाख रुपयांत मिळू शकेल, कारण बांधकामाचा खर्च जास्त नाही. (नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.....

कितीही संगमरवर लावले तरी अडीच ते तीन हजार रुपये स्क्वेअर फुटापेक्षा जास्त भाव होत नाहीत. जमिनी कोणाच्या आहेत ? कष्टकऱ्यांच्या जमिनी तुम्ही मोठे भांडवलदार आणि बिल्डरांच्या घशात घालणार आणि त्यांनी मोठ्या प्रमाणावर घरबांधणी केल्यानंतर आपण सांगणार की, एवढी घरे बांधली गेली. परंतु, ती घरे मोठ्या लोकांच्याच ताब्यात गेली.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एक घोषणा करण्यात आलेली आहे. मुंबईमध्ये राष्ट्रीय विधी महाविद्यालय होणार आहे. आम्ही त्याचे स्वागत करतो. परंतु ती युनिव्हर्सिटी कोठे स्थापन होणार आहे, ती युनिव्हर्सिटी इस्माईल युसूफ कॉलेजच्या कॅम्पसमध्ये स्थापन होणार आहे. इस्माईल युसूफ साहेबांनी अल्पसंख्याक समुदायाचे शिक्षण नीट व्हावे आणि केवळ अल्पसंख्याक समुदायाचेच नाही तर त्यांच्या सोबत इतरांचे देखील शिक्षण व्यवस्थित व्हावे म्हणून शासनाला जागा डोनेट केली. त्याचे बांधकाम कसे असावे, ट्रस्ट कसे असावे, कशा पद्धतीने काम करावे, या सर्व बाबींची आखणी केली गेली. परंतु, आज ते सर्व केरात गेलेले आहे. मुस्लिम समाजाची मागणी आहे की, ज्या उद्देशाने इस्माईल युसूफ साहेबांनी जागा डोनेट केलेली आहे तो उद्देश साध्य झाला पाहिजे. ती वक्फ बोर्डाची, औकाफची जमीन आहे. त्या पद्धतीने तुम्ही नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी स्थापन करावी. ज्या प्रमाणे अलिगढ युनिव्हर्सिटी स्थापन झाली त्या प्रमाणे तुम्ही नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी स्थापन करावी. अल्पसंख्याक युनिव्हर्सिटी केवळ मुस्लिमांसाठी होती असे नाही. त्यातील 50 टक्के जागा इतर समाजाला देखील मिळू शकतात. अलिगढ युनिव्हर्सिटीतील पहिला ग्रॅज्युएट हिंदू राजा होता. आपण दोन्ही समाजाला बरोबर घेतले पाहिजे. परंतु जो सर्वात मागे पडलेला मुस्लिम समाज आहे, त्या समाजाला शिक्षणाच्या अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याऐवजी तुम्ही त्यांच्याच जागेत शिरून तेथे नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी स्थापन करणार आहात. मुंबई विद्यापीठाची जागा आहे. तेथे 350 कॅम्पस मोकळे आहेत. तेथे अनेक लोक आतमध्ये घुसलेले आहेत. त्यांना तेथून बाहेर काढावे. तेथे जे पैसेवाले लोक घुसलेले आहेत, त्यांना तेथून बाहेर काढावे. गोराई येथे मोकळी जागा आहे. एमएमआरडीएची बरीच जागा मोकळी आहे. ती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.....

जागा ताब्यात घ्यावी आणि तेथे युनिव्हर्सिटी स्थापन करावी. परंतु दुसऱ्यांच्या संस्थेत घुसायचे आणि ही सर्व जागा आमचीच आहे असे म्हणायचे, हा कोणता उद्योग आहे ?

सभापती महोदय, मी मघाशी म्हणालो, त्या प्रमाणे नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर तुमचा जो छुपा अजेंडा आहे तो आता बाहेर येऊ लागला आहे. मला अपेक्षा नव्हती. परंतु तुम्ही कॉ.पानसरे यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहात शोक प्रस्ताव मांडला, त्याबद्दल आम्ही तुमचे आभार मानतो. प्रश्न असा आहे की, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचे खुनी सापडले नाहीत आणि कॉ.पानसरे यांचे खुनी आता सापडणार नाहीत. आम्हाला आता अशी भीती वाटू लागली आहे की, ज्या नथुरामी शक्तीला पायबंद घालण्याची अपेक्षा आम्ही शासनाकडून करीत होतो त्या नथुरामी शक्तींना पायबंद घालणे तर दूरच राहिले, त्यांना ताकद देण्याचे काम नवीन सरकार आल्यानंतर सुरु झालेले आहे, याचा मला खेद वाटतो. या नवीन सरकारने सांगावे की, आम्ही नथुरामच्या बाजूने आहोत की नाही ? ज्यांनी महात्मा गांधींचा खून केला, त्यांनी डॉ.दाभोळकरांचा बळी घेतला, त्यांनीच कॉ.पानसरेंचा बळी घेतलेला आहे. आणखी किती बळी तुम्हाला हवे आहेत आणि खबरदार यापुढे त्यांना मदत करणार असाल आणि बळी घेणार असाल तर, तुम्ही सांगावे आणि तुम्ही सांगणार नसाल तर तुम्हालाही सत्तेवरून खाली खेचण्यासाठी जनता उद्या मागे हटणार नाही, एवढेच सांगतो आणि थांबतो.

धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाद्दल शासनाचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला आज खूपच आनंद झाला आणि त्याचे कारण असे आहे की, आमचे ज्येष्ठ मित्र सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी त्यांच्या भाषणात जवळपास सात ते आठ वेळा फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेतले. आपण अगोदर देखील फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेत होता. परंतु आज त्यांनी जास्त वेळा फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेतले, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचा निर्णय युती शासनाने घेतला होता. त्यानंतर 15 वर्षे मी प्रत्येक अभिभाषणात ऐकत आलो की, आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणार आहोत, ते स्मारक अशा प्रकारे करणार आहोत, तशा प्रकारे करणार आहोत. आज कोणत्या तरी सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा उल्लेख नाही. मी सांगू इच्छितो की, मागील 15-20 वर्षात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक झाले नाही. आता सत्तेवर आलेल्या आमच्या शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या मिळविलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे त्या समितीचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली लवकरात लवकर माननीय पंतप्रधानांची तारीख मिळाल्यानंतर त्या स्मारकाचा भूमिपूजन समारंभ होईल, याची मला खात्री आहे. आमच्या शासनाने केलेले हे चांगले काम आहे.

सभापती महोदय, मी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाविषयी माहिती देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेब, आम्ही प्रत्येक वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाविषयी ऐकत होतो, काही वेळा प्रिंटींग मिस्टेक होत होती आणि ते स्मारकाचे काम मार्गी लागत नव्हते. आघाडी शासनाने राज्यात आणि दिल्लीत त्यांच्या पक्षाचे शासन असून देखील स्मारकासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या परवानग्या, जमिनीचे हस्तांतरण किंवा इतर परवानग्या घेतल्या नव्हत्या. निवडणुकीच्या वेळी भाषणांमध्ये फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घ्यायचे. परंतु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.....

ज्यावेळी त्यांचे स्मारक उभारण्याचा विषय येतो त्यावेळी मात्र मागे राहावयाचे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमच्या शासनाने इंदू मिलच्या जागेवर परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेतलेल्या आहेत आणि जमिनीचे हस्तांतरण देखील झालेले आहे. कदाचित, 14 एप्रिल पर्यंत या स्मारकाचे भूमिपूजन देखील होईल.

सभापती महोदय, सभागृहात मुस्लिम आरक्षण आणि इतर विषय देखील उपस्थित करण्यात आले. मागील 50-60 वर्षात केवळ मतांच्या राजकारणासाठी त्या समाजाकडे पाहिले गेले. मागील 40-50 वर्षात हा समाज त्यांची चहाची टपरी आणि टायर दुरुस्तीचे दुकान याच्या पलीकडे गेला नव्हता. आपण त्यांना केवळ मतांचे बुजगावणे दाखविले. नथुराम जिवंत केल्याशिवाय हे राहणारच नाहीत, असे यांना वाटते. यांना आता नथुराम विषयीच बोलत राहावे लागेल. तुम्ही मुस्लिमांना याच विचाराची भीती दाखवून त्यांची मते मिळविली. मागील 50 वर्षात चहाची टपरी आणि टायरचे दुकान सोडून हा अल्पसंख्याक समाज पुढे जावयास पाहिजे होता. परंतु तो समाज यापुढे जाऊ शकला नाही, हे या देशाचे दुर्दैव आहे आणि म्हणूनच या दोन समाजामध्ये दरी राहिली. आपण सांगितले की, मुस्लिम समाजाला काहीच मिळत नाही. मागासवर्गीय मुस्लिम समाजाला काहीच मिळत नाही. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, मी सामाजिक न्याय विभागाचा राज्यमंत्री होतो. त्यावेळी मुस्लिम ओबीसी समाज, मग त्यामध्ये बागवान असेल, खाटीक असेल म्हणजे तो एससी आहे. मागील 15-20 वर्षापासून आपण मुस्लिम समाजातील जे मागासवर्गीय, ओबीसी, एससी, एसटी आहेत या सर्वांना आरक्षण देतो. एवढेच नव्हे तर या समाजाचे लोक निवडणूक देखील लढवितात. मुंबई महानगरपालिकेत अल्पसंख्याक ओबीसी समाजाचे जवळपास 10 ते 20 नगरसेवक आहेत. युती शासनाने हे आरक्षण दिल्यानंतर तुम्ही देखील अनेक वर्षे त्यांना आरक्षण दिले. त्यांना शैक्षणिक आणि इतर सुविधा उपलब्ध करुन दिल्या. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, धर्मांवर आधारित आरक्षण देण्याचा विषय आला. प्रथम आंध्र प्रदेश शासनाने हा विषय मांडल्यावर त्यासाठी सुप्रीम कोर्टाने विरोध केला. आपण कोणतेही राजकीय भान न ठेवता केवळ प्रसिद्धीसाठी, मतांसाठी हे सर्व करतो आणि मग कोर्टात जातो. सन्माननीय सदस्य श्री.शरद

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.....

रणपिसे साहेब, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोणाला आरक्षण द्यावे हे त्यावेळीच सांगितलेले आहे. त्यांनी धर्मावर आधारित आरक्षण दिलेले नाही. इतर वेळी जे आरक्षण दिलेले आहे ते हिंदू धर्मातील जे मागास आहेत, ज्यांचा आपण उल्लेख केला, ज्यांना हजारो वर्षे वंचित ठेवलेले आहे, त्यांच्यासाठी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण ठेवलेले आहे. तुम्ही नंतरच्या काळात शंभर वेळा संपूर्ण घटना तोडीत, मोडीत काढलेली आहे. तुमच्या मनाला वाटले त्या प्रमाणे तुम्ही एक-एक समाजाचा त्यामध्ये समावेश केला आणि कोणताही सारासार विचार न करता मतांसाठी त्यांना आरक्षण दिले पाहिजे, असे सांगितले. त्यासाठी आयोग नेमावा लागतो. आयोग नेमून हा विषय त्या आयोगाकडे अभ्यासासाठी सोपवावा लागतो. आपण मराठा समाजाच्या आरक्षणाचे देखील असेच केले. त्यासाठी जी जी पूर्तता करावयास पाहिजे होती, ती आपण केली नाही आणि ती पूर्तता न केल्यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही, ते कोर्टात टिकू शकले नाही. आम्ही त्याही वेळी आपणाला सांगत होतो की, आपण एखाद्या आयोगाची नेमणूक करून या संदर्भातील सर्व पूर्तता करून आरक्षण द्यावे, तरच मराठा समाजाला न्याय आरक्षण मिळेल. परंतु निवडणुका जवळ आल्या होत्या. त्यामुळे तुम्हाला आरक्षण देण्याची घाई झाली होती. निवडणुकीच्या वेळी हा मुद्दा भाषणांमध्ये निघत होता. प्रत्येक जण त्याचे श्रेय घेत होता. या पक्षाने दिले, का त्या पक्षाने दिले ? मग त्यातून असे दिसले की, मराठा समाजाला देखील आरक्षण दिले नाही.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.मुंडे साहेब आता सभागृहात उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.राठोड साहेब सभागृहात उपस्थित आहेत. सन 2004 मध्ये ज्यावेळी पंढरपूर येथे मेळावा झाला त्यावेळी आपण आदरणीय श्री.अटलजींचे नाव घेतले. त्या मेळाव्याला मी देखील उपस्थित होतो. त्यावेळी आम्ही तिसऱ्या सूचीची मागणी केली आणि त्यावेळी तुम्हाला अध्यक्ष करण्याचे ठरले होते. परंतु त्यावेळी आदरणीय श्री.अटलजींचे सरकार गेले. रेणके आयोग स्थापन करण्यात आला. मागील अनेक वर्षापासून रेणके आयोगाने याचा अभ्यास केला. परंतु तुमच्या सरकारने जाता जाता रेणके आयोग रद्द केला. एससी आणि एसटीच्या आरक्षणाला हात न लावता रेणके आयोगाने केलेल्या शिफारशी तुम्ही मान्य केल्या असत्या तर धनगर समाज, बंजारा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.भाई गिरकर.....

समाज, वंजारी समाज तिसऱ्या सूचीमध्ये राहिला असता आणि समाजासमाजातील वाद, दरी वाढली नसती. हा विषय आल्यानंतर आदिवासी समाजाचे आमदार म्हणतात की, आदिवासी समाजाचे आरक्षण त्यांना देऊ नका.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.....

आपण 2004 पासून 2014 पर्यंत तिसरी सूची निर्माण केली नाही. ही तिसरी सूची आपण निर्माण केली असती तर भटका विमुक्त वंचित समाज आहे, वंजारा, बंजारा समाज आहे, ज्यांचे आपण मेळावे घेत होता, मी सुध्दा त्या मेळाव्याला हजर राहिलेलो आहे, तुम्ही सत्ताधारी पक्षात असताना सुध्दा काही करु शकला नाहीत. रेणके आयोग रद्द करण्यात आला आहे. केंद्र शासनाने आता इदाते समिती स्थापन केली आहे. महाराष्ट्रामध्ये युतीचे सरकार असताना एक समिती नेमली होती. त्या समितीने अनेक समाजाला न्याय दिला आहे. माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांना सांगू इच्छितो की, इदाते समिती सर्व उपेक्षित समाजाचा अभ्यास करेल आणि तिसऱ्या सूचीतून लवकरच तुमचा रखडलेला प्रश्न आहे, त्या धनगर समाजाला आरक्षण देण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आहे ते आश्वासन पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही अशी ग्वाही देतो.

सभापती महोदय, स्व.गोपीनाथ मुंडे यांचे यथोचित स्मारक औरंगाबाद येथे उभारण्याचा मनोदय व्यक्त केला गेला आहे. त्याचबरोबर ऊस तोड कामगारांसाठी मंडळ घटित करण्याचे ठरविले आहे. सफाई कामगारांच्या घराच्या प्रश्नाबद्दल मी सभागृहात मुद्दा मांडला होता. 4 एफएसआय मंजूर करुन 28 हजार सफाई कामगारांना घरे देण्याबाबत विनंती केली होती. त्याचबरोबर मुंबईतील पोलिसांच्या घरांबद्दल 4 एफएसआय मंजूर करण्यात यावा. सफाई कामगारांच्या घरासाठी कलम 33(7)(2) लागू करण्यात आला आहे. याच कलमाच्या आधारे पोलिसांना सुध्दा मालकी हक्काचे घर देण्याबाबत प्रयत्न करण्यात यावा अशी माझी शासनाला विनंती आहे. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना चांगली माहिती आहे. मुंबईतील अंधेरी परिसरामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी अंदाजे 20 हजार घरे बांधण्यात आलेली आहेत. ही घरे मोकळी असून ती शासनाने ताब्यात घेतली तर पोलीस कर्मचाऱ्यांना मोफत घरे देता येतील. पोलीस कर्मचारी त्या ठिकाणी राहू लागले तर त्यांच्या सेवा अधिक सक्षमपणे उपयोगात आणता येतील.

सभापती महोदय, वांद्रे येथे शासकीय कर्मचाऱ्यांची वसाहत आहे. त्या वसाहतीचा पुनर्विकास करण्यासाठी 4 एफएसआय मंजूर केला तर तेथील कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे देता येतील. 1995 पूर्वी जे मुंबईमध्ये आले, फुटपाथवर ज्यांनी अतिक्रमण केले त्यांना मोफत मालकी हक्काचे घर मिळाले. परंतु वर्षानुवर्षे मुंबईत राहणारे सफाई कर्मचारी, पोलीस कर्मचारी,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर...

सरकारी कर्मचारी यांच्या घराचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने परवडणाऱ्या घरांची योजना राबवावी अशी मी शासनाला विनंती करतो. शासनाने अल्पसंख्य समाजाला शैक्षणिक सुविधा देण्यासाठी वसतिगृहाची योजना आणली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आज गोवा राज्य केवळ पर्यटनाच्या व्यवसायावर आपली आर्थिक वाटचाल करीत आहे. गोवा राज्यापेक्षा सुंदर समुद्र किनारे सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयांमध्ये आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयाचे क्षेत्रफळ गोवा राज्यापेक्षा 3 पटीने अधिक आहे. असे असूनही सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटनाच्या विषयाकडे तेवढे गांभीर्याने पाहिले जात नाही. गोवा राज्याने पर्यटनाच्या दृष्टीने पायाभूत सोयी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. आपल्याकडे मुंबई-गोवा महामार्गावरील वडखळ ते पेण पर्यंतचा 20 कि.मी.अंतराचा रस्ता गेली 7-8 वर्षे अपूर्णावस्थेत आहे. मुंबई-गोवा महामार्ग केंद्र शासनाच्या मदतीने येत्या दोन वर्षात संपूर्णपणे सिमेंटचा करण्याचे प्रस्तावित केले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, कोकणामध्ये सागरी महामार्ग झाला तर पर्यटन क्षेत्राचा चांगल्याप्रकारे विकास होऊ शकतो. पर्यटनाला प्राधान्य दिले तर कोकणाची आर्थिक सुधारणा होईल. कोकणाचा विकास होईल. केवळ कोकण नव्हे तर विदर्भ, मराठवाडा आदी भागामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने लक्ष दिले तर स्थानिक लोकांचे उत्पन्न वाढेल, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळेल. म्हणून पर्यटनाला अधिक प्राधान्य दिल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार मांडण्यासाठी व समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आतापर्यंत माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणातून अनेक मुद्दे मांडले गेले आहेत. मी कोणत्याही मुद्याची पुनरावृत्ती न करता माझे विचार मांडणार आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे शासन पुढील वर्षभराच्या काळात काय करणार आहे, कोणते धोरण राबविणार आहे याचे प्रतिबिंब असते. माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मुंबईच्या इंदू मिलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारले जाणार आहे. लंडनमधील डॉ.बाबासाहेबांचे घर विकत घेण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने तयारी दर्शविली त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शासनाने स्व.गोपीनाथ मुंडे यांचे औरंगाबाद येथे यथोचित स्मारक उभारण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने मी शासनाला विनंती करु इच्छितो की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे महाराष्ट्राच्या जनतेवर अतोनात प्रेम होते व महाराष्ट्राच्या जनतेचे सुध्दा त्यांच्यावर प्रेम होते. त्यांच्या स्मारकाबाबतची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या दिवशी उचित स्मारक होईल असे सांगण्यात आले होते. या स्मारकाच्या अनुषंगाने जी समिती नेमली आहे त्या समितीने हे स्मारक कुठे उभारावे, कसे उभारावे याबाबत धोरण निश्चित करुन निर्णय घ्यावा. महाराष्ट्राची जनता या स्मारकाची आतुरतेने वाट पहात आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये मराठी भाषा भवन उभारण्याचा विषय हा अतिशय जिव्हाळ्याचा आहे. शासनाने मराठी भाषा भवन उभारण्याचे निश्चित केले आहे. या विषयाची लवकरात लवकर पूर्तता व्हावी अशी मराठी माणसांची इच्छा आहे. हे मराठी भाषा भवन केव्हापर्यंत उभारले जाईल, याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला स्पष्टीकरण द्यावे अशी मी विनंती करतो. यापूर्वी अनेक वक्त्यांनी सांगितले की, मुंबईमध्ये मराठी माणूस टिकला पाहिजे. तो मुंबईच्या बाहेर फेकला जाता कामा नये. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी परवडणारी घरे देण्यासाठी एफएसआय किती देणार, कसा देणार याबाबतचा मुद्दा मांडला आहे. परवडणाऱ्या घरांबाबत म्हाडाचे धोरण तयार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब.....

होत आहे. 1 मे या दिवशी पुनर्विकासाचे आणि एकूण गृहनिर्माण क्षेत्राबाबतचे धोरण जाहीर केले जाणार आहे. त्या धोरणामध्ये म्हाडाच्या वसाहती, सरकारी वसाहती, पोलीस वसाहती, बीडीडी व बीआयटी चाळींचा अंतर्भाव करून धोरण जाहीर झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये म्हाडाच्या 56 वसाहती आहेत. मागील 15 वर्षाच्या काळातील चुकीच्या धोरणामुळे या वसाहतींचा पुनर्विकास रखडला आहे. या वसाहतीतील इमारती कोणत्याही क्षणी कोसळतील अशी अवस्था निर्माण झालेली आहे. तेथील इमारतीमध्ये राहणारे नागरिक आपला जीव मुठीत घेऊन जगत आहेत. आतापर्यंत शासनाचे पुनर्विकासाचे धोरण लालफितीमध्ये अडकले होते. शासनाच्या धोरणाबद्दल आम्ही दुरुस्ती सुचविली आहे. ज्याच्यामुळे पुनर्विकासाचे धोरण पुन्हा एकदा खुले होईल. 1 मे रोजी जाहीर होणारे धोरण हे सुस्पष्ट असेल व ते महाराष्ट्राला आणि मुंबईतील जनतेला लागू होईल अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, सरकारी कर्मचाऱ्यांच्या घरांचा प्रश्न बरेच वर्ष लोंबकळत पडला आहे. वांद्रे येथील सरकारी वसाहतीचा भूखंड 97 एकरचा असून त्या भूखंडावरील इमारतींचा पुनर्विकास करण्याचा प्रयत्न मागील शासनाने केला होता. आज त्या वसाहतीमध्ये अंदाजे 5500 कर्मचारी रहात आहेत. ही वसाहत 50 वर्षापूर्वी बांधण्यात आली असून आज तेथील इमारतींची दुरवस्था झालेली आहे. अनेक इमारती पडायला आलेल्या आहेत, केव्हाही अपघात होऊन जीवितहानी शकते अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. राज्य शासनाने मुंबईमध्ये 1995 पासून राहणाऱ्या झोपडपट्टीवासियांना, फुटपाथवर अतिक्रमणे करून जीवन जगणाऱ्यांना, कचरा वेचणाऱ्यांना मोफत घरे दिली.

नंतर 2वाय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब....

त्यांना एसआरए मध्ये घरे मिळाली. परंतु, शासनाची 30-35 वर्षे सेवा केल्यानंतर त्या निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला वसई-विरार-अंबरनाथ येथे जावे लागते. शासन हे शासकीय कर्मचाऱ्यांचे मायबाप असून ती आपली मुले आहेत. हे शासकीय कर्मचारी आपल्यासाठी घरे शासनाशी वडिलांकडे मागणार नाही तर मग कोणाकडे मागणार आहेत ? त्यांनी घरे मोफत द्यावीत अशी मागणी केलेली नाही. त्यांची मागणी एवढीच आहे की, त्यांना शासकीय दरामध्ये घरे देण्यात यावी. वांद्रे शासकीय वसाहतीचा भूखंड हा 132 एकराचा होता. या भूखंडातील काही भाग एसआरएमध्ये गेला. काही भाग हा माननीय मंत्र्यांच्या शैक्षणिक संस्थांसाठी गेला, न्यायमूर्तींच्या संस्थांसाठी दिला गेला. पण ज्या शासकीय कर्मचाऱ्यांनी निवासी भूखंडासाठी मागणी केली आहे त्यांना त्या भूखंडातील काही भाग देखील देण्यात येत नाही. आपण उद्याच्या उत्तरामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची विनंती मान्य करावी. यासंबंधातील आमची विनंती आम्ही शासनाला यापूर्वीच केलेली आहे. हे शासन शासकीय कर्मचाऱ्यांच्या घराच्याबाबतीत अतिशय जागरूक राहील. आजही पोलीस 180 फुटाच्या घरांमध्ये रहात आहेत आणि पोलिसांनी चांगला परफॉर्मन्स द्यावा अशा प्रकारची आपण अपेक्षा करतो. त्यांच्या घराचे छत रात्री कधी पडू शकेल याची त्याला गॅरंटी नाही. मराठी माणूस मुंबईत ठेवायचा म्हणजे कोणाला ठेवायचे ? सरकारी कर्मचारी, महानगरपालिका कर्मचारी, पोलीस, या सर्वांना मुंबईत ठेवले तर मराठी माणूस मुंबईतून बाहेर जाणार नाही असे मला वाटते. त्यांना मुंबईमध्ये ठेवायला काहीच हरकत नाही. जी जागा उपलब्ध आहे ती जागा बिल्डरच्या घशात न घालता या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी वापरली गेली तर त्याचा उपयोग होईल. आज येथे प्रचंड प्रमाणावर जागा उपलब्ध आहे. शासकीय कर्मचारी, महानगरपालिका कर्मचारी, म्हाडा कर्मचारी यांना घरे देण्यासंबंधी शासनाने उदात्त धोरण राबवावे आणि त्यांना मुंबईमध्ये सामावून घ्यावे.

तिसरा मुद्दा नवी मुंबईतील विमानतळासंबंधातील आहे. हा प्रकल्प अनेक वर्षापासून रखडलेला आहे. यासंबंधातील परवानग्या ताबडतोब देऊन तो प्रकल्प सुरू करावा. या प्रकल्पावर अन्य उद्योग अवलंबून आहेत. या प्रकल्पामुळे वसाहती उभ्या राहणार आहेत. त्यांना देखील विलंब होत आहे. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब....

केंद्र शासनाने 65 स्मार्ट सिटी उभारण्याचे धोरण आखले आहे. त्या कुठे कुठे होणार आहेत, त्यासाठी राज्य शासन किती भागभांडवल देणार आहे, यात राज्य शासनाचा किती पुढाकार आहे या सर्व गोष्टींचा खुलासा व्हावा. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शासनाचे धोरण दाखविण्यात आले आहे. हे धोरण समाजाला एक पाऊल पुढे घेऊन जाणारे आहे. त्याचे मी समर्थन करतो आणि माझे भाषण जास्त वेळ न लांबवता येथेच थांबतो. धन्यवाद.

....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अजून किती वेळ यावर चर्चा होणार आहे ?

उप सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आपणाला आजच पूर्ण करावयाची आहे. उद्या सकाळी 11.00 वाजता माननीय मुख्यमंत्र्यांचे यावर उत्तर होणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण उद्या सकाळी विशेष बैठक घेऊन सन्माननीय सदस्यांना यावर बोलण्यास अनुमती द्यावी.

उप सभापती : जी नावे माझ्याकडे आहेत त्यांचीच भाषणे आता होणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी भाषणाला सुरूवात करावी.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आपण सर्वांनी चर्चा केली आहे. या अभिभाषणाचे काही सन्माननीय सदस्यांनी अभिनंदन केले आहे, तर काही माननीय सदस्यांनी खेद आणि खंत व्यक्त केला आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणाची सुरूवात माझ्या शासनाने आपली सुरूवात अत्यंत उत्साहाने केली आहे या वाक्याने केली आहे. माझे सरकार असा उल्लेख माननीय राज्यपालांना करण्याचा अधिकार आहे काय असा माझा सवाल आहे. यामध्ये दोन भाग आहेत. माझे सरकार हा शब्द प्रयोग माननीय राज्यपालांनी वापरला आहे. या सरकारमधील दोन्ही पक्ष एकत्रितपणे काम करत आहेत काय असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. आताच येथे शिवस्मारकाच्या परवानगीसबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी केला आहे. पण मला आता येथे सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे दिसत नाहीत. आम्ही सर्व परवानग्या आणल्या आहेत, जे काम आधीच्या सरकारला जमले नव्हते ते काम आम्ही केले आहे, आता लवकरात लवकर हे स्मारक होणार आहे असा उल्लेख करण्यात आला आहे. हे एकून आम्हाला फार आनंद झाला. शिवजयंती आपण वर्षानुवर्षे आनंदाने साजरी करतो. पण त्याची एकच तारीख आहे काय ? भाजपचे मंत्री म्हणतात की, सरकारी तारीख 19 फेब्रुवारी असल्यामुळे त्या दिवशी शिवजयंती साजरी करू या. पण दुसऱ्या पक्षाचे माननीय मंत्री म्हणतात की, आम्ही तिथीनुसार शिवजयंती साजरी करणार. आपण एक तारीख निश्चित करणार नसाल तर मग ते स्मारक करून काय फायदा आहे. तेव्हा माझे शासन असा त्यांना उल्लेख करता येऊ शकतो काय ? हा मुद्दा आपल्याला लागणार आहे याची मला कल्पना आहे. त्यामुळे आपण मला बोलू द्यावे. शिवजयंती सारखा उत्सव दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन साजरा केला तर मराठी बांधव मुंबईतच राहतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

दुसरा प्रश्न अणु ऊर्जेचा आहे. आज देशाला अणु ऊर्जेची गरज आहे. या देशाचे पंतप्रधान म्हणतात की, हा प्रकल्प होणार आहे. दुसरे म्हणतात की, आम्ही हा प्रकल्प होऊ देणार नाही. रत्नागिरीमध्ये असलेले ऑफिस आम्ही बंद करणार आहोत. आपण कधी तरी एकत्र यावे. आपण दोघे एकत्र येणार नसाल तर मग माझे शासन आपण कसे काय म्हणू शकता. हे माझे शासन होऊच शकत नाही. यात अ आणि ब अशी दोन शासन आहेत. त्यांनी जर हे अभिभाषण दिले असेल तर त्यावर आपल्याला चर्चा करता येणार नाही. तेव्हा पहिल्यांदा एकच शासन आहे काय हे ठरले पाहिजे. एक शासन असेल तर ते राज्यपाल मानत आहे काय ? आज मुंबईचे लचके तोडले जात आहेत. आताच माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी फार चांगले भाषण केले असून ते मला आवडले. आज मुंबईचे लचके तोडले जात आहेत. त्यासाठी आपण एकत्रित होणार आहात काय ? त्यासाठी एक शासन म्हणता आले तर ती गोष्ट फार चांगली होईल.

अन्न सुरक्षा कायद्यासाठी केंद्र शासन मदत करणार आहे. अन्न सुरक्षा बिल आणून त्यावर चर्चा झाली. कृषी मंत्री हे पद माननीय श्री.शरद पवार साहेबांकडे देखील होते. त्यांनी जेव्हा ही योजना आणली त्यावेळी 5 ते 7 रुपये किलोने धान्य मिळत होते. आता आपले सरकार आल्यानंतर ते धान्य 15, 17, 18 रुपयांनी खरेदी करावे लागत आहे. महाराष्ट्रात या योजनेचा फायदा घेणारे 1 कोटी 60 लाख लोक आहेत. त्यात मुंबईतील 60 ते 70 लाख लोक आहेत. त्यांना या योजनेचा फायदा मिळत होता. यासाठी मागील शासन 120 कोटी रुपये भरत होते. पण ते भरण्याचे आपण आता बंद केले आहे. हे 120 कोटी रुपये वाचविण्यासाठी आपण अनुदान किती महिन्यामध्ये बंद केले आहे ? शासन आल्यानंतर ही योजना आपण एक वर्षभर तरी चालवायला पाहिजे होती. आपल्याला सत्तेवर येऊन चार-पाच महिने झाली नाही तोवर आपण ही योजना बंद करून त्यावरील 120 कोटी रुपयांवर डल्ला मारला आहे. या अभिभाषणामध्ये आपण म्हणता की, माझ्या शासनाने केलेली चांगली कामे. ही कामे चांगली कशी काय असू शकतात ? गरिबांना मिळणारे अन्न आपण काढून घेतले आहे. यासाठी लागणारी सबसिडी आपण देत नसाल तर हे शासन चांगले आहे असे आपण कसे काय म्हणू शकता. धूळफेक किती असावी ? R&D करून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते.)

श्री.किरण पावसकर...

काही तरी नवीन प्रोडक्ट बनविता येते. आपण कोणतेही नवीन प्रोडक्ट बनवू शकत नाही. आपण फक्त जाहिरातबाजी करून विकत आहात. ते विकण्याचे काम आपण चांगले केले म्हणून आपण सरकारमध्ये येऊन बसला आहात असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. आपण टोलमुक्त, एलबीटी मुक्त महाराष्ट्राची घोषणा केली आहे. एवढेच नव्हे तर स्वतंत्र विदर्भाची देखील घोषणा केली आहे. आपण जनतेचे 120 कोटी रूपये खाल्ले आहेत. असे एक नाही अनेक प्रकार सांगता येतील. त्या दिवशी खरोखरच वाईट वाटले. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना देखील वाईट वाटेल.

सभापती महोदय, शिव आरोग्य योजना राबविण्यात आली.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, मेळघाटमध्ये शिव आरोग्य योजना राबविण्यात आली, ही अतिशय चांगली योजना आहे. माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत तेथे काम करीत आहेत. मी त्यांना आमदार म्हणून काम करताना पाहिले आहे. मेळघाटमध्ये काम करीत असताना त्यांच्या डोक्यात ही कल्पना आली. त्यानंतर त्यांनी ही योजना राबविली. पण त्यांचा सहकारी पक्ष सांगत आहे की, "हा कार्यक्रम त्यांच्या सरकारचा नसून तो एका पक्षाचा कार्यक्रम आहे." आज स्वाईन फ्लू आजाराने कित्येक जणांचा मृत्यू झालेला आहे. राज्यातील जनतेच्या आरोग्यासाठी आपण कोणत्या उपाययोजना राबविणार आहात ? शिव आरोग्य योजनेमध्ये सरकार म्हणून दोन्ही पक्षांनी भाग घेतला असता तर आपले काय नुकसान झाले असते ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, शिवसेना पक्षाने हा कार्यक्रम प्रथम राबविला नंतर तो राज्य शासनाला दिला. माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणात या योजनेचा उल्लेख केला. त्यामुळे हे दोन वेगवेगळे विषय नाहीत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझ्याकडे या संदर्भातील कात्रणे आहेत. हा सरकारचा उपक्रम नाही. ही योजना एका पक्षाची आहे असे सांगण्यात आले. या विषयावर अजून आपले एकमत झालेले नाही. आपण ते सांगितल्याबद्दल आपणास धन्यवाद देतो. माझी चूक सुधारल्याबद्दल आपणास धन्यवाद देतो. त्यावेळी एक विचार होता, यावेळी एक विचार आहे, अजून आपल्यामध्ये एकमत झालेले नाही. "शिव आरोग्य योजने"वर एकदाचे एकमत करावे. महाराष्ट्रातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी एकमतावर यावे. आपण यावर एकमत केले तर मला खात्री आहे की, स्वाईन फ्लू आजारामुळे जेवढे लोक दगावले ते यापुढे दगावणार नाहीत याची तरी आपण काळजी घ्यावी. माझे ते सर्व जुने मित्र आहेत, त्यांना हे सर्व झोंबण्यासारखे आहे. त्यांना ते थोडे झोंबणार आहे. त्यांना झोंबले असेल तर त्यांनी मलम लावून थोडी फुंकर घालावी.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात "मेक इन महाराष्ट्र" असा उल्लेख आहे. महाराष्ट्राची आर्थिक राजधानी मुंबई आहे. ज्याची कष्ट करण्याची तयारी आहे तो कधी उपाशी राहणार नाही, अशी या आर्थिक राजधानीची ख्याती आहे. अशा या मुंबईला संयुक्त महाराष्ट्रामध्ये ठेवण्याचे काम 105 हुतात्म्यांनी केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर हे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

सभागृहात छातीवर हात मारुन 105 हुतात्म्यांसाठी आवाज देणाऱ्यांपैकी एक होते. मी त्यांना सभागृहात बोलताना पाहिलेले आहे. या 105 हुतात्म्यांनी कशासाठी मुंबई मिळविली ? मुंबईतून सर्व उद्योगधंदे बाहेर काढण्यासाठी मुंबई मिळविली का ? मुंबईतून उद्योगधंदे बाहेर जाणार असतील तर त्या ठिकाणी काम करणारा मराठी माणूस आणि पक्षासाठी छातीवर हात मारुन बोलणारे नेते गेले कुठे ?

सभापती महोदय, पालघर येथे होणारा कोस्ट गार्ड हब पोरबंदरला गेला. पालघर महाराष्ट्रामध्ये आहे. आपण तो प्रकल्प थांबविण्यासाठी काही तरी प्रयत्न करु शकला असता. कोस्ट गार्ड हब येथे झाला तर उद्योगधंदे वाढतील. पण आपण त्या विरोधात एक अवाक्षर बोलला नाहीत. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी हुतात्मा चौकात 105 हुतात्म्यांना आदंराजली वाहण्यासाठी जाल तेव्हा आपण त्यांना काय सांगणार ?

सभापती महोदय, रिझर्व्ह बँकेचे मुख्यालय हलविण्याचे काम सुरु आहे. आरबीआयमध्ये आपलीच युनियन आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते मला देखील पटत आहे. माझ्या मनात एका गोष्टीचा संशय आहे की, माननीय पंतप्रधान श्री.मोदी साहेब बारामतीला गेले होते त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही श्री.शरद पवार साहेबांच्या सल्ल्याने सरकार चालवितो. मग असा प्रश्न निर्माण होतो की, त्यांना हा सल्ला कोणी दिला ? आपण या सर्व बातम्या वर्तमानपत्रात वाचल्या असतील.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हब ही काही इंडस्ट्री नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, कोस्ट गार्ड हबचे कामकाज काय आहे, त्याचा काय विपरीत परिणाम होईल या विषयावर मी जास्त चांगले बोलू शकेन. रिझर्व्ह बँकेचे मुख्यालय हलविण्याचे काम सुरु आहे. ते हलविल्यास तेथे काम करणारे असंख्य कर्मचारी मुंबई सोडून जातील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, न्हावा-शेवा येथील 60 टक्के व्यवसाय हा पोरबंदरला गेलेला आहे. त्याबद्दल कोणी आवाज उठविलेला मला आठवत नाही. आपल्याकडे न्हावा-शेवा पोर्ट चांगले चालावे असे वाटत असेल तर त्या ठिकाणी काय काय योजना करावयास पाहिजे होत्या यावर आपण विचार करु शकला असता. पण आपण तो विचार केलेला नाही.

सभापती महोदय, मुंबईतील हिरे बाजार गुजरात राज्यात चालला आहे. सिप्झमधील उद्योगधंदे हळूहळू कमी होत चालले आहेत. सिप्झमध्ये एकही कर्मचारी कायम स्वरूपी नोकरी करीत असल्याचे दिसणार नाही. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब आपल्या अखत्यारीत तो भाग येतो. आपण तेथे जाऊन पाहणी करु शकता. सिप्झमध्ये उद्योगधंदे कसे ओस पडले आहेत हे आपण पाहू शकता आणि सूरत येथे हिरे व्यवसाय कशा पद्धतीने सुरु आहे हे देखील पाहू शकता. आपण दोन्हीमधील फरक लक्षात घ्यावा. तेव्हा आपण 105 हुतात्म्यांना काय उत्तर देणार आहात ? आपण सरकारमध्ये आहात, आपण त्याविरुद्ध आवाज उठवू शकता. भाई आपण काही तरी करु शकाल अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, एअर इंडियाची 22 मजल्याची इमारत आहे. आपल्या इमारती समोर ती इमारत आहे. या इमारतीमधील फक्त तीन मजले एअर इंडियाकडे आहेत. अन्य सर्व मजले भाड्याने दिलेले आहेत. एअर इंडियाचे हेड ऑफीस दिल्लीला नेले आहे. मराठी लोकांना नोकऱ्या मिळण्यासाठी त्या एअर इंडिया बिल्डींगमध्ये शिवसेनाप्रमुख स्वत: आले होते. त्या इमारतीमधील मजले भाड्याने दिले जातात, पण आपण ते थांबविण्याचा प्रयत्न केला तर ते चालले असते. या सर्व गोष्टी घडत असतील तर आपणास विचारावे लागेल की, "कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र " ज्या जाहिरातीवर आपण मते मिळविली तो महाराष्ट्र कुठे नेऊन ठेवला आहे ? आपण महाराष्ट्राच्या आर्थिक राजधानीचे तुकडे करायला निघालात. आर्थिक राजधानी मोडकळीस आली तर राज्याचे काय होणार आहे, राज्य कशा पद्धतीने चालणार आहे ? तिजोरीमध्ये खडखडाट आहे असे बोलून आपणास चालणार नाही, तर त्यावर आपणास काहीतरी उपाययोजना करावी लागेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, "मुंबईचा आराखडा चुलीत घाला" असे वक्तव्य एका पक्षप्रमुखांनी केले. मुंबईचा आराखडा प्रशासनाने बनविला. या प्रशासनावर त्यांची 18-20 वर्षे पकड आहे. मग या 18-20 वर्षामध्ये आपण काय करीत होता, असे असंख्य प्रश्न निर्माण होतात.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे. तो आराखडा अजून चर्चेला आलेला नाही. तो आता सबमिट झालेला आहे. त्यावर सजेशन्स आणि ऑब्जेक्शन्स येतील. सभागृहात चर्चेला येईल त्यावेळी सत्तेमध्ये असणारा पक्ष आपली भूमिका मांडेल. जर तो आराखडा लोकांच्या हिताचा नसेल तर तो आराखडा चुलीत घाला, असे आदेश यापूर्वीच दिलेले आहेत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, त्यासाठी चूल लागेल, ती चूल आपल्याकडे नसेल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, त्याची काळजी त्यांनी करु नये. ती काळजी आम्ही करु. आराखडा कशा पद्धतीने आणला जातो, कशा पद्धतीने तो मंजूर केला जातो याची प्रोसिजर त्यांनी समजून घेतली पाहिजे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेची भ्रष्टाचाराची असंख्य प्रकरणे मी या सभागृहात काढलेली आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर बोलत असताना सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब मध्येच बोलले. मुंबईच्या डेव्हलपमेंट प्लॅनच्या बाबतीत जो विषय सभागृहात सांगण्यात आला तो अगोदरच माननीय श्री.उध्दव ठाकरे यांना कळला असता तर नक्कीच या बाबतीत ते जे बोलले, ते बोलले नसते आणि त्यावर दोन्ही सभागृहात चर्चा झाली नसती.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, लोकांना 300 फुटांच्या घराऐवजी 400 फुटांचे घर मिळत नाही. श्रीमंत व्यक्तींचे चोचले पुरविले जातात, पण गरीब माणसांसाठी काही केले जात नाही. या ठिकाणी मी काही बड्या लोकांची नावे सांगितली होती. अनेकांनी शासनाकडून जमिनी घेऊन क्लब सुरु केले आहेत. मग त्यामध्ये आमदार, खासदार असतील, त्यांनी जमिनी कशा बळकावल्या आहेत या बाबत मी सभागृहात बोललो आहे. सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम हे सभागृहातून जात आहेत. ते जर सभागृहात थांबले असते तर बरे झाले असते किंवा न्याय मिळाला असता. यामध्ये महालक्ष्मी रेसकोर्स असेल....'चुलीत घाला' या शब्दातून मी थोडा बाहेर येतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी 'माझे शासन' अशी सुरुवात केली. शिवसेना आणि भाजपा यांच्यामध्ये एकमत नाही, असे त्यांनी सांगितले. मी त्यांना सांगेन की, आपण आत्मपरीक्षण करुन घ्यावे. दोन्ही पक्षात एकमत होत नाही याला कोण जबाबदार आहे, या बाबत त्यांनी आत्मपरीक्षण करावयास पाहिजे. यामध्ये मिठाचा खडा कोण टाकतो, या दोन पक्षांना एकत्र कोण येऊ देत नाही, हे त्यांनी आपल्या नेत्यांना विचारुन बघावे.

श्री.किरण पावसकर : महोदय, राजकीय भाषण न करता एवढे सांगतो की, मुंबईच्या डेव्हलपमेंट प्लॅनचे आमच्याकडे प्रेझेंटेशन झाले. महालक्ष्मी रेसकोर्स असेल, राणीची बाग असेल, या गोष्टी मूळ जागेवरुन काढल्या जात आहेत असा मनात संशय येतो. आपण सत्ताधारी म्हणून बसायचे आणि मोक्याच्या जागा बाहेर काढायच्या. परंतु सांगताना वेगळे सांगायचे आणि करताना वेगळे करायचे. असे केल्याने कोणाच्याही मनात संशय येईल. असे संशयाचे वातावरण सर्वांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

मनात तयार झाले आहे. हे संशयाचे वातावरण मुंबईच्या डी.पी. मधून बाहेर येत आहे. डेव्हलपमेंट प्लॅनची 100 टक्के अंमलबजावणी होते असे मी म्हणणार नाही. आज केवळ डेव्हलपमेंट प्लॅन बाहेर आला आहे. पण एका पक्षाचे प्रमुख आणि जे महापालिका चालवितात तेच म्हणतात की, मुंबईचा डेव्हलपमेंट प्लॅन चुलीत घाला. पण सध्या चुली शिल्लक नाहीत. हा डेव्हलपमेंट प्लॅन तुमचा आहे, राणीची बाग तुमची आहे आणि महालक्ष्मी रेसकोर्स सुध्दा तुमचेच आहे. या निमित्ताने मी विचारतो की, डेव्हलपमेंट प्लॅन चुलीत घाला हे फक्त सांगण्यासाठी आहे की याचा वापर दुसरेच काही करण्यासाठी आहे ?

सभापती महोदय, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर म्हणाले की, पर्यटनाला चालना मिळाली पाहिजे. काही राज्ये पर्यटनाच्या माध्यमातून महसूल गोळा करीत आहेत. मग ते गोवा राज्य असेल किंवा केरळ राज्य असेल. निसर्गाने कोकणाला भरभरून दिले आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला आहे. पण तिकडे सुधारणांच्या नावाने मात्र खणखणाट आहे. यासाठी वेगळे काही केले तर जी नैसर्गिक देण आहे तिला पर्यटनामध्ये स्थांतरित करून राज्याच्या तिजोरीत चार पैसे आणू शकतो. पण त्यासाठी आपल्या विचारांना चालना द्यावी लागेल. विचारांना चालना द्यावयाची असेल तर त्यासाठी चांगले विचार डोक्यात असावयास पाहिजेत. पर्यटनाला चालना देण्याबाबत माझे शासन अमुक अमुक करेल, असे अभिभाषणात नमूद केले आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी असल्यामुळे आपण तीर्थक्षेत्रांना मानतो. असो.

महोदय, मी एक प्रसंग सांगेन. त्यामध्ये जी वाक्ये लिहिली आहेत त्यावरून आपल्याला दुजोरा मिळेल. 15 जानेवारीला नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात भगवानगडाचे दर्शन घेण्यासाठी माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे हे तेथे गेले होते. त्यांच्या दर्शनाचा कार्यक्रम होत असताना त्यांच्यावर पूर्वनियोजित हल्ला करण्यात आला. पूर्वनियोजित यासाठी म्हणतो की, एक-दोन लोकांकडून हल्ला झाला असता तर समजू शकतो, पाच माणसांकडून झाला तरी कळविता येतो. पण 100 लोकांकडून हल्ला झाला असेल तर तो पूर्वनियोजितच असेल, असे वकील सुध्दा म्हणतात. माननीय विरोधी पक्षनेत्यांवर पूर्वनियोजित हल्ला झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

माननीय मुख्यमंत्री तेथे कार्यक्रमाला गेले. पत्रकारांनी माननीय मुख्यमंत्र्यांना झालेल्या हल्ल्याबाबत विचारूनही त्यांनी साधी खंत व्यक्त केली नाही. या राज्याचे गृह मंत्रीपद माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. ते या बाबत काय उत्तर देणार आहेत ? आज त्या हल्ल्याबाबत कोणावरही कारवाई झाली नाही. गृह विभागाने त्याची काय दखल घेतली हे सुध्दा माहीत नाही आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या बाबत उत्तरही दिलेले नाही. पण हे सरकार आल्यानंतर विरोधी पक्ष नेत्यांवर हल्ला करण्याची जी प्रथा आणि परंपरा आहे ती आपल्याला कोठेतरी बंद करावी लागेल. माननीय श्री.छगन भुजबळ साहेब विरोधी पक्ष नेते असताना त्यांच्यावर मंत्रालयासमोरील बंगल्यावर हल्ला झाला. ते बंगल्यात नव्हते म्हणून नशिबाने वाचले. पण विरोधी पक्ष नेत्यावर हल्ला करण्याची जी प्रथा आहे ती या पक्षाचे सरकार आल्यावरच का सुरु होते हे शोधणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. अशा प्रकारे हल्ला होण्याची प्रथा हे सरकार मोडणार आहे का, या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी उद्या उत्तरात सांगावे. कारण तत्कालीन विरोधी पक्ष नेत्यांवर हल्ला झाला, आता माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला. उद्या ते पुन्हा एकटे दर्शनासाठी गेले तर त्यांच्यावर हल्ला होईल किंवा काम करताना त्यांच्यावर हल्ला होईल. त्यामुळे आपण ह्या प्रथा, परंपरा मोडणार आहात काय ? तसेच ज्यांनी हा हल्ला घडवून आणला त्यांना अद्दल घडविण्यासाठी किंवा या राज्यात कायदा व सुव्यवस्था अस्तित्वात आहे हे दाखविण्यासाठी आपण या बाबतचा उल्लेख उत्तराच्या भाषणात कराल, अशी मी अपेक्षा करतो. महोदय, या चर्चेवर बोलण्यासाठी जास्त वेळ दिला असता तर अनेक गोष्टी सांगता आल्या असत्या.

महोदय, या निमित्ताने एवढेच सांगतो की, या अभिभाषणाबद्दल खेद आणि खंत व्यक्त करतो, हे 'माझे शासन' होऊ शकत नाही. हे दोन शासन पॅरलल चालले आहेत. या दोन शासनाचे पुढच्या वर्षापर्यंत एक शासन करा, अशी मी विनंती करतो किंवा यावर आपण पर्याय शोधून काढाल, अशी मी अपेक्षा करतो आणि येथेच थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आता रात्रीचे 8.00 वाजले आहेत. उद्या सकाळी 11.00 वाजता बैठक सुरु करण्याचा निर्णय होत आहे. या चर्चेवर अजून 7-8 सन्माननीय सदस्य बोलायचे राहीले असतील. मला वाटते उद्या त्यांना 5-5 मिनिटे बोलण्याची संधी दिली तर बरे होईल आणि ही सर्व सभागृहाची विनंती आहे.

तालिका सभापती : माननीय सभापतींनी जो निरोप दिला होता तो मी सांगत आहे. परंतु आपण केलेल्या विनंतीबाबत माननीय सभापतींना विचारून घेतो. तोपर्यंत एक-दोन वक्त्यांची भाषणे होऊ द्यावीत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सूचना मांडली होती की, रात्री 8.00 वाजेपर्यंतच सभागृह सुरु ठेवावे आणि ही चर्चा दुसऱ्या दिवशी सकाळी सुरु करावी. उद्या सकाळी 11.00 वाजता सभागृह सुरु करावे. आमच्या पक्षाकडून चार सदस्य बोलणार आहेत. या चर्चेवर मोजकेच पाच-सहा सदस्य बोलायचे राहतील. त्यांची भाषणे झाल्यानंतर पुढील कामकाज सुरु ठेवावे. या बाबत सर्वांचे एकमत आहे, असे आपण माननीय सभापतींना कळवावे.

तालिका सभापती : माननीय सभापतींना निरोप पाठविला आहे. त्यांच्याकडून संदेश आल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्याठी उभा आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण सरकारने तयार केलेले असते आणि तेच माननीय राज्यपाल वाचून दाखवितात. मला वाटते की, शासनाने दिलेल्या आश्वासनांचा समावेश यामध्ये असला पाहिजे. जनतेला देण्यात येणाऱ्या जाहिरनाम्याचा उल्लेख यामध्ये असला पाहिजे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना ऑन लेग ठेवावे आणि सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठक सुरू करावी.

(अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

तालिका सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांचा विचार लक्षात घेता उद्या सकाळी 10.00 ते 11.00 वाजेपर्यंत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण झाल्यावर साधारणपणे सकाळी 11.00 ते दुपारी 12.15 वाजेपर्यंत माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर होणार आहे. आज आपल्याला सन्माननीय सदस्यांची भाषणे संपवायची होती.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक 13 मार्च, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. सकाळी 10.00 ते दुपारी 12.15 वाजेपर्यंत उत्तरासहित चर्चा पूर्ण होईल आणि दुपारी 12.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 08 वाजून 01 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 13 मार्च, 2015 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION